# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ५०** **दि. ०७/०७/२०२३**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.०७/०७/२०२३ शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | सोनवणे अश्विन शांताराम | सोनवणे सुरेखा सुदाम |
| नेरकर सरिता अनंत | पाटील सचिन भिमराव | पाटील राजेंद्र झिपरु |
| पोकळे दिलीप बबनराव | पाटील प्रतिभा सुधीर | महाजन सुनिल सुपडू |
| खान रुकसानाबी गबलु | पाटील चंद्रशेखर शिवाजी | नाईक प्रशांत सुरेश |
| सोनवणे कांचन विकास | देशमुख प्रतिभा गजानन | आहुजा मनोज नारायणदास |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | पाटील विजय पुंडलिक | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| शिंदे गायत्री उत्तम | सोनवणे सुरेश माणिक | सोनार रंजना विजय |
| बाविस्कर किशोर रमेश | बारी शोभा दिनकर | खडके विश्वनाथ सुरेश |
| सपकाळे मिना धुडकु | शेख हसीनाबी शरीफ | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सपकाळे रंजना भरत | भिल पार्वताबाई दामु | शेख सैईदा युसुफ |
| कोल्हे प्रविण रामदास | बरडे नितीन मनोहर | पटेल इब्राहिम मुसा |
| सनकत चेतन गणेश | बेंडाळे उज्वला मोहन | सोनवणे निता मंगलसिंग |
| भंगाळे विष्णु रामदास | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे विक्रम किसन |
| सोनवणे राखी शामकांत | जोशी अनंत हरिश्चंद्र | भापसे जिजाबाई अण्णासाहेब |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | तायडे सुरेखा नितीन | **स्विकृत सदस्य** |
| काळे अमित पांडुरंग | चव्हाण ज्योती बाळासाहेब | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| चौधरी मंगला संजय | मराठे जितेंद्र भगवान | राजेंद्र नारायण मराठे |
| ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | महेश रतन चौधरी |
| सोनवणे धीरज मुरलीधर | पाटील रेखा चुडामण | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, नगररचनाकार श्री.अशोक करवंदे, नगरसचिव तथा सहा.आयुक्त, श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त श्री.गणेश चाटे, मुख्यलेखाधिकारी श्री.चंद्रकांत वानखेडे, सहा.आयुक्त(आरोग्य विभाग) श्री.उदय पाटील, शहर अभियंता, श्री.चंद्रकांत सोनगिरे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**नगरसचिव :-** नमस्कार, सर्व सन्मा.सभागृहाचे स्वागत आहे. सर्व सन्मा.सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी वंदे मातरमसाठी उभे राहावे.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता १) सन्मा.सदस्या सोनवणे भारती कैलास २) काळे दिपमाला मनोज ३) कोल्हे सिंधु विजय ४) सन्मा.सदस्य कापसे मयुर चंद्रकांत ५) कोल्हे ललित विजय ६) खडके सुनिल वामनराव यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११५० पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.कुलभुषण विरभान पाटील, मा.उपमहापौर | जळगांव शहर महानगरपालिकेच्या विदयमान सदस्या, सौ.पार्वताबाई दामु भिल यांच्या मातोश्री कै.श्रीमती विमलबाई बाबु भिल यांचे दुख:द निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११५१ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | श्री.मनोज नारायणदास आहुजा<br>सौ.रेश्मा कुंदन काळे | जळगांव शहर महानगरपालिकेच्या माजी महापौर तथा सन्मा.सदस्या,सौ.सिमा सुरेश भोळे यांचा आज दिनांक ०७/०७/२०२३ रोजी वाढदिवस असल्यामुळे त्यांचे सभागृहातर्फे हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने हे सभागृह अभिनंदन करीत असुन त्यांचे उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.अश्विन सोनवणे:-** महापौर महोदया, सभा चालु झाली का ? सभा चालु हाण्याआधी पहिले बोलायचे आहे.

**मा.महापौर :-** बोला, बोला. सभा सुरु होईल त्याच्या अगोदर आपण बोला.

**श्री.अश्विन सोनवणे:-** आपल्या देशाचे पंतप्रधान मा.श्री.नरेंद्रजी मोदी यांनी काही वर्षापुर्वी स्वच्छ भारत अभियानांतर्गत आपल्या जळगांव शहराला ७५ कोटीचा निधी प्राप्त झालेला होता. पण हाच निधी आपल्याला पाण्यात जातांना दिसत आहे. जळगांव शहरात कुठेही साफसफाई होत नाही. कचरामुक्त जळगांव शहर असे नसुन हे कचरा युक्त जळगांव शहर झालेले आहे. संपुर्ण शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग दिसत आहे. जवळ जवळ २२० टनाचा तो मक्ता होता आणि आज जागेवर ३०० टन कचरा येत आहे. हा येतो कुठुन? २२० टनाचा जर आपल्या जळगांव शहराचा मक्ता आहे. तर ३०० टन कचरा येतो कुठुन ? आणि ३०० टन जर कचरा तुम्ही उचलत आहात रोज मग जळगांव शहरात कचऱ्याचे ढीग दिसतात कसे काय ? याचे कारण काय ? ठिकठिकाणी मक्तेदार जळगांव शहरात माती, वेस्टमटेरियल उचलुन वजन करीत आहे. आणि कचरा जसाचा तसा दिसत आहे. आता पावसाचे दिवस आहे याच्याने दुर्गंधी होते. रोगरायी वाढु शकते. त्यानंतर त्यांनी आपले ४०० कामगार लावले होते. त्या ४०० कामगारांना किमान वेतन कायद्याप्रमाणे रु.५४०/- रोज द्यायचे होते. त्याप्रमाणे त्यांना दर महिन्याला रु.१८००० /- मिळाले पाहिजे. पण मक्तेदार त्यांना ८०००-९००० च देत आहे. बाकीचे पैसे तो स्वत: ठेवत आहे.साफसफाई कुठेच दिसत नाही. आपले वाहने खराब आहे, स्किपलोडर खराब राहते. कधी घंटागाडी खराब राहते. कॉम्पॅक्टर खराब राहतो. मग इतका कचरा उचलला कुठुन जात आहे. आयुक्त महोदयांनी उत्तर द्यावे याच्यावर. इतका कचरा कसा काय दिसत आहे शहरामध्ये.का उचलला जात नाही. अटीशर्तीचा तो भंग करत नाही का ? अटीशर्तींचा तो भंग करत आहे. कामगारांना त्याने ओळखपत्र दिले पाहिजे,ड्रेसकोड दिले पाहिजे, गमबुट दिले पाहिजे. ते काहीही दिसत नाही.पावसाळयाचे ते पावसात काम करत आहे.

त्याच्यानंतर अजुन एक गोष्ट अशी कानावर आली की, त्यांनी परस्पर महासभेची परवानगी न घेता एम.आय.डी.सी. परिसर जोडला. त्याच्यामध्ये त्याला १० लाख जवळ जवळ रुपये वाढुवुन दिले. मग इतके पैसे त्याला आपण वाढुवुन देतो आहे. पहिले ते रु.९५०/- होते ते आता रु.१०५४/- झाले, त्याचे पैसे त्याचे पेमेंट तो पुर्ण घेतो आहे. पुर्ण पेमेंट आपण कामगारांना देतो पण कामगार कामावर येत नाही. मग आता हे कचरा मुक्त शहर केव्हा होणार. मला आज याचे उत्तर पाहिजे. जर कचरामुक्त शहर नाही झाले, तर आम्ही येथे दालनात उपोषणाला बसणार आहे महापालिकेच्या येथे. उत्तर द्या मॅडम.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** दोन दिवसापासुन हा व्हिडीओ आलेला आहे. याच्यावर काय कार्यवाही करण्यात आली ते सांगा.

**मा.महापौर :-** तो व्हिडीओ टाकुन द्या तुम्ही मॅडमांना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आला आहे ना सर्वांना आलेला आहे.

**मा.महापौर :-** मॅडमांनी बघितलेला नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** काय आहे ते ? माती भरत आहे त्याचेच व्हिडीओ आहे का ? वेस्टमटेरिअल भरला जातो मॅडम.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** याच्यावर काय कार्यवाही केली सांगा.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** सन्मा.महापौर, सन्मा.सभागृह जळगांव शहराचा साफसफाईचा मक्ता वॉटरग्रेस यांना दिलेला आहे. सरासरी आपल्या डी.पी.आर. मध्ये २५० टन.

**श्री.अश्विन सोनवणे :-** २२० टन.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** ते सुधारीत झाल्यानंतर २५० टन केले ते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ठिक आहे, २५० टन मग हे ५० टन कुठुन वाढले तुमचे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** ज्यावेळेला मक्ता दिला होता त्या वेळेला २५० टन असे म्हटले होते. गेल्या ३.५ वर्षांमध्ये.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यात कचरा वाढला आहे असे तुमचे म्हणणे आहे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** दर वर्षी कचरा वाढ ही अपेक्षित असते. त्या अनुषंगाने कचऱ्यामध्ये ३०० टनापर्यंत वाढ होऊ शकते. परंतु दरम्यानच्या काळामध्ये एम.आय.डी.सी.च्या क्षेत्रामधील साफसफाईचा मक्ता हा बंद झाला होता. त्यावेळी मा.आमदार श्री.राजुमामा भोळे, महापौर,उपमहापौर यांच्या कक्षात या याकचऱ्याच्या अनुषंगाने बैठक झाली होती. तेथे डिमांड केली होती की, तातपुर्त्या स्वरुपात कारण आता पावसाळा आहे. त्यासाठी आपण त्याला मान्यता घेतलेली होती. त्यामुळे जवळपास २५ ते ३० टन कचऱ्याची याच्यात वाढ झालेली आहे. आणि आता एम.आय.डी.सी.ने त्याच टेन्डर पब्लिश केलेल आहे आणि त्यांचे टेन्डर पब्लिश झाल्यानंतर आता पुडच्या महिन्यापर्यंत कार्यादेश देण्यात येतील.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ठिक आहे ३०० टन कचरा झाला पण शहरात कचरा दिसतो कसा काय ? जर ३०० टन तुमच आहे ना. मग उचलला का नाही जात आहे कचरा.कचरा दिसत आहे शहरात, ठिक ठिकाणी कचरा दिसत आहे.आता जयकिसनवाडीत ला जो रस्ता आहे जो रेस्ट हाऊसकडे जातो.त्या रस्त्याने मी कमीत कमी मी ८ दिवसापासुन जात आहे. तो कचरा जसाचा तसा दिसत आहे.आजही तो उचलला गेलेला नाही. याच्यावर काय मग याचे उत्तर द्या.कचरा का उचलला जात नाही शहराचा. ३०० टन तुम्ही सांगत आहे ना की, सर्व कचरा उचलला जात आहे शहराचा असे तुमचे म्हणणे आहे. मग सगळे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग का दिसत आहे. नॅमिनल तुम्ही त्याच्यावर कार्यवाही करत आहे. १०००-५०० त्याला दंड करत आहे. त्याच्याने काय फरक पडत आहे. त्याचे असे २-५ लाख रुपये गेले तरी चालते ना. सरासरी माती भरत आहे, वेस्ट मटेरिअल भरत आहे. आता ईबाभाईंनी व्हिडीओ दाखवला, त्याच्यावर तुम्ही काय कार्यवाही करणार, अटीशर्तीचा उघड उघड भंग करत आहे. तो असे म्हणतो की, खालच्या अधिकाऱ्यापासुन ते वरचे सगळे अधिकारी माझ्या खिश्यात आहे. असा उत्तर देतो असे बोलतो तो लोकांजवळ, कोणी फोन केला की साफसफाईच्या बाबतीत फोनवर तर बोलत नाही.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त(आरोग्य) :-** भाऊ, अशी तर काही माझ्यापर्यंत तक्रार आली नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** शहरात तुम्हाला कचरा दिसत नाही का ? तुम्ही राऊंड घेत नाही का ? तुमचे काम आहे राऊंड घ्यायचे. जिथे कचरा दिसला तेथेच जागी उभे राहचे, तिथल्यातिथे कचरा उचलला गेला पाहिजे. कचरा उचलला जात नाही कारण तो वाहनेच पुरवत नाही. कधी घंटागाडी खराब कधी कॉम्पॅक्टर खराब. कधी स्किपलोडर खराब.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ट्रॅक्टरवाले म्हणतात की, फक्त एक ट्रिप आम्हाला दिलेली आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** एकच ट्रिप मारतात तुम्ही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** एकच ट्रिप कचऱ्याची सांगितलेली आहे. त्यानंतर माती जरी टाकली तर ट्रॅक्टर काटयावर भरतो. एक ट्रिप कचऱ्याची नंतर काहीही करा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** वेस्ट मटेरिअल कुठे पडलेले दिसले तर ते भरतात त्याचे वजन करत आहे तो कचरा दिसतो कसा काय जर तुम्ही म्हणत आहे ना की, उचलला जात आहे. मग कचरा कसा काय दिसत आहे शहरामध्ये ठिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग पडलेले आहे. आणि आता तर पावसाळा आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** अश्विनभाऊचे म्हणणे लक्षात आले का तुमचे. जर ३००-३०० टन कचरा शहरातुन उचलला जात आहे. मग जागेवरती पुर्ण शहर साफ होऊन जायला पाहिजे की, रोज ३०० टन कचरा उचलला जात आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तुम्ही राऊंड मारायला पाहिजे शहरात आणि जागेवरती तो कचरा उचलला गेला पाहिजे.आणि दंड केला पाहिजे त्याला. या नॉमिनल दंडाने काही फरक पडत नाही त्याला. २-५-१० लाखाने काय फरक पडणार आहे.९४९ पैसे आपण त्याला वाढुन दिलेले आहे. त्यात तो ॲडजेस्ट करुन घेईल. आणि माती भरतो तो. ते वजन ॲडजेस्ट करतो तो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रत्येक प्रभागामध्ये ट्रॅक्टरची संख्या पुर्ण नाही मग एवढा कचरा येतो कसा. ट्रॅक्टर सुध्दा नाही पुर्ण तेवढे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ट्रॅक्टर नाही, कधी घंटागाडी खराब, कधी स्कीपलोडर खराब, कधी कॉम्पॅक्टर खराब, तुम्ही पाहिले का ? वाहनांचे इन्सपेक्शन केले का ? खुप खराब परिस्थिती आहे. कुठपर्यंत सहन करायचे ते करा. आम्हाला जळगांव शहर कचरा मुक्त झाले पाहिजे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** भाऊ लोकांचे रात्री १२.०० वाजता फोन / कॉल आलेले आहे. आमची गटार फुल आहे, रस्त्यावर पाणी येत आहे, आमच्या घरात पाणी येत आहे. म्हणजे त्रास नगरसेवकांनी सहन करायचा, पैसे अधिकाऱ्यांनी खायचे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** येथे प्रशासकीय बिल्डींगच्या बाजुच्या गल्लीतच चला आता सगळे,ही खाऊ गल्ली जी आहे ना त्याचा विषय आलेला आहे. तेथे चला आपण उभे राहु शकतो का ?

**श्री.प्रविण कोल्हे :-** महापौरताई १ महिना झाला हे दोन कनटेनर एका ठिकाणी भरवुन पडलेले आहे. आता इतका सडलेला वास येतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पाटील साहेब काय झालेले आहे, प्रशासनाचे मक्तेदारावर नियंत्रण नाही. ज्या पध्दतीने मक्तेदार कामगार पुरवत असेल, माझ्या माहिती प्रमाणे त्या कामगारांची कामे करतांना मोठया प्रमाणावर गळती झालेली आहे. गळती झाल्याचे कारण असे आहे की, ४०० माणसे देण्याएवजी त्याने ३०० च माणसे द्यायचे परंतु त्याने ४०० माणसांची हजेरी लावुनच आपल्याच विभागातले काही कर्मचारी त्यापध्दतीने त्याला मॅनेज करुन किंवा त्याची ॲडजेस्टमेंट करुन तेवढे कामगार कमी घ्यायचे आणि त्या कमी कामगारांचा मोबदला, आपल्या खिश्यात टाकायचा. याच्यामध्ये परिस्थिती कशी आहे. आपण एवढ्या मोठया प्रमाणावरती पैसा खर्च करुन सुध्दा आज आपण बघतो की, सल्लग ४ थ्या वर्षी सुध्दा इंदौरचा संपुर्ण देशात पहिला क्रमांक मिळाला, जे इंदौरला शक्य आहे ते जळगांवला शक्य का होत नाही. परंतु प्रशासनाची मानसिकता जी आहे. ती कुठेतरी उदासिनता दिसुन येते. अन्यथा इतक्या मोठया प्रमाणावर पैसा खर्च करुन नागरीक समाधानी नाही नगरसेवक समाधानी नाही. आणि या सगळयांच्या रोषाला लोकप्रतिनिधींनाच सामोरे जावे लागते. कारण नागरीक कोणत्याही मनपा किंवा प्रशासनाच्या अधिकाऱ्याला कचरा उचलायच्या संदर्भात फोन करत नाही. पथदिवे बंद असतील नगरसेवकांना फोन करतात. गटार जमलेली आहे. प्रशासनाला फोन केला जातो. ही जी

परिस्थिती आहे ती बदलविण्याच्या दृष्टीकोणातुन प्रशासन जोपर्यंत रस्त्यावरती येत नाही. मॅडम आपणास सांगतो, अश्विनभाऊचे वडील आरोग्यधिकारी होते म्हणजे हेल्थ ऑफिसर होते महानगरपालिकेच्या सेवेमध्ये. काही काळ त्यांना सुरेशदादांनी शहराचे आरोग्यधिकारीचा पदभार सोपविलेला होता.त्यावेळेस आम्ही लहान होतो. परंतु त्यांची दहशत इतकी होती. जे आज कामगार, ते कामगार असतील, जे फक्त हजेरी लावुन जातात किंवा त्यांचा पर्यायी माणुस देऊन जातात. सगळे कामगार ७.३० वाजता हातात झाडु घेऊन रस्त्यावरती दिसायचे. आणि अत्यंत चांगल्यापध्दतीने स्वच्छता व्हायची. त्याचे कारण एकच आहे. कुठेतरी प्रशासनाचा दरारा पाहिजे तो प्रशासनाचा दरारा हा कमी झालेला दिसुन येतो आहे. जो पर्यंत प्रशासन रस्त्यावर येऊन पाहणार नाही तो पर्यंत कितीही लाखो रुपये खर्च कराल तरी त्यांचे समाधान आणि त्यातली सत्यता आपल्याला दिसणार नाही. तरी अश्विनभाऊंनी जी सुचना मांडली ती अत्यंत बरोबर आहे की, ठिकठिकाणी कचऱ्यांचे ढीग, गटारींची परिस्थिती तुम्ही बघाल, माझ्याच प्रभागमध्ये, प्रभाग क्र.५ मध्ये संपुर्ण व्यवसायीक परिसर आहे. इतकी वाईट परिस्थिती आहे गटारींची की मी म्हणतो. एक एक ठिकाणी गटारींचे तळ लागले जायचे. ८-१० दिवसात स्वच्छता कर्मचारी जेव्हा काम करायचे अक्षरश: गटारींचा तळ दिसायचा, आज वर्षानुवर्ष होऊन गेले गटारींचा तळच दिसत नाही. त्या गटारी जास्तीत जास्त २ किंवा ३ इंच एवढेच खाली असता. बाकी ९०% गटारी जी आहे ते ॲज इट इज भरलेले असतात. आपण असे म्हणत नाही की कामगार कामच करत नाही. परंतु ज्या इफिशियन्सीने काम व्हायला पाहिजे. तशी इफिशियन्सी दिसुन येत नाही. आणि त्या कारणाने इतका कोट्यावधी रुपयांचा खर्च करुन सुध्दा समाधान लाभत नाही. याबाबत प्रशासनाने गंभिर पाऊले उचलण्याची गरज आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बरेच असे परिसर आहे वेगवेगळया प्रभागातले की, ज्या ठिकाणी साफसफाई झाडु मारणारे पण पोहचत नाही, गटारी काढणारे पण पोहचत नाही. भरपुर परिसर आहे, थोडे फार केले की चालले,

**श्रीमती सरिता नेरकर :-** गटारींच्या आजुबाजुने वड किंवा पिंपळ असतो, हे जरी साफसफाई कामगारांना आपण म्हटले की, बाबा हे काढुन घे, हे आम्ही काढु शकत नाही. ते पुर्ण त्याच्यात गेलले असतात त्यामुळे पाणी अडते. ते सरळ सांगतात की, हे आम्ही काढत नाही. हे आम्हाला चालत नाही. मला तर नेहमी हेच उत्तर मिळालेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई आता जी चर्चा चालु आहे. प्रत्येक जण आपआपल्या वार्डातली समस्या सांगत आहे. हे बघा वार्डात तर आहेच आहे पण (मोबाईल मध्ये फोटो दाखवतांना) हे आपल्या महापालिकेचेच युनिट आहे. सानेगुरु जी मध्ये जर महापालिकेची अशी परिस्थिती आहे. तेथे बांधकाम विभागाचे ऑफिस आहे, आरोग्याचे ऑफिस आहे. तेथे अशी परिस्थिती आहे तर वार्डची काय परिस्थिती असेल हे लक्षात येईल आपणांस वारंवार सांगुन सुध्दा जर होत नसेल. तर उपयोग काय ? फक्त येथेच ओरडायचे. आणि नंतर घरी गेल्यानंतर गुपचुप बसायचे ही परिस्थिती होत आहे. ३ दिवसापासुन सांगितलेले आहे. लक्ष्मीनगर मध्ये कॉर्नरला कचरा पडलेला आहे. आजपर्यंत तो उचलला गेलेला नाही. म्हणजे नागरीकांनी फक्त टॅक्स भरायचा, आपला महापालिकेचे काम काय फक्त टॅक्सच घेणे आहे का ? सुविधा देणे कर्तव्य नाही का आपले. का भरायचे १०% साठी पहिले. आणि माझ्या वार्डात तर १०% साठी लाईन लागलेली असते. आपण जर सुविधा देत नसाल तर टॅक्स भरायचाच का ?आरोग्याचा तोच प्रश्न, लाईट विभागाचा तोच प्रश्न, लाईट लागत नाही. काय आहे हे ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** शासनाची टीम जेव्हा येते फक्त तेव्हा भिंती रंगवायच्या. त्या दिवशी चकाचक करायचे. त्यानंतर मान्यता मिळाली की, चालले. तसे व्हायला नको. कचऱ्याची साफसफाई व्हायला पाहिजे. किती दिवसात होईल ते सांगा. आम्ही स्वत: फिरणार आहे आताजर शहर कचरामुक्त दिसले नाही तर मी खर सांगतो की मी उपोषणाला बसणार आहे आणि नाही दिसला, शहर जर कचरामुक्त नाही दिसला तर मॅडम मी खरं सांगत आहे मी उपोषणाला बसणार आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** अश्विनभाऊ, सांगावे लागते त्यांना येथे कचरा आहे तेथे कचरा आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यानंतर अजुन एक विषय आहे. संपुर्ण जळगांव शहरात की असे एकही वृत्तपत्र नाही की, आपल्या महापालिकेच्या प्रशासनाच्या विरोधात लिहत नाही. नाले साफसफाईचा विषय आहे. पावसाळा येऊन गेला तरीही साफसफाई होत नाही.लोकांच्या घरात पाणी जात आहे. आपल्या महापौर मॅडमांच्या वार्डात पाणी शिरलं. नाले तुम्ही साफसफाई करतात, तो कचरा तुम्ही तेथेच टाकुन देता, पावसाच्या पाण्याने ते परत नाल्यात जाते. ते उचलेले गेले पाहिजे ना.

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई, नाले साफसफाईच्या संदर्भातच बोलत आहे. जळगांव शहरातील गणेश कॉलनी सारखा मेन रोड, या रोडवर एक तास ट्रॅफिक बंद होती. त्या पाण्याचा प्रवाह इतका मोठा होता. तर त्या पाण्यामध्ये साप होते. मी स्वत: तेथे उभे राहुन फोटो काढले. इतकी वाईट परिस्थिती जर प्रशासनाची होत आहे तर महापौरताई माझे तर आपल्यावर आरोप आहे की, आपण प्रशासनाकडे काही लक्ष देत नाही. प्रशासकीय अधिकाऱ्यांना काही बोलत नाही. त्याच्यामुळे हे सगळ होत आहे. जर आपण प्रशासन अधिकाऱ्यांना काही बोलले तर नक्कीच काही तरी सुधारणा होईल. दुसरी गोष्ट ज्या नाल्याची साफसफाई होते. त्या नाल्यांचा जो प्रवाह आहे तो कट झाला आहे का ? त्याची साईज कमी झालेली आहे का ? बांधकाम करणाऱ्यांनी तेथे अतिक्रमण केले आहे. जळगांव शहरातले आपल्याला.अतिवृष्टीचा जो प्रॉब्लेम झाला मुंबई मध्ये घरांमध्ये पाणी घुसले, तिच परिस्थिती जळगांव शहरामध्ये होणार आहे. मग आपण किती त्यांना कंट्रोल करणार आहे. प्रशासनाला काही पत्र द्यायचे, प्रशासन त्याला काही उत्तर देत नाही. नगरसेवकांचे पत्र दोन दोन वर्षापासुन पडलेले आहे. त्यांना प्रशासन उत्तर सुध्दा देत नाही. याच्यावर सुध्दा काही तरी नियमावली झाली पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मला एक विचारायचे आहे पाटील साहेबांना, साहेब मला एक सांगा, घंटागाडया किती आहे आपल्या विभागाकडे.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आपल्या सगळयांचाच आरोग्याचा विषय चालु आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कार्यरत किती, चालु किती आहे.

**मा.महापौर :-** नवनाथभाऊ, ताईंनी केव्हाचाच हात वर केलेला होता. ताईंना मी परमिशन दिलेली आहे. बोला ताई.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई हा जो आरोग्याचा मुद्दा अश्विनभाऊंनी मांडलेला आहे. प्रत्येक नगरसेवक या विषयाला त्रस्त झालेले आहे.प्रत्येकाच्या वार्डात या समस्या आहे. कचरा उचलला गेल्यानंतर ही कचऱ्याचे ढीग दिसत आहे ही वस्तुस्थिती आहे. ती प्रशासन नाकारु शकत नाही. आणि याचे उत्तर प्रशासनाला द्यावे लागेल. त्याचे उत्तरदायित्व सुध्दा प्रशासनाला घ्यावच लागेल. जर एवढा कचरा गोळा होत आहे. लोड होत आहे. भरला जातो आहे, विल्हेवाट त्याची लावली जात आहे. मग हा कचरा परत कुठुन येत आहे.  मग आता ६०० टन कचऱ्याची निर्मीती व्हायला लागली आहे का जळगांव शहरामध्ये की, ३०० टन उचलला गेल्यानंतर सुध्दा ३०० टन कचरा हा रस्त्यावर पडलेला दिसत आहे. माझा प्रभाग शहराचा मध्यवर्तीचा प्रभाग आहे. वारंवार मागणी करुन झाली की, जळगांव शहराचा मध्यवर्ती प्रभाग म्हणुन जिल्ह्याचे ठिकाण आहे हे. माझ्या प्रभागात सगळे शासकीय कार्यालय आहे. मॅक्झीमम डॉक्टर्स बेल्ट आहे. हॉस्पीटल्सची संख्या जास्त आहे. घंटागाड्या वेळेवर आल्या पाहिजे साफसफाई नेहमी झाली पाहिजे. नियमितपणे झाली पाहिजे.कोणतीही गोष्ट होत नाही. माझ्या प्रभागात ठेकेदाराचे लोकं नाही कायम कर्मचारी आहे. नितीनभाऊंनी सुध्दा मुद्दा मांडला की, पुर्वीच्या काळातली काय परिस्थिती होती. पुर्वीच्या कायम कर्मचाऱ्यांवर कसा दबाव होता. त्याच्यावर एक वचक होता प्रशासनाचा. आज जर कायम कर्मचाऱ्यांची परिस्थिती बघितली, ते राजे आहेत. महापालिकेतले ते राजे झ ाालेले आहेत. कोणीही कामावर निट येत नाही. कोणीही १००% काम करत नाही.  १००% सोडा, ५०% सुध्दा ते मजुर काम करत नाही. एखाद्या प्रभागातील एखादी गल्ली झाडलेली नसेल. चुकीचीच गोष्ट आहे.पण निदान त्या प्रभागापुरता तो त्रास असतो. ज्या वेळेला शहरातील मध्यवर्ती भागाचा प्रश्न येतो. जिल्ह्यातला माणुस तेथे येतो. जिल्ह्याभरातले लोकं तेथे येत असतात. जळगांव जिल्ह्याचे ठिकाण म्हणुन आपली पत तेथे खालावुन जात असते.हे वारंवार प्रशासनला सांगितल्यानंतर सुध्दा, लक्षात आणुन दिल्यानंतर सुध्दा. अनेक वेळा सांगितले जाते आपल्याला की, माणसे कमी पडत आहे, माणसे वाढवु. काहीच घडत नाही. येथे फक्त आश्वासन दिले जातात.त्यांच्यावर कोणतीही निर्णय प्रक्रिया प्रशासनाकडुन प्रभावी अंमलबजावणी होत नाही. हातात असलेल्या मनुष्यबळाचा तुम्ही काय करत आहात. प्रशासन म्हणुन तुमचे कशाकडे लक्ष आहे. स्वच्छतेसारख्या गंभीर मुद्दावर वारंवार नगरसेवकांना का बोलावे लागते. नागरीकांच्या सामान्य अपेक्षा असतात, रस्ते, लाईट, गटारी आणि पाणी या चार गोष्टींमध्ये सुध्दा आपण सुसुत्रता आणु शकत नाही. मग महानगरपालिका आपल्याला म्हणायचा अधिकार आहे का ? म्हणजे लोकं असे म्हणतात की, यापेक्षा नगरपालिका बरी होती. महानगरपालिका झाल्यापासुन आम्हाला कोणत्याही सोईसुविधा मिळत नाही. आयुक्त म्हणुन महोदया आपली जबाबदारी आहे ही आणि या सगळया प्रश्नांना उत्तर देण्यास आपण बांधील आहात. आता काही दिवसापुर्वी आरोग्याचे लोकं आमच्याकडे एक फॉर्म घेऊन आले होते. मला वाटते सर्वांकडे आले असतील की, कोणती तरी समिती येत आहे

त्यासाठी आपल्याला ते फॉर्म भरवुन द्यावा लागेल. बापु त्याच्यामध्ये जो नंबर दिलेला आहे. त्याच्यावर मी स्वत: आरोग्य कर्मचाऱ्यासमोर कॉल केला तो नंबर ॲक्टीवेटेड नाही. आता आम्ही सहकार्याची भुमिका ठेवतो. नितीनभाऊ, आपल्याला सुध्दा कळते की, या गोष्टी जर झाल्या नाही तर आपण मार्कात मागे पडतो,आणि जो शासकीय निधी येणार असतो शासनाकडुन ते निधी आपण घालुन बसतो. त्यामुळे आपण सहकार्याच्या भुमिकेमध्ये आपण तो फॉर्म भरवुन देतो. कोणतेही अडवण्याचे धोरण ठेवत नाही.पण ती प्रशासनाची जबाबदारी नाही का आयुक्त महोदया याच्यामध्ये, आमच्याकडुन सहकार्याची कायम अपेक्षा असते. शिव्या खायला आम्हालाच उभे राहावे लागते नागरीकांच्या आणि नागरीकांची यात चुक नाही. किमान अपेक्षा आहे नागरीकांच्या त्या सुध्दा जर पुर्ण होणार नसतील तर आम्ही काय कराव.

**मा.महापौर :-** नवनाथभाऊ,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** हे घंटागाडया, ट्रॅक्टर जे दिलेले आहे वॉटरग्रेस वाल्यांना हे किती चालु आहे आणि किती बंद आहे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** फक्त ३ घंटागाडया बंद आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब, एवढया घंटागाडया, ट्रॅक्टर चालु असल्यावर ही कचरा राहतो, माझ्या वार्डात जर पाहिले तर ढीगचे ढीग लागलेले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** किती घंटागाडया मिळालेल्या होत्या आपल्याला,

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** १०० घंटागाडया मिळालेल्या होत्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १०० घंटागाडया मिळालेल्या होत्या मग बाकीच्या कुठे आहे.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** १५ घंटागाडया बंद आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यापैकी १५ बंद आहे आणि या ८५ पैकी ही काही बंद आहे. तर ही जबाबदारी तर मक्तेदारची आहे. मग त्याच्यावर का नाही तुम्ही कार्यवाही करतात.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** १९ ट्रॅक्टर भाडयाने घेतलेले आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि त्या ट्रॅक्टरमध्ये खाली मटेरिअल भरतात आणि वरती कचरा भरतात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आता ओला कचरा, सुखा कचरा आपल्याला एकत्रीत करायचे आहे. ते तर सगळ एकत्रित करत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या लोडरने ज्या ठिकाणी तो कचरा भरतो, त्या ठिकाणच्या रस्त्यात खड्डा पडुन जातो.माझ्या प्रभागात अनेक ठिकाणी या संदर्भात वारंवार सुचना करुन सुध्दा आणि ते इतक्या मोठया प्रमाणावर खड्डे होऊन जातात की, तेथे पर्यायाने काय होते की, तेथे प्राणी येतात आणि लोळतात. पाऊस पडला की, पाण्याचा डबका साचतो. आणि कायम त्या परिसरामध्ये त्या घाणीमुळे दुर्गंधी सुटत असते. वारंवार सुचना करुन सुध्दा त्या पध्दतीने ते लोडरने काम करत नाही. माझे काय म्हणणे आहे की, लोडरने तुम्ही वरचा वरचा कचरा उचला,सोबत कामगार ठेवा, कामगारांच्या माध्यमातुन तो खालचा कचरा झाडु मारुन गाडीत टाकायला पाहिजे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** भाऊ तुमच्याच वार्डात दोन रोड आता कॉंक्रीट केले ते खालुन टाकुन उखडुन टाकले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर या संदर्भात प्रशासनांला थोडे गांभिर्याने सुचना देण्यात यावी.

**श्री.राजेंद्र पाटील :-** स्वच्छतेच्या संबंधी आताच आपण चर्चा केली. मला तर वाटते प्रत्येक प्रभागामध्ये एस.आय. यांनी कामाचेच नियोजन केलेले नाही. साहेबांनी सांगितले ३.५-४ वर्ष झाले या मक्त्याला, यासाठी या ४ वर्षामध्ये यांचे नियोजन जर पाहिले, मी आता रोज प्रभागामध्ये ७ ते १० असतो. पाटील साहेबांना मी बऱ्याचदा फोन केले स्वच्छतेच्या बाबतीत त्यांना फोटो सुध्दा टाकलेले आहे. आमच्याकडे तर एस.आय.च नाही. शेजारच्या एस.आय.ला जबाबदारी दिलेली आहे आमच्या प्रभागाची. त्यांना तिकडचेच काम करायला वेळ मिळत नाही. आमच्या प्रभागात ते ढुकुन ही पाहत नाही. जेव्हा जेव्हा माझा फोन जातो. तेव्हा तेव्हा ते प्रभागात राऊंड मारतात. मी जिथे उभा असतो तेथे येतात. आणि साहेबांना सांगतात भाऊंबरोबर होतो. भाऊंना भेटलो, भाऊंनी काम दाखवल, झाले, प्रभागामध्ये कचऱ्याचे इतके

ढीग पडलेले आहेत. मी साहेबांना फोन केले, १५ दिवसात माझे ३ फोन गेलेले आहे साहेबांना, आणि आता ताईंनी मांडले की, फॉर्म आला आम्ही त्याच्यावर सही केली. मी तेव्हाही साहेबांना फोन केला, साहेब सही करुन देतो पण ही विसंगती आहे. आम्ही जी सही करतो आहे ही विसंगती आहे. इकडे आम्ही आरोप करतो आहे की, शहरामध्ये कचऱ्यांचे ढीग आहे आणि आम्ही स्वच्छतेच्या बाबतीत तुम्हाला प्रमाणपत्र देत आहोत की, शहर कचरा मुक्त आहे. त्याच्यामागे ही कारण आहे की, आम्ही गुडफेथ मध्ये जे सहकार्य करतो, आपल्याला शासनाकडुन निधी मिळणार आहे. त्याला अडचणी निर्माण होऊ नये, अडथळे निर्माण होऊ नये म्हणुन आम्ही सहकार्य करत असतो.याचा अर्थ शहर सुंदर आणि स्वच्छ झाले असे नाही. आता माझ्या प्रभागातील उदाहरण देईल. गणपती नगरमध्ये दोन झाडुवाले दोन गटार काढणारे कामगार,आदर्श नगरमध्ये दोन झाडुवाले दोन गटार काढणारे कामगार, रामेश्वर कॉलनी मध्ये दोन चार कामगार, जवळ जवळ ३० ते ४० कामगार एका प्रभागात आहे. आहेत ना साहेब. दोन दोन वाटुन देतात. टिमकडून काम केले जात नाही. मी त्यांना वारंवार सुचना केल्या की, तुम्ही टिमवर्कने काम करा. आज तुम्ही गणपती नगर लावले, उद्या आदर्श नगर लावा,परवाच्या दिवशी रामेश्वर कॉलनी लावा. तुम्हालाही सोईचे होईल. नागरीकांना ही होईल की, प्रभागात काम होत आहे. दोन माणसे कोणाच्याही लक्षात येत नाही दिसत ही नाही. ते कुठेतरी कोपऱ्यात जातात मोबाईल काढतात, गप्पा मारतात. कोणी चहा घेतो कोणी काय करतो. नागरीक त्यांना सहकार्य करत असतात. सहानभुतीपुर्वक त्यांना चहा देतील, तर तेथे अर्धा अर्धा तास बसुन राहतात. आपण जो मोबदला देतो आहे आपल्याला त्याचा आऊटपुट मिळत नाही. त्याचे आऊटपुट मिळण्यासाठी टिमवर्कने काम झाले तरच मिळेल. आधे इधर जाओ आधे उधर जाओ बाकी मेरे पिछे आओ. अशी परिस्थिती शहरामध्ये चालु आहे. आता हे खरच कामाचे नियोजन आहे की, जाणुन बुजुन केले जाते हा संशोधनाचा विषय आहे. तर मला वाटते आरोग्यधिकारी साहेबांनी याच्यामध्ये लक्ष घातले पाहिजे. जेणे करुन वारंवार आम्हाला या सभागृहामध्ये आपल्या विरोधात बोलायची वेळ येऊ नये. कामामध्ये सुधारणा झाली पाहिजे, एस.आय. असतील, मुकादम असतील. यांच्या माध्यमातुन शहराची साफसफाई झाली पाहिजे. फक्त मला काही तरी मिळत आहे त्याच्या बदल्यात मी काही तरी करतो आहे. असे न करता त्यांच्यामध्ये कसे मोटीवेशन दिले जाईल कामगारांमध्ये, त्यांच्या ज्या आवश्यक गरजा आहे त्या सुध्दा पुर्ण झाल्या पाहिजे. सन्मा.सदस्यांनी मांडलेलेच आहे आदी. ज्या काही समस्या असतील आता पावसाचे दिवस आहे. साथीचे रोग येतील. आता वेळ प्रसंगी माझ्या प्रभागामध्ये हनुमान नगर आहे. अंडरग्राऊंडच्या गटारी तेथे तोडल्या गेलेल्या आहे. आता नगरसेवक म्हणुन मी ते तोडुही शकत नाही, जोडायचे काम मी केलेले नाही.पण मी तोडु सुध्दा शकत नाही. कारण नागरीक नाराज होतील. तेथे गटारी नाही. गटारी नसल्यामुळे पुर्ण रस्त्यावर पाणी आहे म्हणुन ते नाईलाजाने ते अंडरग्राऊंडला जसेचे तसे जोडलेले आहे. मी एस.आय.ला बोलविले मुकादमला बोलविले. पाणी एका कॉलनीतुन त्याच्यामध्ये जोडले गेले. त्रास दुसऱ्या कॉलनीला होत आहे. दुसऱ्या कॉलनीतुन फोन येतात. भाऊ आमच्याकडे अंडरग्राऊंडच्या चेंबर मधुन पाणी बाहेर येत आहे. मी एस.आय.ला बोलविले, मुकादमला बोलविले. यांच्याकडुन चेंबर साफ करुन घेतले. आता आपल्या कामगारांकडुन काम करुन घेतले.अंडरग्राऊंडचे ठेकेदार म्हणतात ते आमचे काम नव्हे. पाईप लाईन टाकणे आणि समजा ते पास होत नसेल. अजुन ती कार्यान्वीत नाही झालेली आहे ती योजना. तर ते साफ कशी करणार. ते लोक काम करत नाही. नाईलाजाने आपल्याला आपले कर्मचाऱ्यांकडुन ते काम करुन घ्यावे लागते. तर त्यांच्या ज्या गरजा आहे. ग्लोज असतील, बुट असतील, गमचे बुट असतील या सुविधा पुरविले गेले पाहिजे. जेणे करुन त्यांच्या आरोग्याचाही आपण विचार केला पाहिजे. आणि सर्वांनी ज्या अपेक्षा व्यक्त केल्या साहेब त्याच्यामध्ये लवकरात लवकर सुधारणा होईल. अशी मी अपेक्षा करतो आणि थांबतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौर त्या रंजनाताईंनी केव्हाचाच हात वर केलेला आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई.

**सौ.रंजना सोनार :-** मा.महापौरताई, उपमहापौर साहेब, आयुक्त मॅडम, ही जी समस्या आहे माझ्याही वार्डात आहे. माझ ा १७ नंबरचा वार्ड आहे आणि या वार्डात तसेच आहे गटारी काढणारे कर्मचारी खुप कमी येतात. आणि आल्यानंतर ते एकाच बाजुची गटार काढतात दुसऱ्या बाजुची गटार काढत नाही. ही समस्या नेहमीच येते. त्यानंतर वार्डातील लोकं येतात की, त्यांनी गटार काढली आमची काढली नाही. हा एक मुद्दा आहे. दुसरा मुद्दा झाडु मारणारे कर्मचारी स्त्रीया

काही येत नाही तेथे. आणि तसेच तृप्ती कॉर्नरचा जो रोड आहे. मी दोन सभेत आधी सुध्दा बोलली मॅडम ही तिसरी सभा आहे. तिसरी सभेपर्यंत काहीच होत नाही त्या रोडचे फक्त एन.ओ.सी. द्यायची आहे त्या रोडची जान्वी हॉटेल पासुन ते दालाई दवाखाना, हा रोड पुर्ण मंजुर झालेला आहे मॅडम. त्या रोडची आहे समस्या खुपच खराब आहे. तर त्या रोडची एन.ओ.सी. कधी मिळेल सोनगिरे साहेब ? नागरीक त्याच रस्त्याने वापरतात. तो रोड इतका खराब झालेला आहे. त्यावर चालणे सुध्दा कठीण झालेले आहे. आमच्या परिसरामध्ये आयोध्या नगर मध्ये रायसोनी स्कुल आहे, चंदु अण्णांची शाळा आहे. आता शाळांच्या ही मुलांना खुप प्रॉब्लेम येत आहे. शाळा चालु झालेले आहे. आता पाणी पावसाचे दिवस आहे. आता ४ दिवसापुर्वी काही पालक घरी आले की, आमचे मुले गाडीवर जातात. त्या खड्डयात जर गाडी गेली तर त्यांचे गणवेश खराब होतात. पुन्हा ते घरी जाऊन ड्रेस चेंज करुन पुन्हा स्कुल मध्ये जातात. इतका प्रॉब्लेम येत आहे मॅडम तर सोनगिरे साहेब आपण सांगावे. आपल्याला दोन सभांमध्ये आधीही सांगितलेले आहे. आणि आता आज ही तिसरी सभा आहे. तर त्या रोडच काम कधी होईल ते सांगा.

**मा.महापौर :-** एन.ओ.सी. दिलेली नाही. फक्त एन.ओ.सी.चा विषय आहे का ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** महापौरताई तो ४२ कोटी मधला रस्ता आहे. आणि ज्या ठिकाणी शांती निकेतन सोसायटीला आपण भेट दिली पाण्याच्या टाकी आणि ऑफिससाठी, त्या पाण्याच्या टाकीचे पण काम पुर्ण आहे.फक्त जोडणी बाकी आहे. आता स्वामी समर्थ मंदीराजवळ जो मोठा खड्डा केला होता. श्रीराम मंदिराजवळ ते चोकअप आहे ते अमृतच्या पाईप लाईनचे आहे. ते करायचे आहे. सोपान नगर मध्ये कनेक्शन बाकी आहे. टेस्टींग बाकी होती. त्या ठिकाणच्या अमृतच्या टेस्टींग पुर्ण झाल्या. शांती निकेतनची पाईप लाईन सुरु झाली. आता तेथे जोडणी वगैरे सगळे झाले. डी.पी.शिफ्ट करायची होती ती झाली. आता फक्त टेस्टींग बाकी आहे. तेथे टेस्टींग करतांना काही तरी प्रॉब्लेम झाला होता. तेथे खोदकाम करुन ते पाईप काढुन पुर्ण जोडणी करण्यात आली. त्याचे टेस्टींग झाले की, काम चालु होईल.

**सौ.रंजना सोनार :-** सर ते काम झाल्यापर्यंत ५०% काम होऊन जाईल सर आणि तो इतका वाहतुकीचा रोड आहे तो एम.आय.डी.सी.त जाणारे सगळे कर्मचारी त्याच रोडने वापरतात.

**मा.महापौर :-** स्वच्छतेच्या बाबतीत प्रत्येक वार्डात अश्विनभाऊंनी सांगितली तीच समस्या आहे, सगळया ठिकाणी आहे. प्रत्येकाने आपआपल्या वार्डाचे सांगण्यापेक्षा उदय पाटील साहेब आपण एकंदरीत नियंत्रण करणे हे सांगुन द्या. कारण मला वाटते नाला साफसफाई सुध्दा या वेळेला पाहिजे तशी झालेली नाही. पहिल्याच पाऊसामध्ये मोठमोठया गटारी ह्या चोकअप झालेल्या आहे. नाल्यांवर अतिक्रमण म्हणजे खुप मोठया प्रमाणावर झालेले आहे. तर साहेब मला असे वाटते ना की, हे जे मोठे नाले आहे ना याचा एक सर्व्हे लावा. हे अतिक्रमण ज्याचे ज्याचे असेल त्यांना एक नोटीस द्या आणि ते अतिक्रमण काढायला लावा. त्याच्या शिवाय साफसफाई करतांना आपल्याला ज्या अडचणी येतात. ते येणार नाही. मेन हा मुद्दा आहे अतिक्रमणाचा, मेन नाल्यावर स्क्रॅप टाकुन घेतलेले आहे.आणि ते नाले साफ करतांना आपल्याला अडचण येतात. आणि ह्या सगळया अडचणी त्याच्यामुळे येतात. अगोदर तुम्ही हा विषय करा आणि बाकी यांच्या प्रश्नांचे उत्तर आहे ते द्या. दोन दोनच मिनीट आहे. कारण विषयपत्रिकेला सुरुवात करायची आहे.

**श्री.प्रशांत नाईक :-** महापौरताई मागच्या महासभेमध्ये बोललो होतो मी. या गटारी जर साफ नाही झाल्या तर या गटारींमध्ये ४-४ फुट घाण आहे. साफसफाई नाही झालेली आहे. येथे नागरीक आम्हाला बोलत आहे. बापुसाहेब तेथे गटार साफ नाही झाली १०-१५ दिवसात. मागच्या महासभेमध्ये महापौरताई, उपमहापौर साहेब.मागच्या वेळेस पण हाच विषय होता तो. साफसफाई नाही तर पाणी लोकांच्या घरामध्ये जात आहे.तुम्ही पहा तेथे येऊन उदय पाटील साहेबांनी जेव्हा माणसाला पाठविले तर विचारा काय झाले तेथे. मागे ठरविले होते आपण तेथे साफसफाई करायची. आता ४-४ फुट गाळ आहे त्याच्यामध्ये. शामाफायर जवळ, त्या व्यतिरिक्त मी बोलणार नाही पण तो जो गाळ आहे ना ४ फुटाचा तो काढुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, महापौर महोदया.

**श्रीमती सरिता नेरकर :-** मागच्या ८ ते १० दिवसापुर्वीचा विषय आहे. मी फोन लावले एस.आय.ला येथे कचऱ्याचे ढिग आहे. त्यांनी ऐकले नाही. शेवटी मला बापुंना फोन लावावा लागला आणि बापुंनी लगेच गाडी पाठवली. ज्या वेळेस

ते आले भरायला, त्यांनी सांगितले की, हा आमचा विषय नाही हे बांधकाम वाल्यांचा विषय आहे. बांधकाम वाल्यांना फोन लावला. जेव्हा ते आले त्यांनी सांगितले की, हे आमचा विषय नाही आरोग्यवाल्यांचा विषय आहे.तेथे काय करायचे, नगरसेवकांनी काय खो-खो खेळायचा. हे दोघी एकमेकांवर येतात. बांधकामवाले आरोग्य वाल्यांवर येतात. आरोग्यवाले बांधकाम वाल्यांवर येतात. हे नेहमीचे चालले आहे. तुम्ही पण उचलले नाही त्यांनी पण उचलले नाही. तिथला कचरा अजुन तिथेच आहे बापु. माझे तुमच्याशी बोलणे झाल्यानंतर अजुन ती गटार पॅक आहे. दोघांचे ट्रॅक्टर आले दोघांनी जरा जरा उचलुन नेले. दोघांनी एकमेकांवर विषय केला. मला खरोखर असे वाटते की, तो कचरा उचलावा आणि माझ या दारी आणुन टाकावा. मला स्वत:ला असे वाटायला लागले.

**सौ.ज्योती चव्हाण :-** महापौरताई झाडांच्या फांद्यांचा विषयही तसाच आहे. एम.ई.सी.बी.ने सगळया झाडांच्या फांद्या काढलेले आहे. सगळया वार्डात झाडाच्या फांद्या तश्याच पडलेल्या आहे.आरोग्यवाले उचलत नाही बांधकामवाले ही उचलत नाही. आज २०-२५ दिवस झाले आमच्या प्रभागात तशीच घाण पडलेली आहे. फांद्या कोणीच उचलत नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त महोदया, माझी एकच विनंती आहे की, नाल्यांचे मोजमाप करुनच नाल्याची साफसफाई करा. त्याचे सगळे मोजमाप केले पाहिजे नगरविकास विभागाकडुन, मग बांधकाम वाल्यांना सांगा, मग आरोग्य वाल्यांना सांगा.तरच पुरे नाले साफ होतील.

**श्री.विश्वनाथ खडके :-** ताई प्रभाग संबंधीत आता रंजनाताईंनी जो विषय मांडला रस्त्याचा तो ४२ कोटीमध्ये प्रस्तावीत आहे रस्ता तो, सोनगीरे साहेबांनी आम्हाला फक्त आश्वासन दिले पाहिजे की, तो रस्ता होणार केव्हा आहे. अमृतचे काम बाकी आहे याचे काम बाकी आहे पण होईल केव्हा याचे उत्तर सांगा ना. तिसऱ्यांदा सांगत आहे ताई. तो रस्ता होईल केव्हा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता** :- त्या संदर्भामध्ये मी भांडारकर साहेबांच्या मागे ही लागलो होतो.

**श्री.विश्वनाथ खडके :-** साहेब मला फक्त उत्तर पाहिजे की, तो रस्ता केव्हा चालु होईल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता** :- आपल्याला बी ॲण्ड सी ला ही NOC द्यायची आहे, अमृतचे काम पुर्ण झाल्याची ती मी १५ दिवसात येईल. NOC मिळाली की, रस्ता बी ॲण्ड सी करणार आहे.

**(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे नेमके कोण काय बोलले समजले नाही)**

**श्री.विष्णु भंगाळे:-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, उपमहापौर साहेब, सन्मा.सभागृह जी आता आरोग्याच्या विषयावर चर्चा चालु आहे. या बद्दल बऱ्याचदा आपण यावर प्रश्न विचारलेले आहे. आणि त्याचे उत्तराचे सेटच्या सेट मला मिळालेला होता.आजची परिस्थिती खरच जळगांव शहराची बिकट झालेली आहे. परंतु जे जे नितीनभाऊंनी सांगितले, आमचा प्रभाग खुप मोठा आहे. तसे पाहिले गेले तर प्रभाग क्र.०५ याच्या माध्यमातुन कचरा उचलला जातो. आणि तेथे खड्डे पडतात. तेथे काय होतो मुरुम टाकला जातो. परत पुढच्या वेळेस ते मशीन आली की, त्याच्याने उचलल्यावर सुध्दा ते पुन्हा म्हणजे या माध्यमातुन सुध्दा लुट आपल्या महापालिकेची होत आहे. कालची गोष्ट आहे दिक्षीत वाडी मध्ये पाणी हे गुडग्यापर्यंत साचलेला आहे. याला कारण आहे की, तुमच्या गटारी पुर्णपणे साफ नव्हत्याच. अशी तर आपण कालचे दिक्षीतवाडी सारखा जो भाग आहे. यामध्ये सुध्दा आणि सिव्हील हॉस्पीटलच्या समोरही जशी नदी वाहते. अश्या प्रकारचा प्रकार झालेला आहे. त्याच्या दृष्टीने आपण जर कधी जळगांव शहरामध्ये आता या हल्ली मी म्हणतो महासभा राहु द्या. जर आताच्या आता तुम्ही राऊंड माराल, मा. महापौर, उपमहापौर आणि अधिकारी यांनी बघितले तर त्याठिकाणी कचरा किती आहे हे आपल्याला समजेल. अशी परिस्थिती आपल्या जळगांव शहराची आहे. तरी आमची विनंती आहे की, आपण हा कचरामुक्त जळगांव शहर कसे आणि केव्हा कराल.

**श्री.चेतन सनकत :-** नाल्यांच्या संदर्भात एक विषय मांडायचे आहे.

**मा.महापौर :-** शॉर्टकट मध्ये बोला.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** शॉर्टकट मध्ये. कसे आहे. आरोप लावणे हा आमचा जन्मसिध्द अधिकार आहे. उठले सुटले की, आपण प्रशासनाला जबाबदारच ठरवितो. माझ्या मते रोज जेव्हा रस्त्यावरून घंटागाडी जाते. आपल्या एरियात घंटागाडी येते. आपल्या गल्लीतुन घंटागाडी जाते. सकाळी सकाळी ७.३० वाजता माझ्या वार्डात घंटागाडी येते. परंतु आपल्याला

सवय आहे १०.०० वाजता उठण्याची. फक्त आपण प्रशासनावर आरोप ठोकतो, ते पण बिचारे ऐकुन घेतात.परंतु आपल्या लोकांना जी सवय आहे. ती बदलायला पाहिजे. आपण कुठेतरी आरोग्याची सवय लावण्यात म्हणा कुठेतरी ॲडव्हर्टाईज करायला म्हणा कुठेतरी कमी पडतो आहे. लोकं १०.०० वाजेला उठतात. ७-७.३० वाजता गाडी निघुन जाते. गाडी गेल्यानंतर लोक रस्त्यावर कचरा आणुन ठेवतात. ही खरोखरी, म्हणजे स्वत:ची वाह वाह करुन घेणे, दुसऱ्याला वाईट बोलणे, आपण कुठेतरी नगरसेवक म्हणा या नात्याने थांबविण्यासाठी प्रयत्न करतो आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाई तुम्ही नेमके प्रशासनाचे कौतुक करत आहात की, टिका करत आहात काहीच समजत नाही.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एका वेळेस बोलत असतांना कोण काय बोलले समजले नाही)

**श्री.ईब्राहिम पटेल :-** कसे आहे माझ्या वार्डात कधीही घंटागाडी आलेली नाही असे झाले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** १० मिनीटापुर्वी तुम्ही प्रशासनाला धाऱ्यावर धरत होते कचऱ्यासाठी आणि आता नागरीकांना धाऱ्यावर धरत आहे. एकच काही तरी भुमिका ठेवा ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपण फक्त एकच भुमिका ठरवुन प्रशासनावर ठपका मारुन चालणार नाही ना.लोकांनाही आपण समजवायला पाहिजे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** प्रशासनाचे काम आहे साफसफाईचे, त्यांचा लोकं दोन तास उशिरा उठतात त्यांचा काय संबंध येतो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जितुभाऊ मी जे धारेवर धरतो एक एकाला धरतो. माती भरुन जो नेत आहे मी त्याचा विरोध केला. मी फक्त बोलुन दिले असे होणार नाही. ठेकेदार जे करीत आहे तो माती भरत आहे. तो आपल्यामुळेच भरतो जे करीत आहे. जर काही नगरसेवकांनी पाकिट घेतले नाही. त्याची मजाल नाही की तो माती भरुन नेईल. आता बोला. पाकिट घेतले नाही तर त्याची मजाल नाही की, तो माती भरीन.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एका वेळेस बोलत असतांना गोंधळामुळेकोण काय बोलले समजले नाही)

**मा.महापौर :-** सर्वांनी शांतता ठेवावी. बसा खाली. बसुन घ्या खाली. सर्वांनी खाली बसायचे आहे.

**श्री.चेतन सनकत :-** कचरा सफाई करत असतांना तुमच्या लक्षात मी एक विषय आणुन देतो. अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम करत असतांना एक काम सुरु होते आपल्या नाल्यामध्ये, ममुराबाद रोडवर अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम सुरु असतांना नाल्यामध्ये खड्डे करुन ठेवलेले आहे आणि पुर्ण पाईप नाल्यामध्ये पडलेले आहे. मी मागे दोन तीन दिवसापुर्वी मी योगेश बोरोले साहेबांना सांगितले होते. त्या मुरुममुळे आणि त्या वेस्ट मटेरियलमुळे वरतुन येणारे पुर्ण पाणी साचत आहे.आणि जर जास्त पाऊस आला. तर लोकांच्या घरांमध्ये पाणी जाण्याची कालची परिस्थिती होती. काल तेथे जर जास्त पाणी आले असते तर त्या सगळया लोकांच्या घरात पाणी शिरले असते. लवकरात लवकर त्या ड्रेनेजवाल्यांना सांगुन ते वेस्ट मटेरिअल आणि पाईप नाल्याच्या मधोमध टाकुन ठेवलेले आहे. ते उचलण्याची व्यवस्था करावी. आणि लवकरात लवकर आपल्या प्रभाग क्र.०२ ची जी नाले सफाई पेन्डींग आहे ती लवकरात लवकर सुरु करण्याची व्यवस्था करावी.

**सौ.पार्वता भिल :-** महापौरताई.

**मा.महापौर :-** साफसफाईचा आणि कचऱ्याचाच विषय आहे सगळयांचे, उत्तर द्या साहेब.

**सौ.पार्वता भिल :-** ताई मी केव्हाचे हात वर केलेले आहे.

**मा.महापौर :-** बोला, बोला दोन मिनीटात बोला.

**सौ.पार्वताबाई भिल :-** महापौरताई आणि उपमहापौर दादा, वाघ नगर पासुन ते खंडेराव नगर पुलापर्यंतचा रस्ता ऐवढा खराब हायल आहे. माग मी मॅडमलाही भेटली होती. हा रस्ता लगेच होणार आहे सोनगिरे साहेबांचे उत्तर. तो रस्ता केव्हा सुरु करणार आहे त्याचे उत्तर मला द्या. आणि या सदस्यांनी सगळे सांगितले आहे ना, तशीच माझ्या वार्डात पण तिच समस्या आहे. सांगुन काही फायदा नाही. जे सदस्य सांगतात त्यांचेच काम होतात. एखादा अधिकारी आला की, तेवढाच रस्ता स्वच्छ करुन घ्यायचे. अधिकारी मध्ये घुसत नाही. आम्ही नगरसेवक मध्ये घुसतात. आम्हाला शिव्या खाण्या पडतात. आम्हाला एक नागरीक नाही बोलता १०० नागरीक बोलतात. शिव्या देतात आम्हाला. माझ्या वार्डात केवढी समस्या आहे मॅडम. मॅडम तुम्ही एकदा व्हिजीट द्या आणि माझ्या बरोबर फिरा. ७ वाज्यापासुन उठते मॅडम तर १२.००

वाजेपर्यंत वार्डात राहते मी. प्रत्येक ठिकाणी जाते. लोकं काय बोलता काही नाही आम्हाला माहित आहे. तुम्ही सांगा मॅडम तो रोड केव्हा होत आहे कोणाला दिले आहे काय दिले आहे. कॉलनी एरिया मध्ये रोड होत आहे आणि मेन रोड.

**मा.महापौर :-** १०० कोटीत आहे ते.

**सौ.पार्वताबाई भिल :-** उत्तर द्या मला केव्हा चालु करणार आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ताईंनी मला रस्ता दुरुस्तीबाबत मागणी केली होती पण तो रस्ता इतका खराब आहे की, तो डिपार्टमेंटली दुरुस्त होणार नाही. त्याचा प्रस्ताव आपल्याला बी ॲण्ड सी ला द्यावा लागेल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणत्या याच्यामध्ये.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** १०० कोटी मध्ये.

**सौ.पार्वताबाई भिल :-** तो रस्ता मुरुम टाकल्यानेही दुरुस्ती होणार नाही मग शिव्याच खायचे आहे ना आम्हाला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तो रस्ता १०० कोटीतुन कॉंक्रीटकरण साठी देण्यात आलेला आहे.

**सौ.पार्वताबाई भिल :-** पण वेळ किती लागेल केव्हा. टर्म संपुन जाईन तेव्हा. पाच वर्षापासुन बोलत आहे मी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** द्या उत्तर द्या.

**सौ.पार्वताबाई भिल :-** उत्तर द्या मला, कारण रोज लोकं मला बोलतात.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** सन्मा.महापौर आणि सभागृह सन्मा.सदस्यांनी ज्या शहराच्या साफसफाई मध्ये जो असंतोष किंवा ज्या तक्रारी येथे केलेल्या आहे. त्याची प्रशासन गंभिर दखल घेणार आहे. ३-४ वर्षापुर्वी मला आरोग्य अधिकारी म्हणुन दिले होते. माझ्या कामाचा वचपा पाहुन मला पुन्हा दिले होते. परंतु मी कामात कुठेतरी कमी पडत आहे. आपण ज्या सुचना दिल्या आहेत. त्यांना मी न्याय देण्याचा प्रयत्न करेल. आपण ज्या समस्या आणि तक्रारी दिलेल्या आहे. त्यासाठी मला १ महिन्याचा कालावधी द्यावा. त्यानंतर मी काही मागे बघु ईच्छितो. दरम्यानच्या काळात जेव्हा नगरपालिका होती. वॉटरग्रेसला जेव्हा आपण कॉन्ट्रॅक्ट दिला. त्यावेळेला ४०० कामगार वॉटरग्रेसचे आणि ४०० कामगार आपले. ४०० कामगारांमध्ये आपले मुकादम पण आहे, एस.आय.पण आहे, सी.एस.आय. पण आहे. असे ८०० कामगार, १०० घंटागाडया, काही कॉमपॅक्टर, काही स्कीपलोडर यावर आरोग्य विभागाची साफसफाई सुरु आहे. मी फक्त समस्या आपल्या समोर मांडत आहे. प्रशासनाची जी अडचण आहे. आपण जर बघितले असेल नगरपालिका असतांना नगरपालिकेच्या साफसफाई कामगारांची संख्या ही १२०० होती. १२०० ते १३००. ज्या वेळेला वॉटरग्रेसला काम दिले त्या वेळेला ओहापोह झाला की, इतक्या कामगारांमध्ये काम होत नाही. आणि तीच तक्रार आज आपल्या समोर आलेली आहे. तत्पुर्वी काय असायचे एकच नगरसेवकाचे एक वार्ड असायचे. तर त्यांच्या समस्या सोडविणे सोपे होते. आता अ,ब,क,ड, भाग झाल्यामुळे चारही नगरसेवकांचे समाधान करणेसाठी एस.आय.ची सर्कस होत असते. इकडे ४ इकडे ४. सरासरी एका वार्डात आपले ४० कामगार आहे. ३५ ते ४०. त्यातले ४-५ रजेवर असतात. ३५ कामगारांमध्ये ४ नगरसेवकांचे एकाच वेळेला काम करायचे असते आणि विषय असा आहे. जेव्हा आपली नगरपालिका होती.त्यावेळेला आरोग्य विभागामध्ये ४ सि.एस.आय. होते, १९ आरोग्य निरिक्षक होते. आज दोन सि.एस.आय. आणि दोन आरोग्य निरिक्षक आहे. संपुर्ण महानगरपालिकेच्या आरोग्याचे काम सफाई कामगारांवर आहे. कारण जो सफाई कामगार तेथे काम करत आहे त्याला त्याचे साहित्य दिलेले आहे. मग मी कमी कुठे पडत आहे. मला ते सुचविले पाहिजे. की मी काम कुठे केले पाहीजे राहीला प्रश्न सफाई कामगारांचा आणि जो सफाई कामगार होता तो युनिट प्रमुख होवुन गेलेला आहे आणि कुठेतरी तो कमी पडत आहे. वस्तुस्थिती आहे की, मी कुठेतरी कमी पडतो. परंतु मला ही यंत्रणा चालवितांना मनुष्यबळाची गरज आहे. त्याची अत्यंत आवश्यकता आहे. आणि एवढया मोठया शहराचा, शहराच्या कचऱ्याचा व्हिल्लेवाट लावणे, मी मान्य करतो.

**श्री.अश्विन सोनवणे :-** जर तुम्हाला हे सर्व माहित आहे. तर तुम्ही जास्त लोकांची मागणी का केली नाही. त्याच वेळेला मागणी केली असती, तुम्हाला जर इतकी माहिती होती तर. डी.पी.आर.तर तुम्हीच तयार केलेला आहे ना. तुम्ही कामगार वाढुन घ्यायला पाहिजे होते डी.पी.आर.मध्ये.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** त्या वेळेस आपण केली होती. यामध्ये आपण सगळे होते. त्या वेळेला खरं तर नगरपालिकेच्या शेवटच्या दिवसात वार्षिक खर्चाची त्यावेळेला वार्षिक खर्च आर्थिक परिस्थिती पाहता. त्यामध्ये आपण ४०० कामगार का लावले की, त्यामध्ये त्यावेळेला जेवढा खर्च होता. तेवढ्याच खर्चामध्ये साफसफाईचे नियोजन झाले पाहिजे. अशी तत्कालीन प्रशासनाची टिप्पणी होती. त्यामुळे आपण ४०० कामगार लावले.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बापु ४०० त्यांचे आणि ४०० कायम कामगार आपले, पण ते वार्डात दिसत नाही.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** आणि आज त्या ८५ घंटागाडयांमधुन ३ घंटागाडया बंद आहे. असा कोणता वार्ड आहे आज जेथे घंटागाडी येत नाही. एका दिवसात जर १००% घंटागाडी फिरत आहे. तर माझे म्हणणे आहे लोकांनी घंटागाडीत कचरा टाकायला पाहिजे. तसे होत नाही. लोकं रस्त्यावर कचरा फेकत आहे. आणि त्याच्यामुळे मनुष्यबळ असुनही घंटागाडया असुनही यंत्रणा असुनही आपल्याला हे जे चित्र दिसत आहे त्याच्यामुळे होत आहे आणि दुसरी गोष्ट अशी दर वर्षी आपण बघतो, या वर्षी आता आपली नाले सफाई सुरु  आहे. आपण दोन तीनदा जे.सी.बी.लावला, जे.सी.बी. आला नाही. नाले सफाई झाली आणि आपल्याला नेहमीप्रमाणे माहित आहे जेव्हा पहिला पाऊस येतो. तेव्हा तुम्ही कितीही खर्च करा त्या पहिल्या पावसामध्ये सर्व शहर विस्कळीत होते. आणि विस्कळीत झ ाल्यानंतर आता कितीही पाऊस आला तर आता शहरामध्ये ही समस्या निर्माण होणार नाही. परंतु पहिल्या पावसामध्ये कितीही नाले साफसफाई केले तरीही समस्या हल होत नाही. या ठिकाणी मला असेही नमुद करायचे आहे की, बरेच कामगार हे कामावरुन निघुन जात होते किंवा फक्त हजेऱ्या लावत होते. जी वस्तुस्थिती आहे आपल्याला टाळता येणार नाही. असे २० कर्मचारी मी बंद केलेले आहे. तरी सुध्दा प्रशासन कुठे तरी कमी पडत आहे. प्रशासन तुम्हाला खात्री देईल. समस्या भरपुर आहे प्रशासनाच्या, प्रशासनाच्या फक्त समस्या सांगुन असे होणार नाही. मी महिन्याभरात कामात दुरुस्ती करुन देईल असे सभागृहाला अश्वस्त करतो. धन्यवाद.

**श्री.अनंत जोशी :-** आरोग्याचा विषय संपला का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो.

**श्री.अनंत जोशी :-** सभागृहासाठी एक आनंदाची बातमी आहे. सगळयांच्या मोबाईलवर आलेच असेल नसेल तर मी माहिती देतो. मद्रास हायकोर्टाचे जे न्यायाधीश आहे त्यांनी एक निर्णय दिलेला आहे की २४ तासांपेक्षा जेल मध्ये ठेवु शकत नाही. असा मद्रास उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती मालु म्हणुन आहे तेथे त्यांनी एका ई.डी.च्या केस मध्ये असा निर्णय दिलेला आहे की, ई.डी.कुठल्याही तपासासाठी ई.डी.चा ज्यांना आदेश आहे त्यांना २४ तासापेक्षा जास्त जेल मध्ये ठेवु शकत नाही. त्याला कोर्टासमोर हजर केले पाहिजे. आपल्याला २४ तासांपेक्षा जास्त ठेवता येणार आपल्या येथे वेगळा विषय आहे आपण घाबरु नका. भाऊ तुमचे काही होणार नाही, माझे काही होणार नाही. आपले काही होणार नाही. पोकळे साहेब, पोकळे साहेब,

**श्री.दिलीप पोकळे :-** येथे ई.डी.चा आणि आपला काय विषय आला, येथे आरोग्यचा विषय चालु आहे, अतिक्रमणाचा विषय आहे.

**श्री.अनंत जोशी :-** अरे गंम्मत म्हणुन बोललो.

**श्री.दिलीप पोकळे :-** काय गंम्मत म्हणुन बोललो.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्हाला का वाईट वाटले.

**श्री.दिलीप पोकळे :-** मला कशाला वाईट वाटेल.

**श्री.अनंत जोशी :-** आता मला बोलायला नका लाऊ. मला दुसऱ्या विषयावर येऊ द्या. बोलायला नका लाऊ, एका हो, एका हो. बसा, बसा. ज्ञान नाही शिकवायचे मला. बाविस्कर साहेब, आयुक्त मॅडमांनी दि.०६/०४/२०२३ ला एक आदेश पारित केलेला होता. आपल्याकडे प्रभाग समिती निहाय कर्मचाऱ्यांची पाहणी करण्याचे आदेश दिलेले होते आणि तिन लोकांची कमिटी नेमलेली होती. माझ्या प्रभाग समिती क्र.४ मध्ये जेव्हा दि.२६/०४/२०२३ त्या ठिकाणी ३ कर्मचारी प्रभाग समिती क्र.४ मध्ये हे दोषी आढळले.याच्या बद्दल सविस्तर माहिती तुम्ही द्या या संपुर्ण प्रकरणाबद्दल त्याच्यानंतर मी बोलेल.

**मा.महापौर :-** द्या माईक द्या.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** ज्या वेळेस तपासणी पथकाने तपासणी केली. त्यावेळेला ३ कर्मचारी तेथे उपस्थित नव्हते. त्यानंतर त्यांना कारणे दाखवा नोटीस काढण्यात आली. त्यांचा खुलासा मागविला आणि त्या खुलास्यामध्ये आयुक्त मॅडमांकडे फाईल पुटअप केलेली होती. आयुक्त मॅडमांनी त्यांना सुधारणेसाठी अजुन एक संधी द्यावी आणि त्यांना सख्त ताकीद करण्यात यावी.

**श्री.अनंत जोशी :-** किती लोकांवर आक्षेप आलेला होता आणि त्यांच्यावर काय काय कार्यवाही झाली.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** सर एकझ्याक्ट मला सांगता येणार नाही.

**श्री.अनंत जोशी :-** तुमच्या हाताखालुन ही सर्व प्रक्रिया झालेली आहे. ३ च लोक होते ३०० नव्हते.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** प्रभाग समिती क्र.४ चे ३ लोकं होते. आणि त्या तिघांना सख्त ताकीद दिलेली आहे.

**श्री.अनंत जोशी :-** काय काय पाहणीत काय आक्षेप होते.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** एका कर्मचारीचे नातेवाईक आजारी होते त्यामुळे ते निघुन गेले होते कामावरुन आणि त्यांची सही करायची राहुन गेलेली होती हजेरी पुस्तकावर. एका कर्मचाऱ्याने ॲडव्हान्समध्ये स्वाक्षरी केलेली होती. आणि तिसऱ्याचे मला आठवत नाही.

**श्री.अनंत जोशी :-** पाहणी किती तारखेला झाली होती साहेब.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** दि.२६/०४/२०२३ ला

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही या लोकांना नोटीस कधी काढली.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** मे मध्ये काढली असेल. दि.२६/०४/२०२३ ला पाहणी झाली.

**श्री.अनंत जोशी :-** एप्रिल.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** एप्रिल.

**श्री.अनंत जोशी :-** आणि तुम्ही आता त्यांना नोटीस केव्हा काढली. आयुक्त मॅडमांनी इतक्या चांगल्या प्रमाणे काम केले.

**श्री.अनंत जोशी :-** त्यासाठी पथक नेमुन दिलेले आहे. जे कामचुकार लोकं आहे. जे काम करत नाही. जागेवर थांबत नाही. किंवा हजेरी लावुन चालले जातात.त्यांच्या कामात सुधारणा झाली पाहिजे. मनुष्यबळ नाही अशी ओरड असते कायम आमची.आरोग्य झाले, विद्युत झाले, पाणी पुरवठा झाले, सर्विकडे तिच ओरड असते की, माणस नाही. फक्त सफाई कामगार नाही की, तेच हजेरी लावुन जातात. आपल्याकडे मनुष्यबळ कमी आहे. आपण परमनंट कर्मचाऱ्यांकडुन काम का घेऊ शकत नाही. त्याच्यासाठी त्याच्यात सुधारणा होईल त्यासाठी ते पथक नेमलेले होते. दि.२६/०४/२०२३ ला पाहणी झाली त्यात ३ लोकं प्रभाग समिती ४ मधील दोषी आढळले. त्याच्यातले २ कर्मचारी असे होते ज्यांनी सही केलेली होती पण ते जागेवर हजर नव्हते. कामाच्या वेळेत हजर नव्हते. आणि एक कर्मचारी तेथे शिपाई पदावर नेमलेले आहे प्रभाग समिती क्र.४ मध्ये त्यांच्यावर आक्षेप असा होता की, माझ्याकडे कागदपत्र आहे सही शिक्क्यांसहीत मी माहितीच्या अधिकारात घेतलेले आहे. त्यांच्यावर आक्षेप असा होता की, २६ तारखेला जेव्हा पाहणी झाली. त्या २६ तारखेची जी सही होती. आणि ते जागेवर हजर नव्हते. २६ तारखेला ज्या दिवशी पाहणी झाली. त्या दिवशी सदरहु कर्मचारी सही करुन जागेवर हजर नव्हता, विषय क्र.१, मुद्दा क्र.१, त्यानंतर २६ ला पाहणी झाली, पाहणी मध्ये असे ही आक्षेप आहे की, २७ तारखेची सही त्यांनी ॲडव्हान्स केलेली होती. होती की नव्हती.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** तपासणी अहवाल तसा होता.

**श्री.अनंत जोशी :-** मग अहवाल तसा होता, मग मला एक सांगा तुम्ही, जेव्हा हा संपुर्ण विषय तुमच्या डोळयांसमोर आला.ज्या उद्देशाने पथक नेमलेले होते. ज्या उद्देशाने पाहणी केलेली होती. तुम्ही कार्यवाही का केलेली नाही. तुम्ही नोटीस का पाठविलेली नाही. त्याची उत्तर देण्याची गरज नाही. मी तुम्हाला सांगतो.मी सगळे सांगणार आहे खुलासा करणार आहे. त्या दिवशी तुम्ही, जेव्हा मी दोन वेळी पत्र व्यवहार केला की, या लोकांवर काय कार्यवाही करण्यात

आली म्हणुन त्यानंतर तुम्ही माझ्याशी फोनवर बोलले की, भाऊ करतो म्हणुन, तोपर्यंत तुम्ही केलेली नव्हती. बरोबर आहे. त्यांना नोटीस काढली तुम्ही. त्यांच्याकडुन खुलासा मागविला. आज महासभा होती. मी गेल्या १५ दिवसापासुन मागे लागलेलो आहे. सदरहु लोकांना तुम्ही नोटीसा दिल्यानंतर त्यांनी काय खुलासा सादर केला.आणि खुलाश्याच्या अनुषंगाने तुम्ही त्यांच्यावर काय कार्यवाही केली. तर मी १५ ते २० दिवसापासुन मागत आहे तुम्हाला, आज सकाळी तुमचे कर्मचारी मला हे कागदपत्र देऊन गेले कारण की आज महासभा होती. मी बोललो असतो म्हणुन आज सकाळी घरी येऊन देऊन गेले. आता याच्यामध्ये तुम्ही ३ कर्मचाऱ्यांचे दिलेले आहे की, त्यांच्यावर काय काय आक्षेप घेण्यात आलेले होते. त्यांना तुम्ही नोटीस दिली खुलाश्यासाठी आणि त्यांनी खुलासा दिला. याच्यामध्ये खालाश्याचे कागदपत्र का दिले नाही की, काय खुलासा दिला म्हणुन. तुम्ही सांगा काय काय खुलासे केले.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** सर, पुर्ण माहिती दिली ना तुम्हाला.

**श्री.अनंत जोशी :-** खुलासा सांगा तुम्ही, त्यांनी काय काय खुलासा दिला.

**श्री.अभिजीत बाविस्कर, उपायुक्त :-** एकाचे नातेवाईक आजारी होते.त्याच्यामुळे ते सही करु शकले नाही. दुसऱ्यांना डोळयांचे काही त्रास होते. तर ते चष्मा घरी विसरले होते म्हणुन सही २६ च्या ऐवजी २७ ला केली होती.

**श्री.**अनंत जोशी :- आता माझे असे म्हणणे आहे, ३ लोकं सापडले पाहणी मध्ये, दोन लोक फक्त सही करुन जागेवर हजर नव्हते. आता तुम्ही तर काय प्रशासन आहे शेवटी तेरी भी चुप मेरी भी चुप, तेथे काय आहे तुम्हाला माहिती आहे. मला ही माहिती आहे. हे मी स्पष्टपणे सगळयांसमोर सांगणार. तुमच्याकडे ही बोललेलो आहे, आयुक्त मॅडमांनाही बोललेलो आहे गेल्या वर्ष भरामध्ये, आयुक्त मॅडमांचे उत्तर काय आहे. गेल्या वर्षभरापासुन ते उत्तर मी सभागृहासमोर सांगणार आहे. त्याच्या आधीची गोष्ट सांगतो, आयुक्त मॅडम जेव्हा आयुक्त होऊन जळगांव शहर महापालिकेत आल्या. जसा आपल्या सर्वांना आनंद झाला की, नविन पिढी, तरुण अधिकारी, वेगळया पध्दतीने काम करणाऱ्या, जसे सगळयांना आनंद झाला होता तसाच मला ही झाला होता. त्यानंतर त्या त्यांच्या हक्कासाठी भांडण करुन आल्या. न्यायालयातुन जसे रुजु झाले येथे. मी त्यांना वैयक्तीक व्हॉटसअॅपवर मॅसेज करुन सांगितले की, मला सगळयात जास्त आनंद झाला कारण की, एक महिला, त्या पण नविन वयात आलेले अधिकारी, यांच्यामध्ये काम करण्याची खुमखुमी असते, एक शक्ती असते किंवा निर्णय घ्यायची वेगळी पध्दत असते. मी त्यांना व्हॅटसअॅपला मॅसेज केले होते की, मला खुप आनंद झाला मॅडम, तुम्ही परत आलात. कारण तुम्ही लढा देऊन आलेत मला तुमच्या बद्दल आदर आहे. प्रत्येक महासभेमध्ये प्रत्येक आयुक्त जेव्हा जेव्हा येतो. बऱ्याच दिवसापासुन आपल्या महापालिकेच्या गेटवर खुर्ची टाकुन बसतात. आपले कर्मचारी अधिकारी येतात ते कधी कधी १० ला येतात १०.३० ला येतात आणि तपासणी करतात. कोण वेळेवर येतो कोण येत नाही. कोण उशिरा आला त्यांच्यावर कार्यवाही करा, त्यांना नोटीस द्या, असे करा, तसे करा, दोन वेळा फोटो आलेला आहे मॅडमांचा वृत्तपत्रात, मॅडमांनी तपासणी केली, हजेरी घेतली मॅडम जर इतक्या पोटतिडकीने या विषयाची प्रामाणिकपणे काम करीत आहे. प्रवेशद्वारावर उभे राहुन तपासणी करतात. कर्मचारी चुकत आहे का ? काही चुकीचे घडत आहे का ? कामचुकारपणा करतात का ? मॅडमांना जर इतकी आत्मीकता आहे कामाबद्दल इतकी तळमळ आहे. ज्या प्रमाणे मॅडमांचे वृत्तपत्रात फोटो आले तर मला वाटले की, मॅडम त्यांच्यावर कार्यवाही करतील. जे चुकलेले लोक आहे. कारण २०-२०, २५-२५ वर्षापासुन ते लोकं तेच करत आहे. पण मी मॅडमांना वर्षभरापासुन सांगत आहे. हे जे काही कर्मचारी आहे ज्यांचे नाव पण मी मॅडमांना सांगितले होते की, हे लोकं गेल्या २०-२५ वर्षापासुन फक्त सह्या करत आहे आणि पगार घेत आहे. त्यांच्यावर कार्यवाही करा. मॅडमांचे शब्द सांगतो आयुक्त मॅडमांचे, आयुक्त मॅडम प्रशासनाचे जबाबदार अधिकारी आहात तुम्ही मला मॅडमांनी प्रत्येक वेळेस एकच उत्तर दिले. भाऊ तुमचे म्हणणे मला सगळे मान्य आहे. मला सगळ पटत आहे. या गोष्टी आम्हाला पण कळतात माहित आहे. हे कोणाचे शब्द आहे आयुक्त मॅडमांचे. तुम्ही जे म्हणत आहे ते आम्हाला ही मान्य आहे. हे आम्हालाही कळतं. पण ते कागदोपत्री कुठेच सापडत नाही. म्हणुन मी कार्यवाही करु शकत नाही. हे मॅडमांनी एक वर्षा आधी सांगितले आहे. मला माहित आहे, हे होत आहे व घडत आहे. कोण आहे ते पण मला माहित आहे. पण ते कागदोपत्री सापडत नाही म्हणुन मी कार्यवाही करु शकत नाही. हे आयुक्त मॅडमांचे शब्द मला वर्षभरापासुन माहित आहे. आता हे पथक तर मी नेमलेले नव्हते. हे पथक मी नेमलेले होते का ? मॅडमांनी नेमलेले होते. पाहणी करण्यासाठी मॅडमांनी ३ लोकांचे पथक नेमलेले होते. आणि ते पाहणी करायला

गेले. ही संकल्पना मॅडमांची होती. मॅडमांनी पाठविलेले होते. ज्या कर्मचाऱ्यांबद्दल मॅडम सांगत होते की, कागदोपत्री सापडत नाही ते आता कागदोपत्री सापडलेले आहे. तरी सुध्दा मॅडम काही कार्यवाही करत नाही. माझ्याकडे आज आहे, त्यांना काय सांगितलेले आहे, ते दोन कर्मचारी सही करुन गैरहजर होते जागेवर ते तर आहेच पण ज्यांनी अडव्हान्स सही केली. त्यांना पण काय सांगितले आहे की, कामात सुधारणा करा अशी सख्त ताकीद देण्यात येत आहे. म्हणजे आपण हे करतो ना मला बाविस्कर साहेबांना विचारायचे आहे. साहेब तुम्ही म्हणत आहात की, मला एका कर्मचाऱ्यानी सांगितले की, मला डोळयाचे प्रॉब्लम आहे आणि माझा चष्मा घरी राहीलेला होता. त्यांचा २५ वर्ष चष्मा घरीच राहत आहे. आले का लक्षात २५ वर्ष घरीच राहत आहे चष्मा घरी आणि त्यांना त्याच दिवशी डोळयांचा प्रॉब्लेम झाला. ते चष्मा घरी विसरले, म्हणुन सही त्यांनी २६ तारखेच्या ऐवजी २७ तारखेच्या ठिकाणी केली. हेच बोलले ना तुम्ही. मला एक सांगा, २६ तारखेला तुमचे पथक पाहणीसाठी गेले त्या ठिकाणी, त्यांनी सह्यांची पुस्तीका तपासली. त्यांच्या १ ते २७ पर्यंतच्या सह्या होत्या किती? १ ते २७ पर्यंतच्या सह्या होत्या बरोबर आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, चष्मा घरी राहिल्यामुळे मी २६ च्या ऐवजी २७ तारखेच्या ठिकाणी सही केली. मग त्या हजेरी पुस्तके प्रमाणे २६ तारखेपर्यंत सह्या किती असायला पाहिजे होत्या. भाऊ दोनच मिनीट, प्लिज दोनच मिनीट. नजरचुकीने कॉलम चुकला, तारीख चुकली, तर त्या रजिष्टर मध्ये सह्या किती असायला पाहिजे होत्या. २६ कारण २६ तारीख होती. सह्या किती होत्या. नजर चुकीने चष्मा नसल्यामुळे कॉलम चुकु शकतो, तारीख चुकु शकते. सह्या मात्र कश्या होऊ शकतात. हे तर जादा झाले, ही प्रशासनाची मिलीभगत आहे. मी आज उघडपणे सांगतो. हे महिन्याला ठरलेली अमाऊंट देतात. हे जे लोक आहे ना. त्यांचे जे युनिट प्रमुख असतात किंवा त्यांचे जे अधिकारी आहे ते जबाबदार असतात. त्याला सह्या करुन घरी राहण्याचे पैसे देतात ५०००-७०००. आणि हे वर्षानुवर्ष चाललेले आहे. भाऊ बोलु द्या ना. प्लिज बोलु द्या. प्रशासनाला नेमके काय साद्य करायचे आहे याच्यातुन. एकीकडे आयुक्त मॅडमांचे फोटो छापुन येतात पेपरात की, हजेरी घेत आहे, वेळेवर येत नाही. कामचुकार लोकांना धडा शिकवणार. आणि दुसरीकडे जेव्हा सापडतो माणुस तर तुम्ही झाकता त्याला. कसली भिती आहे. शिपायाची भिती आहे. तुम्ही उपायुक्त, ते आयुक्त आहे. तुम्ही शिक्षण घेतलेले आहे. तुम्ही मोठया पदावर आहात. शिपाईंवर कार्यवाही करायला घाबरतात तुम्ही. त्यानी ॲडव्हान्स सही केलेली आहे. आपल्याकडे कापडणीस साहेब होते. माझे अनुभव सांगतो. असे मी खुप देऊ शकतो. पण माझ्या गेल्या टर्ममध्ये मी नगरसेवक होतो. आयुक्त कापडणीस साहेब होते. पठारे म्हणुन एक सापडलेले होते ॲडव्हान्स सही मध्ये. त्यांना निलंबीत केलेले होते. ती रग तुमच्यात नाही. ही जबाबदारी तुमच्यात नाही.खालच्या लोकांना घाबरतात, आमदारांचे मंत्र्यांचे फोन येतील म्हणुन घाबरतात तुम्ही. मग दिखावा कशासाठी करतात. मनुष्यबळ नाही म्हणतात. जे लोकं आहे त्यांच्याकडुन तुम्ही काम करुन घेऊ शकत नाही. ते सापडतात, आम्ही म्हणतो आम्हाला सांगतात की, ते कागदोपत्री सापडत नाही. कागदोपत्री सापडल्यानंतर तुम्ही साधे उत्तर देतात.कामास सुधारणा करणेसाठी सख्त ताकीद देत आहे म्हणुन. दोन लोकं हजर नव्हते त्यांनी काय कारण दिले की, नातेवाईकाची तब्येत बरी नव्हती.ते तुम्ही मान्य करुन घेतले, त्यानी काही नोंद घेतलेली होती का त्या दिवशी. जो सांगुन गेला की, माझ्या नातेवाईकाची तब्येत बरी नव्हती. तुम्ही पाठवले का काही कामानिमित्त, तो ऑफिसच्या कामानिमित्त गेला होता का? नाही ना मग तो त्याच्या वैयक्तीक कारणाने गेला तर त्याची नोंद घेतलेली आहे का तेथे. दाखवा मला कागदपत्र तुम्ही.त्या दोन लोकांचा विषय झाला. आणि हा जो ॲडव्हान्स सही करणारा शिपाई आहे. यानी तर ॲडव्हान्स सही केलेली आहे हा तर गुन्हा आहे. का कार्यवाही नाही केली तुम्ही. ते जे दोन सही करुन घरी राहिले होते.त्यांच्या बद्दल तुम्ही म्हणु शकतात की, याच्यापुढे कामात सुधारणा करायची आणि जागेवर बसायचे म्हणुन ज्याने ॲडव्हान्स सही केलेली आहे. त्याच्यावर तुम्ही कार्यवाही का केली नाही. तुमच्यातले काही कर्मचारी मॅडमांना समजवतात. त्या शिपायाची बाजु घेऊन समजवतात. काय सांगतात की, मॅडम असा खुलासा देऊन टाकु नजरचुकीने झाले. तुमच्या शेजारी बसलेल्या अधिकाऱ्याने सांगितले मला माहिती आहे सर्व त्या माणसावर कार्यवाही का झाली नाही. त्या शिपायावर कार्यवाही का झाली नाही. कार्यवाही कोणावर झाली जो एक सज्जन माणुस आहे. जो चांगला माणुस आहे आस्थापनातला, लक्ष्मण सपकाळे साहेब या महापालिकेमध्ये खुप चांगले अधिकारी कमी आहे. मोजके अधिकारी चांगले आहेत.त्यातले ते सपकाळे साहेब आहे. त्यांची बदली केली गेली ते मला आज सकाळी कळले. मॅडमांनी तीन लोकांचे पाहणी पथक तयार केलेले होते. तुम्ही पाहणी केली २६ तारखेला, म्हणजे २६/०४ ला

एप्रिल महिन्यामध्ये. आज काय सुरु आहे. जुलै सुरु आहे. कुठे आहे ते पथक, कुठे आहे ते पथक, २६/०४ ला म्हणजे एप्रिल महिन्यात पाहणी केली. त्याच्यात दोन प्रतिनिधींचे नातेवाईक तुम्हाला कार्यवाही मध्ये सापडले, राजकीय लोकांचे नातेवाईक तुम्हाला कार्यवाहीत सापडले, एप्रिल महिन्यानंतर तुम्ही ते पथक बंद केले. एप्रिल महिन्यानंतर त्या पथकाने पाहणी का केली नाही. एकच दिवसाचे होती का ती ऑर्डर. आयुक्त मॅडमांनी एका दिवसाची ऑर्डर दिलेली होती का ? ते पथक एका दिवसासाठी नेमलेले होते का ? एप्रिल महिन्यानंतर कार्यवाही का थांबविण्यात आली. आज ते पथक कुठे आहे. ते का पाहणी करत नाही, ते का कार्यवाही करत नाही. सगळ व्यवस्थीत झालेले आहे. कर्मचारी सुधारले सगळे, सगळे जागेवर आहे, कामचुकारपणे काम करत नाही. फुकटाचा पगार घेत नाही.या महापालिकेला लुटत नाही. सगळं अपडेट चालल आहे का ? सगळे व्यवस्थतीत होऊन गेलेले आहे का ? मग नेमलेले पथक बंद करण्याचे कारण काय ? कारण हे आहे की, पहिल्याच कार्यवाही मध्ये तुम्हाला अशी व्यक्ती सापडली ज्याच्यावर तुम्ही कार्यवाही करायची हिम्मत करु च शकत नाही. तुम्हाला आमदाराचे फोन येतील, तुम्हाला मंत्र्यांचे फोन येतील. आपण पथक सुरु करुन चुक केली, हे तर आपल्याच अंगाशी येईल. हे आपल्या अंगाशी येईल म्हणुन तुम्ही पथक बंद करुन टाकले. ते कार्यवाही करणारे तीन लोकं जे होते. त्यांना मॅडमांने नेमलेले होते. त्या पथकामध्ये आस्थापनाचे लोकं. त्या लोकांनी आपल्या अधिकाऱ्यांचे आदेश माणुन आयुक्तांचे आदेश माणुन त्या ठिकाणी पाहणी केली. जे लोकं दोषी सापडले, त्या लोकांचा रिपोर्ट तुम्हाला सादर केला का तो त्या संबंधीत शिपाई आहे. त्या माणसाने आस्थापनातील ३ लोकं जे होते. पाहणीसाठी गेलेले. त्यांना धमक्या दिल्या. त्या आस्थापना विभागामध्ये खुर्ची लावुन बसले तेथे आणि त्यांना धमकवले, तुमचे सगळे काढतो मी आता, तुमच सगळ काढतो मी आता. येथे खुर्ची टाकुन बसतो त्यांना घाबरविले, इतक्या वर्षात कोणाची हिम्मत नव्हती, त्यांना धमक्या देण्याची तेथुन लक्ष्मण सपकाळे साहेबांची बदली करुन टाकली. एका शिपायासाठी, आणि हेच जेव्हा मी बोललो एका शिपायासाठी, माझ्यावर कोर्टात दोन दावे दाखल केलेले आहे. हेच बोललो मी प्रेस मध्ये की, हे २५ वर्षापासुन फुकटाचे पगार घेत आहे. आणि आज परत सांगतो, हे २५ वर्षापासुन फुकटाचे पगार घेत आहे. हे महापालिकेला लुबाडत आहे. हेच जेव्हा प्रेसमध्ये मी बोललो होतो, माझ्या अपरोक्ष दोन दावे कोर्टात दाखल केले, मी कोर्टात ४-४ तास बसलो तेथे. दोन दावे दाखल केले माझ्यावर. काय खोटं बोललो मी, सापडले ना हे. हे कोर्टात देणार आहे मी सगळे, पण तुम्ही काय करत आहात. अरे किती झाकणार, असा कोणी सापडला असता तर त्याला सोडले असते का तुम्ही. तेव्हा पेपरबाजी केली असती तुम्ही त्यांच्यावर कार्यवाही केली असती , त्याच्यावर कार्यवाही केलीच असती. प्रशासन किती स्ट्रीक्ट वागत आहे. अधिकारी किती स्ट्रीक्ट वागत आहे. तुम्ही मॅडम मला सांगा, याच्यामध्ये फरक आहे की नाही. सही केल्यानंतर जागेवर गैरहजर असणे, नसणे आणि ॲडव्हान्स सही करणे याच्यामध्ये फरक आहे की नाही.सांगा मला.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर ज्या प्रमाणे सन्मा.सदस्य सांगत आहे. यामध्ये या अनुषंगाने आपण भरारी पथक लावलेले आहे. बऱ्याच वेळी वारंवार ही चर्चा होते की, कर्मचारी वेळेवर येत नाही. त्यानुसार ते पथक लावलेले आहे. आणि आता पर्यंत मागचा जो आपला अनुभव आहे. कापडणीस साहेबांच्या काळामध्ये डायरेक्टली आपण सस्पेंड केले किंवा बडतर्फ केले, त्यांना न्यायालयात जाऊन पुन्हा आपल्याला घ्यावे लागले आणि कामावर नसतांना सुध्दा पगार द्यायची आपल्यावर वेळ आली. हे होऊ नये म्हणुन आपल्याला प्रशासकीय दृष्टया कागदोपत्री सगळे व्यवस्थीत बसेल याच दृष्टीने कार्यवाही करायची असते. त्याची चौकशी करुन त्याचे पुरावे असुन ते सिध्द झाले पाहिजे. तरच कार्यवाही टिकते. अदरवाईज ती कार्यवाही कोर्टाकडुन ताशेरे ओडले जातात प्रशासनावर.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, तुमच्या बोलण्यात विसंगती आहे. तुम्ही एक विषय लक्षात घ्या. तुम्ही म्हणत आहात की, कापडणीस साहेबांनी सरसकट कार्यवाही केली. न्यायालयात जाऊन त्यांना परत घ्यावे लागले. मान्य आहे. तुमच्याकडे प्रुफ आहे ना मॅडम ॲडव्हान्स सहीचे. आणि तुमच्या अधिकारात आहे. ते कोर्टात गेले तर तुम्ही कोर्टात देऊ शकत नाही का की या व्यक्तीने ॲडव्हान्स सह्या केलेल्या होत्या हजेरी पुस्तीकेमध्ये. हा पुरावा नाही आहे का ? आणि नंतर जर न्यायालयाने निर्णय दिले असते तर आपण परत घेतले असते त्यांना आमचे काही म्हणणे नव्हते.

**मा.आयुक्त :-** आज जेव्हा जेव्हा मी जॉईंट झाले, जेव्हा जेव्हा मी हजेऱ्या घेतल्या. प्रत्येक वेळी याच्यामध्ये किमान आम्हाला ८ ते १० कर्मचारी सापडतात. जर आपण ४० च्या मध्ये, ४० जणांवर कार्यवाही करतांना आपण ४० लोकांना सस्पेंड करत आहोत तर कामे कोणाकडुन करुन घ्यायचे. स्टेप बाय स्टेप घ्यावे लागेल ना.

**श्री.अनंत जोशी :-** वाह मॅडम, काय उत्तर आहे.

**मा.महापौर :-** मॅडम, असे तर काम होणारच नाही, त्यांच्याकडुन काम करुन घ्यायचे आहे आपल्या.

**श्री.अनंत जोशी :-** तुम्ही ४० लोकांचे म्हणत आहे ना मॅडम, ४० लोकांवर कार्यवाही केल्यानंतर काम कोण करणार आहे. जे लोकं कामच करत नाही ना. त्यांच्याकडुन कामाचे काय प्रश्न येतात. आणि सगळयात महत्वाचा विषय मी तुम्हाला वारंवार सांगत आहे. हे पण चुकीचे आहे. हजेरी लावुन जागेवर नसणे हे पण चुक आहे. वर्षानुवर्ष अनेक विभागाचे कर्मचारी काम करत असतात. त्यांना आपण निर्दोष मानत नाही. पण जो व्यक्ती ॲडव्हान्स सही करतो तो दोषी आहे की नाही. आणि बाविस्कर साहेब हे तुम्ही जसे ठरविले की, त्या शिपायाने २७ तारखेची ॲडव्हान्स सही जी केलेली होती. ती त्या महिन्यातल्या १ ते २७ ची होती. १० ते २७ पर्यंतची होती की, २० ते २७ पर्यंतची होती. तुम्ही कसे ठरविले की, २६ तारखेला पाहणी केली आणि २७ ची सही आढळत होती. असु शकतो ना . असु शकतो ना की, २७ तारखेपर्यंत सह्या केलेल्या असतील. तुम्ही कश्यावरुन निर्णयाला पोहोचले. तुमच्याकडे काय प्रुफ आहे. त्याच दिवसाची ॲडव्हान्स सही होती. मी म्हणतो पुर्ण २७ दिवसाच्या ॲडव्हान्स सह्या होत्या. आणि हे प्रशासन म्हणुन तुम्ही पण म्हणु शकता अधिकारी म्हणुन, ईच्छाशक्ती पाहिजे मॅडम फक्त दिखावा नाही. मी स्पष्ट बोलेल आणि हे सत्य फार त्रासदायक आहे. हे सत्य मी बोलतो ना मी भोगत आहे. माझ्यावर दावे दाखल केले गेले. याच्यावर उत्तर द्या नाही तर कार्यवाही करा. मी पिछा सोडणार नाही. माझ्याकडे २ महिने अजुन बाकी आहे. ही टर्म संपवायला.

**मा.आयुक्त :-** आपण यात जे कर्मचारी सापडलेले आहे. त्यांना पहिली प्राथमिक शिक्षा ही ताकीद देण्याची दिलेली आहे. त्याची सर्व्हीसबुकला नोंद होते.शिक्षा देतांना सुध्दा अगोदर किरकोळ द्यायची असते. त्यानंतर कठोर द्यायची असते. आणि त्या अनुषंगाने आपल्याला स्टेप बाय स्टेप जावे लागते. पहिल्यांदा आपण कठोर शिक्षा देऊच शकत नाही. त्यामुळे तुम्हाला स्टेप बाय स्टेपच जावे लागते.पथक बंद केलेल नाही. असे झालेले असेल तर पथकाने एकदा पुन्हा तपासणी करायला सुरुवात करावी. पथक बंद करा अशी कुठेही सुचना दिलेली नाही.

**श्री.अनंत जोशी :-** चोरी, दरोडा आणि खुन यात फरक आहे ना मॅडम, सगळयांना एकच शिक्षा असते का ? सगळयांना एकच शिक्षा असते, नका करु असे.कळते मॅडम, जे दृश्य आहे ते लोकांना दिसते. आणि येथे काय सुरु आहे ते पण कळत आहे. नका वागु असे. तुमच्याकडुन खुप अपेक्षा होत्या मॅडम. चांगल्या अधिकाऱ्याबद्दल मी चांगलेच सांगतो. माझा स्वभाव आहे मी लपवुन काहीच ठेवत नाही. मला अभिमान वाटला मी स्वत: तुमचे अभिनंदन केले. मी सांगितले की, तुम्ही लढा देऊन आल्या, स्त्री लढा देऊन आली. आणि आज तुम्ही चुकत आहात ते पण सांगेल की, तुम्ही चुकत आहात म्हणुन. नका करु असे. आणि वैयक्तीक नाही. तुमचे शब्द परत सांगतो. मी मॅडमांकडे गेलो, मी माहितीच्या अधिकारात सगळे कागदपत्र काढलेले आहे. तुम्ही आजपर्यंत म्हणत होते ना की, कागदोपत्री सापडत नाही. ते कागदोपत्री सापडले आहे. मॅडम मला काय बोलल्या, भाऊ तुमचा राजकीय विषय बाजुला ठेवा. राजकीय विषय काय ? म्हणे तुमचे आपसातले भांडण. कर्मचारीशी माझे कसले भांडण आहे. त्याचे कोणी नातेवाईक असतील लोकप्रतिनिधी, नगरसेवक असतील, नगरसेविका असतील तो वेगळा विषय आहे. ते तर तुमचे कर्मचारी आहे ना. तुमचे शिपाई आहे ना. त्यांच्याशी माझा काय वाद आहे. तो प्रशासनाचा भाग आहे. माझे वैयक्तीक काय आहे त्याच्यामध्ये. माझे वैयक्तीक वाद काय ? दुसरा विषय मॅडमांनी सांगितले मोकळयापणाने बोलले नाही मॅडम. मोघम बोलल्या. तुम्हाला माहित आहे काय होईल पुढे, आमदारांचा फोन येईल, दुसऱ्या आमदारांचा फोन येईल, तिसऱ्या आमदारांचा फोन येईल. येऊ द्या ना फोन, कार्यवाही करा, मलाही सांगा आणि आमदारांना सांगा आणि मी आता १५-२० मिनीट बोललो याचे शेवट काय ते सांगुन द्या तुम्ही.

**मा.आयुक्त :-** सर मी सांगितले ना, पथक एकदा परत ॲक्टीवेट होईल. जसे जसे कर्मचारी आढळतील त्याप्रमाणे त्यांना शिक्षा करण्यात येईल.

**श्री.अनंत जोशी :-** जे झाले त्याचे काय ?

**मा.आयुक्त :-** ती तर झाली सर शिक्षा, कायद्यामध्ये शिक्षा आहे. शिक्षा आहे ताकीद देणे, सोडण अस नाहीये . सर्व्हीसबुकला नोंद होते ताकीदची. किरकोळ शिक्षेतली पहिली शिक्षा आहे ती.

**श्री.अनंत जोशी :-** सॉरी मॅडम, वाईट आहे. मला कोर्टात जे करायचे आहे. ते मी लढाई जी लढायची आहे ती मी लढणार, येथे लढाई वेगळी होती. तुमच्याकडुन अपेक्षा होत्या. मी तुमची माफी मागतो आणि सांगतो मला तुमच्याकडुन न्याय मिळणार नाही खरं सांगतो, जे कापडणीस साहेब करु शकतात ते तुम्ही करु शकत नाही. सारखा विषय आहे. आहो त्यांची हिम्मत कशी होते की, एक शिपाई जाऊन आस्थापना विभागाच्या अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांना धमक्या देतो. तुम्ही माझ्या प्रभागात कसे काय येतात म्हणुन या गोष्टी तुम्हाला माहित नसतात का तुम्हालाही माहित असतात सगळया गोष्टी. बाविस्कर साहेब योग्य नाही वाईट आहे हे. आणि ऐका,तुम्ही आज दबावा पोटी एका राजकीय व्यक्तीच्या नातेवाईकाला माफ करत आहात सोडत आहात. हे सगळयांना कळेल तुमच्या कर्मचाऱ्यांना, तुमच कर्मचारी कोणीच ऐकणार नाही. कोणीच तुम्हाला दुमटणार नाही. कारण तुम्ही कार्यवाहीच करत नाही. तुम्ही उडवा उडवीचे उत्तर देतात काही ही सांगतात. वाईट आहे.

**मा.महापौर :-** लक्षवेधीला सुरुवात करण्यात यावी.

**नगरसचिव :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ लढ्ढा यांनी मा.महापौर महोदया यांच्याकडे लक्षवेधी सुचना दिलेली होती. सदरची लक्षवेधी सुचना मा.महापौर महोदया यांनी स्विकृत केलेली आहे.

**(सन्मा.सदस्य श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी मांडलेली लक्षवेधी खालील प्रमाणे असे)**

**मा.महापौर महोदया,**

**स. नमस्कार,**

जळगांव शहर महानगरपलिकेला राज्य शासनाकडुन शहरातील रस्ते व मुलभुत सोयी सुविधेसाठी निधी वितरीत करण्यात आला असुन सन २०१८ ते आज पर्यंत तारीख व वर्ष निहाय किती निधी मुलभुत सोयी सुविधेसाठी मंजुर झालेला असुन त्यापैकी किती रक्कम आज पावेतो मनपाकडे प्राप्त झाली आहे व मंजुर झालेला निधीमधुन कोण कोणती कामे प्रस्तावीत करण्यात आलेली होती व आहे त्यापैकी आजपर्यंत किती कामे पुर्ण झालेली असुन उर्वरित कामांची सदय परिस्थिती काय आहे.

दि.२९/०६/२०२३ रोजीच्या वर्तमान पत्र दै.दिव्य मराठी च्या दिव्य सिटी अवृत्ती मध्ये प्रसिध्द झाल्या बातमीच्या अनुषंगाने जुने नेरी नाका ते नेल्सन मंडला चौक, अजिंठा चौफुली पर्यंत तसेच मोहाडी फाटा ते लांडोर खोरी हा रस्ता पुर्वी ३८ कोटी रु च्या निविदेत डांबरीकरणचे कार्यादेश मक्तेदार यांना देण्यात आले होते परंतु मध्यंतरी च्या काळात दोघीही रस्ते नव्याने कॉंक्रीटीकरण करण्याचे ठरले असल्याचे समजले, परंतु दि.२९/०६/२०२३ दै.दिव्य मराठीच्या बातमीच्या अनुषंगाने ते पुन्हा डांबरीकरणात करण्याची निविदा काढण्यात आल्याचे दिसत असुन नेमकी सदय परिस्थिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे. महानगरपालिका ही शहराचा विकास करणेचे दृष्टीने स्वतंत्र प्राधिकरण असुन सुध्दा मनपा या सर्व बाबी पासुन अनभीज्ञ आहे असे दिसुन येते. सर्व सामान्य नागरीक या संदर्भात लोक प्रतिनिधींना जाब विचारत असतांना लोकप्रतिनिधींची सुध्दा हतबलता दिसुन येते तरी खालील मुद्दयासह सर्व बाबींची दखल घेवुन सर्व सन्माननीय सदस्यांना याबाबत माहिती उपलब्ध करुन देणेबाबत आपले लक्षवेधु ईच्छितो व दिनांक ०७/०७/२०२३ च्या महासभेमध्ये सदरहु लक्षवेधीवर चर्चा करण्याची परवानगी मिळावी ही विनंती.

**आपला विश्वासु**

**सही /-**

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौर महोदया, लक्षवेधी लावण्याच्या मागचा हेतु हा आहे की, दि.२९/०६/२०२३ रोजी दै.दिव्य मराठीच्या बातमीमध्ये एक बातमी आलेली होती. आणि रस्त्यांच्या संदर्भात बातमी होती. आणि त्या बातमीचा आश्यर्च असे होते की, काही रस्ते यापुर्वी ३८ कोटी रूपयाच्या निविदेमध्ये त्यांचे कार्यादेश देण्यात आलेले होते.त्यामधील काही रस्ते हे कॉंक्रीटीकरण मध्ये प्रस्तावीत करण्यात आलेले होते.म्हणजे उदा. नेल्सन मंडेला चौक ते अजिंठा चौफुली ते नेरी नाक्यापर्यंत हा रस्ता यापुर्वी ३८ कोटी रूपयामध्ये घेण्यात आलेला होता. तसेच त्याचा कार्यादेश मक्तेदाराला देण्यात आलेले होते.तसेच मोहाडी फाटा ते लांडोरखोरीचा रस्ता हा सुध्दा ३८ कोटीच्या कामांमध्ये पुर्वी प्रस्तावीत केलेला होता. आणि तद्नंतर तो रस्ता पुन्हा कॉंक्रीटींगकरणामध्ये प्रस्तावीत करण्यात आलेला होता. एकाच कामाचे कार्यादेश मक्तेदाराला देण्यात आलेनंतर त्याच कामावरती कॉंक्रीटींगचा प्रस्ताव देण्यात आला. आणि तो आपण मान्य ही केला. वास्तविक बघितले तर मोहाडी फाटा ते लांडोरखोरी हा रस्ता सन्मा.सदस्य जितुभाऊ मराठे यांच्या येथे एक धार्मिक कार्यक्रम होता. त्यावेळेला मक्तेदाराकडुन त्या रस्त्यावरती बऱ्याच प्रमाणावरती डागडुगीचे काम, काही मेनटेनन्सचे काम करून घेण्यात आलेले होते.परंतु रस्ता कॉंक्रीटींगचा होत आहे आणि रस्ता कॉंक्रीटीकरणचा होत असल्याने तो काही लेखी आदेश न देता, सदरहु मक्तेदाराला ते काम थांबवण्याच्या संदर्भातल्या सुचना संबंधीत विभागाकडुन देण्यात आलेल्या होत्या. आणि त्याच पध्दतीने अजिंठा चौक ते नेरी नाका, या रस्त्याच्या संदर्भातले सुध्दा काम मक्तेदाराला न करण्याच्या संदर्भातल्या सुचना देण्यात आलेल्या होत्या. परंतु २९/०६/२०२३ ला दिव्य मराठीच्या त्या बातमीमध्ये असे दिसुन आले की, सर्व रस्ते हे कॉंक्रीटीकरणाची लांबी कमी भरत असल्या कारणाने पुन्हा रद्द करण्यात आले आणि पुन्हा डांबरी करणामध्ये प्रस्तावीत करण्यात आले. आणि त्याच्या संदर्भातली स्वतंत्र निविदा काढण्यात आली. म्हणजे बातमी वाचल्यानंतर एक संभ्रम निर्माण होतो की, जे काम पुर्वीच मक्तेदाराकडे ज्याचे कार्यादेश आहे. मग ते कार्यादेश अस्तीत्वात असतांना सुध्दा पुन्हा त्याची निविदा कश्या पध्दतीने काढण्यात आलेली आहे. अश्या पध्दतीने तो संभ्रम निर्माण झालेला होता. त्या बातमीच्या अनुषंगाने मी बातमी वाचल्यानंतर त्या बातमीला व्हॉटसअॅप वरती मा.आयुक्त महोदया यांना ती प्रत पाठवली की, या बातमीमध्ये काही तथ्य आहे का ?मा.आयुक्त महोदयांकडुन उत्तर आले की, हे पी.डब्ल्यु.डी.ला माहिती आहे. पण त्यानंतर मी शहर अभियंतांना सुध्दा त्या बातमीचे कात्रण पाठविले. आणि त्यांच्याकडुन सुध्दा विचारणा केली. नेमके या बातमीचे आश्यर्च काय ? आणि हे संमभ्र असल्याकारणाने नेमकी परिस्थिती काय त्यांनी सुध्दा सांगितले की, याच्या बाबतीत कुठलीच माहिती आमच्याकडे नाही. मी त्यानंतर सार्व.बांधकाम खात्याच्या उपअभियंता श्री.गिरीष सुर्यवंशी यांना फोन केला, आणि त्यांना सुध्दा बातमीचे कात्रण पाठविले. आणि त्यांना सुध्दा विचारना करण्यात आली की, नेमकी ही परिस्थिती काय? त्यांनी सुध्दा सांगितले की, मला या विषयाची कल्पना नाही. आता एखाद्या विषयाच्या संदर्भातली लोकपत्रात बातमी येते आणि ज्या ज्या काही जबाबदार संस्था याच्यामध्ये, मग महानगरपालिका शहराचे प्राधिकरण म्हणुन त्यांना याच्या संदर्भातली कल्पना नाही. ज्या सार्व. विभागाचे मार्फत हे काम करण्यात येत आहे. त्या विभागाचे उप-अभियंता यांना याची कल्पना नाही. अश्या पध्दतीने नेमके चालले काय आहे रस्त्यांच्या संदर्भात विषय हा मुळात कळायला मार्ग नाही. कोट्यावधी रूपयांचा निधी प्राप्त झ ाला ही खरी गोष्ट आहे. कॉंक्रीटींगच्या संदर्भात निविदा प्रसिध्द होतात वृत्तपत्रात बातम्या येतात. आज मी म्हणतो या सभागृहातला एकही सदस्य असेल किंवा एकही अधिकारी असेल की, तो शास्वतपणे जळगांव शहरातील रस्त्यांचे नियोजन कश्या पध्दतीने सुरु आहे. कोणत्या विभागामार्फत सुरु आहे. कोणते कामे प्रस्तावीत केलेले आहे. कोणते कामे पुर्णत्वाकडे गेलेली आहे. कोणते कामे तांत्रिक अडचणीमुळे प्रलंबित आहे. याच्या संदर्भातली माहिती देऊ शकणार नाही. ही माझी धारणा आहे. आणि याच अनुषंगाने की, जेव्हा कोट्यावधी रूपयांचे विकास कामांचे विषय चालत असतांना कुठल्याही संस्थेतले पदाधिकाऱ्याना अधिकाऱ्याना या गोष्टी पासुन अनिमित्त राहणे मला वाटते हे योग्य नाही. कारण शेवटी लोकप्रतिनिधी कुठलेही नगरसेवक असेल आमदार असेल कोणीही असेल, ज्या वेळेला शहरामध्ये फिरतो, जरी मी माझ्या प्रभागाची माहिती घेऊ शकत असेल.परंतु ज्या वेळेला मी दुसऱ्या प्रभागात जातो. तिथले माझे कोणी नातेवाईक असतील, कर्मचारी असतील किंवा सामान्य नागरीक असतील. ते हे विचारणा करतात की, आमचे रस्त्यांच काय करायच. त्या वेळेला आपल्याला सुध्दा निरूत्तर राहव लागत, कारण कुठले नियोजन कश्या पध्दतीने सुरु याच्या

संदर्भातली कुठलीच माहिती योग्य पध्दतीने उपलब्ध होत नाही. आज मला सांगा, १०० कोटी रुपयांचा सगळयात पहिला निधी प्राप्त झालेला होता २०१८ ला. २०१८ ला प्राप्त झालेल्या निधीच्या अनुषंगाने साधारणता ३८ कोटी २५ लक्ष रुपयांचे कार्यादेश देण्यात आले. म्हणजे आज २०१८ मध्ये मंजुर झालेला निधी आज २०२३ ला आलेला आहे. संपुर्ण ५ वर्षाचा कालावधी झाल्यानंतर ही आज जर आपण सभागृहात शहराबद्दल विचारणा केली की, ३८.२५ कोटीच्या कामांचे स्टेटस काय आहे की, याच्यामधील किती कामे पुर्णत्वास झालेली आहे, किती १००% झालेली आहे. कुठली कामे ७५% झालेली असेल. कुठली कामे २५% झालेले असतील, कुठल्या कामांना अद्यापपावेतो सुरुवात ही झालेली नाही. तरी सुध्दा मी म्हणतो की, मला खात्री आहे की, मा.शहर अभियंता सुध्दा या संदर्भात समाधानकारक उत्तर या सभागृहाला देऊ शकणार नाही. तर अश्या पध्दतीने ३८.२५ कोटीचे कार्यादेश दिल्यानंतर त्याच्या मधील काही कामे प्रगतीपथावर आहे. काही कामे खुप अत्यावश्यक होती. परंतु त्यांना अद्यापपावेतो सुरुवात सुध्दा झालेली नाही. उदाहरणार्थ म्हणायचे तर मागचे आषाढी एकादशीच्या निमित्ताने ज्यावेळेला सुरेशदादांसोबत पिंप्राळयाच्या रथोत्सवाला जाण्याचा प्रसंग आला. त्या रस्त्याची परिस्थिती मा.उपमहापौर त्याच भागात राहतात. ५-७ नगरसेवक त्या प्रभागातुन निवडुन येतात.परंतु त्या रस्त्यांची दुर्दशा आज इतक्या वाईट अवस्थेत आहे. उपनगर आहे पिंप्राळा अनेक नविन नविन भागातल्या कॉलन्या त्या भागात आहे. आज समजा १२-१५ नगरसेवक त्या भागातले प्रतिनिधीत्व करतात. मला वाटत नाही की, त्या भागातले नागरीक त्या नगरसेवकांना आशिर्वाद देत असतील की, शिव्या देत असतील. हा एक मोठा गंभीर विषय आहे. तर अश्या पध्दतीने त्या ३८ कोटीच्या कामांच्या प्राथमिकता सुध्दा ठरवितांना कोणाला विश्वासात घेतले जात नाही. जिथे गरजेचे आहे तेथे कामांना प्राथमिकतेने सुरुवात होणे अपेक्षित होते. परंतु त्या रस्त्यांची दुरदशा बघाल तुम्ही. म्हणजे कुठेतरी कॉलन्यांमध्ये कामे सुरु आहे. परंतु ज्या मुख्य रस्त्यावरुन दिवसात कमीत कमी एक लाख लोकांचे येणे जाणे होत असते. आणि त्या रस्त्याची दुर्दशा महापौरताई आपण ही आल्या होत्या. ज्या वेळेला ईलेक्ट्रीक पोलसाठी आपण आणि उपमहापौर दोघी आले होते.अश्या ज्या प्राथमिकता आहे त्या प्राथमिकता नेमके धोरण कोण ठरवितो. महापालिकेचे प्रशासनाला विचारणा केली तर  महानगरपालिकेचे प्रशासन म्हणते की, ती कामे आपल्या अख्तयारीत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आपल्याला बोलण्याची सोय नाही. कारण काही आपण तेथील प्रतिनिधीत्व करत नाही. मग अश्या गोष्टी आपल्याला दाखविणार कोण.परंतु या सगळया गोष्टींना शेवटी जाब देण्याचे काम जे आहे. नागरीक म्हणुन लोकप्रतिनिधींनाच विचारतात किंवा नगरसेवकांना विचारता आणि नगरसेवक सुध्दा या परिस्थितीमध्ये त्यांचे समाधान करु  शकत नाही. किंवा त्यांना समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही. तर हे अश्या पध्दतीचे जे नियोजन आहे. मला वाटते अत्यंत कुठेतरी चुकीचे आणि गैरजबाबदारीचे नियोजन आहे. ३८.२५ कोटीतले कामे सुध्दा अजुन पुर्णत्वास आलेले नाही. त्यापैकी ६२ कोटी रुपयांची मागणी आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातुन शासनाकडे केलेली होती. उर्वरीत ६२ कोटीचा प्रस्ताव आपण मंजुर केलेला होता. ६२ कोटीचा प्रस्ताव ज्या वेळेला सभागृहात चर्चेला आला आणि त्याच्यामध्ये प्रत्येक सदस्याचा वाढीव मागणीचा विचार करता करता साधारणता तो ८४ लाख रुपयांचा प्रस्ताव झाला. ८४ कोटी रुपयापर्यंतचा प्रस्ताव झाला. आज त्याचे नेमके स्टेटस काय आहे. याच्या संदर्भातील तरी माहिती या सभागृहात उपलब्ध होईल का ? म्हणजे शासनाने २०१८ मध्ये १०० कोटी रुपये मंजुर केलेले आहे. त्याला तत्वता मान्यता दिलेली आहे. म्हणजे आज जर त्याचा हिशोब जोडला. तर ३८ कोटीचे जी कामे मंजुर केलेली आहे. त्याच्यातलेही साधारणता ११, ११.५ कोटी रुपये हा मनपाचा हिस्सा आहे. आणि उर्वरीत फक्त २७ कोटी रुपये हाच शासनाकडुन अपेक्षित आहे. म्हणजे १०० कोटीचे अनुदान मंजुर झाल्यानंतर त्याच्या मध्ये ३० कोटी रुपये आपले जाणार आहे. परंतु त्या निधीचा विनियोग कश्या पध्दतीने कधी होणार आहे. कोण त्याला जबाबदार आहे. याच्या संदर्भातली माहिती जर सभागृहाला मिळाली तर कमीत कमी या संदर्भात भविष्यात त्या निधीच्या संदर्भात कोण पाठपुरावा करत आहे किंवा त्याचे सद्यास्थितीत स्टेटस काय आहे म्हणुन ही लक्षवेधी घेण्याचा माझा ४ दिवसापुर्वीचा हेतु हाच होता की, कमीत कमी या सार्वजनिक विभागाच्या माध्यमातुन का होईना. या संदर्भातले करंट स्टेटस काय आहे.याची माहिती अवगत होणे अपेक्षित आहे.

**श्री. सोनगिरे, शहर अभियंता :-** सन्मा.सभागृह, सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ लक्षवेधीच्या बाबतीत चर्चा केली. त्याची वस्तुस्थिती पाहता. जशी लक्षवेधीची सुचना आमच्या कार्यालयास प्राप्त झाली. तर त्या अनुषंगाने आम्ही माहिती उपलब्ध

करुन देण्यासाठी कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, यांना त्याच तारखेला म्हणजे ४ तारखेला पत्र दिलेले आहे आणि प्रत्यक्ष फोन करुन त्यांना सांगितले ही होते की, ७ तारखेला आमची महासभा आहे. त्यापुर्वी तुम्ही आम्हाला अपेक्षित असलेली माहिती देण्यात यावी. नेमकी आम्ही सभागृहाला ती माहिती देऊ शकतो.परंतु ती माहिती अद्याप आम्हाला मिळालेली नाही. त्यामुळे आज रोजी मी आपल्याला अधिक माहिती देऊ शकत नाही. आता राहिलेला विषय १०० कोटी पैकी ३८ कोटीचा आणि उरलेले ६२ कोटी ज्यात ८४ कोटीचे प्रस्ताव झालेले होते. ते प्रस्ताव आम्ही तयार करुन तांत्रिक छाननीसाठी पी.डब्ल्यु.डी.कडे जमा केलेले आहे त्याची आपल्याकडे पावती देखील आहे. आणि आता पुर्ण जी १०० कोटीची रक्कम मंजुर झालेली आहे. त्यांच्या यादीमध्ये पुन्हा त्यातील तेही रस्ते आलेले आहे.पुर्वी सुरवातीला जे १०० कोटी मंजुर  झाले होते. त्यामध्ये जी कामे होते. त्यात अमृत योजना आणि अंडरग्राऊंड ड्रेनेज चालु असल्यामुळे इतर कामांचा समावेश केलेला होता. त्यात ओपनस्पेस असेल, डिव्हायडर असेल,नाल्याचे बांधकाम असेल. पण त्यानंतर जशी जशी कामे पुर्ण होण्यात आली. त्यावेळेला मा.मंत्री महोदयांच्या अधिपत्याखाली मा.जिल्हाधिकारी साहेबांच्या उपस्थितीत त्रिसदस्यीय समिती झाली. त्या समितीने नेमुन दिलेले फक्त रस्त्यांचे कामे करण्यात यावे अश्या सुचना करण्यात आल्या. त्यानुसार आपण ती ओरिजीनल जी मुळ यादी होती. ती अ,ब,क करुन त्यामध्ये बदल करुन पुर्ण रस्त्यांचे कामे सुचवलेली होती. परंतु त्यामध्ये ३८.२५ कोटीचा तो निधी आपल्याला मंजुर होवुन बी ॲण्ड सीकडे वर्ग झालेला आहे आणि त्यांचेमार्फत ही कामे चालु आहे. त्यामध्ये ४९ रस्त्यांचे कामे असुन त्यातुन २५ रस्त्यांच्या कामांची सुरूवात केलेली आहे. याची पुर्ण माहिती आपल्याकडे उपलब्ध झालेली नाही. जशी प्राप्त होईल तशी आपल्याला ती माहिती देण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया, ३८ कोटीचे कामे हे प्रगतीपथावर आहे हे मान्य आहे. परंतु उर्वरित ८४ कोटी रुपयांची कामे जी प्रस्तावीत करुन पाठवलेली आहे. त्याच्या संदर्भात उर्वरित ३ महिन्याचा कालावधी उरलेला आहे. त्याच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने काय कार्यवाही केली. याच्या संदर्भात मनपा प्रशासनाने काही पाठपुरावा केलेला आहे का ?

**मा.आयुक्त :-** ८४ कोटीची यादी आपण जेव्हा त्यांना पाठवली. त्यानंतर त्यांनी यांच्याशी संपर्क साधुन त्यातलेच काही कामे घेवुन आर.सी.सी.चे प्रस्ताव तयार करुन पाठविले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला सांगा आयुक्त महोदया, हे संपुर्ण नियोजन प्राधिकरण जळगांव शहर महानगरपालिका आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग आहे. म्हणजे आंसरेबल कोण आहे या शहराच्या सगळया समस्यांसाठी.प्राधिकरण म्हणुन स्वतंत्र याला एन.एस.जी.टी आहे. आयुक्त म्हणुन ही आपली जबाबदारी आहे. आणि अश्या पध्दतीने आपण एका हेड खाली ८४ कोटीची कामे प्रस्तावीत केलेली आहे. ८४ कोटीचे अतिरिक्त निधीतल्या संगनमतातुन आपण प्रस्तावीत जरी केले असतील. तरी ६२ कोटीतल्या १०० कोटीला तत्वता मान्यता दिली होती. त्या १०० कोटीतील उर्वरित ६२ कोटीला सुध्दा मान्यता देणे हे त्यांच्या कर्तव्याचा भाग होता. परंतु या संदर्भात महानगरपालिकेकडुन कुठल्याच पाठपुरावा करण्यात आलेला नव्हता.  आणि आपण पाठविलेली ८४ कोटीतली कामे त्यांनी त्या डेडमधुन उचलायची आणि नविन १०० कोटीमध्ये प्रस्तावीत करायची आणि आपल्याकडे पुन्हा एन.ओ.सी.घ्यायची. म्हणजे नेमकी या महानगरपालिकेची याबाबतीत भुमिका स्पष्ट व्हायला पाहिजे की, मुळात आपल्याला १०० कोटी जे पाहिजे होते त्यापैकी फक्त ३८ कोटींचीच कामे मान्य झालेली आहे. उर्वरित निधी हा आपला लॅप्स झालेला आहे किंवा तो आता आपल्याला खर्च करता येणार नाही. जी काही वस्तुस्थिती असेल. आज सर्व सामान्य जनतेला काय वाटते की, आता आलेले १०० कोटी नंतर आलेले १०० कोटी, त्याच्यानंतर आलेले ८५ कोटी, त्याच्यानंतर विविध नगरसेवकांना जिल्हा नियोजन मंडळाकडुन मिळालेले निधी. त्याच्यानंतर राज्य शासनाकडुन वेगवेगळया सोयीसुविधांकरीता आणलेला निधी, इतका कोट्यावधी रुपयांचा निधी प्राप्त झाल्यानंतरही जळगांव शहराच्या रस्त्यांची अवस्था कशी दिसुन येते म्हणजे हा पैसा लोकप्रतिनिधी खावुन जातात का ? हा त्याच्या मागचा गैरसमज हा संपुर्ण सभागृहाला होणे स्वाभावीक आहे. नेमके आपल्याकडे असेल निधी आपल्याकडे शिल्लकी पडलेले आहेत की आपण पाठविलेल्या प्रस्तावाचा आपणही पाठपुरावा करत नाही. आणि सार्वजनिक बांधकाम विभागही सुध्दा याच्यावर काही कार्यवाही करत नाही. असली परिस्थिती तर नाही.

**मा.आयुक्त :-** भाऊ, हा ८४ कोटीचा जेव्हा आपण प्रस्ताव पाठविला होता. त्यानंतर तो बदली साठी होता. तर माझ्या माहितीनुसार पवार साहेबांची मंत्रालयात बैठक झाली होती. आणि मग तेथे त्यांना सुचना दिल्या होत्या की, हा प्रस्ताव सी.सी.करुन टाका. त्यानंतर सी.सी.चे प्रस्ताव गेले अशी माझी माहिती आहे. नंतर ८ फेब्रुवारीला आपण ७५ कोटीचा आणि १०० कोटीचा एन.ओ.सी. दिलेला आहे त्यांना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपल्याला सुरवातीला १०० कोटीचा जो निधी मंजुर झालेला आहे. आता हे जे सी.सी.चे प्रस्ताव केलेले आहे कश्या मधुन आले आहे नविन मिळालेल्या १०० कोटीमध्ये. मग पुर्वीचा १०० कोटीचा ६२ कोटी कुठे हवेत गेले का ?

**मा.उपमहापौर :-** ते कुठे आहे ६२ कोटी ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याची कमीतकमी जनतेला तरी माहिती पाहिजे ना.फक्त ३८ कोटीच मिळाले ६२ कोटी जे आहे ते रद्द झालेले आहे. याची अपेक्षा जळगांव शहराच्या नागरीकांनी सोडुन द्यावी.

**मा.आयुक्त :-** आमच्याकडे राईटींगमध्ये असे काही नाही ६२ कोटी रद्द झाले म्हणन. ६२ कोटीच्या चौकशीसाठी जेव्हा मागणी झाली मग तिथुन असे कळाले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण ते उपस्थित करणे आवश्यक आहे. आपल्याला १०० कोटी रुपये हे सन २०१८ ला मंजुर झालेले आहे. आणि त्यापैकी ३८ कोटीचेच कामे प्रस्तावीत झाली आहे. उर्वरित निधीचे आम्ही नव्याने प्रस्ताव पाठवु शकलो असतो ना.

**मा.आयुक्त :-** सर रिसेंटली बी ॲण्ड सीने माहिती मागितली होती. त्या बरोबरच त्यांची बैठक झाली होती. त्याबरोबरच त्यांनी माहिती मागितली होती. तेथेच माहिती दिली की, १०० कोटीला तत्वता मान्यता मिळाली. ३८ कोटीला कमान मिळाली. ६२ कोटी अजुन शिल्लक आहे परंतु त्याला मान्यता पण मिळालेली नाही आणि प्रस्ताव पण मागितले नाही.आणि हे काम पी.डब्ल्यु.डी. ला गेलेले आहे. ही माहिती आपण पी.एम.ओ.ला दिली. ते आता शासनासमोर सादर करतील. आता शासनाकडे सादर करुन आपण मागील पत्राप्रमाणे ही जाऊ शकतो. परंतु पी.एम.ओ. कडेच ती माहिती दिली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर याचसाठी या सर्व गोष्टी ज्या आहेत कुठेतरी रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. आणि शासनाकडे सुध्दा त्याच्या बाबतीत स्पष्टीकरण आहे तुम्ही मुदतीत खर्च न केल्यामुळे आम्ही १०० कोटी पैकी फक्त ३८ कोटीच मान्य केले. पडुन पडुन ते ६८ कोटी जे तुमचे आहे ते व्यपगत झाले.तर कमीत कमी तो चॅप्टर तर येथे क्लोज होतो. आता तो चॅपटरही ओपन दिसतो आणि तो निधीही आपल्याकडे नाही. आता याच्यामध्ये जी काही काम प्रस्तावित करण्यात आलेली आहेत आता याच्यामध्ये बरेचशी रोड जी आहेत ती इतर भागातील कॉंक्रीटचे रोड आहे. मी मलनिस्सारण योजनेची माहिती घेतली. मलनिस्सारण योजनेच्या संदर्भातील वस्तुस्थिती ही आहे की, साधारणता जळगांव शहरातील रस्त्यांची लांबी ही ९०० कि.मी.ची लांबी आहे. आणि ९०० कि.मी.च्या लांबी पैकी फक्त २०० कि.मी.च्या लांबी मध्ये मलनिस्सारण योजना ही कार्यान्वीत झालेली आहे. कार्यान्वीत म्हणजे ती पुर्ण:तवास गेलेली आहे. त्याच्यानंतर काय झालेले आहे की, ७०० कि.मी.ची मलनिस्सारण योजना अजुन होणे बाकी आहे. ७०० कि.मी. ची मलनिस्सारण योजना बाकी असतांना म्हणजे १/३ ची योजना मलनिस्सारणाची शहरामध्ये झालेली आहे. २/३ अजुन जी आहे ती बाकी आहे. आणि ती संपुर्ण योजना बाकी असतांना आपण त्या रस्त्यांवरती कॉंक्रीटचे रोड प्रस्तावीत केलेले आहे. त्यांच्या निविदा प्रक्रिया सुरु झालेल्या आहे. काही दिवसानंतर कार्यादेश देऊन तेथे प्रत्यक्षात कामाला सुरुवात होईल. मग त्याच्या अनुषंगाने त्या ९ मिटरच्या रस्त्यामध्ये तुम्ही किती पाईपलाईनसाठी जागा सोडणार आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ, मागे जेव्हा याबाबतीत बैठक झाली होती कॉंक्रीट रस्त्यांच्या संदर्भात त्यावेळेला हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. आपल्या त्या ठिकाणी पुन्हा खोदकाम करावा लागणार आहे. त्यामुळेच ते डांबरीकरणाचे प्रस्ताव तयार करुन पाठविलेले होते. परंतु त्यावेळेस बी ॲण्ड सीचे सोनवणे साहेबांनी असे सांगितले की, ज्या ठिकाणी मोकळे रस्ते आहे आणि त्याठिकाणी अंडरग्राऊंड ड्रेनेज बाकी असेल तर आम्ही त्याची पोझिशन करणार आहोत. त्यावेळेला त्यांनी असे दाखविले होते की, आमच्या सेंटरला मेन लाईन असते. सेंटर लाईनलाच हाऊस

कनेक्शन झालेले असतात.कारण तिथे ते सर्व जोडले जात नाही त्यामुळे ते सरळ रोडाला जोडु त्यावेळेला त्यांनी असे सांगितले होते की, अशी दुरुस्ती आम्ही आमच्या प्रस्तावात करणार आहोत. सभागृहानेही मागच्या महासभेत एन.ओ.सी. दिलेली आहे. त्यामध्ये आपण ही कन्डीशन टाकलेली आहे की, ज्या भागात अंडरग्राऊंड ड्रेनेज झालेले नाही. त्यामध्ये भविष्यात अंडरग्राऊंड ड्रेनेजची प्रोव्हीजन करण्यासाठी आवश्यक असलेल्या कारणेनुसार अंदाजपत्रकात समावेश करावा. ही अट आपण एन.ओ.सी.मध्ये टाकुन दिलेली आहे.परंतु प्रॅक्टीकली ते शक्य आहे की नाही. त्याची खात्री नाही.
**श्री.नितीन लढ्ढा :-** मी हेच म्हणतो ना की, या ज्या गोष्टी आहेत. कागदोपत्री जे आहे. त्या सुटसुटीत वाटतात. परंतु प्रत्यक्षात काम करतांना अनेक अडचणी निर्माण होतात आणि हा काही पाळधी सारख्या रस्त्यासाठीचा विषय राहिला आता तर समजु शकलो असतो. पंरतु ७०% भाग जो आहे. तो मलनिस्सारण योजनेचा अजुन यायचा बाकी आहे आणि १०० कोटीत प्रस्तावीत केलेली कामे. ही सुध्दा समजुन घ्या ही ७०% इफेक्टेड होतील. तर त्याच्या संदर्भात या सभागृहाला कमीतकमी या प्राधिकरणाचे आपण सदस्य आहोत त्या गोष्टी त्यांना कळायला पाहिजे की, हे ड्रॉईंग कसे असेल.त्यांचे नियोजन कसे असेल. कश्या पध्दतीने त्या कॉंक्रीटच्या रस्त्यामधुन अंडरग्राऊंड ड्रेनेजचे काम असेल, कारण कॉंक्रीटचे काम हे महिने दोन महिने, चार महिन्यात सुरु होऊन जातील. आपली मलनिस्सारण योजना सुरु व्हायला दोन वर्षाचा कालावधीही लागु शकतो, एक वर्षाचा कालावधीही लागु शकतो, तीन वर्षाचा कालावाधीही लागु शकतो. मग नंतर पी.डब्ल्यु.डी.वाले आपले कामे करुन मोकळे होऊन जातील. आणि त्याच्यानंतर मात्र ते मलनिस्सारण योजनेचे काम करतांना ज्या अडचणी येतील किंवा हा जो आपला कॉंक्रीटींग वरती इतका कोट्यावधी रुपयांचा खर्चही करतील आणि त्यांची जर विल्हेवाट लागली तर रस्त्यांची मग याला जबाबदार कोण राहणार. नागरीक पी.डब्ल्यु.डी.कडे येणार नाही. नागरीक दुसऱ्या लोक प्रतिनिधींना शिव्या घालणार नाही. नागरीक शिव्या द्यायला व नगरसेवकांनाच जबाबदार धरतील. तर याचे नेमके डिझाईन काय ? ९ मिटरच्या रस्त्यात मला सांगा, पाईपची साईज आणि त्या जे.सी.बी.च्या बकेटने तुम्ही ज्या वेळेला खोदाल. तर तो सेंटर मधुन रस्ता खोदाल. इतकी काही टेक्नोलॉजी सुपेरियर नाही. तुम्हाला ६ इंच पाहिजे तर ६ इंची चीच कटींग तुम्ही खालपर्यंत द्याल. ज्या वेळेला बकेटने खोदल्या गेल्यानंतर जो साईटचा पार्ट राहील तो सुध्दा क्रॅक होत जाईल. तो सुध्दा डॅमेज होईल. त्याची कमीतकमी एक प्रॅक्टीकल तरी करुन दाखवा की, नेमका कश्या पध्दतीने तो रस्ता खोदला जाईल. मी काल योगेश कडुन माहिती घेतली. नेमका तो रस्ता कश्या पध्दतीने खोदला जाईल. तर त्याचे हेच म्हणणे आहे. साधारणता २-२.५-३ मिटर पर्यंत खोली असेल आणि २-२.५ मिटर पर्यंत त्याची विडथ असेल. म्हणजे याचा अर्थ काय की, ९ मिटरच्या रस्त्यामध्ये हे खोदकाम झाल्यानंतर फक्त चिरोट्या चिरोट्या साईडने उरतील. माझे म्हणणे हे आहे की, ही आता आंनदाची बाब आहे. त्यांनी निधी आणला त्यांचे मनापासुन आभार आहे. परंतु निधीचा विनियोग करु नये. मला वाटते की, अत्यंत चुकीच्या पध्दतीने ते नियोजन चाललेले आहे. कारण हे कॉंक्रीटच्या रस्त्यांचे आयुष्मान २५-३० वर्ष टिकावे या दृष्टीने मा.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी सांगितले असेल. आनंदाची गोष्ट आहे. परंतु येथील स्थानिक परिस्थिती काय आहे. ही स्थानिक परिस्थिती त्यांना अवगत करण्याच्या दृष्टीकोणातुन कुठेतरी आपले प्रयत्न तोकडी पडलेले दिसतात. आणि अश्या पध्दतीने मिळालेल्या कोट्यावधी रुपयांचा निधी पाण्यामध्ये जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. दुसरीकडे काय होईल. ज्या वेळेला आपण या कॉंक्रीटींगचे रस्त्यांचे कामे करतो. आपण जर इस्टीमेट बघाल तर खुप चांगले इस्टीमेट आहे. खुप हेवी आहे. साधारणता एक एक फुटाच्या दगडीचे ते रस्ते तयार होतील.परंतु आपण या सर्व गोष्टींचे नियोजन करतांना संपुर्ण कॉलनी ही इनटीग्रेटेड करुन प्लॅनींग केलेले नाही. या कॉलनी मधील अश्विनभाऊंचे ४ रस्ते, त्याच्या बाजुच्या कॉलनीतला एक रस्ता, मधला रस्ता वेगळेच डांबरीकरणामध्ये ऑलरेडी झालेले आहे.परंतु हे संपुर्ण रस्ते करतांना या रस्त्यामुळे जसा आपला डी-मार्टचा रस्ता बघा. साधारणता एक फुट उंच आलेला आहे आणि कालची जी घटना घडली त्याचे एक कारण तेही आहे की, संपुर्ण तांबापुराचा परिसर जो आहे तो खोलगट भाग झाला आणि हा रस्ता उंच झाला, हायवेकडुन हायवेचा भाग उंच येवुन गेला. डी-मार्टचा रस्ता उंच होवुन गेला आणि त्याच्यामुळे मुळ तांबापुर आणि फुकटपुरा असलेला भाग खोलगट झाला. जी परिस्थिती मी साधारणता २५ वर्षापासुन आमच्या नवीपेठेत भोगत आहे. नवीपेठेतला नटवर टॉकीजचा चौक, एकही पाऊस पडला की, तेथे कशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. कारण काय टॉवर पासुन नेहरु चौकाकडे येणारा मुख्य रस्ता, हा मुख्य रस्ता असल्याकारणाने याच्यावरती सातत्याने डांबरीकरणाचे कामाचे थरावर थर

लागत असतात. त्याच्यामुळे काय झाले आहे की, हा रस्ता उंच झाला आणि पलीकडचा रस्ता खालती झाला, म्हणुन तेथे खोलगट भाग निर्माण झाल्यामुळे एकही पाऊस पडला की, तेथे गुडघ्यापर्यंत पाणी साचते. कारण यापुर्वी जेव्हा शहराचे नियोजन झाले होते. ४०-५० वर्षापुर्वी त्यावेळेला बरीच पावसाची अतिवृष्टी ज्यावेळेला होते. त्यावेळेला पडणाऱ्या पाण्याचा काऊंट हे इतक्या मोठया प्रमाणावर असते की, या साधारण गटारी पाणी वाहुन नेण्याच्या परिस्थितीमध्ये नसतात. अश्या परिस्थितीमध्ये जर कधी नैसर्गिक रित्या रस्त्यांच्या उतार भागावरुन हे पाणी वाहुन जाण्याच्या संदर्भातले नियोजन हे फार पुर्वीपासुन या शहराच व्यवस्थित आहे. परंतु कालांतराने मुख्य रस्ते हे उंच उंच होत गेले आणि साईडरोड जे आहे ते खालती खालती होत गेले. तश्या परिस्थितीमध्ये या १०० कोटींच्या कामांमध्ये प्रत्येक कॉलनीमध्ये काही रस्ते हे कॉंक्रीटींगमुळे उंच भागावर असतील आणि त्यांना जोड रस्ते जे असतील ते खालच्या थराला गेलेले असतील. आणि तेथे संपुर्ण कॉलन्यांमध्ये पाणीचे तळे साचतील आणि ह्या समस्या येणाऱ्या पुढच्या सगळ्याच नगरसेवकांना अत्यंत गंभिरपणे प्रश्न येतील की, त्यांना उत्तर देणे सुध्दा कठीण जाईल. का की काही रस्ते कॉंक्रीटींगमध्ये उंच असतील आणि काही रस्ते खालती असतील तर याच्या संदर्भात सुध्दा प्राधिकरण म्हणुन या संपुर्ण गोष्टींवर नियंत्रण ठेवणेबाबत महानगरपालिका प्रशासन जबाबदारी स्विकारेल का? कारण अशा परिस्थितीत नुस्ती आपली जबाबदारी झटकुन चालणार नाही. आपण म्हणाल की, ठिक आहे आता बी ॲण्ड सीने काम घेतलेले आहे. परंतु बी ॲण्ड सी काम करुन बाहेर निघुन जाईल. हे प्रश्न लोकप्रतिनिधींना सोडवावे लागतील किंवा त्यांना सामोरे जावे लागेल.तर याच्या संदर्भात कुठली तरी पॉलिसी ही निश्चित होणे गरजेचे आहे अन्यथा केलेल्या कामाचे श्रेय कमी मिळेल आणि शिव्या जास्त खाव्या लागतील. हे माझे स्पष्ट मत आहे. तर अशी काही पॉलिसी आपण सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करुन ठरवणार का ?

**मा.आयुक्त :-** सर, आपण त्यांची एक बैठक घेवुन चर्चा करुया की नेमक काय करता येईल. परंतु ऑलरेडी ते दिलेले आहे रस्ते किंवा जे टेन्डर पडलेले आहे.त्यांनी आपण जी माहिती त्यांना दिलेली आहे परंतू त्यांनी तेच घेण्याचे प्रयत्न केलेला आहे. उर्वरीतसाठी आपण त्यांच्या सोबत बसुन चर्चा करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही गंभिर विषय आहे ना हा अत्यंत गंभिर विषय आहे.

**मा.महापौर :-** याच्या संदर्भात आपण सर्वांनी एक मिटींग घेतली होती. त्यामध्ये सांगितले होते की, रस्त्यांचे काम कसे पाहिजे. मला वाटते त्या संदर्भातली प्रोव्हिजन त्यांनी केलेली आहे की नाही. हे पण माहिती ते देत नाही.आपण त्यांना विचारले होते पण त्यांना सुध्दा याची माहिती नव्हती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई आपले म्हणणे काय आहे की, कमीतकमी आपले स्वत:चे / सदस्यांचे या सभागृहाचे ती डिझाईन बघुन समाधान झाले तरी अश्या पध्दतीने तुम्ही थोडेशे नागरीकांचेही समाधान करु शकाल. ज्या गोष्टीपासुन महानगरपालिका प्रशासन अणिज्ञ आहे, या सभागृहातील सदस्य अणिज्ञ आहे आणि एखादी थर्ड पार्टी जर काम करत असेल किंवा दुसरी एजन्सी काम करत असेल, आता आपण हायवेचे बघितले आहे. कालचे आजचे सगळे वृत्तपत्रांचे फोटो आपण बघाल, नॅशनल हायवेने काम करुन चालले गेले. एम.जे.कॉलेज परिसरामध्ये संपुर्ण पाणी साचलेले आहे. गणेश कॉलनी सारखे परिसरामध्ये पाणी साचलेल आहे. हे का होत आहे फक्त चुकीच्या नियोजनामुळे. तांत्रिक रित्या अत्यंत योग्य पध्दतीने कामे झाली तर त्याच समाधान ही मिळेल आणि भविष्यात या रस्त्यांचे आयुष्यमान वाढेल. आणि नागरीकांना पुढे या समस्यांना सामोरे जावे लागणार नाही. तर या सगळया गोष्टी ज्या आहे. कामे सुरु करण्याच्या पुर्वी विचार करुन आणि समजुन घेणे खुप गरजेचे आहे. यासाठी कामे सुरु करण्यासंदर्भात विलंब झाला तरी चालेल. परंतु जे काम सुरु होईल ते अत्यंत नियोजनपुर्वक सुरु व्हायला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

**मा.उपमहापौर :-** मा.महापौर महोदया, सन्मा.सभागृह नितीनभाऊंनी जी लक्षवेधी सभागृहासमोर मांडलेली आहे ज्या सुचना दिल्या. मी महापौरांना आताच सांगितले, १०० कोटीचे महानगरपालिकेला जे शासन स्तरावर नियोजन झाले होते. त्या संदर्भातले ३८ कोटी रुपयाचे कार्यादेश देण्यात आलेले होते व उर्वरीत ६२ कोटीच्या संदर्भातला प्रस्ताव तयार करुन शासन दरबारी आपण पाठविला होता. मॅडमांनी आता या ठिकाणी सांगितले की, तो मंजुरच झालेला नाही. किंवा तो शासनाने डिक्लिअर केलेला नाहीये आणि मंजुरही झालेला नाहीये. त्याच्या संदर्भात तसा काही पत्र व्यवहारही झालेला

नाही. परंतु माझ्या माहितीनुसार मॅडम, ३८ कोटी रुपयांचा कार्यादेश ज्यावेळी दिला. जेव्हा राज्य शासनाने महानगरपालिकेला फंड वितरीत केला त्याच पत्रासोबत त्यांनी म्हटलेले होते. आपल्या ३८ कोटीच्या कामाच्या संदर्भात काम पुर्ण झाल्याचे उपयुक्तता प्रमाणपत्र सादर करावेत. तद्नंतरच ६८ कोटीच्या निविदा प्रकरण झालेल्या कामांना आपल्याला मंजुरी देण्यात येईल. सर्वात खरा मुद्दा आहे मॅडम प्रशासनाला व सभागृहाला येथे सांगु ईच्छितो की, प्रशासनाच्या वतीने आतापर्यंत ३८ कोटी रुपयाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांवचे माध्यमातुन जी कामे चाललेले आहे. खरं तर याच्यावरती जळगांव शहर महानगरपालिकेचे नियंत्रण असणे खुप गरजेचे होते. परंतु आपण त्यांना एन.ओ.सी.देत असतांना किंवा प्रमाणपत्र देत असतांना आपण ईस्टीमेट जे बनविलेले होते. त्याच्यामध्ये नंतर प्राईज एसकीलेशनचा मुद्दा निघाला, नंतर कामासंदर्भात एक एजन्सी जी होती ती म्हणत होती की, नियमाप्रमाणे आम्हाला एसकीलेशन द्या. असे अनेक मुद्दे तयार झालेले होते. अनेक समस्या त्याच्यामध्ये निर्माण झाल्या होत्या. परंतु कुठेतरी आपण ते सेटल करुन कामाला सुरुवात केली. पण असे असतांना देखील मॅडम ३८ कोटी रुपये मधुन आता पर्यंतचे किती कामांची जळगांव शहरामध्ये सुरुवात झालेली आहे व किती कामे पुर्ण झालेली आहे याचे उत्तर द्या.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्या प्रस्तावामध्ये एकुण ४९ रस्ते आहे. त्यापैकी ३५ रस्त्यांची कामे चालु आहेत. अजुन कुठल्याही कामाचे फायनल झालेले नाही. आपल्याला शासनाकडुन ३८.२८ कोटीपैकी ९ कोटी समर्थींग पैसे आपल्या खात्यावर आले, ते आपण बी ॲण्ड सी कडे वर्ग केले. आणि त्यामध्ये आपला जो हिस्सा आहे तो ५ कोटी होता. तो आपण बी ॲण्ड सी कडे वर्ग केला. असे १४ कोटींची आपण त्यांना यु.सी. मागणी केलेली होती.ती आपल्याला पुढील मागणी करण्यासाठी त्यांनी आपल्याकडे यु.सी.दिली. ती संपुर्ण १४ कोटीची पुर्ण खर्चाची यु.सी.दिलेली आहे. आणि आता पुढचा निधी मिळणेबाबत शासनाला पत्र दिलेले आहे.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये आपण ३८ कोटी रुपयाचे कामांच्या संदर्भात महानगरपलिका म्हणुन आपण आपल्या कार्यक्षेत्रातील कामे करीत आहे. ज्यावेळेस पालकमंत्री महोदयांकडेस सर्वपक्षीय गटनेत्यांची किंवा आयुक्त, प्रशासन किंवा महापौरांची मिटींग झाली होती. त्यावेळेला स्पष्ट सुचना पालकमंत्री महोदयांनी दिलेल्या होत्या की, महानगरपालिकेचे आयुक्त,सर्व सन्मा.सदस्य यांना विश्वासात घेतल्याशिवाय आपण कामांची सुरुवात करु नये. मग आपण त्यांनी असे पत्र दिलेले असल्याने टाईमींग क्लियर केलेले आहे. मग पी.डब्ल्यु.डी.कडुन जी कामे चालु आहे. तर महानगरपालिका म्हणुन आपले काय नियंत्रण आहे त्यांच्यावरती.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही, त्यांनी आपल्याला फक्त त्या रस्त्यांची पाईप लाईनची व अमृतची कामे झ ालेली आहे किंवा ड्रेनेजची कामे झालेले असेल तर त्यांनी आपल्याकडे एन.ओ.सी. मागितली होती. आपण ४९ कामांची सुरुवात केली, गिरगावकर साहेब असतांना २० कामांची त्यांनी आपल्याला एन.ओ.सी. दिलेली होती की, हे २० रस्ते आता पुन्हा खोदण्यात येणार नाही. आणि त्यानंतर मग पुन्हा त्या मक्तेदाराकडुन अमृतचे मॅझीमम कामे पुर्ण करुन उर्वरीत सगळया रस्त्यांची एन.ओ.सी. दिली. आज आपल्याकडे कुठलीही एन.ओ.सी. बाकी नाही.

**मा.उपमहापौर :-** हा झाला तुमचा पाईप लाईन, ड्रेनेज अतिक्रमणाच्या बाबतीतला विषय, परंतु ते रस्ते सद्यास्थितीत चालु आहे. त्याच्यावर बी.एम. झालेले आहेत, कारपेट झालेले आहे की, ते रस्ते खोदुन ठेवलेले आहे. किती थांबलेले आहेत, किती चालु आहेत, त्यासाठी नागरीकांती किती रस्ते खोदुन ठेवलेले आहे. ते वेळेवरती पुर्ण न झाल्यामुळे नागरीकांना काय त्रास सहन करावा लागतो. याची तुम्हाला काही कल्पना आहे का ? मग महापालिका म्हणुन असे स्पष्ट निर्देश आदेश असतांना देखील महानगरपलिका प्रशासनाच्या वतीने आता पर्यंत पी.डब्ल्यु.डी.ला आतापर्यंत एकही पत्र व्यवहार झालेला नाही की, आपण वेळेत कामे करा, वेळेत यावर बी.एम. टाकला पाहिजे. ईस्टीमेटच्या अंदाजपत्रकात देखील त्या रस्त्यांची आज रोजी जर परिस्थिती पाहिली आपण तर त्यानुसार सुध्दा त्या ठिकाणी कामे होत नाही. ३८ राहिले ६२ कोटीच्या संदर्भातला विषय, आपण एन.ओ.सी. त्यांना दिल्यानंतर पाठपुरावा करतो का, शासनाच्या वतीने, प्रशासनाच्या वतीने आपण राज्य शासनाला पत्र पाठविले का ? की या ३८ कोटी रुपयामधील ही कामे चालु आहे, इतके कामे हे पुर्ण झालेले आहे. याचे यु.सी.प्रमाणपत्र आपल्याकडे सादर करीत आहे. त्यापैकी ६८ कोटी रुपयांचा आपला जो संकल्प प्रस्ताव आहे त्याला मान्यता द्यावी. आपण असे काही पत्र पाठविले आहे का आतापर्यंत. पाठपुरावा केला का त्यांच्याकडे.मॅडम जे सांगत आहे की, ते आतापर्यंत रिपोर्ट ही केलेले नाही आणि मान्यही केलेले नाही. आता

नितीनभाऊंनी जो प्रश्न विचारला की, उगाच सुरुवात जिथुन झाली,आज रोजी राज्य शासनाने आपल्याला १०० कोटी, ८५ कोटी,२०० कोटी, ३०० कोटी जो काही निधी दिलेला आहे. त्या संदर्भामध्ये आपण महानगरपालिका प्रशासन म्हणुन आपण एकही पत्र व्यवहार तरी केलेला आहे का ? जो शासन स्तरावर आपण निधी अनुज्ञेय करत आहात. यापुर्वी आमचे सर्व नियोजन होऊन ३८ कोटी रुपयांच्या रस्त्यांचे कामे, सर्व सदस्यांना सर्व पक्षीय नगरसेवकांना, आयुक्तांना महानगरपालिका प्रशासनाने सर्व अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन अतिशय नियोजित पध्दतीने ती कामे आपण केलेले होते. मला असे वाटते की, प्राधान्य त्या ६८ कोटी रुपयांना दिला गेला पाहिजे होता. जे आता नितीनभाऊंनी मांडले. त्या कामांचा आता येथे जो प्रश्न उपस्थित केला गेला मॅडम की, जो ८५ कोटी रुपयांची निविदा प्रक्रिया झालेली आहे. आपण आमदार महोदयांच्या आणि महापौर महोदयांच्या अध्यक्षतेखाली येथे सभागृहामध्ये घेतलेली होती. अश्विनभाऊ पण होते, विशालभाऊ पण होते. त्या ठिकाणी आपण स्पष्ट अटीशर्ती टाकलेल्या आहे. डिक्लेयर केलेल्या आहे. ज्या कोणाचे स्टॅम्प बाकी असेल, त्याठिकाणी आपल्याला सोनगिरे साहेबांनी सांगितले होते. त्या ठिकाणी पेव्हर ब्लॉकचा एक पट्टा द्यायचा, किंवा ज्यांना कनेक्शन देण्यात आलेले नाही ते सोडुन द्यायची. परंतु आज रोजी त्या ८५ कोटी निधीच्या निविदेतले जे काही कार्यादेश देऊन सी.सी.रोड चालु आहे. त्या ठिकाणी भाऊ एकही ठिकाणी पी.डब्ल्यु.डी.च्या अधिकाऱ्यांनी सांगितल्या प्रमाणे की, आपण महासभेत ठराव करुन दिल्याप्रमाणे अशी कुठलीही प्रोव्हीजन नाही ते रस्ते सोडविण्यासाठी जात नाही.मग आता नितीनभाऊंनी जे सांगितले. की, भविष्यामध्ये हीच परिस्थिती उद्‌भवणार आहे. जसे आज नॅशनल हायवेचे काम करुन चालले गेले, त्या ठिकाणी ते काम करुन तर निघुन गेलेले आहे. आता भाऊंनी सांगितले की, त्या ठिकाणचे नागरीक रात्रभर जागेवर होते. पाणी खुप साचलेले होते. याच्याने सर्व दैनंदिन अवस्था विस्कळीत होत आहे. मग याला जबाबदार कोण ? महानगरपालिकाच्या कार्यक्षमतेने जी कामे होत आहे मॅडम. याची सर्वस्वी जबाबदारी महानगरपालिका प्रशासनाची आहे. आपण एन.ओ.सी. देतात, पी.डब्ल्यु.डी.चे असेल किंवा महानगरपालिकेनुसार, आपण जे काम केल्यानंतर त्या कामाची पाहणी ते योग्य पध्दतीने चालु आहे किंवा कसे ही सुध्दा जबाबदारी आपली आहे. मग असे का होत नाही.

**श्री.विष्णु भंगाळे :-** मा.महापौर महोदया, एक विचारायचे होते. मा.महापौर महोदया, हे आता नितीनभाऊ आणि उपमहापौरांनी जे मांडले , जे आपण आता रस्त्यांच्या बाबतीत म्हणत आहोत की, कॉंक्रीट रस्ते करु आणि मध्ये बसवु ते भाग, परंतु आता पर्यंत त्याचा अनुभव लक्षात घेता की, आपण आऊटलेट द्यायचा असतो, त्याच्यासाठी काय कराल.

**मा.उपमहापौर :-** नाही, विष्णुभाऊ त्याच्यासाठी काय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे तुम्ही जे सांगत आहात ना, पेव्हर ब्लॅक तेथे नाही.जेथे आपण कनेक्शन देत आहे ना तेथे पेव्हर ब्लॉक आहे. मध्ये डांबरी पट्टा आहे. असे आहे ते.

**श्री.विष्णु भंगाळे :-** एक सांगा, वस्त्या ह्या इतक्या जवळ जवळ आहे. ५०-५० फुटावरती, २०-२० फुटावरती, १०-१० फुटावरती आपल्याला ते पेव्हर ब्लॉक टाकावे लागणार आहे. कसे जमणार त्या ठिकाणी. आणि काही ठिकाणी १० फुटावर सुध्दा नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** आपण जेवढे रस्ते प्रस्तावीत केलेले आहे. तुम्ही त्याचे वर्गीकरण केले का की, किती रस्त्यांवर ते पेव्हर ब्लॉक बसविण्याची वेळ येणार आहे. तुम्ही केले का त्याचे वर्गीकरण की, याला काही अडचण येत नाही. हे करायला पाहिजे. केले आहे का त्याचे वर्गीकरण, किती रस्ते आहे असे की, जिथे आपल्याला अंडरग्राऊंड करणे बाकी आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आपण एरिया सांगितलेला आहे. जसे शिवाजी नगर, कांचन नगर,

**श्री.अश्विन सोनवणे :-** भाऊ, बी ॲण्ड सीच्या अधिकाऱ्यांना बोलवुन घेऊ आणि मिटींग घेऊ ना. मा.महापौर, उपमहापौर, तुम्ही, विष्णु भाऊ असतील.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजले नाही.)

**श्री.अश्विन सोनवणे :-** भाऊ, आताशी टेन्डर झाले त्याचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई,

**श्रीमती सरिता नेरकर :-** मा.महापौरताई, आयुक्त मॅडम, मला सोनगिरे साहेबांना विचारायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर महोदया,

**श्रीमती सरिता नेरकर :-** भाऊ दोन मिनीट, सोनगिरे साहेबांना विचारायचे आहे. आमच्या वार्डात आता कामे चालु झ ालेले आहे. बरीच कामे झालेली आहे. ती कोणशिला बनवली जाते, ती कोणाच्या याच्याने बनवली जाते. कारण येथे माझ्याकडे जी लावली गेलेली आहे. ही कोणाच्या याच्याने बनवली आणि कशी, कारण चार नगरसेवक आहे. सोनगिरे साहेबांनी दाखवावी ही कोणशिला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** प्रशासनाने अशी कोणतीही कोणशिला लावलेली नाही. प्रशासनामार्फत ईस्टीमेट मध्ये एक पतऱ्याच एक बॅनर असते, बोर्ड असतो. त्याच्यावर कामाचे नांव, मक्तेदाराचे नांव ही शासकीय प्रोटोकॉलनुसार जी माहिती असते, तीच आम्ही मक्तेदार कडुन करुन घेतो, अशी कोणतीही कोणशिला आम्ही बनवलेली नाही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** मग ही कशी काय बनवलेली आहे ही दाखवा तुम्ही आता, ही वाचा तुम्ही. हे बघा अशी माझ्याकडे केलेली आहे. ही योग्य आहे का ? आम्ही तीन नगरसेवक, तु और मे और हम तीन नगरसेवक, गोट्या खेळतात तिथे. आम्ही गोट्या खेळतो.आम्ही काहीच काम करत नाही. आम्ही वार्डात येऊन गोट्या खेळतो.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** याच्यावर तर तुमच नांव दिसत आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** सांगा आता बंटीभाऊ यांना समजावुन सांगा. माझा नाव दिसत आहे. यांना आता समजावुन सांगा.

**श्री.अनंत जोशी :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.०१ मध्ये विकास कामे हस्ते श्री.गुलाबरावजी पाटील पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री विशेष प्रयत्न ॲड.दिलीप बबनराव पोकळे,

**श्रीमती सरीता नेरकर :-** मोठे अक्षरात.

**श्री.अनंत जोशी :-** आणि मग सगळ्यात खाली आहे आणि विशेष अतिथी आहेत.

**(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे आवाज बरोबर येत नाही.)**

**श्रीमती सरीता नेरकर :-** कुठलाही निधी आला तर ४ नगरसेवक बरोबर असतात. ४ ही नगरसेवक सगळया याच्यात बरोबर आहे. ४ ही नगरसेवक बरोबर आहे की नाही सगळयांनी याचे उत्तर द्यावे. कसे आहे, कसे शांतीपुर्वक सांगा. किशोरभाऊ खरं बोला, बरोबर याच्यात आहे. मी दाखवते आयुक्त मॅडमांना.

**(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य चर्चा करीत होते त्यामुळे आवाज बरोबर येत नाही.)**

(सन्मा.सदस्या श्रीमती सरीता नेरकर यांनी स्टेजवर येऊन मा.आयुक्त यांना फोटो दाखविले. तसेच त्यावेळेस अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजले नाही.)

**मा.आयुक्त :-** हे काय खाली आहे ना.

**श्रीमती सरीता नेरकर :-** आहेत ना पण त्यांचे विशेष प्रयत्न आहे. जास्त आहे, आम्ही काय गोट्या खेळतो आहे.

**मा.आयुक्त :-** पण नांव आहेत ना.

**श्रीमती सरीता नेरकर :-** असे नाही चालत ना मॅडम.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, माहिती आपल्याजवळ दिलेली आहे.

**मा.महापौर :-** प्लिज सर्वांनी शांतता ठेवा, खाली बसुन घ्या.

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, माझी एक विनंती आहे. या अडचणीमुळे खरंच सभागृहाने ठराव करावा, एक नगरसेवक एक वार्ड करावा. या अनुषंगाने जो काम करतो कमीत कमी त्या वार्डातील नागरीकांची एका नगरसेवक प्रतिनिधीला त्याचा फोन येतो आणि तो बांधील राहतो कामाचा. हे तर असे झालेले आहे आमचे चार जणाचे नांव टाकल्यावरती, अशी परिस्थिती या वार्डाची झालेली आहे. म्हणुन आम्ही सभागृहाला विनंती करतो की, म्हणुनच मी आपल्याला म्हणतो की, आपण या भावना राज्य शासनाला कळवाव्यात की, प्रभागात कामे व्यवस्थीत होण्याच्या दृष्टीने एका नगरसेवकाचा एक प्रभाग करावा. याला हे सुध्दा मान्यता देतील.म्हणुन मी म्हणतो.

**श्रीमती सरीता नेरकर :-** विष्णुभाऊ सोनगिरे साहेबांना परत विचारायचे आहे मला, एक नगरसेवक पुर्ण वार्डात काम करतो का ? बाकीचे गोट्या खेळतात का ? याचे उत्तर द्या. तुम्ही आमच्या वार्डात काम लावुन देतांना विश्वासात घेत नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मॅडम हा प्रशासनाचा विषय नाही म्हणुन तुम्हाला मी उत्तर देऊ शकत नाही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** आमच्या येथे तुम्ही येतात, कामे चालु होतात. आम्हाला विश्वासात का घेतले जात नाही. आम्ही तुम्हाला फोन लावतो. तेव्हा तुम्ही आमचे फोन घेत नाही. म्हणतात की, जावळे साहेबांकडे तुमचे काम दिले गेलेले आहे. जावळे साहेब, पहिले काय म्हणे तुमचे काम रंधे साहेबांकडे आहे. लोकांनी पहिले फोन केलेले नाही .आम्ही कोणाकडे जायचे परत आयुक्तांकडे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मी जावळे साहेबांनाही सांगितले,

**श्रीमती सरीता नेरकर :-** काही नाही संपले आता, ५ वर्षात जो त्रास दिला ना तुम्ही अधिकाऱ्यांनी तो खुप दिला. तुम्ही भेदभाव केला हा माझा सक्त तुमच्यावर आरोप आहे. जो तुमच्या मागे पुढे करेल ना. त्यांचे कामे केले तुम्ही.आम्ही तुमच्यावर ओरड करु शकत नाही ना. म्हणुन तुम्ही असे केले. म्हणुन तुम्ही अधिकाऱ्यांनी इतका भेदभाव केला.मग ते आरोग्य विभाग असो, लाईट विभाग असो की, बांधकाम असो. हा माझा पुर्ण तुम्हा सगळयांवर राग आहे. ५ वर्ष तुमच्या त्रासामुळे असे वाटायला लागले की, पुढच्या वर्षी इलेक्शन सुध्दा लढु नये. किमान सेवा करायचा चान्स सुध्दा घेऊ नये. हे निव्वळ आणि निव्वळ अधिकाऱ्यांमुळे झालेत. मी फक्त सेवा करणे म्हणुन नगरसेवक म्हणुन उभी राहीली होती. कुठला ठेका कुठले काहीच नाही पाहिजे होते आम्हाला, पण तुम्ही जो मानसिक त्रास दिला आहे ना प्रत्येक अधिकाऱ्याने तुम्ही दिला हा. ५ वर्ष तुम्ही ऐकलेच नाही. मला अजुन पुढे खुप सेवा करायची होती. मी पाच नये पैसे कोणाची हे नव्हते. पण तुमच्या अधिकाऱ्यांना कंटाळुन वाटायला लागले की, कधी कोणाची सेवा करायला जावु नये. इतकी अशी परिस्थिती तुम्ही आमची वार्डांमध्ये करुन टाकली. तुमच्या जवळ काय येवुन बसायला पाहीजे का ? तुम्हाला फोन करतो तर उचलत जा ना. भेदभाव का करता हो तुम्ही. हे सगळे अधिकारी हे वरिष्ठ अधिकारी, यांना कंटाळलो, ५ वर्ष कंटाळलो आणि पुढे ईच्छा सुध्दा होणार नाही. नाही तर आज सुध्दा घरुन काम करू शकते मी लेडीज आहे माझ्या मागे कोणी नव्हते. घरुन सेवा करायची ईच्छा होती पण तुमच्या सारख्यांना कंटाळुन नको असे वाटायला लागले, भेदभाव करतात तुम्ही अधिकारी भेदभाव, मी काही जेन्ट्स नाही की, तुमच्या जवळ बसेल आणि मग एकमेकांची झाक झाकेल. एकतरी बोलायला तयार आहे का ? का म्हणुन तुम्ही फोन उचलले नाही. का म्हणुन तुम्ही कामे केले नाही. का म्हणुन भेदभाव केला जातो. माझ्या वार्डात काम चालु असते तरी तुम्ही आम्हाला बोलवत नाही. म्हणता काय संबंध नगरसेवकांचे. अधिकाऱ्यांचे काम नाही, आहे आमच्या वार्डात. तुम्हाला कंटाळलो, सगळया अधिकाऱ्यांना कंटाळलो. खुप ईच्छा होती पुढच्या वेळेस सेवा करायची. तुम्ही आम्हाला हे केले आणि माझ्यासारखीला वाटले होते, माझ सगळ संपलेले आहे देवा, सगळयांकरीता स्वत:च्या मुलांसाठी नाही जगायचे, दुसऱ्यांकरीता जगायचे.पण तुम्ही असे लोकांना खाली बसवले. सगळया अधिकारी खुशाल सांगतात, याला फोन लावा त्याला फोन लावा,त्याला फोन लावा, तुमचा सादा एवढा एवढा कर्मचारी सांगतो, नाही नाही, बोल देव तुमको जो बोलना है साहब को बोल देव. ही पध्दत आहे तुमच्या येथे. ही पध्दत बंद करा. जर कोणाला आवड असेल ना सेवा करायची तर करु द्या. स्वाभिमानाने करु द्या त्याला. ठेके घेण्यासाठी नाही आलेली आहे. मी स्वत: तरी नाही आलेली आहे.खुप त्रास झाला, खुप त्रास झाला.

**मा.महापौर :-** ताई तुम्ही शांत राहा. शांत बसा. बघा सन्मा.सदस्यांनी जर कॉल केला असेल, तर ते त्यांचे किंवा पर्सनल कामे सांगत नाही. आपल्या वार्डातील छोटीमोठी कामे असतात. आणि मला वाटते, सन्मा.सदस्यांनी कॉल केल्यानंतर प्रत्येकाने, ठीक आहे त्यांनी जर चुकीच्या व्यक्तीला लावले असेल, ठिक आहे आरोग्य वाल्यांचे काम असेल बांधकाम वाल्यांना फोन केला, तर त्यांना माहिती द्यायची. कारण प्रत्यक्ष काही वेळा माहिती नगरसेवकांपर्यंत सुध्दा पोहचत नाही. मग त्या वेळेला योग्य माहिती देणे प्रत्येक सन्मा.सदस्यांना को-ऑपरेट करणे हे प्रत्येक अधिकाऱ्याचे आणि महापालिकेच्या कर्मचाऱ्याचे काम आहे. सरीताताईंचा विषय प्रत्येक वेळी असाच येतो की, ताईंनी कॉल केल्यानंतर ताईंचे कॉल उचलले जात नाही. त्यांनी काही सांगितले, कामे सांगितले तरी ते केले जात नाही. एका वेळेला तीन तीन चार चार वेळेला खड्डा बुजविण्याचा विषय होता. तो सुध्दा त्यांचा झाला नाही. मग अस का घडतं. याचे सुध्दा

आत्मपरिक्षण मला वाटते आयुक्त मॅडम आपण करावे. आपण आपल्या कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना या सुचना द्या. कोणाचा ही फोन आला, फक्त ओरडणारे नगरसेवक असतील, बोलणारे असतील, त्यांचेच कामे करायचे. जे सादे असतील जे कधी बोलत नाही. किंवा ज्या महिला असतील किंवा त्यांचा आवाज दाबण्याचा जर प्रयत्न होत असेल, तर महिलांचा आवाज काय असतो ते तुम्ही आता पाहिलेलच आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** ताई, नितीनभाऊ सुध्दा सांगतील, नितीनभाऊ तुम्ही योगेशभाऊंशी बोलणे केलेले आहे. ते काम झाले नाही भाऊ, तुम्ही स्वत: सांगुन सुध्दा काम झाले नाही. झाले का स्वत: सांगतील नितीन भाऊ. काम छोटेशे होते, भाऊ सुध्दा सांगत होते.तरी ते काम झाले नाही. भाऊ सुध्दा सांगतील.

**मा.महापौर :-** व्यवस्थीत बोलुन, ही यंत्रणा नाही. ताई दोन दिवसांनी काम लावतो, तीन दिवसांनी काम लावतो.काही तरी अश्वस्त तुम्ही करा आणि दोन दिवसानंतर तुम्ही ते काम लावा. ते करा, तेवढेही आम्ही समजु शकतो. मॅनपावर कमी आहे. तात्काळ त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी होईल. परंतु दोन दिवसानंतर तीन दिवसानंतर ते काम व्हायला हवे. बऱ्याच वेळेला तर असे होते की, आपल्या डोक्यातुनही तो विषय निघुन जातो.शहराचा जर विषय असेल तर, आणि आठ दिवसानंतर जैसे थे परिस्थिती असते. आणि याच्यामुळे हा रोष सगळा फक्त नगरसेवकांवर येतो. आपण सगळे अधिकारी आणि कर्मचारी खरच सुस्त असतात. रात्रभर दोन वाजेपर्यंत आमच्या वार्डातील नगरसेवक झोपलेले नाही, नागरीक झोपलेले नाही. काय त्रास तेथे सहन करावा लागला आमचा आम्हाला माहिती आहे. तेथे कोणताही प्रशासनातील तीन चार अधिकारी सोडले तर बाकी कोणीही त्या जागेवर नव्हते. आरोग्याचे ४२ कर्मचारी कामाला आहे. त्यापैकी फक्त २ लोकं जागेवर उपस्थित होते. कांबळे साहेबांना फोन केला, तेव्हा त्यांची टिम आल्यानंतर ते काम सुरु झाले. खरंच कांबळे साहेबांबद्दल आम्हाला खुप आदर आहे. आणि कुठलेही काम सांगितले शहरातले तर ते स्वत: पुढाकार घेऊन काम करतात. पण असे प्रत्येक आरोग्य धारकाने काम करणे आणि करुन घेणे, एक गट्स असा असतो की, आपण जर चेअरपर्सन आहोत तर समोरच्या कडुन काम करुन घेणे, ही जबाबदारी आपली असते. ते तुम्ही साम दाम दंड भेद कश्याही पध्दतीने करा. पण ते काम तुम्ही करुन घ्या. नाही तर जे काम करत नाही. कामचुकारपणा करतात. त्यांच्यावर कार्यवाही करा. कार्यवाही केल्यानंतर ते बरोबर सरळ होतील आणि कामे करतील. दोन महिने राहिले आहे. मला वाटते, दोन महिन्यानंतर जळगांव शहर प्रशासनाचे काय होणार आहे. हा म्हणजे विचार न केलेला बरा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ही ताईंची जी तक्रार आहे, अशी सर्व सन्मा.नगरसेवकांची तक्रार आहे. २००३ ला, मी नगरसेवक डायरी म्हणुन एक मान्यता दिलेली होती, एक सुचना दिलेली होती, मी स्वत: त्याचा पाठपुरावा केला होता. आरोग्य, लाईट, पाणी आणि बांधकाम. सौ बका एक लिखा. म्हणुन नगरसेवक डायरी आपण सुरु केली होती. ती त्याच्यानंतरच्या प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांनी बारगळुन लावली. नगरसेवकाचे काम आहे का ? गटार साफ करायची. रेग्युलर काम आहे. त्याला सांगायची बारी यायला नको. लाईट गेलेला आहे, नगरसेवकाकडे नागरीक येतात तेव्हा नगरसेवक फोन करतो. का आपले मानसे नाही का ? त्यांनी जाऊन पाहायला नको का ? लाईट लागला आहे की नाही लागला आहे. पाणी येत नाही कोणी तक्रार केली. त्या पाण्याच्या ठिकाणी इंजिनिअर संबंधीत अधिकाऱ्यांनी जायला नको का ? अश्या छोटया/ छोटया ठिकाणी खड्डे पडलेले आहे. सांगुन सुध्दा जर तेथे मटेरिअल टाकले जात नसेल. मग हे पण सांगितले पाहिजे. तिथे खड्डा झाला आहे. म्हणुन नगरसेवक डायरी २००३ ला या सभागृहाने सुरु केली होती. ती परत सुरु करावी अशी मी मागणी करतो, सौ बका आणि एक लिखा, भलेही दोन महिने का होईना. पुढच्या टर्मच्या लोकांना ती सुविधा योग्य होईल. आणि त्या पध्दतीने काम चालेल. कमप्लेंटची तारीख, काम झाल्याची अधिकाऱ्यांनी केलेली सहीची तारीख, त्याचे काय केले अशी एक डायरी आपण बनविली होती. एखादा सॅम्पल कोणत्या अधिकाऱ्याकडे पडले असेल, नसेल तर मी त्यासाठी पुर्ण मदत करेल. आणि नगरसेवक डायरी पुन्हा सुरु करावी अशी माझी विनंती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई, माझ्या लक्षवेधीच्या अनुषंगाने दोन प्रश्नांचे उत्तर अद्यापपावेतो प्राप्त झालेले नाही की, लांडोरखोरीचा रस्ता आणि अजंठा चौफुली ते नेरीनाका पर्यंतचा रस्ता आज नेमकी याची सद्या परिस्थिती काय ? तो कुठल्या निधी मधुन होणार आहे. तो कॉंक्रीटींग मधुन होणार आहे की, डांबरी मधुन होणार आहे. याच्या संदर्भात वृत्तपत्रातल्या बातमीच्या अनुषंगाने त्याची वेगळी निविदा प्रसिध्द झालेली आहे. अशी जी बातमी होती. नेमकी त्याची वस्तुस्थिती काय ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** भाऊ, आपण ज्या रस्त्याचे उल्लेख करत आहात. तोपुर्वी कॉंक्रीटींग करीता ४२ कोटी मध्ये मंजुर आहे. आता पेपरामध्ये आले व जे आपण मला व्हॉट्सअॅपलाही टाकले होते. त्या संदर्भात मी बांधकाम विभागाशी फोनवर कॉन्टॅक्ट ही केला होता. परंतु आपल्याला कुठलीही अधिकृत माहिती दिलेली नाही. आता आपण जे पत्र दिलेले आहे, त्याच्यामध्ये आपण त्याचे ही उल्लेख केलेले आहे. यापुर्वी ४२ कोटीमध्ये त्याचे कार्यादेश दिलेले आहे. आणि डांबरीकरणामध्ये तो रस्ता समाविष्ट केलेला आहे. आणि आता त्याची स्वतंत्र निविदा, निविदा काढायची गरज नाही. ऑलरेडी जर ४२ कोटीमध्ये त्याची निविदा आहे. तर त्याला पुन्हा टेन्डर काढण्याची गरज नव्हती असे मी फोनवर बोललो आहे त्या साहेबांना. तर आपण त्यांना लेखीस्वरुपात माहिती मागितलेली आहे की, लेखी द्या आम्हाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कधी आपल्या महानगरपालिका हद्दीमध्ये नेमके कामाचे स्टेटस काय आहे. त्याची माहिती सुध्दा सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन वेळेवरती तत्परतेने उपलब्ध करुन देत असाल. मला वाटते अश्विनभाऊ ही अत्यंत चुकीची गोष्ट आहे. कारण काय होते की, आपण त्या खटोडच्या मागे लागतो की, तु तो रस्ता चालु कर. कारण शहराचा मुख्य रस्ता आहे की, टॉवर पासुन ते अजिंठा चौफुली पर्यंत, शहरातला एक मुख्य रस्ता आहे जो एम.आय.डी.सी.त वाहतो. आज त्या रस्त्याची परिस्थिती अशी आहे. मी दुर्देवाने अॅक्टीवा घेऊन गेलो. आतापर्यंत मी जनरली कार मध्ये फिरतो तर त्याच्यामध्ये रस्त्याची परिस्थिती लक्षात येत नाही. परंतु अॅक्टीवा वर गेल्यानंतर अक्षरश: असे वाटायला लागले की, मी हॉर्स राईडींग घेत आहे का ? इतक्या पध्दतीने त्या रस्त्याला ठिगळ लागलेले आहे. आणि रस्ता मंजुर असतांना त्या रस्त्याचे काम मार्गी लागु शकत नाही. त्याच्या संदर्भातली वस्तुस्थिती काय आहे मी व्यक्त करु शकत नाही. मग आता करायचे काय या गोष्टीला.

**मा.आयुक्त :-** सर आपण दर आठवडयाला पी.डब्ल्यु.डी.ची व आपल्या नेत्यांची, सदस्यांची, गटनेत्यांची एक बैठक लावु. आणि दर आठ दिवसात त्यांची एक बैठक घ्यायची. याच्यातुन मग आपल्याला माहिती मिळेल. आणि नियोजन ही त्यासोबत राहील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदया, महापौरताई जसे आता अश्विनभाऊंनी सांगितले की, आपण पुन्हा त्याच्यावर चर्चा करु. आता मी हे १०० कोटीचे कॉंक्रीटींग रस्त्याच्या प्रस्तावा संदर्भात बोलतो की, मलनिस्सारण योजनेचा डी.पी.आर. आपला तयार नाही. यांची निविदा प्रक्रिया सुरु झालेली आहे. १०० कोटीतल्या कामांची. १०० कोटींच्या कामांची निविदा साधारणता ८-१५ दिवसात पुर्ण होईल. प्रत्यक्ष कामांना महिने दोन महिन्यानंतर सुरुवात होईल. जेव्हा त्याचा डी.पी.आर. मेन तयार आहे. तर त्या जागा सोडल्या कश्या ? आयडेंटीफाय कोण करुन देईल की, तुमची मलनिस्सारण योजना या गटारीतुन जाणार आहे की, त्या गटारीतुन जाणार आहे की, येथे हाऊस कनेक्शन येतील. या सर्व गोष्टीचा डी.पी.आर. जर तुमच्या हातात आहे. तेव्हाच तुम्ही त्यांना चॉकआऊट करुन देऊ शकाल की, हा आमचा डी.पी.आर. आहे. या लेनमध्ये अश्या पध्दतीने आमची ही मलनिस्सारणाची मुख्य लाईन जाणार आहे. येथे हाऊस कनेकशन राहतील. त्यावेळेला त्या रस्त्यांचे नियोजन त्यांच्याकडुन करुन घेणे अपेक्षित असेल. उद्या समजा त्याचे टेन्डर झाले, कार्यादेश दिला, मक्तेदाराने काम सुरु करुन टाकले. तर काय करणार किंवा मक्तेदाराला कार्यादेश दिल्यानंतर कामाची मुदत असेल, मलनिस्सारण योजना किंवा त्याचा डी.पी.आर. तयार व्हायला अजुन वर्षभर लागेल. वर्षभरात त्या मक्तेदाराची कामाची मुदत संपुन जाईल. म्हणजे एकीकडे त्याची मुदत संपल्याचे संदर्भात तो काम सुरु करण्याची घाई करेल. पण दुसरीकडे त्याला आखुन देण्याचे नियोजन आपल्याकडे नसेल. मग तश्या परिस्थितीमध्ये कुठल्या अर्थाने तो बी अॅण्ड सी च्या गल्ल्यांचे काम करेल.हा सुध्दा एक तांत्रिक प्रश्न निर्माण होणार आहे ना. तर याचे सोल्युशन काय ?

**मा.**आयुक्त :- हे तर आपल्याला चर्चेतुनच कराव लागेल सर. आपण त्यांना बैठकीला बोलवु या व समक्ष चर्चा करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मॅडम, बैठकीला बोलवा, निश्चितपणे बैठक बोलवु त्याबद्दलही वाद नाही. परंतु ह्या सगळया गोष्टी. आपल्या सारख्यांना व सगळयांना समजण्या सारख्या आहे ना. उद्या त्यांनी सांगितले, कार्यादेश आम्ही मक्तेदाराला दिलेले आहे आम्ही उद्यापासुन काम सुरु करत आहोत. तुम्ही तुमचा मलनिस्सारण योजनेचा प्लॅनिंग सांगा की, आम्ही कश्या पध्दतीने तुमच्या मलनिस्सारण योजनेसाठी पाईपलाईनसाठी जागा सोडायची. आपण काय उत्तर देणार. कशाच्या

आधारावर देणार. जेव्हा आपला डी.पी.आर.च बनलेला नाही. मग पुन्हा चर्चेला काही अर्थ राहणार नाही. म्हणजे कॉमन गोष्टी आहेत ना.

**मा.महापौर :-** भाऊ साधा विषय आहे, आपण मागच्या महासभेमध्ये एन.ओ.सी.दिली. नाहरकत प्रमाणपत्र आपण दिलेले आहे आणि हे देतांना आपण काही अटीशर्ती त्या खाली टाकलेल्या आहे. त्या अटीशर्तींचा जर अभ्यास केला तर त्या अटीशर्ती कुठे कमी पडणार. ती जबाबदारी कोणाची. महापालिका हे करु शकत नाही का ? अमृत योजनेमध्ये झालेले आहे का ? मलनिस्सारण झालेले आहे का ? अमृत २.० चे नळ कनेक्शन झालेले आहे. सगळया बारीक बारीक गोष्टी पाहायचे आहे. आपण त्यांना एन.ओ.सी.दिलेली आहे. पण ते असतांना त्या अटीशर्ती कोणी पुर्ण करावयच्या आहे महापालिकेने, म्हणुन ती एन.ओ.सी. देणे पण चुकीची पध्दत आहे. मला वाटते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे ना. बिल्कुल बरोबर आहे. ज्या वेळेला आपण आपल्या महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये त्यांना कामाच्या एन.ओ.सी. देतो आहे. त्या एन.ओ.सी.च्या अनुषंगाने भविष्यातल्या ज्या येणाऱ्या अडचणी आहे. त्याची जबाबदारी कोण स्विकारणार. कारण त्याच्यावरती नियंत्रण आपले आहेच ना. तो जो कोणी मक्तेदार असेल. त्या मक्तेदारावर आपले नियंत्रण नाही. आपले प्रशासनाचे नियंत्रण नाही. मग उद्या जाऊन त्या कामाच्या जर कधी तांत्रिक दृष्ट्या काही अडचणी निर्माण झाल्या. तर बी ॲण्ड सी म्हणेल की, आम्हाला तुम्ही दिलेले एन.ओ.सी. आहे. आम्ही त्या प्रमाणे काम करुन मोकळे झालो, परंतु प्रत्येक्षात काम करतांना ज्या काही अडचणी येतील. त्याच्यावरती नियंत्रण कोणाचे. म्हणजे वास्तविक बघितले तर १०० कोटी सारख्या इतका मोठा निधी आपण ज्या वेळेला खर्च करतो, त्याच्यातला डी.पी.आर. तयार करतो. आणि त्या डी.पी.आर.च्या अनुषगांने रस्त्यातील कश्या प्रकारचे स्लोप तयार करता येईल. भविष्यात अश्या पध्दतीने ज्या वेळेला अतिवृष्टी होते. ज्यावेळेला रस्त्यांचा पुर्ण फ्लो नैसर्गिक रित्या उतरत्या भागाने वाहुन जायला पाहिजे. कारण गटारींची कॅपॅसीटी जी आहे. त्याला तुम्ही मटेरियल पेक्षा वाढवु शकत नाही. परंतु काही चौक खालती दिसतील काही वरती दिसतील आणि अश्या पध्दतीने वृत्तपत्रात दर पाऊसाळयाला फोटो येतात. तश्या पध्दतीची परिस्थिती कायम स्वरुपी निर्माण होईल. म्हणुन मला वाटते की, याचा सुध्दा डी.पी.आर. तयार करायला पाहिजे. तो डी.पी.आर. करतांना तुमच्या पाण्याच्या योजना, तुमच्या मलनिस्सारणच्या योजना, या सगळया गोष्टींचा त्याच्यामध्ये समावेश असुन एक परिपुर्ण असा डी.पी.आर. तयार करुन प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी. आणि याच्यावरती महानगरपालिकेचे १००% नियंत्रण असणे गरजेचे आहे.

**मा.उपमहापौर :-** नाही भाऊ त्यांना स्ट्रीक्टली सांगावे लागणार आहे. तिकडे ते हो म्हणतात. इकडे आल्यानंतर जेव्हा आपण संयुक्तीक मिटींग घेतो. आपण जे सांगतो ते लिहुन पण घेतात.पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नाही. मग याच्यावर पण काही नियंत्रण असले पाहिजे. त्यांनी आपल्याला सांगितले मागच्या मिटींगमध्ये परंतु प्रत्यक्षात आता ज्या ठिकाणी कामे चालु आहे तेथे जर गेलात तर अशी कुठलीच इमप्लीमेंट होत नाही आज. मग आपल्या अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन पाहणे आपले काम आहे. एन.ओ.सी. आपण दिल्या आहेत, अटीशर्ती आपण दिल्या आहेत त्यांना. त्या अटीशर्तीनुसार जर काम होत नसेल तर ती जबाबदारी कोणाची. ते तर उद्या आपल्यावरच जबाबदारी निश्चित करणार आहे ना. त्या ठिकाणी विकास कामे आपण करत आहोत. त्या ठिकाणी भविष्यात काही अडचणी निर्माण झाल्यास, समस्या निर्माण झाल्यास त्याचे निरसन आपल्यालाच करावे लागणार आहे महानगरपालिकेला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ॲक्झाटली शेवटी ते पण सगळ आपल्यावरच येणार आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** का हो कुलभुषणभाऊ, तुमच्या प्रभागात कॉंक्रीट रोड झाले, तुम्ही नियोजन केले आहे तसे. झ ाले तुमचे रस्ते सगळे. तुमचे बाकी आहे का ड्रेनेजचे काम आता तुम्ही कसे नियोजन करणार आहे.

**मा.उपमहापौर :-** ऐका ना. मी तुम्हाला तेच सांगतो,

**श्री.अश्विन सोनवणे :-** आम्ही त्या अधिकाऱ्याला बोलवु आणि समोरासमोर करु ना काय आहे.

**मा.उपमहापौर :-** ऐका ना, आपल्याला रोड करण्यामध्ये काहीच अडचण नाही. १००% सी.सी.चेच झाले पाहिजे. परंतु ते जेव्हा या ठिकाणी सांगतात ना. तसे ते काम नाही करत आहे. त्याचे इमप्लीमेंट झाले पाहिजे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर मॅडम आहे, तुम्ही आहे आयुक्त मॅडम आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कोणी तरी जबाबदारी स्विकारणारे अधिकारी असेल ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर दालनात घेऊ म्हणजे तेथे आपल्याला बोलता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मिटींगच्या सोबत, जबाबदारी फिक्स करा,

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो चालेल ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे ती जबाबदारी फिक्स करुन ती सार्वजनिक बांधकाम विभागाला कळवा की, आमच्या महानगरपालिकेच्या महासभेने असे एक धोरण ठरविलेले आहे. आणि त्या धोरणाच्या अनुषंगाने शहरामध्ये होणाऱ्या प्रत्येक कामाच्या बाबतीत महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना आणि पदाधिकाऱ्यांना विश्वासात घेवुन अश्या पध्दतीने त्यांचे सहभाग करुन घेणे गरजेचे आहे. तसे सुचना द्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नितीनभाऊ यांनी पण पुढाकार घेतले पाहिजे. हे पण काय करत आहे. आपली जबाबदारी त्यांच्याकडे फेकत आहे. करत आहे ना करु द्या. यांनी पण पुढे यायला पाहिजे ना. हे पुढे येत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण जसा पत्र व्यवहार केला ना. माहितीच देत नाही ना.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ठिक आहे, पत्र व्यवहार केले ना. माहिती दिली नाही. बी ॲण्ड सी काय करते २००-३०० कि.मी. वर आहे का ? चालले जायचे तेथे. अधिकाऱ्यांना भेटायचे किंवा त्या अधिकाऱ्यांना येथे बोलुन घ्यायचे. तुम्ही फोन केले पाहीजे. आपण फोन केले तर का नाही येणार ते बी ॲण्ड सीचे इंजिनिअर, येतील ना. पण आपण पण पुढाकार घेतले पाहिजे. फक्त नगरसेवकच बोलुन दाखवत आहे पोटतिळकीने, यांनी पण दाखवले पाहिजे ना. आपले इंजिनिअर नाही का?

**श्री.नितीन लढ्ढा :-** आयुक्त महोदया, आपल्याला MDC मध्ये निर्णय घेण्याचा अधिकार आहे.

**मा.आयुक्त :-** आपण सोमवारी नाही तर मंगळवारी त्यांची बैठक बोलवु.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आणि दुसरा एक विषय होता. मागच्या महासभेत पण विषय झाला होता. बजेट संपलेला आहे, बजेटची वाढ करण्याचा विषय या महासभेत येणार होता. पण तो आला नाही. असे का ? यायला पाहिजे असे करायला नको ना. या महासभेला आला पाहिजे होता, नगरसेवकांचे कामे पेंडींग आहे. आता एक दोन महिन्यात कार्यकाळ संपत आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, मागच्या मिटींगला आम्ही सगळयांनी प्रशासनाच्या लक्षात आणुन दिले होते. अनेक आमचे छोटे छोटे कामे बजेट तरतुद संपलेली असल्याने होत नाही. पुढच्या महासभेत आम्ही बजेटची प्रोव्हीजन वाढवु गटारीसाठींची, असे अश्वस्त करण्यात आले होते प्रशासनाकडुन. नितीनभाऊ आपण सुध्दा हा शब्द दिला होता आम्हाला. पण प्रस्ताव आलाच नाही. आणि यासाठी आम्ही पाठपुरावाही केलेला आहे. मागच्या महासभेपासुन तर आता पर्यंत.

**मा.आयुक्त :-** कार्य सुरु आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, आमचा कार्यकाळ संपुन गेल्यानंतर बजेटमध्ये वाढ होणार का ?

**श्री.धीरज सोनवणे :-** आमचे ईस्टीमेट तयार होऊन पडलेले आहे मॅडम, सोनगिरे साहेबांना विचारले तर ते म्हणतात की, बजेटची अशी तरतुदच नाही.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आणि ते २५ लाखाचे ठरले होते निधी द्यायचे. आणि ठराव ही झाला होता पण ते म्हणत आहे की, तशी तरतुद नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** बजेटमध्ये तरतुद केलेली आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ते नाही म्हणत आहे सोनगिरे साहेब, नगरसेवक निधी बजेटमध्ये तरतुद आहे. गटारीचे संपले ना. आमच्या नगरसेवक निधीतुन गटारीची तरतुद लावा बजेटची. ते पण नाही म्हणत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमचा नगरसेवक निधी गेला कुठे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** धीरजभाऊंनी फोन लावला.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बजेटला तरतुद नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** बजेटला तरतुद आहे ना असे काय करता तुम्ही ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मी तुम्हाला काल फोनवर पण हेच सांगितले की, माझ्याकडे नविन रस्ते, नविन गटारी, जुन्या गटारी दुरुस्ती, जुने रस्ते दुरुस्ती, ओपनस्पेस असे जे हेड आहे. याच्यामध्ये असे कुठलेही हेड नाही की, नगरसेवकांसाठी २५-२५ लाख रुपये ठेवलेले आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही)

**श्री.विष्णु भंगाळे :-** महापौर महोदया, आपल्याकडे या लोकशाही दिनामध्ये सुध्दा गटारीसाठी तक्रार अर्ज आलेले आहे. आता नगरसेवक असल्याकारणाने गटारींना जर बजेटमध्ये तरतुद नसेल. तर आपल्यापर्यंत सुध्दा नागरीक लोकशाही दिनात पोहचत आहे. ते ही आपल्यापर्यंत आले असेल. सोनगिरे साहेबांपर्यंत पोहचले. लोकशाही दिनाच्या दिवशी. तरी सुध्दा तुम्ही येणाऱ्या महासभेला आपण त्याची तरतुद का घेतली नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** आपल्या तोंडाला पान पुसणे, एवढेच फक्त येथे चाललेले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बसा, बसा, बसुन जरी बोलले तर चालेल.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** सन्मा.सभागृह आणि महापौरताई, या ठिकाणी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे बजेटच्या अनुषंगाने तर आपण जो २०२३-२४ चा अंदाजपत्रक मांडलेला आहे. त्याच्या मध्ये आपण नविन गटारींसाठी महासभेने १० कोटी रुपये मंजुर केलेले होते.आणि त्याच्यानंतर नविन रस्त्यांसाठी २८ कोटी रुपये मंजुर केलेले आहे. माझ्याकडचा जो अभिलेख आहे आजच्या डेटला कालपर्यंत, तर १० कोटी रुपये आपण गटारीसाठी केलेले आहे. तर त्याच्यावरती आजपर्यंत प्रत्यक्ष खर्च हा रु.३,४३,४०,४७९/- झालेला आहे. आणि नविन रस्त्यांसाठी २८ कोटीची तरतुद केलेली आहे. त्याच्यावर प्रत्यक्ष खर्च हा रु.१,१०,०९,३१०/- झालेले आहे. प्रत्यक्ष खर्च हा आहे परंतु बजेटच्या अनुषंगाने हे आहे आणि तरतुद च्या अनुषंगांने सन्मा.सदस्यांकडुन जे काही प्रस्ताव आलेले आहे किंवा काही प्रस्ताव शासकीय किंवा अशासकीय त्याच्या अनुषंगाने किती प्रस्ताव मंजुर करायचे आहे. किती केलेले आहे बांधकाम विभागाने, त्याच्यानंतर आयुक्त महोदयांनी किती मंजुर केलेले आहे. प्रत्यक्षात वर्कऑर्डर किती दिलेल्या आहे. आणि आज बांधकाम विभागाकडे किती प्रस्ताव पेंडींग आहे. आयुक्त महोदयांकडे किती प्रस्ताव पेंडींग आहे. याचे कोणतेही माझ याकडे रेकॉर्ड या ठिकाणी नाही. आता जे काही बजेटची आकडेवारी तीन वर्षाची आहे.मागच्या बजेटमध्ये मांडलेले आहे. जरी एखाद्या विभागाची डिमांड असेल, तर प्रत्यक्ष बजेटमध्ये जास्तीत जास्त १०% वाढ आपण करु शकतो. आता प्रत्यक्ष ॲवरेज काय आहे त्या तीन वर्षाचा. त्याच्यावर आपल्याला वास्तविक आधारीत बजेट आपल्याला अंदाज मांडायचा असतो. त्याअनुषंगाने आपण अंदाजपत्रक आयुक्त महोदयांकडे मांडलेले होते. सभागृहाच्या या भावना लक्षात घेता आणि सन्मा.सदस्यांची मागणी लक्षात घेता. सभागृहाने ४०-४५ कोटी रुपये आपण ते बजेट वाढवुन अंतिम केलेला आहे. आता २०२३-२४ चा जो बजेट केलेला आहे. त्या अनुषंगाने आज जे रु.१० कोटी गटारींना, तर त्याची तरतुद पुर्ण झालेली आहे. किंवा २८ कोटीचे जे रस्ते आहे प्रस्तावित केलेले. त्यांची वर्कऑर्डर देऊन त्यांचे पुर्ण नियोजन झालेले आहे का ? तर ते काम आता उपलब्ध नाही. त्यानंतर आज नविन बजेट ही ॲपरॉपिरयेशन आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** मला सांगा, ज्या वेळेस बजेट सादर करायचा होता. जेव्हा आलेले होते सभागृहासमोर तेव्हा सगळयांनी सुचना केलेली होती. २५ लाख निधी हा नगरसेवक निधी. तो केलेला आहे का ?

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** मी बोलत आहे भाऊ, याच्यामध्ये १० कोटी आणि २८ कोटी याच्या व्यतिरिक्त सन्मा.सदस्यांच्या भावना व मागणी प्रमाणे आपण २०२३-२४ च्या बजेटमध्ये सुध्दा सन्मा.सदस्यांसाठी जे काही अंदाजपत्रक मांडलेले आहे. तर त्याच्यामध्ये अद्यापपर्यंत आता त्याच्यामध्ये जो आपण नगरसेवक हा निधी ठेवलेला आहे. नंतर हा निविदासाठी ठेवलेला आहे. आता एका वार्डात जर चार नगरसेवक आहे. त्याचे असेच केलेले आहे. एका वार्डात १०० रु चा तर ते सर्व नगरसेवकांना ते २५-२५ प्रमाणेचे नियोजन पुढच्या वेळेस प्रस्ताव आल्यानंतर त्याच्यावर कार्यवाही करणे आयुक्त महोदयांनी बजेटच्या अनुषंगाने अपेक्षित आहे. तर त्याच्या अनुषंगाने मला असे वाटते. अद्याप त्याच्यावर कार्यवाही सुरु झाली किंवा नाही. तर याच्या बद्दल सोनगिरे साहेब सांगीतले की जर नसतील तर ती तरतुद ऑलरेडी आपल्या बजेट मध्ये आहेच.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ते म्हणतात तरतुदच नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तुमच्या समोर सांगितले तरतुद नाही म्हणुन.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** तरतुद आपण केलेली आहे. १० कोटी आणि २८ असे ३८ कोटीची तरतुद केलेली आहे. त्याच्यामध्ये जसे कामे प्रस्तावीत होत आहे. त्याच्यामध्ये तशी तरतुद केलेली आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** तशी झालेली नाही. विशेष वार्डामध्ये ते पैसे खर्च झाले.आता येथे ठरवितांना आपण काय ठरवत आहे. प्रत्येक वार्डातील चारही नगरसेवकांना समान निधी देण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** धीरजभाऊ एक मिनीट,

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असल्यामुळे कोण काय बोलले समजले नाही)

**मा.उपमहापौर :-** घ्या सोनगिरे साहेब सांगा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आता साहेबांनी जो खुलासा केला त्याचा अर्थ असा दिसतो आहे की, हे जे २५-२५ लाख रुपये. प्रत्येक नगरसेवकाच्या हिशोबाने जे ठेवले आहे ते प्रभाग अधिकाऱ्याच्या अधिपत्या खाली म्हणजे २५ लाखाचा हा बजेट प्रभाग अधिकाऱ्याने प्रभाग समितीच्या कार्यालयामार्फत लावयाचा आहे. यापुर्वी बऱ्याच वर्षापुर्वी नगरसेवकांची जी जनरल बॉडी आली होती.त्या वेळेला ही प्रक्रिया चालु होती. आणि त्यांना लिमिट दिले होते की, प्रत्येक ईस्टीमेट ५ लाख पेक्षा जास्त नसावे. ५ लाखाच्या वर असले तर ते मुख्यालयात यायचे आणि येथे बजेट लावायचा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एकच सांगतो. वानखेडे साहेब,

**श्री.धीरज सोनवणे :-** नाही ना. ५ लाखाच्या वरती जे आहे त्याचे कोण देईल.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ही प्रोव्हीजन पहिले केलेली होती २५ लाखाची. त्यांना ५ लाखापर्यंतचे मंजुर करायचे अधिकार होते.

**श्री.धीरज सोनवणे :-** त्याच्या वरचे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याच्या वरचे आपण येथे नोंदवायचे.

**श्री.धीरज सोनवणे :-** मग आता हे त्यांच्याकडुन बजेट लावुन तुमच्याकडे पाठविले तर ते तुम्ही मंजुर करणार.

**सौ.शुचिता हाडा :-** बजेट वाढवायचे ठरले होते मागच्या मिटींगमध्ये, ते आपण करणार आहात की नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** करणार आहोत. साहेबांनी जे मुद्दे मांडले ना.

**सौ.शुचिता हाडा :-** त्यांचे म्हणणे आहे, त्यांच्याकडे बऱ्याच गोष्टी आलेल्या नाही. आयुक्त महोदया, हा तुमचा प्रशासकीय कामकाजाचा भाग आहे. याच्यात लोक प्रतिनिधींचा काय सहभाग येतो.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** म्हणुन सांगतो, हे जे प्रस्ताव आलेले आहे ते विस्तृत स्वरुपाचे आहे. बजेट मंजुर झाल्यापासुन आजपर्यंत जेवढे ईस्टीमेट आलेले आहे आमच्याकडे रजिष्टरमध्ये त्याची एन्ट्री आहे. त्याला बजेट लावला आणि त्याची एन्ट्री आहे. परंतु ते पुढे गेल्यानंतर त्याच्यातले किती मंजुर झाले किंवा किती नामंजुर झाले.आपल्याला सर्वांना माहिती आहे. काही अंदाजपत्रक मोठे २०-२५ लाखाचे असतात त्यासाठी साईट व्हिजीट केली जाते. आयुक्त महोदया स्वत: साईट व्हिजीट करतात. आणि आवश्यकता अनावश्यकता पाहुन त्याला मंजुरी देतात. जे काम मंजुर झाले ते होऊन जाते.

**सौ.शुचिता हाडा :-** कामाच्या साईट व्हिजीटसाठी आम्ही ९-९, १०-१० महिने थांबवुन आहोत. साईट व्हिजीट झाल्यानंतर आम्हाला सांगण्यात येते. बजेट प्रोव्हीजन संपलेली आहे. नविन बजेट प्रोव्हीजन करु. आता याच उत्तरांचे खुलासे द्या परत गोल गोल गोल फिरवुन उत्तरे देऊ नका. गटार स्लॅब कल्व्हर्ट हे जे काही किरकोळ कामे आम्ही आमच्या प्रभागातले दिलेले आहे. त्याला बजेट प्रोव्हीजन प्रशासन कशामधुन करणार आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** जसे साहेबांनी सांगितले.

**सौ.शुचिता हाडा :-** कालावधी, काही तरी कालावधी द्या आम्हाला.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** सन्मा.सदस्य आपण नगरसेवक स्वईच्छा निधी व प्रभाग विकास निधी याच्यात आपण जवळपास १९ कोटी रुपयांची तरतुद केलेली आहे. स्वईच्छा निधी २,७६,५०,०००/- आणि प्रभाग विकास निधी १७,००,५०,०००/- हे १९ कोटी जर आपण डिव्हायडेड बाय ७५ केले तर प्रत्येक सन्मा.सदस्य तर जवळपास २५ ते २६ लाख, एका सदस्यावर, त्या त्या जर प्रभाग सदस्यानी जर तसे काही प्रस्ताव दिले. त्यांना यादी दिल्यानंतर करायला काही हरकत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** साहेब माझी एक विनंती आहे नगरसेवक निधीच्या बाबतीत. जे मिनीट्स असतील, बजेटच्या दिवसाचे मिनीट्स, त्या मिनीट्स मध्ये जे मुद्दे मी टाकलेले आहे. त्या मुद्दयांचे आणि बजेट तरतुदीचे एक पत्र शहर अभियंतांना देऊन द्या की, कोणत्या पध्दतीने त्याच्यावर काय कार्यवाही करायची आहे. हा प्रभाग समिती अधिकाऱ्याचा विषय नाही. मी परत सांगतो, हे जे गैरसमज आणि गोंधळ होत आहे ना. सरळ ५ लाखाचे असेल, तुम्ही म्हणता ५ लाखाचे, आज पण जे तुमच्याकडे ५ लाखाचे चालु आहे ना ते पण तुम्ही प्रभाग अधिकाऱ्याकडे पाठवायला पाहिजे. तुम्ही करु राहिले बजेट तरतुद असो किंवा नसो.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** याच्यामध्ये प्रभाग अधिकाऱ्याचे काही संबंध नाही. प्रभाग विकास निधी म्हणजे एका प्रभागाला जर ४ सन्मा.नगरसेवक असतील, ४ जे सन्मा.सदस्य आहे ते जे काही कामे प्रस्तावीत करतील. ते या निधीत पडतील. आता तुम्हाला एक सांगितले की, जवळपास १९ कोटी रुपये ते आहे. प्रत्येक सन्मा.सदस्यांना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ८० नगरसेवकांना.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** ८० नगरसेवक जे आहे ना आपले सन्मा.सदस्य १९ कोटी भागीला ८० जे येईल ते पर एक सदस्य प्रभागात ते काम प्रस्तावीत करु शकतात. आणि या निधी मधुन आपण ते काम मंजुर करु शकतो.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नगरसेवक जे सुचवतील ते. रस्ते असेल, स्लॅब कल्व्हर्ट असेल, लाईट असेल जे काही त्याला गरज वाटेल ती कामे.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** याच्यामध्ये जे शासन निर्णय आहे. त्यात त्यांनी यादी दिलेली आहे. तर त्याच्यामध्ये सगळी विकास कामेच आहे. मी ही यादी ठेवलेली आहे सभागृहामध्ये. त्यासाठी १९ कोटी रुपये निधी आहे.

**श्री.धीरज सोनवणे :-** साहेब जी कामे आवश्यक होणे गरजेचे आहे. त्या कामांचे तयार ईस्टीमेट आमच्याकडे पडलेले आहे. तुम्हाला त्यांना ज्या सुचना करायच्या आहे ते त्वरीत करा. जेणे करुन पावसाळयाच्या आधी आमचे कामे मार्गे लागतील.

**श्री.चंद्रकांत वानखेडे, उपायुक्त :-** प्रभाग विकास निधी आणि नगरसेवक स्वईच्छा निधी तो क्लब केला की होतो. १९ कोटी भागीला ८० त्यात जे काही प्रत्येक सदस्याला जे येईल. त्याप्रमाणे जर रजिष्टर ठेवले तर ते काम होतील.

**सौ.शुचिता हाडा :-** सोनगिरे साहेब, महापौरताई,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** साहेब, सोनगिरे साहेब, आता मॅडमकडे जे प्रस्ताव ठेवलेले आहे ते कश्यात धरले जातील. बजेट मध्ये, तुम्ही मग त्याच्यावरच सद्या करा ना. नविन बजेट लावुन फायदा काय ?

**सौ.शुचिता हाडा :-** सोनगिरे साहेब, मला हे विचारायचे आहे, आमचे जे कामे ऑलरेडी तुमच्याकडे बजेट तरतुदीसाठी पेन्डींग आहे. तुमच्याकडे म्हणजे प्रशासनाकडे, ते कोणाच्या टेबलवर असेल माहित नाही. त्यासाठी तुम्हाला अजुन काही पत्र अपेक्षित आहे का ? जर काही अपेक्षित असेल तर आताच सांगा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही अपेक्षित काही नाही. फक्त आता बजेटच्या तरतुदीचे रजिष्टर आजच सन्मा.सदस्यांकरीता तयार करतो.

**सौ.शुचिता हाडा :-** जे कामे आपल्याकडे आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता:-** यस, तेच कामे आपण त्याच्यात टाकु. आणि मान्यता घेऊ.

**मा.आयुक्त :-** जे माझ्यापर्यंत आले ते मायनस होतील ते. वजा होतील वजा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता:-** मला असे समजविण्यात आले की, आपण प्रस्ताव दिल्यानंतर आणि आयुक्त महोदयांच्या त्यावर स्वाक्षरी झाल्यानंतर मी तो खर्ची टाकतो.म्हणजे ते २५ लाख रुपये प्रॉपरली वापरता येतील. त्यांचे जर अंदाजपत्रक नामंजुर झाले तर त्याला बजेट नाही लागणार. तसेही ते आपण मेनटेन करु शकतो.

**सौ.शुचिता हाडा :-** आता बजेटची तरतुद जी संपलेली होती ती आता पुन्हा क्रिएट करणार की, करणार नाही. कारण आर्थिक वर्ष आपले आताच सुरु झालेले आहे. कारण आमचे काही कामे त्या २०-२५ लक्ष निधीतुन होतील. पण तरी सुध्दा काही पेन्डींग राहणारच आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता:-** नाही त्यासाठी सरांनी जसे सांगितले ना, जी कामे आयुक्त महोदयांनी नामंजुर केलेली आहे ती कामांची अमाऊंट आपल्याला क्यालक्युलेट करावी लागेल आणि ती आपल्याला पुन्हा बजेटमध्ये ॲड करता येईल. तेवढी रक्कम जर ॲड केली तर तेवढ्या खर्चात आपले कामे होतील. असे बरेच कामे आहे. जसे भाऊ म्हणत आहे. त्याच्यावर अट होती म्हणुन ते काम नाकारले गेले. त्याला बजेट लागलेले होते. ती नाकारली गेली तर ती रक्कम परत बजेट मध्ये आली पाहिजे. त्यासाठीच साहेबांनी तक्ता आखायला सांगितला, त्या तक्त्यात आपण हे टाकले तर सोपे होईल.

**सौ.शुचिता हाडा :-** आता तुम्ही म्हणतात की, मनुष्यबळ नाही. तर हे कधी पर्यंत करणार.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता:-** याला मनुष्यबळाची आवश्यकता नाही. आमचे जे बांधकामाचे लिपीक आहे. त्याच्याजवळ मनपा निधीचे कामे आहे.मनपा निधीमध्ये तरतुदीसाठी आमच्याकडे बजेटचे रजिष्टर आहे. आणि ज्या कामांचे कार्यादेश झालेले आहे त्याची लिस्ट आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** मग आता हे कधीपर्यंत होणार.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता:-** हे ८-१० दिवसांमध्ये मी सगळे करुन टाकतो ताई.

**सौ.शुचिता हाडा :-** पुढच्या महासभेपर्यंत होणे अपेक्षित आहे. महापौरताई, याची नोंद घ्यावी की, पुढच्या महासभेपर्यंत सगळे करणार आहेत.

**मा.महापौर :-** आता आपण विषयपत्रिकेकडे वळु या. एक मिनीट ताईंनी केव्हाचा हात वर केलेला आहे. बोला ताई.

**सौ.गायत्री शिंदे :-** महापौरताई, आयुक्त मॅडम, मला प्रशासनाला एक विनंती करायची आहे की, सद्या झालेल्या काँक्रीट रोडाचे काम शिवाजी नगर भागातील कामांचे लेखापरिक्षण करुन चौकशी करावी. प्रभाग क्र.०२ मध्ये काँक्रीट रस्त्यांचे जे कामे झालेले आहे.

**मा.महापौर :-** कुठले कुठले रस्ते आहेत. तुमच्या रस्त्यांचे जर नाव सांगितले, तर त्या रस्त्याची चौकशी करावी.

**मा.आयुक्त :-** कोणता रस्ता, काही स्पेसिफिक आहे की, सरसकट

**सौ.गायत्री शिंदे :-** सरसकट, काँक्रीटीकरणाचे जे ही रस्ते झालेले आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :**- १ आणि २ दोघी वार्डांची.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, एकच मिनीट, सन्मा.महापौर, नितीनभाऊ गेल्या महासभेमध्ये तुम्ही मला महापालिकेचे ओपन स्पेसच्या संदर्भात खाजगी संस्थांना जे दिलेले होते, शैक्षणिक संस्थांना जे दिलेले होते. तुम्ही मध्यस्थी करुन सांगितले होते की, याच्याबाबत खुलासा पुढच्या महासभेच्या आत मिळुन जाईल. ही महासभा येवुन गेली. अजुन पर्यंत कुठलाच खुलासा नाही. कुठल्या जागेवर किती उत्पन्न त्यांनी कमविलेले आहे. महानगरपालिकेला किती मिळालेले आहे. कुठलाच खुलासा नाही. तुम्ही मध्यस्थी आहे तुम्ही उत्तर द्या सगळयांना काय उत्तर द्यायचे तर. आता परवाच्या लोकमत पेपरला बघा.परवाच्या लोकमत पेपरला एवढी मोठी बातमी आहे. यांना अजुन तरी त्या पत्राचा खुलासा द्यायचा नसेल. मग तुमच्या सारखे जेष्ठ सदस्यांची मध्यस्थी काय कामाची. गांभिर्याने घेतले पाहिजे ना. ठिक आहे राजकीय काही दबाव आहे जे असेल ते असेल पण आम्ही पत्र व्यवहार केला. जसा बंटीभाऊंचा रोष होता, रोष आहे पत्राचे, त्यांना क्लियर होत नाही म्हणुन असे होते. चार चार वेळा स्मरणपत्र देऊन ही. महापौरताई गेल्या ६ महिन्यापासुन मी आपल्याला त्या संदर्भात सांगत आहे. प्रत्येक महासभेला आपण सांगतात अधिकाऱ्यांना की, आपण कठोर काही तरी कार्यवाही केली पाहिजे. असे केले पाहिजे. परंतु तुमच्या शब्दाला किंमत नाही असे दिसत आहे या ठिकाणी.

**मा.उपमहापौर :-** जितुभाऊ एक मिनीट, ज्या दिवशी वृत्तपत्रात बातम्या आल्या, मला वाटत, त्याच्या दुसऱ्या दिवशी आयुक्त मॅडमांशी माझे बोलणे झाले होते. त्यांनी सांगितले आम्ही आजच त्या संदर्भात मिटींग घेतलेली आहे व ज्या ज्या ओपन स्पेसेस कोणत्या संस्थांना दिले गेलेले असतील किंवा त्या संस्थाचे व्यवसायीक वापर सुरु असतील. किंवा अश्या ज्या संस्थांना ओपन स्पेसेस दिलेले असतील त्या सर्वांची चौकशी करुन सविस्तर अहवाल ८ दिवसाच्या आत सादर करण्यासंदर्भात सर्व अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहे. असे मला मॅडमांनी सांगितले, हे आपण जे म्हणत आहे आणि या गोष्टीची दखल, या वृत्तपत्रात बातमी आली ही गोष्ट तेवढीच खरी आहे. त्याच्या ३ दिवसापुर्वी महापौरांनी आयुक्त मॅडमांना या बाबतीत विचारना देखील केलेली होती. की आपण आता, ऐका ना. ज्या कोणत्याही ओपन स्पेसेस आता, आपल्या पिंप्राळयातल्या, त्या ओपन स्पेसच्या बाबतीत विषय आहे, त्या ठिकाणचे नागरीक आले होते. हा त्या दिवसाचा विषय आहे. तात्काळ आयुक्त मॅडमांनी या संदर्भात मिटींग घेऊन संबंधीत अधिकाऱ्यांना अश्या सुचना पण दिलेल्या आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** एक मिनीट, नितीनभाऊ एक मिनीट

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊंचे म्हणणे काय आहे. ज्या सुचना दिल्या, मिटींग झाली हे मान्य आहे. परंतु त्यांच्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हा विषय आताचा नाही. मी ३-४ महिन्यापासुन या संदर्भात पत्र व्यवहार करत आहे आणि प्रत्येक महासभेमध्ये मी या संदर्भात बोलत आहे. पुर्वी मी चाटे साहेबांना विचारले होते मी. उत्पन्नाचेच विचारले होते. त्याच्या संदर्भातच तुम्ही मला माहिती देणार होते ना. भाऊ यांनी दिला होता का खुलासा.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** तुम्ही त्या दिवशी विचारले होते आणि मी त्याच दिवशी सांगितले होते की, कुठलेच उत्पन्न येत नाही. त्याच मिटींगमध्ये खुलासा दिला होता.

**श्री.जितेंद्र मराठे :-** भाऊ असे उत्तर होते का ?

**श्री.**गणेश चाटे, उपायुक्त :- मी येथेच उभा होता.

**श्री.जितेंद्र मराठे :-** साहेब तुम्ही यातले व्हीडीओचे रेकॉर्डींग चेक करा. नितीनभाऊ मध्यस्थी होते. तुम्ही सांगितले, त्या संदर्भामध्ये आम्ही व्यवस्थीत अभ्यास करुन तुम्हाला येत्या महासभेमध्ये कळवितो. असे तुम्ही सांगितले, आयुक्त मॅडम आपण गांभिर्याने घ्या हा विषय. मी पत्र दिलेले आहे. मी महापौरताईंना पण पत्र दिलेले आहे. ज्या ठिकाणी असे गैरव्यवहार आढळले असतील. तुम्ही त्यांच्यावर कार्यवाही करा. त्यांनी एवढ्या वर्षानुवर्ष आपल्या महापालिकेच्या जागेवर उत्पन्न कमविले. आणि मोठमोठ्या प्राईव्हेट जागा विकत घेवुन त्या डेव्हलप केल्या. आता ते आपल्या महापालिकेच्या जागेवरुन ते दुसरी प्रायव्हेट जागेवर शिफ्ट होणार आहे. २० वर्ष तर त्यांनी आपल्या जागा फुकट वापरल्या. आणि त्याठिकाणी महापालिकेला रु.१/- चे उत्पन्न मिळालेले नाही. मग त्यांच्यावर कार्यवाही कराचीच नाही का आपण, त्यांना आपण इतके सोडुन द्यायचे का ? ठिक आहे त्यांना सुट दिलेली आहे. सुनिलभाऊ, मागच्या वेळेस तुम्ही पण होते, नितीनभाऊ, सुनिलभाऊ आपल्या मध्यस्थीने आपण विषय थांबविला, मग कार्यवाहीच्या संदर्भामध्ये यांचे धोरण काय ? महापौरताई काय याच्या संदर्भामध्ये खुलासा द्या महापौताई, त्यांचे चार वेळेला झालेल्या महासभेमध्ये झालेल्या व्हिडीओचे रेकॉर्डींग चेक करा, आम्ही तुमच्याकडे विश्वासाने बघतो, तुम्ही अधिकाऱ्यांना सांगतात.

**मा.आयुक्त :-** भाऊ, मागच्या बैठकीच्या अनुषंगाने आम्ही बैठक घेतली, आणि ज्या ओपन स्पेसेसवर, कमर्शियल वापर होतो. ज्या कामासाठी आपण दिलेले आहे. त्या कामाचा वापर न होता कमर्शियल वापर होतो. अशी माहिती काढायला सांगितली. टाऊन प्लॅनिंगकडे जुने रेकॉर्ड शोधायला सांगितले. एक सर्व्हे केल्यानंतर आम्हाला ३५ ते ४० अश्या ओपनस्पेसेस आढळल्या होत्या की, ज्या कमर्शियल वापर होत आहे. त्या अनुषंगाने फक्त मागच्या फाईल शोधायला सांगितल्या मी की, आपण त्यांना दिलेले आहेत का ? त्यांना नोटीसा दिल्या आहेत का? त्यांचे करारनामे आहेत का ? तर ह्या टेक्निकल गोष्टी शोधायला सांगितल्या होत्या नंबर एक, नंबर दोन चाटे साहेब यांचे म्हणणे आहे की, मला उत्तरच दिलेले नाही. सर यादी तर आपण माझ्या कॅबिन मधुन झेरॉक्स करुन घेतलेली होती. या व्यतिरिक्त त्यांचे जे काही प्रश्न आहे त्यांचे उत्तर द्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** यादी ॲकच्युली मी मागीतली होती प्रभाग क्र.१३ ची. मला यादी मिळाली पुर्ण शहराची. ती यादी मोघमस्वरुपाची होती. तुम्ही माझे पत्र वाचा तुम्हाला लक्षात येईल. मी तुम्हाला जे पत्र दिले त्यानुसार मला माहिती मिळाली नाही. मी गेल्या महासभेत पण सांगितले की, त्याच्यावर आपण काय धोरण ठरविल काय कार्यवाही करणार ? कश्या पध्दतीने आपण वसुली करणार ? जी पण असेल कार्यवाही ? गुन्हे दाखल करणार का ? या संदर्भात, म्हणे येत्या महासभेमध्ये खुलासा देऊ. आता महासभा येऊन गेली तरी आपला कोणताही पत्र व्यवहार झाला नाही आमच्या पर्यंत. पुढे कार्यवाही कशी करणार आहे आपण त्याच्यावर.

**मा.आयुक्त :-** सर यामध्ये एकदा माहिती हातात आली की व्यवस्थीत सगळे ॲग्रीमेंट सोबत वगैरे घेऊन ॲग्रीमेंटसच्या पुर्ण कॉपी फाईल्स आतापर्यंत माझ्या समोर आलेल्या नाही. ती मी त्यांना शोधायला सांगितले आहे. मागची जी मिटींग झाली त्यानंतर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमची आयुक्त पदाची कार्यवेळ संपुन जाईल तोपर्यंत ती माहिती प्राप्त होणार नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, मला बोलायचे आहे. याच विषयावरती.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई,

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तुमच्या विषयाशी रिलेटेड विषय आहे. महापौर महोदया, आयुक्त मॅडम, जितुभाऊंनी जो विषय मागच्या महासभेत पण आणला होता. यावेळेस परत आलेला आहे. मागच्या वेळेला श्री.सुरेशदादांनी एक निर्णय घेतलेला होता. आणि या महासभेने एक निर्णय घेतलेला होता २००८ ला. आम्ही या सभागृहात असतांना ज्या शाळेला लागुन ओपन स्पेस असेल, त्या शाळेला ते ओपन स्पेस फस्ट प्रायरिटी आपण करुन द्यायचे. कसे आहे अमुक अमुक संस्थेला टार्गेट करुन हे विषय परत परत आणणे हे चुकीचे आहे. ते धोरण आपण ठरविलेले आहे त्या विद्यार्थ्यांच्या खेळासाठी ग्राऊंड उपलब्ध करुन देणे ही महापालिकेची पण जबाबदारी आहे. असे ही आपल्या ज्या ओपन स्पेस आहे लोकांना कचरा टाकण्यासाठी उपयोगात येतात. कुठेही ओपन स्पेस असला तर लोकं काय करतात आपलीच जागा, परंतु श्री.सुरेशदादांनी त्यावेळेला हे धोरण आणलेले होते. काही काही संस्थांना ही ओपन स्पेस शादी हॉल म्हणजे प्रत्येक बिरादरी जेवढे आहेत. त्यांना प्रोव्हाईड करण्यात आलेले होते. मंगल कार्यालय बनवुन दिलेले आहे ओपन स्पेसवरती. काही ओपनस्पेस वरती शाळा आहे. जशी माझ्या वार्डामधील ३६/५६ जळगांव मधील नंबर १ शाळा आहे.तेथे सर्वात जास्त पटसंख्या आहे. ओपन स्पेसवरती आहे. तेथे मुलतानी हॉस्पीटल आहे ओपन स्पेस वरती आहे. असे आपण एक धोरण केलेले होते. आपण नविन आहे आपल्याला मागचे माहित नसेल. परंतु आपल्या निदर्शनात आणुन देतो कोणत्याही संस्थेला शाळेला टार्गेट न करता,आपण जो निर्णय घेतलेला होता तो यांना समजुन सांगावे. बस ऐवढेच माझे म्हणणे आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.जितेंद्रभाऊ मराठे यांचे प्रश्नांचे उत्तरे तरी प्रशासनाने द्या ना. त्यांना जे काही व्यवसायीक वापर होत असेल त्यांची लिस्ट हवी असेल. आणि काही प्रश्न विचारलेले असतील.काही तरी तर उत्तर द्या. त्या संदर्भात काय कामकाज सुरु आहे. तुम्ही काय करत आहे त्या संदर्भात ते तरी द्या. त्यांना सांगा, लेखी द्या त्यांना तसे.

**मा.उपमहापौर :-** मालमत्ता अधिक्षक कोण आहे. ओपन स्पेस ज्या दिलेल्या आहे त्यांच्याकडे असेल ना डाटा. ज्या ज्या संस्थांना दिलेल्या आहे.

**मा.आयुक्त :-** नगररचना, नगररचना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ, जबाबदारीच समजत नाही कोणाकडे आहे. नितीनभाऊ आता मध्यस्थी कराल ना तर अशी करा की, पुढच्या वेळेस.

**मा.आयुक्त :-** भाऊ, बैठक झालेली आहे याच्यावर, कार्यवाही सुरु आहे. आपले जे प्रश्न आहे त्या प्रश्न उत्तरांचे काय आहे त्या संबंधी त्यावर कार्यवाही सुरु आहे याच्यामध्ये.

**श्री.जितेंद्र मराठे :-** परत परत तेच नका करु. या ठिकाणी तुम्हाला वेळ भरपुर मिळाला, दोन तीन महिन्याचा वेळ मिळाला, चार महिने झाले मी ही माहिती विचारत आहे.

**मा.आयुक्त :-** या मध्ये बैठकीमध्ये माहिती घेत असतांना असे लक्षात आले. २०१८-१९ ला जे ठराव सगळे रद्द केलेले होते. त्या ठरावांच्या अनुषंगाने कार्यवाह्या सुरु केलेल्या होत्या. तीच माहिती आपण कलेक्ट करतो आहे. त्यामुळे म्हटले मला वेळ लागेल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तरी किती दिवस सांगा.

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ म्हटले की, मॅडम तुमची कार्यवाही संपुन जाईल. टी.पी.मध्ये रेकॉर्ड सेक्टशनला डाटा ठेवलेला आहे तो सगळा. तो आपल्याला शोधायचा आहे. २०१८-१९ ला जसे ठराव रद्द केलेले आहे. तसे ते ठराव रद्द केलेले होते.

**श्री.धीरज सोनवणे :-** मॅडम, त्यांच्या सोबत काय अॅग्रीमेंट झाले होते त्याचा डाटा तुम्ही बघत आहात.

**मा.आयुक्त :-** हो.

**श्री.धीरज सोनवणे :-** पण आज त्याचे नियम अटीशर्ती काय आहे ते तर कोणालाही तोंडीपाट असतील ना. त्यांना देतांना काय काय नियम अटीशर्ती केलेल्या होत्या.

**मा.आयुक्त :-** जर आपल्याला त्यांनी नोटीस काढायला सांगितली तर कागद बघुन काढावी लागेल ना.

**श्री.धीरज सोनवणे :-** मग अॅकच्युअल साईटवर जाऊन बघा ना. त्याच्यावरुन लक्षात येणार आहे. त्यांना आपण १०%ची बांधकाम परवानगी दिली होती. तेथे आज किती टक्के बांधकाम आहे.त्याचा वापर काय ? ते बघुन बघुन तर करु शकता ना. अॅग्रीमेंट काढा, मग नोटीस काढेल हे मोघम स्वरूपाचे उत्तरे नका देऊ ना मॅडम. अधिकाऱ्यांना अॅकच्युअल साईटवर पाठवा. तेथील परिस्थिती बघा, त्या परिस्थितीनुसार त्यांना नोटीस तर द्या.

**मा.आयुक्त :-** साईट व्हिजीट करुन सर्व्हे करुन बेसिक डाटा आलेला आहे. परंतु जर नोटीस द्यायची आहे आपल्याला तर कायदेशीर नोटीस द्यावी लागेल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** कार्यवाही काय करणार आणि कधी पर्यंत कार्यवाही होईल.

**श्री.धीरज सोनवणे :-** सांगा १०% च्या वर जे बांधकाम असेल ते आम्ही पाडु, निष्कासीत करु किंवा तिथल्या स्थानिक नागरीकांच्या ताब्यामध्ये देऊ. काही तर उत्तर द्या मॅडम.

**मा.आयुक्त :-** कायदेशीर कार्यवाहीसाठी मला कायदे बघावे लागतील ना. कायद्यामध्ये काय काय अलाऊड आहे. कश्यानुसार देता येतील. ते सगळे रिपोर्ट घ्यावे लागतील. नेमकी काय कार्यवाही आणि कशी कार्यवाही कशी सांगता येईल बघितल्याशिवाय.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मॅडम, आता दोन तीन दिवसापहिले लोकमत पेपरने ही माहिती दिली. याच्यापुर्वी माझ्या माहितीनुसार दिव्यमराठी पेपरने ही माहिती दिली. जवळ जवळ दोन अडीच महिने झाले असतील. म्हणजे पेपर मध्ये सुध्दा ह्या बातम्या येऊन आमचे पत्र जाऊन जर कार्यवाह्याच होत नसेल तर कुठेतरी महापौरताई. शोकांतिका आहे ही.

**मा.आयुक्त :-** सर, कार्यवाही होईल ऐवढे मी अश्वस्त करेल.

**श्री.जितेंद्र मराठे :-** कधी पर्यंत.

**मा.महापौर :-** त्यांचे कामकाज सुरु आहे ना. सुरु आहे. त्यांचे कामकाज, फक्त कधी कमप्लीट होईल हे तर तेच सांगु शकतात ना. बरोबर आहे की नाही.

**श्री.जितेंद्र मराठे :-** मी त्यांनाच विचारत आहे कधी पर्यंत होईल पण.

**मा.आयुक्त :-** मी कार्यवाही होईल ऐवढे अश्वस्त करते तुम्हाला.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ. तुम्हीच पहा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जितुभाऊ मी काय म्हणतोय की याच्यामध्ये हस्तक्षेप न करता काय होते ते बघुन मग तो निर्णय घेऊ. कसे आहे मॅडम, सदस्य पण वारंवार सांगतात आणि जर कधी आपण निर्देश दिल्यानंतरही जर कधी खालचे अधिकारी या विषयाच्या अनुषंगाने गांभिर्याने त्याची दखल घेत नसेल. तर मला वाटते कुठेतरी कार्यपध्दतीमध्ये बदल करायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-**भाऊ आम्ही बसलो पण त्याला काही टेक्नीकली गोष्टी आहे. त्यासाठी वेळ लागणार आहे. म्हणुन तर मी सांगते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुम्हाला ही या विषयाचे गांभिर्य आहे. पुढच्या महासभेमध्ये अधिकाऱ्यांना माहिती द्यायला लावा. कुठेतरी त्यांना दोन तास जास्त काम करायला लावा.परंतु प्रशासनाकडे ती माहिती अपडेट असायला पाहिजे. काय होते. संपुर्ण सभागृहाचा वेळ वाया जातो या गोष्टीमुळे. आणि सदस्य ही नाराज होतात.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे एका महिन्याच्या आत कार्यवाही करते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, एक विषय होता. आपण ईच्छादेवी ते त्या डी-मार्टच्या पंपापर्यंत मोहाडी फाटयापर्यंत आता आपला रस्ता खुप छान झालेला आहे काँक्रीटीकरणामध्ये पण डी-मार्ट जवळ इतके भयंकर अतिक्रमण झ ालेले आहे. आपण शिरसोली कडे जात असतांना त्या साईडने. असे समजा तो २० फुटाचा रस्ता तो १० फुटावर येऊन गेलेला आहे अतिक्रमणामुळे. म्हणजे त्याच्या संदर्भात तेथे कडक कार्यवाही झालीच पाहिजे आणि ते उचलेले गेले पाहिजे.

**मा.महापौर :-** डी-मार्टच्या समोर.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अतिक्रमण नाही ते.  आपण जैन वाल्यांना दिले आहे ते.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नाही नाही भाऊ ते नाही. गाडया वगैरे लागेलेल्या आहे तेथे. आपण आदेश करुन द्या तेवढे.

**मा.महापौर :-** अतिक्रमण विभाग, एकदा बघुन घ्या तेथे काय अतिक्रमण आहे. त्यांना अगोदर नोटीसी द्या. आणि उचलुन घ्या. चला आता विषयपत्रिकेला सुरुवात करु.

**श्री.विष्णु भंगाळे :-** चला अजेंडा घ्या आता.

**श्री.प्रविण कोल्हे :-** महापौरताई, उपमहापौर साहेब,आयुक्त मॅडम, गट नंबर १७७ योगश्वर नगर, गणपती मंदिर तेथे रहिवाश्यांचा एक रस्ता बंद आहे. तो कमीत कमी ४ ते ५ वर्षापासुन आपल्या अतिक्रमणकडे, टी.पी.कडे चालु आहे. पण आतापर्यंत ती कार्यवाही कशी होत नाही. मॅडम ते प्लॉटधारक आले होते आता, तुम्ही काही तरी ७ दिवस सांगितले होते त्यांना अतिक्रमण कार्यवाहीसाठी. दोन वेळी संकीर्ण आदेश निघाले. पण तो आदेशच सापडला नाही आपले इंजिनिअर साहेबांना.

**मा.आयुक्त :-** काय रस्त्यावरचे अतिक्रमण आहे.

**नगरसचिव :-** संकीर्ण आदेश निघालेले आहे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** सन्मा.सदस्य, सन्मा.महापौर, नगररचना विभागामार्फत जेवढे अतिक्रमण काढायला सांगितले होते तेवढे अतिक्रमण आम्ही काढलेले आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** देशमुख आहे ना ते. ज्यांचे अतिक्रमण आहे ते.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** देशमुख नाही, पाटील आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** त्यांनी कोर्टात अपील केलेले होते . ते अपिल फेटाळण्यात आलेले आहे. आता टी.पी. वाल्यांनी उत्तर द्यावा. अजुन एक विषय आहे अतिक्रमणाचे अत्तरदेंची भिंत विना नोटीस देता पाडलेली आहे. अत्तरदे म्हणुन आहे त्यांची भिंत विना नोटीस देता पाडलेली आहे. तर विना नोटीस देता कशी पाडली आहे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** कुठे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** तिथेच ना. त्याला लागुनच आहे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** नाही भिंत नाही पाडली आपण त्याच्या जवळच्या ज्या टपऱ्या होत्या  त्या पाडल्या आहे आपण.

**श्री.प्रविण कोल्हे :-** विना नोटीसचे.

**श्री.उमाकांत नष्टे, अतिक्रमण अधिक्षक :-** नाही नगररचनाविभागाने त्यांना आदेश दिलेले आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** बरं ती नोटीस दाखवा आणि टी.पी.चे आदेश पण दाखवा.

**मा.महापौर :-** याची माहिती जी आहे भाऊंनी मागितलेली, ती अतिक्रमण विभागाने किंवा टी.पी.कडे असेल तर त्यांनी ती अवगत करुन द्यावी.

**श्री.प्रविण कोल्हे :-** अतिक्रमण वाल्यांनी जी माहिती मागविली किंवा टी.पी. वाल्यांनी आम्हाला आदेश द्यावेत आम्ही लगेच करून देवु.

**मा.महापौर :-** ठिक आहे.

**श्री.प्रविण कोल्हे :-** अतिक्रमण वाल्यांना ही माहित आहे.

**मा.महापौर :-** ठिक आहे ना. देतील ना ते. कोणाकडे काय आहे. तुम्ही बघा तपासुन घ्या दोन्ही डिपार्टमेंट मिळुन आणि ती माहिती त्यांना द्या.

**श्री.प्रविण कोल्हे :-** ५ वर्षापासुन फिरत आहे ते लोकं.

**मा.महापौर :-** ठिक आहे आपण बघु. आता विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करु या.

**नगरसचिव -विषय क्र.०१ :-** दि.३०/०५/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११५२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.३०/०५/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०२ :-** भुसंपादन प्रस्ताव क्र.२५४/२०१८ मौजे पिंप्राळा गट नं.६१/१ब या ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याकरीता प्रस्तावातील ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कम जमा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात जमिन मालकाला टी.डी.आर. ऑफर करण्याच्या संदर्भातली भुमिका प्रशासनाने स्विकारावी आणि आगाऊ मोबदला भरण्याच्या संदर्भात मान्यता देण्यात यावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौर महोदया, नितीनभाऊनी भुसंपादनाच्या संदर्भात मागे आपला ठराव झालेला आहे की, यांना टी.डी.आर. देण्यात यावा. तरी ही प्रशासन कोणत्या न कोणत्या मार्गाने हा विषय डॉकेटवर आणत असतो. नगररचना विभागाचा विषय असल्यामुळे मला बोलायचे आहे की, आपल्या शहरातील सामान्य जनता असेल, बिल्डर असेल आणि व्यापारी असतील. या नगररचना विभागावर अतिशय नाराज आहे. आणि नगररचना विभागात दलालांचा सुळसुळाट झालेला आहे. कोणतीही फाईल नगररचना विभागात गेली की, ती बातमी समोरच्याला कळते. नंतर तो व्यक्ती समोरच्या व्यक्तीला फोन लावतो आणि त्याच्याशी डिलींग करतो. आणि जो पर्यंत ती डिलींग होत नाही तो पर्यंत ती फाईल दाबली जाते. त्याला मंजुरी दिली जात नाही. आणि काही काही अनाधिकृत पण कामे होतात. काही दिवसापुर्वी रहदारीचा रस्ता आहे चांगला परिसर आहे. भरपुर रहदारीचा रस्ता आहे. एका कमर्शियल बिल्डींगला पार्किंग नसतांना सुध्दा कमप्लीशन देऊन टाकलेले आहे. आणि याच्यामध्ये खुप मोठा आर्थिक व्यवहार झालेला आहे. अशी पक्की माहिती माझ्याकडे आलेली आहे. म्हणुन या विषयावर मी बोलत आहे. याच्यामध्ये महापौर असतील, उपमहापौर असतील, आयुक्त महोदया असेल यांनी लक्ष घातले पाहिजे ना. तुम्ही बाकीच्या संदर्भात मिटींग घेतात या संदर्भात का नाही घेत नगररचनाच्या संदर्भात. माझ्या प्रभागातील माझ्या मित्राला सुध्दा, मी शेवटी तुम्हाला फोन केला मॅडम की ,

तुमच्याकडे ती फाईल आलेली आहे. त्याला सुध्दा अश्या पध्दतीने फिरविण्यात आलेले होते. तर हे कुठपर्यंत चालणार आहे असे. सामान्य जनता असेल, बिल्डर असेल, व्यापारी असतील तेही नाराज आहे. आपणच नियम तोडत आहे बनविणारे, पार्कींग नसतांना कॅमप्लीशन देतात, बांधकामची परवानगी देतात. मग नंतर ते अपार्टमेंट मध्ये राहायला येणारे लोक काय रस्त्यावर गाडया लावतील का ? याचे उत्तर द्या मॅडम.

**मा.आयुक्त :-** सर, या अनुषंगाने सगळ्या आर्किटेक्ट यांची बैठक घेतलेली होती आणि म्हणुनच आपण ऑनलाईन प्रणालीद्वारे प्रस्ताव घेण्याचे सुरु केले होते. पण त्या ऑनलाईन मध्ये काही टेक्नीकल त्रुटी आली म्हणुन आपल्याला ऑफलाईन कराव्या लागल्यात आणि आर्किटेक्ट पण म्हणतात की, ऑफलाईन घ्या.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सर्व काही ऑफलाईन करता येते ठिक आहे. सगळं मान्य आहे मला, पण आपल्या डिपार्टमेंट मधुन बातमी बाहेर जाते कशी. तुमच्या ऑफिसला ही सी.सी.टी.व्ही. कॅमेरे आहे, काय चालु आहे तेथे. मग आपल्या ऑफिस मधुन बातमी बाहेर जाते कशी काय ? बाहेर जाते, समोरच्या व्यक्तीला कॉल केले जातात. त्रास दिला जातो. हे कसे काय चालेल आणि कुठपर्यंत चालणार आहे. आता लोकांचेही फोन यायला लागले आहे. माझ्या प्रभागातील माझ्या मित्रालाही तशी मागणी करण्यात आली होती. शेवटी मग मला तुम्हाला फोन करावा लागतो. तर तुम्ही या संदर्भात एकदा निर्देश का नाही देतात की, अशी कोणतीही तक्रार यायला नको. कार्यवाही करण्यात येईल असे. आणि कोण आहे तेथे संबंधीत जे बाहेर बातम्या सांगतात. याच्यानंतर अजुन एक विषय आहे. आपल्या पिंप्राळयातील गट नं. १०९/१ आणि गट नं. १०९/२ जी जागा आहे. डी.पी.रोडची. हे मॅटर अजुन सद्या हायकोर्टात पेंडींग आहे. तरी त्यालाही मोबदला देण्याचे प्रयत्न चालु आहे.जो पर्यंत हायकोर्टाचा निकाल लागत नाही तो पर्यंत स्थगित ठेवा ना तो विषय. ठिक आहे हायकोर्टाचा निकाल लागल्यानंतर तुम्ही द्या. पण आता इतकी घाई का करत आहे. १०९/१ आणि १०९/२ करीता.

**मा.आयुक्त :-** तुम्ही त्या दिवशी फोन केलेला होता ते का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** नाही, मागे मी उपमहापौर असतांना अर्ज दिलेला होता आयुक्तांना, त्यावेळेला हा विषय समोर आलेला होता आणि सदरचे मॅटर आता हायकोर्टात पेंडींग आहे ना अजुन त्याचा जो ही निकाल लागेल तो मान्य आहे. पण आताच त्याची घाई का ? एवढे करोडोने पैसे देण्याची काय घाई झालेली आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपण धोरण ठरविलेले आहे ना. टी.डी.आर.घेतले तर द्यायचे नाही तर नाही द्यायचे.

**मा.आयुक्त :-** त्याच्या डिटेल्स सांगा, शासनाकडुन ते मान्य होऊन आलेले आहे. हे जे सांगत आहे पिंप्राळा गट नं.१०९/१ व १०९/२

**श्री.अश्विन सोनवणे :-** तो डी.पी.रोडच आहे मॅडम, त्या डी.पी.रोडचा मोबदला देण्याचे अजुन तो विषय हायकोर्टात पेंडींग आहे. हायकोर्टात निकाल लागल्यानंतर द्या तुम्ही मोबदला पण आताच काय इतकी घाई लागली आहे. इतके करोडोने पैसे द्यायचे आहे. समजा हायकोर्टाचे आपल्या बाजुने निकाल लागले, आपण टी.डी.आर. चा ठराव अजुन केलेला आहे. त्याच्यानंतर तुम्ही लोकं बिल्डींग प्लॅन चेक करत नाही, पार्कींग आहे की ना ते चेक करत नाही. अनाधिकृत रित्यांनी परवानग्या मिळुन जातात. पार्कींग नसतांना कमप्लीशन देतात. काय चालले का आहे. मॅडम तुम्ही चौकशी करा, कोण आहे ते बाहेर बातमी पुरविणारे. लोकांना वेठीस धरले जाते ना. याच्यात सगळयांचे नांव बदनाम होत आहे आपले, आमचेही नांवे बदनाम होतात.

**मा.महापौर :-** यात खरोखर लोकप्रतिनिधी किंवा महापौर, उपमहापौर याच्याशी काहीच संबंध नसतो. ही सर्व अधिकारी टु अधिकारी फाईल फिरते. आयुक्त मॅडमांच्या सहीने होतो तो सगळा विषय. आपल्याला तर हे ही माहित नसत की, कुठली फाईल कोणाचे कमप्लीशन, दिले नाही दिले. आपले काय संबंध आहे.

**श्री. अश्विन सोनवणे :-** हायकोर्टाचे मॅटर आपले पेंडींग आहे, ते का घाई करत आहे.थांबा ना. जो ही निकाल लागेल आम्हाला मान्य आहे. जर आपल्या बाजुने निकाल लागला तर ते करोडोचे पैसे गेले आपले.

**मा.उपमहापौर :-** त्याला कॉमपेन्सेशन देऊन कोणते ते आपल्या ताब्यात भेटणार आहे. तो ३० मिटर रस्ता बनवायला आपल्याकडे फंड नाही. ते रस्ता बनवायला आपल्याकडे फंड नाही, रहदारी नाही, कॉमपेन्सेशन दिल्यानंतर त्याला पुढे ताब्यात पण घेणार की नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा ठराव येतो कसा काय परत परत ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगररचनाच्या बाबतीत जे आहे ना मॅडम संपुर्ण जळगांव शहर मध्ये नगररचना विभाग हा अत्यंत बदनाम झालेला विभाग आहे. खरं अर्थात अश्विनभाऊ म्हणत आहे तशीच परिस्थिती आहे. तेथे दलालांचा सुळसुळाट झालेला आहे. मला सांगा कोणीही जातो आणि आपल्या फाईल उचलतो. आणि त्या फाईली पाहायला लागतो. प्रशासनाचा त्याच्या वरती काय अंकुश आहे. असे अनवान्टेड लोकांना एन्ट्री कश्या पध्दतीने मिळते. म्हणजे हि अत्यंत गंभिर बाब आहे ना. प्रशासन म्हणुन ज्या पध्दतीने एखादा लॅन्डलॉर्ड येत असेल ती गोष्ट वेगळी आहे. परंतु अश्या पध्दतीने दलालांचा आड्डा झाला असे म्हटले तरी चालेल.आणि जे अश्विनभाऊ म्हणत आहे ती वस्तुस्थिती आहे की, अश्या पध्दतीने जमिन मालकाला फोन जातो. जमिन मालकाला फोन गेल्यानंतर तुमचा ले आऊट मंजुरीला आलेला आहे. तुमचा बिल्डींग प्लॅन मंजुरीला आलेला आहे. तुमचा कमप्लीशन भोगवटा प्रमाणपत्रासाठी तुमची फाईल आलेली आहे. या संदर्भात काय करायचे. म्हणजे हे काय प्रकार काय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** आणि मोठया प्रमाणात पैसे मागितले जातात ना. बदनाम तर अधिकारी होतात, आपणही होतात सर्वे होतात ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामुळे महापालिका बदनाम होते. याच्याने काय होत संपुर्ण लोकप्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर सुध्दा प्रश्नचिन्ह निर्माण होते. असे वाटते की, हे सगळे निरंकुशपणे चाललेले आहे. याच्यामध्ये पदाधिकाऱ्यांची सुध्दा इनव्हालमेंट आहे का ? अश्या पध्दतीने चित्र समोर राखले जाते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कडक निर्देश द्या त्यांना की, बाहेर बातमी जायला नको.

**मा.आयुक्त :-** ऑनलाईन परमिशन हा एक चांगला ऑपशन आहे त्याला, डायरेक्टली प्रस्ताव आयुक्तापर्यंत, तेथुन स्क्रुटनी होऊन जाते. रिपोर्ट दिसतो.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** मॅडम, आता ऑनलाईनबाबत दोन दिवसापुर्वीची बातमी आहे की, चालत नाही सर्व.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऑनलाईनच्या संदर्भात एक बिल्डींग परमिशन जी दिली गेली, ज्याच्या संदर्भात आता अश्विनभाऊ बोलत आहे. चुकीच्या पध्दतीने विदाऊट पार्कीगची परमिशन दिली गेलेली आहे. एकही वाहनाचे पार्कीग सोडलेले नाही. मग आता या ऑनलाईनवर काय ट्रस्ट करायच.

**मा.उपमहापौर :-** ऑनलाईन परमिशन देण्याचा पण एक स्टॅण्डर्ड फॉरमेट आहे. ऑनलाईन पध्दतीने यांची परवानगी दिल्यानंतर पण प्रत्येक्ष त्या जागेवर बांधकाम पुर्ण झाल मुळात विषय तेथुन सुरु होतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु कुलभुषणभाऊ तुम्ही जे म्हणत आहात ना, तुमचा मुद्दा हा वेगळा आहे. जेव्हा ऑनलाईन बिल्डींग परमीशनला काही नॉर्मस असतील. जी काही कमांड दिलेली असेल, त्याच्यानंतर ही ऑनलाईनची परमिशन ही चुकीने दिली गेलेली आहे. आणि चुकीने दिलेली परमिशन मध्ये कुठेही कमर्शियल वास्तुला, जी शहराच्या अत्यंत मौक्याच्या जागेवरती आहे. अत्यंत रहदारीच्या रस्त्यावरती आहे आणि कुठच पार्किंग न सोडता, ती बिल्डींग परमिशन सँक्शन झालेली आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** म्हणजे ते जागेवर गेलेच नसतील ना पाहायला, जरी ऑनलाईन प्लॅन आला, तर टाऊन प्लॉनिंगच्या अधिकाऱ्यांनी तेथे जायला पाहिजे की, कायद्यानुसार आहे का हे की, बस बसल्या बसल्या.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ऑनलाईन परमिशन समजा दिली गेलेली आहे. परंतु ऑनलाईन परमिशन ही सुध्दा वेरिफाय करण्याची जबाबदारी संबंधीत अधिकाऱ्याची आहे. एखाद्या वेळेला तो कमप्युटर किंवा ती ऑनलाईन सिस्टीम कुठे करप्ट झाली असेल, आणि ती चुकीची परवानगी देत असेल, परंतु ज्या वेळेला जो कोणी अधिकारी त्या ऑनलाईन बिल्डींग परमिशनवर सिगनिचर करत असेल, त्याची खात्री पटवण्याची जबाबदारी त्याची आहे की, ही बिल्डींग परमिशन जी आहे ती नियमानुसार दिसत नाही. त्याने त्याची फेरस्क्रुटनी करणे आणि नंतरच सही करणे आवश्यक आहे. म्हणजे कुठेतरी सिस्टीमही करप्ट होत आहे आणि आपला कर्मचारी किंवा अधिकारी असेल तो ही करप्ट होत आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ, काही दिवसापुर्वी आपल्या महापालिकेच्या समोर ॲक्सीडेन्ट झाला, त्यासंदर्भात मी अर्ज दिला, आणि हा जो आपला शहराचा मेन रस्ता आहे. येथे पार्कीग लागते, बोर्ड लागतात, अतिक्रमण त्यांचे आहे

त्याच्यामुळे ॲक्सीडेन्ट होत आहे. आता आपला जो महापालिकेचा टर्न आहे. महापालिकेसमोरील जागाही, त्या पार्कींगचे रस्त्यावर येणे, बोर्ड रस्त्यावर येणे, अतिक्रमण होणे, आणि त्याच्याबाबत माहिती असुन सुध्दा जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणे, मग आपण संबंधीत अधिकाऱ्यांवर सदरील मनुष्य वारला तर काय सांगतो आहे. जी व्यक्ती वारलेली आहे. त्यांनी पार्कींगला जागा नाही. पार्किंग रस्त्यावर येणार आहे. तुम्ही महानगरपालिका प्रशासन म्हणुन हे सगळे जे रस्ते आहे मेन नो-पार्कींग झोन डिक्लेअर करुन टाका, ही सर्व पार्कींगला जागा नाही. तुम्ही एकदा परवानगी दिली की, या रस्त्यावर बोर्ड, टु व्हीलर, फोर व्हीलर अलाऊड नाही. तर नागरीक डायरेक्ट येतील. जर मला महापालिका चौकात काम आहे, मला माहित आहे की, येथे गाडी लावायला जागा नाही. मी पाई येईन, मी कसाही येईन. पण जाणीवपुवर्क जर दुर्लक्ष झाले असेल, मी मागे ही सांगितले पुन्हा सांगतो, एखादा अपघात पुन्हा होण्याची वाट पाहु नका. असा अपघात झाला, मी व्यैयक्ति रित्या सर्वोच्च न्यायालयात गुन्हा संबंधीत अधिकाऱ्यांवर/ प्रशासनावर गुन्हा दाखल करेल. याची नोंद घेण्यात यावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मॅडम नगररचना विभागाची चौकशी व्हायला पाहिजे. चौकशी काय कार्यवाही पण व्हायला पाहिजे. लोक खुप नाराज आहे मॅडम आम्हाला बोलवुन दाखवतात.

**मा.आयुक्त :-** चालेल, याची चौकशी करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. मोबदल्याच्या ऐवजी टी.डी.आर.ची ऑफर संबंधीत जमीन मालकाला करण्यात यावी. मोबदला अदायगीचा प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनेची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. मोबदला रद्द करुन त्या ऐवजी टी.डी.आर. देण्यासंदर्भात संबंधीतांनी कार्यवाही करण्यात यावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** महापौरताई, मी जो विषय बोललो, त्याची पण चौकशी होऊन कार्यवाही करण्यात यावी.

**मा.महापौर :-** विषय क्र.२ सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे. आणि सन्मा.सदस्य अश्विनभाऊंनी दिलेल्या सुचनेनुसार कोणत्याही बिल्डींगला पार्कींगची परवानगी न देता कमप्लीशन दिलेले आहे याची प्रशासनाने कार्यवाही करावी. बघावे आणि नगररचनेमध्ये जर असे प्रकार घडत असतील, तर मला वाटते आयुक्त मॅडमांनी अधिकाऱ्यांना याबाबत योग्य त्या सुचना देऊन योग्य ती कार्यवाही करुन चौकशी करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११५३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहातील चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे भुसंपादन प्रस्ताव क्र.२५४/२०१८ मौजे पिंप्राळा गट नं.६१/१ब या ३०.०० मी रुंद विकास योजना रस्त्याकरीता प्रस्तावातील ५० टक्के आगाऊ मोबदला रक्कम जमा करणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. प्रस्तावातील जमिन मालक यांना ५० टक्के आगाऊ मोबदला देण्यात येवू नये त्याऐवजी विकास योजना रस्त्याने बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात जमिन मालक यांना टी.डी.आर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५३**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०३ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शहरातील विकास कामे शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव मार्फत करण्या बाबत ०१ ते १० कामे करण्याकरीता ना हरकत दाखला देण्याकरीता महासभा ठराव क्रं.९८७ दि.१५/०२/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्याऐवजी शासन शुध्दीपत्रकानुसार मान्यता दिलेल्या ०१ ते १३ कामांना ना-हरकत दाखला देण्याबाबत मान्यता होणे असा बदल मंजुर ठरावात होण्यास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बदल करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये माझी एक सुचना आहे. संबंधीत या प्रस्तावामध्ये सुचीपत्रिकानुसार अं.क्र.६ चे जे काम आहे. ते प्रभाग क्र.१६ मध्ये येत नसुन तो प्रभाग क्र.०९ मध्ये येतो. प्रभाग क्र.०९ अंतर्गत मानवसेवा शाळेपासुन ते अष्टभुजा गेट तो रस्ता १२ मिटर रस्ता हा डांबरीकरण करणे ही सुधारणा करुन घ्यायची आहे. दुसरा विषय याच्यामध्ये असा आहे की, हा सदरील रस्ता शहर विकास योजनेत होऊन १२ मिटरचा झालेला आहे. पण आज प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन पाहणी केली तर सदरील रस्ता कुठे ६ मिटर कुठे ८ मिटर कुठे ९ मिटर भरतो. प्रत्यक्षात हा रस्ता १२ मिटरचा नाही. तरी काम सुरु करण्यापुर्वी रस्त्याचे इस्टीमेट बनविण्यापुर्वी त्या ठिकाणी संबंधीत अधिकाऱ्यांनी जाऊन पाहणी केलेली होती व त्या मालमत्ता धारकांना सुचना देखील देण्यात आलेल्या होत्या. परंतु त्या कुठल्याच सुचनांचे पालन न करता आजही त्या ठिकाणी रस्त्याचे काम सुरु पण झालेले आहे. तर माझी प्रशासनाला विनंती आहे. त्या ठिकाणी तो रस्ता आहे आज अस्तीत्वात तितका न करता जो शहर विकास योजनेत बाधीत झालेला असेल. त्या ठिकाणी त्या रुंदीचा रस्ता झाला पाहिजे. याची महानगरपालिका प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करायची आहे व त्या अनुषंगाने ज्या संबंधीत अधिकाऱ्याकडुन या रस्त्यांची कामे हाती घेण्यात आलेले असेल. त्या संबंधीत प्राधिकरणाला संबंधीत रस्त्याबाबत तश्या सुचना करुन आपल्या महानगरपालिकेकडुन काही पत्र द्यायचे आहे की, तो १२ मिटरचा रस्ता करण्यात यावा. आणि आता सगळे मुलभुत सुखसुविधांचे जे रस्ते आहे आणि सी.सी.चे रस्ते असतील. त्यामध्ये ज्या अटीशर्ती आपण १०० कोटीच्या ८५ कोटीच्या रस्त्याच्या कामांमध्ये टाकलेले आहे. त्या अटीशर्तीने सदरील रस्त्यांचे कामे हातात घेण्यात यावी व सदरील विषयास माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ आणि कुलभुषणभाऊ यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी आणि तश्या पध्दतीची ठरावात नोंद करुन घ्यावी. विषय क्र.०३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११५४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(११२)/न.वि.-१६ दि.२१ डिसेंबर २०२२ अन्वये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकासासाठी विशेष तरतुद योजना अंतर्गत रक्कम रु.१०.०० कोटी (लेखा शिर्ष-४२१७०५४१) अन्वये खालील विवरण पत्रानुसार कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.११ अंतर्गत नेहरु नगर गट क्रं.१४६ मधील श्री.दिपक सोनवणे यांच्या घरापासुन ते वाघ नगर पर्यंत मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| २ | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत महाबळ चौक ते संत गाडगेबाबा चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २६०.०० |
| ३ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गणपती मंदिर शिक्षक कॉलनी परमार्थ नगर ते शिंदे आव्हाने रस्त्यापर्यंत, आर कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ४ | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत मानवसेवा शाळेपासुन ते अष्टभुजा गेट शिवरस्ता १२ मीटर रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ५ | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत राठी शाळेपासुन ते सिंधी कॉलनीपर्यंत (टि.पाईट) रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ६ | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत श्री.गणेश डोळे ते श्री.गोपाल विलास सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९०.०० |
| ७ | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत संत चौखामेळा ते राठी शाळेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| ८ | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत पंचमुखी हनुमान मंदिरापासुन ते नानीबाई हॉस्पीटल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८०.०० |
| ९ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर मधील माऊली नगर येथील रस्ते डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| १० | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत मायादेवी नगर गेट पासुन ते राटरी हॉल श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६०.०० |
| | एकुण रक्कम रु.:- | १०००.०० |

सदरहु रस्ते मनपा हद्दीमध्ये असल्यामुळे शासन निर्णय क्रमांक मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(११२)/न.वि.-१६ दि.२१ डिसेंबर २०२२ अन्वये कार्यान्वयन यंत्रणा सार्व.बांधकाम विभाग,जळगांव असल्याने प्रस्तुत विकास कामे सार्व.बांधकाम विभाग,जळगांव यांच्या मार्फत करण्यात येणार असल्याने उक्त ०१ ते १० कामांना मनपा सर्वसाधारण सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने सदर कामांना महानगरपालिका महासभेची मंजुरी होण्याकरीता प्रस्ताव दि.१५/०२/२०२३ चे होणाऱ्या बैठकीत विषय पटलावर घेण्यात आलेला आहे. परंतु शासनाने शासन शुध्दीपत्रक क्रं. मनपा-२०२२/प्र.क्र.२३६(११२)/न.वि.-१६ दि.२८ डिसेंबर २०२२ पारित करण्यात आलेला आहे. त्यात वर नमुद शासन निर्णया नुसार मान्यता प्रदान केलेल्या ०१ ते १० कामांना कार्यादेश दिलेला नसल्यास ते रद्द करुन त्या ऐवजी खाली नमुद कामांना मान्यता देण्यात येत असल्याबाबत सुचित केलेले आहे. त्यानुसार वर नमुद शासन निर्णयातील ०१ ते १० कामांऐवजी शासन शुध्दीपत्रकानुसार मान्यता दिलेल्या ०१ ते १३ कामांना महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

**तक्ता - "ब"**

| अ.क्रं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.११ अंतर्गत नेहरु नगर गट क्रं.१४६ मधील श्री.दिपक सोनवणे यांच्या घरापासुन ते वाघ नगर पर्यंत मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| २ | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत संत गाडगेबाबा चौक ते रायसोनी नगर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | १००.०० |
| ३ | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत चंद्रलोक अपार्टमेंट ते मोहाडी रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८१.०० |
| ४ | प्रभाग क्रं. अंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडिया ते मोहाडी रोड पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६१.५० |
| ५ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गणपती मंदिर शिक्षक कॉलनी परमार्थ नगर ते शिंदे आव्हाने रस्त्यापर्यंत, आर कॉलनी रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ६ | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत मानवसेवा शाळेपासुन ते अष्टभुजा गेट शिवरस्ता १२ मीटर रस्ता डांबरीकरण करणे. | १२०.०० |
| ७ | प्रभाग क्रं.१३ अंतर्गत महाबळ चौक ते संत गाडगेबाबा चौक पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | २६०.०० |
| ८ | प्रभाग क्रं.०३ अंतर्गत श्री.गणेश डोळे ते श्री.गोपाल विलास सोनवणे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ९०.०० |
| ९ | प्रभाग क्रं.१६ अंतर्गत संत चौखामेळा ते राठी शाळेपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| १० | प्रभाग क्रं.०६ अंतर्गत पंचमुखी हनुमान मंदिरापासुन ते नानीबाई हॉस्पीटल पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८०.०० |
| ११ | प्रभाग क्रं.०७ अंतर्गत आशाबाबा नगर मधील माऊली नगर येथील रस्ते डांबरीकरण करणे. | ५०.०० |
| १२ | प्रभाग क्रं.१२ अंतर्गत मायादेवी नगर गेट पासुन ते राटरी हॉल श्री.चव्हाण यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ६०.०० |
| १३ | प्रभाग क्रं.०५ आणि ०६ अंतर्गत शाहु नगर येथील श्री.रहीम तडवी यांच्या घरापासुन ते फारुक मेंबर यांच्या घरापर्यंत रस्ता तयार करणे. | १७.५० |
| | एकुण रक्कम रु.:- | १०००.०० |

वर नमुद तक्ता- "अ" मधिल ०१ ते १० कामांचा प्रस्ताव मान्यतेकरीता महासभेपुढे सादर करण्यात आला असता महासभा ठराव क्रं.९८७ दि.१५/०२/२०२३ अन्वये तक्ता- "अ" मधिल कामांना मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु वर नमुद शासन शुध्दीपत्रकानुसार सदर ठरावात सुधारणा करणे आवश्यक असल्याने तक्ता- "अ" मधील अ.नं.१ ते १० कामांऐवजी तक्ता- "ब" मधिल ०१ ते १३ कामांना तसेच सदरचे कामे सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव यांच्या कडुन करणेबाबत ना हरकत दाखला देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे उपरोक्त तक्ता- "ब" मधिल अ.नं.०६ मध्ये नमूद केलेले काम हे प्रभाग क्रमांक-१६ मध्ये येत नसुन ते प्रभाग क्र.०९ मध्ये येत असल्याने

सदरचे काम प्रभाग क्रमांक १६ ऐवजी प्रभाग क्रमांक ०९ असे नमूद करणेस तसेच सदरचा रस्ता हा शहर विकास योजनेत १२ मीटर झालेला आहे परंतू आज प्रत्यक्ष त्याठिकाणी सदर रस्ता कुठे ६ मिटर, कुठे ८ मिटर, कुठे ९ मिटर भरतो प्रत्यक्षात हा रस्ता १२ मिटरचा नाही म्हणून त्या ठिकाणी जो रस्ता आज अस्तीत्वात आहे तितका न करता जो शहर विकास योजनेत बाधीत झालेला असेल त्या ठिकाणी त्या रुंदीचा रस्ता झाला पाहीजे. त्याअनुषंगाने त्या संबंधीत प्राधिकरणाला संबंधीत रस्त्याबाबत तश्या सुचना करुन संबंधीत प्राधिकरणास पत्र देवून सदर रस्ता १२ मीटर करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ५३**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०४ :-** मेहरुण स.नं.४८३/२ मधील जागा रामानंद पोलिस स्टेशन करीता उपलब्ध करुन देणेबाबत १)मा.पोलिस अधिक्षक यांचेकडील पत्र जा.क्र./३१७/सी.बी-४/रामानंद नगर पो.स्टे.जागा मागणी/२०२२/७६०२ दि.३०/०९/२०२२, २)मा.महापौर यांचेकडील पत्र/मका/२१ दि.२३/०५/२०२३ नूसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- सदरहु प्रस्ताव मान्य केल्यानंतर यामध्ये साधारणत: दोन ते तिन मुद्दयांचा उहापोह होणे गरजेचे वाटत की सदरहु जागेच्या संदर्भात धुडकु तुकाराम भारंबे हे मयत झालेले आहेत. त्यांच्यातर्फे वारस गजानन धुडकु भारंबे यांनी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख विभाग यांचे कार्यालयात व नगर भुमापन यांचेकडेस ४८१/२०२२ यांचेकडे मौजे जळगांव, जिल्हा.जळगांव मधील सिटी सर्वे नं. ६७८९ च्या जागेबाबत अपिल अर्ज दाखल केलेला आहे. सदर सिटी सर्वे नं. हा ६७८९ याबाबत सदर मिळकतीच्या मालकी हक्काबाबत दिसुन आलेले आहे. तसेच सदरील अर्जदार यांची सुनावणी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख विभाग, जळगांव यांचेकडे सद्यस्थितीत सुरू असुन याबाबत पुढील सुनावणी दि.२०/०६/२०२३ रोजी आणि त्याच्या नंतरची सुनावणी दि.१९/०७/२०२३ रोजी ठेवण्यात आलेली आहे. म्हणजे याच्यासंदर्भात काय झालेले आहे की त्यांनी याच्यात टॉयलेटचा वाद कुठेतरी उपस्थित केलेला आहे आणि टॉयलेटचा वाद उपस्थित केल्यानंतर त्याचा निवाडा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत ही जागा आपण अलोकेट करण योग्य होईल का नाही ? हा एक विषय आहे. दुसरा विषय हा आहे की सदरहु जागा जी आहे ही आपल्या महानगरपालिकेच्या पाईपलाईनसाठी आरक्षित होती आणि या जागेतुन आता सुध्दा महानगरपालिकेच्या अनेक पाईपलाईन या जागेच्या खालुन गेलेल्या आहेत. उद्या जर का बांधकाम करण्याच्या संदर्भात जर का प्रस्ताव आला तर त्या ठिकाणी आपल्या पाईपलाईन अफेक्टीट होतील. हा एक मुद्दा , तिसरा मुद्दा की सदरहु जागेचा न्यायालयीन वाद मिटल्यानंतर आणि हि जागा जर का महानगरपालिकेच्या मालकीची नसली आणि खाजगी मालमत्ता महानगरपालिकेची असल्यानंतर आणि अशा पध्दतीने निर्णय घेणे योग्य होईल का ? कारण सेक्शन ७९ हा ॲप्लीकेबल होईल की, महापालिकेच्या कुठल्याही मालमत्तेचा विनियोग करतांना भाड्याने देणे , मालकी हक्काने देणे, लिजने देणे यासंदर्भात जाहिर लिलाव करणे हे कायदेशीर होईल असे सेक्शन ७९ म्हणतो. तर या अनुषंगाने या सर्व बाबींचा विचार करून योग्य तो निर्णय घ्यावा. म्हणजे याच्यासंदर्भात अजुन कोणाला काही चर्चा करायची असेल आणि त्या चर्चेअंती जो काही सभागृहात झालेल्या चर्चेनुसार निर्णय होणे अपेक्षित आहे.

**मा.महापौर** :- या बाबत त्या जागेच्या उताऱ्यावर महानगरपालिकेचे नाव आहे. आज रोजी जरी आपण उतारा काढला तर त्यावर महापालिकेचे नांव आहे.याबाबत मला वाटते आपण सांगु शकतात की, आपण ही जागा देवु शकतो की नाही देवु शकत. कायद्याने सुव्यवस्थाच्या दृष्टीने जर विचार केला तर मला.

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- आपण जर याचा विचार केला तर आणि नितीनभाऊ जे म्हणत आहेत तर त्यानुसार हे बरोबर नाहीये कारण की टायटल नाहीये तर ते बरोबर म्हणत आहेत आणि तो निर्णय आल्यानंतर आपण घेवु

**मा.उपमहापौर** :- टायटल क्लियर झाल्यावर आपल्याला देता येईल का?

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- हो आपल्याला देता येईल.

**मा.उपमहापौर** :- टायटल क्लियर झाल्यावर निर्णय घ्या. आपला कायदा काय म्हणतो ते सांगा ते विचारत आहेत मी तुम्हाला सांगा.

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- उपमहापौर साहेब याच्यात आपल्याला काहीच अडचण नाहीये परंतू जोपर्यंत निर्णय होत नाही तोपर्यंत देऊ शकत नाही.

**मा.महापौर** :- नाही पण आता आपले त्यावर नाव आहे ना त्या उताऱ्यावर.

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- आपण आज रोजी उताऱ्यावर आपले नांव आहे ना. ७/१२ आपला महापालिकेचा आहे.

**मा.महापौर** :- कारण कायदा आणि सुव्यवस्थेचा विषय आहे कारण मला वाटत की रामानंद नगर आणि हरिविठ्ठल नगर बराच स्लम ऐरिया आहे. त्या ठिकाणी काही घटना घडतच असतात तर आपण या अनुषंगाने सगळ्यांनी हा विचार करावा.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई

**मा.महापौर** :- हो ताई बोला.

**सौ.उज्वला बेंडाळे** :- महापौरताई , जस नितीनभाऊंनी म्हंटल की त्याजागेवर महापालिकेची पाईपलाईन आहेत आणि बांधकाम होईल या सगळ्या गोष्टी मान्य आहेत. पण त्या पाईपलाईन आपल्या कुठल्याही उपयोगाच्या नाहीयेत आणि त्या जागेत कुठलेही कार्यालय नाहीये आणि मला वाटत त्या भागात अमृत योजना चालु झाली आहे. त्याच्यामुळे या भविष्यात चालु होती अशी काही शक्यता दिसुन येत नाही आणि कायदा आणि सुव्यवस्था हि आपली महापालिकेची पण जबाबदारी आहे. प्रत्येक ठिकाणी आपण जर कमर्शियल विचार करत गेलो तर कायदा आणि सुव्यवस्था आपल्याला बाजुला ठेवावी लागेल. जे काही घडत आहे ते घडु द्या आणि आपण फक्त बघत रहा अशी भुमिका आपण घ्या. प्रत्येक ठिकाणी जर असे म्हणत गेलो आपण तर ते योग्य होणार नाही आणि अशा इतर बऱ्याच ठिकाणी जागा आहेत ना या महापालिकेच्या त्या पण इतर दिलेल्या आहेच ना, मग त्या जर देवु शकतो तर आताच का अडचण असावी हा माझा एक प्रश्न आहे आणि कायदा आणि सुव्यवस्थेच्या दृष्टीने योग्य तो निर्णय व्हावा आणि भारतीय जनता पार्टीचा याला पुर्ण पाठींबा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- पण अशा पध्दतीने महानगरपालिकेच्या मालकीच्या इमारती सेक्शन ७९ वाचलेले आहे का आपण मॅडम, काय म्हणतो सेक्शन ७९ ?

**मा.आयुक्त :-** अजुन पहिल्यांदा द्यायचे की नाही हा मुद्दा आहे. मग पुढची प्रोसिजर सुरु होईल. अजुन त्याच्यात दर नाही फिक्स केलेले आहे आपण.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** रेडी रेक्नर प्रमाणेच देणार ना आपण आणि त्यांनी काही फुकट मागितलेली नाही. रु१/- मासिक भाडे दर त्यानुसार आपल्याला द्यायची होती.

**श्री.नितीन लढ्ढा** :- टायटलच्या वादाच्या संदर्भात मला वाटते, समीर बोरोले आहे का येथे ?

**मा.आयुक्त :-** समीर बोरोले नाही आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण याच्या संदर्भात सचिन भोळे, या जमिनच्या व्यवसायातले तज्ञ आहे. ते स्वत: या गोष्टीचा पाठपुरावा करत आहे. त्यांनी समीरला सांगितले आणि ज्या वेळेला हा प्रस्ताव आला, तर याच्या टायटलच्या संदर्भात मी माहिती विचारली की, ही महानगरपालिकेची ओपनस्पेस आहे की, ही महानगरपालिकेची स्वत:ची मालमत्ता आहे.
तर मग समीर बोरोलेंनी त्याच्या संदर्भातील माहिती उपलब्ध करून दिली की यासंदर्भातील असा -असा वाद आहे. या जमिन मालकाकडुन हि जागा भुसंपादन त्यावेळेला केलेली होती. परंतू त्याला कुठल्याही प्रकारचा भुसंपादनाचा मोबदला अद्यापपावेतो अदा झालेला नाही आणि अशा संदर्भातील काही दस्ताऐवज आपल्या दप्तरी आहे म्हणजे यासंदर्भातील काहीही निर्णय घेतांना टायटलच्या संदर्भातला भाग अजुन प्रलंबीत आहे. मला वाटते की, एकदा टायटल हा विषय क्लियर होवुन जायला पाहीजे, जी मालमत्ता जरी आपलीच नसेल. जरी आज उताऱ्यावर नाव असेल आपले.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीनभाऊ , आपण पाईपलाईन कश्या टाकल्या होत्या त्याच्यावर, कोणत्या अधिकाराने टाकल्या होत्या आपण, जर आपल्या नावावर नाहीच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ताई, ज्यावेळेला आपण या जागेचा भंसंपादनाचा प्रस्ताव झालेला होता ना आणि भुसंपादनाचा प्रस्ताव झाल्यानंतर, आता काय झालय जस की खेडीचे ओपनस्पेसच म्हणतोय, शिवाजी नगरच्या हुडकोचा मोबदला आपण अदा केलेला होता. खाजगी वाटाघाटीने आपण ती जागा आपण ताब्यात घेवुन घेतली, आपण त्यांना ३ लाख रूपयांप्रमाणे प्रती एकर मोबदला दिलाही आणि नंतर काय झाल की सदरहु जागेचे खरेदीखत झालेले नव्हते. त्या जागांवर आपल्या घरकुलच्या योजना उभ्या राहुन गेल्या आणि गेल्या १२ वर्षानंतर जमीन मालकाने सदरहु जमीनमालकाने भुसंपादनाची प्रक्रीयापुर्ण न करता ती महानगरपालिकेने प्रती एकरी ३ लाख रूपये जो पैसा दिला होता तो फक्त बयाणा रक्कम दिलेली होती. अस करून त्याचे साधारणत: १४ कोटी रूपये भुसंपादनाचा मोबदला आपल्याला अदा करावा लागला. जर कधी या जागेच्या बाबतीतही अशा पध्दतीने आपण जर निर्णय घेतला आणि भविष्यात जर मालक कोर्टात गेला आणि त्या अनुषंगाने जर कधी त्याने त्या जागेचा मोबदला मागीतला म्हणजे आपल्याकडे असलेली जागा आपण विनामुल्य द्यायची

आणि तिथे पोलिस स्टेशनची उभारणी झाल्यानंतर त्याने जागेचा मोबदलाकरीता महानगरपालिकेवर क्लेम करायचा आणि त्यामुळे कोट्यावधी रूपये महानगरपालिकेला चुकवावे लागतील. म्हणुन टायटलच व्हेरिफिकेशन होण गरजेच आहे आणि या उपरांत जर सभागृहाला वाटत असेल तर सभागृहाने निर्णय घ्यावा आणि याच्या संदर्भात आमची भुमिका म्हणजे माझ ी व्यक्तिगत भुमिका आहे . ती भुमिका विरोधाची राहील. कारण यासंदर्भात मला पोलिस अधिक्षक साहेबांचा निरोप आला होता, रामानंद नगर पोलिस स्टेशन ला ज्या लेडिज PI होत्या त्यांचाही फोन आला होता. परंतू शेवटी काय आहे की त्याची कायदेशीर वैधतेची पुर्णपणे खात्री पटत नाही. हिच वस्तुस्थिती त्यांनाही सांगीतली जर कधी रितसर क्लियर असता विषय तर निश्चित पणे आपण त्याच्यावर निर्णय घेवु शकलो असतो. परंतू आज त्याची सगळी परिस्थिती नाहीये. हि अपुर्ण माहिती आपल्या समोर आहे किंवा त्याचा जो काही न्यायनिवाडा बाकी आहे तो अजुन पुर्णावस्थेकडे गेलेला नाहीये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मॅडम आपण कोर्टात गेल्यानंतरही २०/०६ ला तारीख होती कोर्टाची मग आपले वकील का हजर झाले नाही तिथे का कोणी बाजु मांडायला जात नाहीत. म्हणजे वकील काय फक्त नावापुरतेच ठेवलेले आहेत का?

**मा.महापौर :-** २०/०६ ला होती तारीख तर कोणी गेले होते का ? म्हणजे काय निर्णय लागला काय नाही. कळायला पाहिजे ना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कोणीच हजर नव्हते आपले लोक तिथे, कोण आहे तिथे विधी शाखेला विचारा ना, असे एकमेकांकडे पाहुन थोडी निर्णय होणार आहे.

**मा.महापौर** :- या आदी या जमिनीचे बाबत काही घडले आहे का ? मानधनावर मागितले होते आपल्याकडे. किती वर्षापासुन आपल्या नावावर नाही ही जमिन.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, कधी याच्यावर काही कार्यवाही केलेली आहे का हे विचारा, आयुक्त मॅडमांनी पाहणी केलली होती आणि ते खुप दिवसापासुन चर्चेला येतोय. मुंडे साहेब SP होते तेव्हा पण ते येवुन बघुन गेले होते. मॅडम पण पाहुन गेल्या होत्या. त्याच्यानंतर कोणाचे काही तरी शिजले. आणि त्यानंतर हे सगळे प्रकरण पुढे आलेले आहे. त्याच्यापुर्वी कोणत्याही मालकाला माहिती नव्हते.कोणाला काहीही माहिती नव्हते आणि साहेब सांगत आहे ना की, देऊ शकतो म्हणुन.

**श्री.नितीन लढ्ढा** :- तसा लेखी रिपोर्ट द्यायचा ना त्यांनी असा मोघम अहवाल का देतात की उचित निर्णयास्तव सादर.

**मा.महापौर** :- तो निर्णय आम्ही कसे काय घेणार. त्याची पार्श्वभुमी काय आहे त्यात उल्लेख करायला पाहिजे. सांगायला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- नाही नाही याच्यामध्ये द्यायलाच पाहीजे किंवा देता येईल.

**श्री.इब्राहीम पटेल** :- प्रशासनाने आपल मत मांडायला पाहीजे ना.

**श्री.नितीन लढ्ढा** :- त्यांनी फक्त हिस्ट्री लिहुन पाठविलेली आहे.

**श्री.नितीन बरडे** :- जुन्या बस स्टँडची जागाही आपलीच आहे मॅडम तीही गेलेली आहे अशीच

**श्री.राजेंद्र पाटील** :- महापौरताई, प्रशासनाकडुन जे डॉकेट आलेले आहे ते मुळात संदीग्ध आहे. आपण कुठल्याही सदस्यांना कळणार नाही. अशा पध्दतीच ते डॉकेट आलेला आहे. आपण सुरूवातीला ७/१२ प्रमाणे वर्णन केलेले आहे आणि दुसऱ्या पेजवर सिटी सर्वेप्रमाणे वर्णन केलेले आहे. या दोन वेगळया वेगळया प्रॉपर्ट्या आहेत की एकच प्रॉपर्टीच वर्णन आहे. मागच्या बाजुला सिटीएस नंबर दिलेला आहे. मागच्या पेजवर आणि पहिल्या पेजवरती सातबाऱ्याप्रमाणे सर्वे नंबर दिलेला आहे ४८३.

**श्री.नितीन लढ्ढा** :- हो ते काय झालेल आहे सिटीएस मध्ये गेल्यानंतर तो नंबर बदललेला आहे. म्हणुन

**श्री.राजेंद्र पाटील** :- नाही

**श्री.नितीन लढ्ढा** :- पुर्वी एक क्रमांक होता आणि

**श्री.राजेंद्र पाटील** :- भाऊ याच्यामध्ये शेजारी शेजारच्या प्रॉपर्टीचा वाद आहे की, एकाच प्रॉपर्टीचे मालक दोन आहेत याचा खुलासा होत नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- पुर्वी त्याचा शेतमालक एकच होता जुन्या याच्या त्यावेळेसच त्यावेळेला

**श्री.राजेंद्र पाटील** :- भाऊ नाही ना ८१४ जे आपण गुंठे म्हणतोय येथे आपण म्हणतोय सर्वे नं. ४८३ याच्यामध्ये निशाणी A मध्ये ८१४ गुंठे म्हंटलेल आहे आणि निशाणी B मध्ये ८३२ गुंठे म्हंटलेले आहे. आता हि जी प्रॉपर्टी आहे हि सिटीएसमध्ये आहे. आपण ६७८९ नंबर हा त्याच प्रॉपर्टीचा सातबारा उतारा आहे की बाजुच्या प्रॉपर्टीचा आहे. मग आता जर तुम्ही त्या प्रॉपर्टीवर जर महापालिकेच नांव लागलेल आहे तर काहीतरी व्यवहार झाला असेल नाहीतर त्याच्या शिवाय कसे लागले असेल आपले महापालिकेचे नांव.त्याच्यासाठी कागदपत्र शोधणे गरजेच आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- राजुभाऊ काय आहे की याच्यासंदर्भात स्पष्ट भुमिका प्रशासनाने जी आहे ना वस्तुस्थिती टाकायला पाहीजे.

**श्री.राजेंद्र पाटील** :- भाऊ डॉकेटमध्येच देतांना एकतर सिटीएसप्रमाणे किंवा ७/१२ प्रमाणे द्यायला पाहीजे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कस असत प्रशासनाने त्यांच मत देतांना स्पष्ट मत द्यायला पाहीजे. ही पार्श्वभुमी प्रशासनाने निदर्शनात का आणली , परंतू प्रशासनाच मत नेमक काय आहे.

**मा.आयुक्त** :- सर यामध्ये जी तारीख झाली होती २० जुनला ॲक्च्युली आता ADTP साहेबांनी माहिती द्यायला पाहीजे की ७/१२ आपल्या नावावर आहे त्या ७/१२ वर जर आपले ऑब्जेक्शन घेतले आहे तर २०/०६ ला आपण ७/१२ त्यांच्याकडे सम्बीट केलेला आहे. पुढची तारीख त्यांनी ११ जुलै दिली आहे तर आता परंतू अजुन याचा निकाल त्यांनी दिला नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा** :- मॅडम आता पुढची तारीख त्याच्यामध्ये १९/०७ आहे.

**मा.आयुक्त** :- ११ आहे.

**श्री.नितीन लढ्ढा** :- ११ कि १९ त्याच्यामध्ये बघुन घ्या.

**श्री.अनंत जोशी** :- नितीनभाऊ आता मघाशी बोललेले आहे की माझी वैयक्तिक भुमिका आहे तर आम्ही नितीनभाऊंच्या भुमिकेसोबत आहोत. जी नितीनभाऊंची भुमिका आहे ती आमची सगळ्यांची भुमिका आहे.

**मा.महापौर** :- बोला राजुभाऊ

**श्री.राजेंद्र पाटील** :- मला अस वाटत की हा ठराव मंजुर करावा आणि निकालाला अधिन राहुन मंजुरी देण्यास हरकत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- काहीच हरकत नाही.

**श्री. अश्विन सोनवणे** :- काहीच हरकत नाहीये.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- जो निकाल येईल तो मंजुर राहील आज तर महापालिकेचे राहील.

**श्री.नितीन बरडे** :- तोपर्यंत तेही पाहणी करतील.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- हो ना मग ते करतील ना पण मंजुर तर करून घ्या आजच्या तारखेला.

**मा.महापौर** :- आपल काय म्हणण आहे याच्यामध्ये करवंदे साहेब जुने कागदपत्र काही आहेत का या जुने दस्तऐवज या जमिनीच्या संदर्भात आहे आपल्याकडे ? जुने काही आहे का की, त्यांनी कधी आपल्याला भ्रुदंडसाठी मागणी केली होती.

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजत नाही. )

**मा.महापौर** :- केली होती का ?

**श्री.करवंदे, नगररचनाकार** :- (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजत नाही. )

**(सभागृहात बरेच सन्मा.सदस्य आपआपसांत चर्चा करीत होते त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.)**

**श्री.विशाल त्रिपाठी** :- भाऊ, तुम्ही जे मुद्दे मांडले की नाही.

**श्री.नितीन लढ्ढा** :- आपण प्रस्ताव काय पाठवतो की यांच्यामुळे सभागृहातील बरीचशी सदस्य मंडळी जी असते ती कायद्याला धरून अनभिज्ञ असते. ज्या चुका घडतात आणि त्या चुकांचे परिणाम त्यांनाही भोगावे लागतात. त्याच्यामुळे आपण प्रशासनाकडे पाठवतो. नाहीतर आपण मान्य करून टाकला असता तो.

**मा.महापौर** :- नाही ना पण नितीनभाऊ

**श्री.नितीन लढ्ढा** :- प्रशासनाने याच्यामध्ये त्यांच्या स्वयंम स्पष्ट अभिप्रायासह की कायदेशीररित्या सदरहु जागा आपण देण्यास हरकत नाही अशा पध्दतीच जर कधी त्यांचे मत असेल तर निश्चितपणे कारण कमीत कमी काय होत की, ज्यावेळेला प्रशासन स्वत:च मत व्यक्त करतांना किंवा तो त्याचा माईंड अप्लाय करतांना तो योग्य पध्दतीनेच वापर करतो, मोघम स्वरूपात काय होते की आपण आपल्यावरील जबाबदारी झटकुन देतो आणि प्रशासनाचे नांवही होवुन जाते आणि नंतर काय की बॉडीने ठराव केला होता म्हणुन बॉडीला सर्वस्वी जबाबदार धरण्यात यावे.

**श्री.विशाल त्रिपाठी** :- कोर्टाची पण जागा तशीच दिली ना आपण भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा** :- कोर्टाची जागा जी आहे ना ती शासनाची जागा होती ती आणि उताऱ्यावर महापालिकेच नाव होते.

**(सभागृहात काही सन्मा.सदस्य व पदाधिकारी आपआपसात चर्चा करत होते. )**

**श्री.राजेंद्र पाटील :-** सुरक्षेच्या दृष्टीकोणातुन पोलिस स्टेशन होणे गरजेचे आहे. तरी सदरचा विषय बहुमताने मंजुर करण्यात यावा. आणि प्रशासनाने सर्व अटीशर्ती ज्या काही असतील ते टाकुन सदरचा विषय बहुमताने मंजुर करावा. टायटल क्लियर करुन.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रशासनाने मुद्दे लिहुन घ्या. प्रशासनाने दिलेले टायटल क्लियर असणे, नियमात असणे किंवा कायद्यात क्लियरंस असणे आवश्यक असुन त्याची नियमाप्रमाणे कार्यवाही करुन हा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. त्याची पुर्ण पुर्तता, खात्री प्रशासनाने करावी. असे ठरावामध्ये उल्लेख करा. जेणे करुन सगळया टेक्नीकल गोष्टी त्याच्यामध्ये योग्य येतील. आणि त्या प्रमाणे पुढील कार्यवाही प्रशासनाने करावी. असा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा. तटस्थची भुमिका ज्यांची असेल तटस्थची. उर्वरित जे असेल ते.

**(सभागृहात काही सन्मा.सदस्य व पदाधिकारी आपआपसात चर्चा करत होते. )**

**श्री.प्रशांत नाईक :-** गोराणे साहेब, मतदान घ्या याच्यावरती.

**श्री.अश्विन सोनवणे :-** काय करायचे आहे, गोराणे साहेब, काय आहे सांगा ना लवकर बहुमताने सांगितले ना आम्ही. महापौर महोदया,

**मा.महापौर :-** गोराणे साहेब, बहुमताने करता येणार आहे का ?

(सभागृहात व्यासपीठावर मा.महापौर व नगरसचिव आपआपसात चर्चा करत होते. )

**मा.महापौर :-** सगळयांनी दोन मिनीट शांतता ठेवायची आहे. या प्रस्तावाच्या संदर्भात द्विधा मनस्थिती आहे. बहुमताने मंजुर करायचे म्हटले तरी किती जणांचे बहुमत आहे आणि किर्तीचे नाही हे या ठिकाणी कळत नाही. तर या ठिकाणी प्रस्तावाच्या बाजुने मतदान आणि प्रस्तावाच्या विरोधात मतदान असे आपल्याला करावे लागणार आहे. ज्यांचे प्रस्तावाच्या बाजुने असेल ते हात वर करुनच आपण मतदान प्रक्रिया करणार आहोत. त्यामुळे सगळयांनी आपआपल्या जागेवर शांत बसायचे आहे. सगळे नगरसेवकांनी आपल्या जागेवर बसा. बसलेत सगळे.

**नगरसचिव :-** या ठिकाणी,

**मा.महापौर :-** प्रविणभाऊ बसुन घ्या खाली.

**नगरसचिव :-** या ठिकाणी, मा.महापौर महोदया यांनी विषय क्र.०४ मध्ये मतदान घेण्याबाबतचे निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने सर्व सन्मा.सदस्यांनी आपआपल्या जागेवर बसायचे आहे. कृपया करुन मतदानाची प्रक्रिया ही पारदर्शक आणि शांततेत पार पाडावी म्हणुन मतदानाला सहकार्य करायचे आहे. कोणीही आपसात बोलु नये आणि त्या ठिकाणी मतदानाला सुरुवात झाल्यानंतर कोणीही आपली जागा बदलु नये.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** पहिले ठराव काय झाला वाचुन दाखवा, नंतर कोण चार लोकांनी मतदान सांगितले त्यांची नावे घ्या. मग पुढची प्रक्रिया चालु करा.

**मा.महापौर :-** मतदानाची मागणी ज्या ४ लोकांनी केलेली आहे त्यांनी उभे राहवे.

(मतदान घेण्याची मागणी करीता सन्मा.सदस्य श्री.नितीन लढ्ढा, श्री.सुनिल महाजन, श्री.प्रशांत नाईक, श्री.ईब्राहिम पटेल व श्री.नितीन बरडे यांनी हात वर केले.)

**नगरसचिव :-** ठराव सुध्दा जो मांडला गेलेला आहे तो येथे क्लियर करावा. ठराव जो मंजुर करायचा आहे ते सभागृहाला अवगत करावे. जो बहुमताने मांडलेला आहे तो प्रस्ताव.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासनाने प्रशासकीय पुर्तता करुन सदरचा ठराव मंजुर करण्यात यावा बहुमताने.

**मा.महापौर :-** न्यायालयाचा जो निर्णय येणार आहे त्याच्या अधिन राहुन. न्यायप्रविष्ट आहे ना त्यामुळे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** प्रशासकीय मध्ये सर्व आला ना. प्रशासकीय पुर्ततेमध्ये सगळ आल.

**नगरसचिव :-** प्रशासनाच्या बाजुने जो प्रस्ताव आलेला आहे. त्याच्यात काही सुचना मांडलेली आहे. याच्यात प्रशासनाने सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन हा ठराव मंजुर करण्यात यावा अशी सुचना आहे. बरोबर आहे का ?

**श्री.अश्विन सोनवणे :-** बरोबर आहे.

**नगरसचिव :-** तर प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे. त्यांच्या सुचनेनुसार ज्यांना त्या प्रस्तावाच्या बाजुने मतदान करायचे असेल त्यांनी कृपया एकतर हात वर करावे आपल्याला शांतपणे मतदान घ्यायचे आहे. सहकार्य करायचे आहे पारदर्शकतेने. प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने ज्यांना मतदान करायचे असेल त्यांनी कृपया हात वर करावे. हात पुर्ण वर करावा जेणे करुन या ठिकाणी जे गणक नेमलेले आहे. ज्यांनी हात वर केलेले आहे त्यांनी एका बाजुला बसावे. या ठिकाणी गणक नेमलेले आहे त्यांनी तात्काळ. पत्रकार बंधुंना विनंती आहे की, थोडे बाजुला व्हा.

(प्रस्तावाच्या बाजुने मतदान करणारे सन्मा.सदस्य व सदस्या यांनी हात वर करुन आपले मत नोंदविले.)

**श्री.विशाल त्रिपाठी :-** गोराणे साहेब आमचा चालेल का हात वर केलेला.

**नगरसचिव :-** स्विकृत सदस्यांना मतदान करता येणार नाही. ज्यांचे हात वर आहे त्यांची टिकमार्क करा. प्रशासनाच्या प्रस्तावाच्या बाजुने. ज्यांचे अनुमोदन आहे अनुमोदनच्या ठिकाणी टिकमार्क करा. शुचिताताई हाडा, उज्वलाताई बेंडाळे, बारी मॅडम, नाव जरी सांगितले आपण तरी चालेल. अंजनाताई सोनवणे आणि ज्या बाजुने आहे तेथेच टिकमार्क करा. गायत्रीताई राणे, सुरेखाताई तायडे, सुरेशभाऊ सोनवणे, ठरावाच्या बाजुने आहे लक्षात ठेवा. राजेंद्रभाऊ घुगे, झाले का ? अश्विनभाऊ सोनवणे, ज्यांचे वोटींग झाले आहे त्यांनी हात खाली केला तरी ही चालेल. जितेंद्रभाऊ मराठे, धिरजभाऊ सोनवणे, अमितभाऊ काळे, डॉ.विरणभाऊ खडके, किशोरभाऊ बाविस्कर, हे जे वोटींग आहे सर्व घेतले का बरोबर. नवनाथभाऊ दारकुंडे, चेतनभाऊ सनकत, दिलीपभाऊ पोकळे, गणेशभाऊ सोनवणे, प्रविणभाऊ कोल्हे, मागे काय आहे तुमचे. ईकडे नेरकर मॅडम, गायत्रीताई तुम्ही हात वर केला आहे का? मग वर कराना असे नाही चालणार. गायत्रीताई शिंदे, गणक ही तुमची फार महत्वाची जबाबदारी आहे. कायद्यामध्ये तरतुद आहे. दोन गणक नेमुन त्यांनी मतदानाची प्रक्रिया पुर्ण करायची आहे. चुका तुमच्याकडुन व्हायला नको.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरताईंच राहिलेले आहे.

**नगरसचिव :-** त्यानंतर जयश्रीताई महाजन. या सर्व लोकांचे वोटींग आहे ठरावाच्या बाजुने. माईक द्या त्यांना गणकांना माईक द्या. नाव डिक्लेअर करा की, ठरावाच्या बाजुने कोण सदस्य आहे.

**श्री.प्रकाश सोनवणे, गणक :-** शुचिताताई हाडा, अंजनाताई प्रभाकर, उज्वला बेंडाळे, शोभा दिनकर बारी, गायत्री राणे, तायडे, राजेंद्र झिपरु पाटील, अश्विन सोनवणे,सुरेश सोनवणे, धिरज सोनवणे, जितेंद्र मराठे, विश्वनाथ सुरेश खडके, सनकत चेतन गणेश, पोकळे दिलीप, विक्रम किसन, प्रविण कोल्हे, अमित काळे, किशोर बाविस्कर, नवनाथ दारकुंडे, नेरकर सरिता, गायत्री शिंदे, जयश्री महाजन.

**नगरसचिव :-** बरोबर आले सर्व नांव.ठरावाच्या बाजुने किती आहे.

**श्री.प्रकाश सोनवणे, गणक :-** २२.

**नगरसचिव :-** आता सन्मा.श्री. नितीनभाऊ लढ्ढा यांनी जी सुचना मांडलेली होती. म्हणजे तो प्रशासकीय प्रस्तावाच्या विरुध्द तटस्थ म्हणुन. हात वर करायचे आहे कृपया करुन कुलभुषण भाऊ, नितीनभाऊ लढ्ढा, नितीनभाऊ बरडे, सुनिलभाऊ महाजन, अंनतभाऊ जोशी, ईब्राहिम मुसा, प्रशांतभाऊ नाईक, रियाजभाई बागवान, शेख हसिनाबी. नाव डिक्लेअर करा तटस्थ म्हणुन.

**श्री.प्रकाश सोनवणे, गणक :-** तटस्थ म्हणुन नितीन बरडे, नितीन लढ्ढा, सुनिल महाजन, अंनत जोशी, ईब्राहिम पटेल, प्रशांत नाईक, रियाज बागवान, कुलभुषण पाटील, हसिनाबी शरिफ,

**नगरसचिव :-** आले भाऊ सर्वांचे नाव. आता शिट तयार करा सहीला द्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच्यामध्ये बाजुने आणि तटस्थ विरोधात एकही नाही. अशी नोंद घ्या विरोधात एकही नाही.

**नगरसचिव :-** पोकळे साहेब.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आपले काम आहे सुचना करायच.

**नगरसचिव :-** तटस्थ म्हणुन टिकमार्क करा, आणि यांचे ठरावाच्या बाजुने.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नगरसचिव साहेब, हे ही घ्या की, जर मते समसमान आली तर पिठासीन अधिकारी यांचा निर्णय बाधीत करतील.

**नगरसचिव :-** आजच्या वोटींगमध्ये समसमान मतदान नाही. आता मा.पिठासीन अधिकारी डिक्लेअर करतील.

**मा.महापौर :-** सगळयांनी कृपया जागेवर बसुन घ्यावे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सुचक म्हणुन सदर प्रस्तावाला माझे नाव आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** माझे प्रस्तावाला अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०४ यावर मतदान प्रक्रिया पार पडलेली आहे आणि या मतदान प्रक्रियेमध्ये उपस्थित असलेले एकुण सदस्य ३१ होते. त्यात ठरावाच्या बाजुने झालेले मतदान हे २२ आहे. ठरावाच्या विरोधात झालेले मतदान शुन्य आहे. ठरावास तटस्थ असलेले सदस्य ०९ आहे. प्रशासनाचा प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौरांचे खुप खुप धन्यवाद की, त्यांनी या ठरावाला समर्थन केले आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०५ ला सुरुवात करण्यात यावी.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११५५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पोलिस अधिक्षक यांचेकडील पत्र जा.क्र/३१७/सी.बी-४/रामानंद नगर पो.स्टे.जागा मागणी/२०२२/७६०२ दि.३०/०९/२०२२ चे पत्रानुसार पोलिस अधिक्षक यांनी विषयांकीत जागा, रामानंद

नगर पोलिस स्टेशन करीता वितरीत करणे बाबत या महापालिकेचे अभिप्राय/नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

प्रस्तुत पत्रानुसार व सोबत जोडलेल्या ७/१२ उताऱ्यावर व इतर कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदरची जागा जळगांव वि.यो.जुनी हद्द मध्ये रहिवास विभागात समाविष्ट आहे. सोबत जोडलेल्या ७/१२ अताऱ्यानुसार सदरची जागा, 'म्युनीसीपालटी जळगांव शहर वाटर सप्लाय' यांचे नावाने भोगवटादार वर्ग क्र.०१ या प्रमाणे दिसुन येते. तसेच सोबत जोडलेल्या भूमी अभिलेख विभागाकडील नकाशानुसार मेहरुण स.नं.४८३ पैकी या जागेत 'पाईप लाईन' या प्रमाणे जागा दर्शविलेली आहे. तसेच सोबत जोडलेल्या मोजणी नकाशाच्या छायांकीत प्रतीवर दर्शविल्या प्रमाणे, स.नं.४८३ मध्ये निशाणी 'ए' ही जमिन ८१४ गुंठे व निशाणी 'बी' या जमिनीचे क्षेत्र ८३२ गुंठे या पैकी १८६ गुंठे जमिन नगरपालिका संपादन करुन मागीत असल्याबाबत नोंद आहे. सदर १८६ गुंठे जमिन ही भुमीअभिलेख विभागाकडील नकाशात 'पाईप लाईन' करीता दर्शविल्याचे स्पष्ट होते. तसेच या पुर्वी स.नं.४८३/२ मधील जागा मिळणे बाबत कॅप्टन त्र्यंबकराव एन देशमुख यांचे प्रकरण प्राप्त झालेले होते. प्रस्तुत प्रकरणात जोडलेल्या दि.२३/०९/१९९३ च्या ७/१२ उताऱ्यावर म्युनिसीपालटी शहर जळगांव वॉटर सप्लाय या करीता फेरफार क्र.२०८० असल्याचे दिसुन येते. (याबाबतची संचिका दि.०८/०९/२०२१ रोजी पाणी पुरवठा विभागाकडे पाठविण्यात आलेली आहे.) या सर्व कागदपत्रांवर प्रस्तुत जागा ही पाणी पुरवठा विभागाच्या कामाकरीता दर्शविण्यात आल्याचे स्पष्ट होते.

मा.महापौर यांचेकडील पत्र/मका/२१ दि.२३/०५/२०२३ अन्वये मा.महापौर यांनी विषयांकीत जागा रामानंद नगर पोलिस स्टेशन उभारणी करीता पोलिस विभागाकडे हस्तांतरीत केल्यास त्या जागी पोलिस स्टेशन उभारले गेल्यास परिसरातील कायदा व सुव्यवस्था योग्य प्रकारे हातळली जाईल हे निर्विवाद सत्य आहे. नागरिकांची सुरक्षा ही महानगरपालिकेचे आदय कर्तव्य आहे. यास्तव सुचना वजा विनंती करण्यात येत आहे की, तात्काळ सुयोग्य प्रस्ताव तयार करुन महासभेच्या मान्यतेसाठी यथाशिघ्र सादर करण्याची दक्षता घेण्यात यावी. अशा आशयाचे पत्र दिलेले आहे. तथापि, श्री.धुडकु तुकाराम भारंबे (मयत) तर्फे श्री.गजानन धुडकु भारंबे व इतर यांनी जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख जळगांव यांचे कार्यालयात न.भु/अपील/एस.आर/४८१/२०२२ दि.२१/११/२०२२ नुसार मौजे जळगांव ता.जि.जळगांव येथील सि.स.नं.६७८९ च्या जागेबाबत अपील अर्ज दाखल केलेला आहे. सदर अपील अर्ज हा सि.स.नं.६७८९ या मिळकतीचे मालकी हक्काबाबत असल्याचे दिसुन आलेले आहे. तसेच सदरील अपीलाबाबतची सुनावणी जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख जळगांव यांचे कोर्टात सदयस्थितीत सुरु असुन याबाबत पुढील सुनावणी दि.२०/०६/२०२३ रोजी आहे. सबब प्रकरणी वरील प्रमाणे अपीलाबाबत निकाल प्राप्त होई पावेतो प्रस्तुत जागेच्या मालकी बाबतची सुस्पष्टता होत नाही. तथापि पोलिस अधिक्षक यांचेकडील पत्र जा.क्र./३१७/सी.बी-४/रामानंद नगर पो.स्टे.जागा मागणी/२०२२/७६०२ दि.३०/०९/२०२२ अन्वये पोलिस अधिक्षक जळगांव यांनी अपेक्षिलेली जागा पोलिस स्टेशन करीता देणेबाबत मा.महापौर यांनी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने यथाशिघ्र कार्यवाही करणे कामी महासभेपुढे मान्यतेस्तव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांनूसार रामानंदनगर परीसरात नागरीकांच्या सुरक्षेच्यादृष्टीने पोलिस स्टेशनची आवश्यकता असल्याने मेहरुण स.नं.४८३/२ मधील जागा मे.न्यायालयाच्या निर्णयाचे अधिन राहून, प्रशासनाने सर्व प्रशासकीय बाबींची पुर्तता करुन घेवुन नियमाप्रमाणे रामानंद पोलिस स्टेशन करिता देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा देतांना महानगरपालिकेच्या ज्या काही अटी-शर्ती असतील त्या टाकुन जागा देणेची कार्यवाही करावी तत्पुर्वी सदर जागेचे टायटल क्लिअर करुन घेवुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल** | **:- २२** | **प्रतिकूल - ००** | **तटस्थ - ०९** |
| **सूचक** | **:- बेंडाळे उज्वला मोहन** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील राजेंद्र झिपरु** | | |

**नगरसचिव -विषय क्र.०५ :-** मौजे मेहरुण शिवार स.नं.१६५/१क/१फ/२ पैकी मधील खुली जागा (ओपन स्पेस) निमरा फाऊंडेशन,जळगांव या संस्थेला मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११५६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, निमरा फाऊंडेशन,जळगांव या संस्थेचा महापौर यांचे मार्फत नगररचना कार्यालयास आवक क्रं.१० दि.२३/०८/२०२२ अन्वये प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर पत्रान्वये, मौजे मेहरुण शिवार स.नं.१६५/१क/१फ/२ पैकी या मंजूर अभिंन्यासातील खुला भुखंड (ओपन स्पेस) विकसीत करणेकामी निमरा फाऊंडेशन,जळगांव यांना मिळणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे. सदर अर्जावर महापौर यांनी डॉकेट सादर करणे बाबत आदेशीत केलेले आहे.

त्या अनुषंगाने, शासनाने डिसेंबर २०२० रोजी मंजुर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुदी नुसार अभिंन्यासातील भुखंड धारक यांची सोसायटी/असोशिएशन, यांनाच खुली जागा (ओपन स्पेस) वितरीत करणे बाबत नमुद आहे.

सदर अभिंन्यासातील भुखंडधारक यांचे सदर संस्थेस खुली जागा देण्यास संमतीपत्र सादर केलेले आहे, या प्रमाणे सदर अभिंन्यासातील बहुता:श नागरिकांनी स्वाक्षरीसह संमती पत्र दिलेले आहे.

निमरा फाऊंडेशन या संस्थेमार्फत मौजे मेहरुण शिवार स.नं.१६५/१क/१फ/२ पैकी मधील खुली जागा विकसित करणेबाबत देण्यात यावा याबाबत विनंती अर्ज केलेला आहे. सदर अर्जामध्ये अभ्यासिका वर्ग, व इतर शैक्षणिक, सामाजिक, आरोग्य सेवा, क्रिडा, सांस्कृतिक, जनजागृती, लोकहितार्थ इत्यादी उपक्रम या प्रयोजनांकरिता मागणी केलेली आहे.

अर्जदार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने वापर हा फक्त शासनाने डिसेंबर २०२० रोजी मंजुर केलेल्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) मधील तरतुद क्रं.३.४.७ मध्ये नमुद प्रयोजनांकरिता व अभिंन्यासातील भुखंडधारकांकरीताच अनुज्ञेय असून मौजे मेहरुण शिवार स.नं.१६५/१क/१फ/२ पैकी मधील खुली जागा (ओपन स्पेस) महानगरपालिका अटी-शर्तीनुसार निमरा फाऊंडेशन,जळगांव या संस्थेला देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर जागा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबत खात्री करुनच नियमानूसार पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- सोनवणे विक्रम किसन**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०६ :-** केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कामे करणेसाठी महासभा ठराव क्रं.१०२४ दि.२१/०३/२०२३ अन्वये निश्चित केलेले सल्लागार शहा टेक्नीकल कन्स्ल्टंट मुंबई यांनी करारास असमर्थतता दर्शविल्याने इतर सल्लागार फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स, औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांची नियुक्ती करणे, प्राप्त दरानुसार येणाऱ्या पर्यायी खर्चास व संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौर महोदया, डॉकेटमध्ये जी माहिती देण्यात आलेली आहे. यामध्ये काही गोष्टी मोघम नमुद करण्यात आलेल्या आहेत. जसे की, दि.१६/०४/२०२३ ला कराराचा मसुदा पाठवुन काम करण्याला तयार आहे किंवा कसे याबाबत विचारना केली असता, पुरविलेल्या कराराच्या मसुद्यानुसार त्यांनी यापुर्वी सादर केलेल्या दरानुसार, ह्या विभागाकडुन सभेसमोर नमुद करुन घ्याव. खरं तर हे सगळ डॉकेटमध्येच येणे अपेक्षित होते. जसे शाह कन्सल्टन्सी बद्दलचे दर किंवा त्यांनी मागितलेले बदल हे डॉकेटमध्ये नमुद करण्यात आले. तसेच याच्या बद्दल सुध्दा विस्तृत विवेचन डॉकेट मध्ये येणे अपेक्षित होते. ते आता सभेसमोर नमुद करुन घेण्यात यावे. मोघम ठेवण्यात येऊ नये. विभाग प्रमुखांना बोलवावे. त्यांच्याकडुन यापुर्वी नमुद केलेले दर म्हणजे काय ? याचा खुलासा सभेसमोर करुन घ्या.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** शाह कन्सल्टन्ट यांनी १.२०% दर दिलेले होते. आपण त्यांना त्यानुसार करारनामा करण्याबाबत कळविले. करारनाम्याच्या अटीशर्ती कळविल्या. त्यांनी करारनाम्याच्या अटीशर्तीमध्ये १,२,३,४,५ प्रमाणे ते म्हणाले आम्हाला बदल करुन द्या.

**सौ.शुचिता हाडा :-** त्या आपण नाकारल्या.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** त्या आपण नाकारल्या. कारण ते आपल्या अटीशर्तींच्या विरुध्द होत्या.

**सौ.शुचिता हाडा :-** त्याच्या बद्दल मी बोलतच नाही, ज्याला आपण आता काम दिलेले आहे त्याच्या बद्दल जे मोघम दिलेले आहे. मी त्याच्या बद्दल बोलत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दर काय आहे ते नमुद करुन घ्या.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपल्या अटीशर्तींचा करारनामा त्यांना पाठविलेला होता. त्यानी तो ॲक्सेप्ट केलेला आहे. आणि त्यांचे दर १.४०% हा २०० कोटी करीता आहे. परंतु त्याच्यात ५-५ कोटीचे टप्पे आहेत.

**सौ.शुचिता हाडा :-** जस जस काम वाढेल तस तस दर कमी होत जाणार. १.४० पेक्षा ही कमी होत जाणार. बरोबर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरोबर.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रशासनाने याची नोंद घ्यायची आहे की, करारनामा महापालिकेमार्फत देण्यात आलेला आहे. त्या करारनाम्यानुसारच ही सगळी प्रोसेस पुढे गेली पाहिजे. हे इनक्युडींग जी.एस.टी. आहे की, एक्सक्युडींग जी.एस.टी. आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही जी.एस.टी. वेगळे आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** इनक्युडींग जी.एस.टी. असे तुमच्या अनुसुचीत नमुद आहे. मग तुम्ही एक्सक्युडींग जी.एस.टी. कसे काय म्हणत आहेत.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** याच्यामध्ये १.२०% जो दर दिलेला होता ना त्यांने तो इनक्युडींग जी.एस.टी. दिलेला नव्हता.

**सौ.शुचिता हाडा :-** आपली जी अनुसुची येथे दिलेली आहे. सादर केलेल्या दरानुसार व सोबत जोडलेले टप्पे निहाय दर.याच्यामध्ये सगळयात पहिल पेज उघडा याचे. नीट वाचा त्याच्यातली उघडायचे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** इनक्युडींग जी.एस.टी.

**सौ.शुचिता हाडा :-** मग इनक्युडींग जी.एस.टी.जर आहे तर तुम्ही एक्सकल्युडींग जी.एस.टी.कसे काय करत आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** शाह वाल्याची जी ऑफर होती ना सुरुवातीला

**सौ.शुचिता हाडा :-** शाह वाल्याचा आता विषय संपलेला आहे. शाह वाल्या बद्दल आता मी काहीही बोलत नाही. शाह वाल्याचा विषय संपुष्टात आलेला आहे. आपण आता बोलत आहोत.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो.

**सौ.शुचिता हाडा :-** आता आपण बोलत आहोत फोर्टीस जे.व्ही विथ यश इनोव्हेटीव्ह बरोबर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरोबर.

**सौ.शुचिता हाडा :-** त्यांचा रेट तुम्ही १.४० सांगितला, जसे जसे काम वाढेल २०० कोटींसाठी तसे तसे तो कमी होईल. कसा कमी होईल, या ॲनेक्चर मध्ये जसे टप्पे दिलेले आहे त्यानुसार.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो.

**सौ.शुचिता हाडा :-** मग तुमच ॲनेक्चर काय सांगतात आहे वरती, Including १८%GST and all other Taxes.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरोबर.

**सौ.शुचिता हाडा :-** मग तुम्ही कसे काय म्हणत आहात की, एक्सक्ल्युडींग जी.एस.टी.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपण जे सुरुवातीला दिलेला होता ना १.२० चा दर.

**सौ.शुचिता हाडा :-** १.२०% चा विषय कुठुन आणता तुम्ही, आयुक्त महोदया तुमच्या लक्षात येत आहे का ? शाहचा विषय संपलेला आहे की नाही, १.२० हे शाहच होत. आता आपण बोलत आहोत. फोर्टीस आणि यश बद्दल बरोबर, त्यांचे रेट १.४०% आहे २०० कोटीसाठी. त्याच्यापुढे आपण जाणार कसे जाणार या अनुसुचीनुसार जाणार. या अनुसुचीच्या सगळयात वरची नोंद काय म्हणत आहे. इनक्युडींग जी.एस.टी. तुम्हाला प्रश्न विचारला तर तुम्ही मला गोलमोल उत्तर देत आहात बोरोले साहेब. तुम्ही मला आता एक्सक्ल्युडींग जी.एस.टी. म्हटले आता. हे स्पष्ट करा, इनक्ल्युडींग जी.एस.टी. की एक्सकल्युडींग जी.एस.टी.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ही जी आपण ऑफर स्विकारत आहोत ती Including GST and all other Taxes आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** नगरसचिव साहेब प्रशासनाचे हे वाक्य नोंद करण्यात यावे. इनक्ल्युडींग जी.एस.टी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परिशिष्टात आहेत ना ताई.

**सौ.शुचिता हाडा :-** परिशिष्टात आहे नितीनभाऊ पण सभेसमोर प्रश्न विचारले मी त्यांना, ते म्हणत आहे एक्सकल्युडींग जी.एस.टी. सगळयांच्या समोर असेच गोलमोल कारभार येथे सुरु आहे. त्याच्यामुळे माझी विनंती आहे प्रशासनाला की, हे सगळ व्यवस्थीत पार पडले पाहिजे. करारनामा जो आपण दिलेला आहे. जो मसुदा आपण दिलेला आहे. त्या मसुद्यानुसारच करारनामा झाला पाहिजे. १.४०% आता प्रशासनाने सगळयांसमोर यांनी सांगितलेले आहे २०० कोटींसाठी त्याच्यावर जर काम केले जाईल या ॲनेक्चरनुसार टप्पे होणार आहे. इनक्युडींग जी.एस.टी., एक्सकल्युडींग नाही. हे स्पष्ट नमुद करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दर आणि जी.एस.टी. इनक्ल्युडींग ठरावात नमुद करुन घ्या.

**सौ.शुचिता हाडा :-** ते ठरावात नमुद करा. त्याच्या मध्ये नोंदच आहे. आणि याच्यामध्ये जर कोणताही बदल झाला तर याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल, हे सुध्दा ठरावात नमुद करा.

**मा.महापौर :-** विषय क्र.६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११५७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत २.० अभियाना अंतर्गत पाणी पुरवठा योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी शासन परीपत्रक क्रं.अमृत-२०२२/प्र.क्रं.२०२३/नवि-३३ दि.१६ सप्टेंबर २०२२ अन्वये शासनाने निर्धारीत करुन दिलेल्या सुचीतील सल्लागारांना दर सादर करणेबाबत कळविलेले होते. त्यानुसार सदर कामी ३ सल्लागारांनी दर सादर केलेले होते. त्यापैकी शहा टेक्नीकल कन्स्ल्टंट मुंबई यांनी अहवाल रकमेच्या १.२०% दराने काम करणेस तयारी दर्शविली होती. त्यानुसार मा.अधिक्षक अभियंता, मजीप्रा मुंबई यांचे पत्र क्रं.मजीप्रा/संस/तांशा-४/४७९ दि.०८/०४/२०२१ अन्वये शहा टेक्नीकल कन्स्ल्टंट मुंबई यांची नियुक्ती करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार सदर सल्लागार यांना करार करणेकामी कराराचा मसुदा महानगरपालिका विधी सल्लागार यांचेशी चर्चा करुन तयार करुन पाठविण्यात आलेला होता. सदर मसुदयानुसार करार करता येणार नाही असे सल्लागार यांनी कळवून त्यात काही बदल केलेले असून त्यानुसारच काम करणेस तयारी दर्शविलेली आहे. प्रामुख्याने बदल केलेल्या महत्वाच्या शर्ती खालील प्रमाणे आहे.

१. यापूर्वी सादर केलेल्या दरांत सल्लागार यांनी भाववाढ नमूद केलेली नाही तथापि करार मसुदा निश्चिती करतांना भाववाढीची मागणी केली आहे.
२. Force Major परीस्थितीत ०.०२५% नुकसान भरपाई मिळावी.
३. काम करण्याच्या कालावधी ०३ महीने प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिलेला असतांना त्यात वाढ करुन ६ महीने दिलेला आहे.

४. काम करणेसाठी ०.१०% अग्रीम धन मागणी केलेली असून मेहनताना अदायगीच्या रचनेत बदल केला आहे.

५. अहवाल तयार करणेसाठी व प्रकल्पाच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ ठेवणेबाबतच्या तरतूदीत बदल सुचवून एकुण ०९ कर्मचारी देणार असल्याचे नमूद केले आहे.

वरील प्रमाणे करारात केलेल्या बदलामुळे प्रत्यक्षात आर्थिक देकारात बदल केलेला असल्याने तसेच महानगरपालिकेने पाठविलेल्या कराराच्या शर्तीनुसार काम करणेस असमर्थतता दर्शविली. तसेच यानंतर देखील दि.०९/०५/२०२३ रोजी ई मेल संदेशाव्दारे कराराच्या मसुदयानुसार काम करणेस तयार आहे किंवा कसे ? या बाबत सल्लागार शहा टेक्नीकल कन्स्ल्टंट मुंबई यांना कळविले असता त्यांनी दि.१०/०५/२०२३ रोजी स्पष्ट तयारी दर्शविलेली नाही. सल्लागार यांनी महानगरपालिकेने दिलेल्या करार मसुदयानुसार काम करणेस तयारी दर्शविली नाही.

सदर कामासाठी शासनाच्या सुचीवर सुचीबध्द असलेले व मनपास दर सादर केलेले सल्लागार फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांना ई मेल व्दारे दि.१६/०४/२०२३ रोजी कराराचा मसुदा पाठवून काम करणेस तयार आहेत किंवा कसे ? याबाबत विचारणा केली असता, दि.२०/०४/२०२३ रोजी त्यांनी महानगरपालिकेने पुरविलेल्या कराराच्या मसुदयानुसार व त्यांनी यापूर्वी सादर केलेल्या दरानुसार (सोबत जोडलेल्या अनुसूचीत दिलेले टप्पेनिहाय दर) काम करणेबाबत तयारी दर्शविली असून याबाबत ईमेल व्दारे कळविले आहे.

पाणी पुरवठा योजनेसाठी प्रकल्प अहवाल तयार करणे कामी फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांचे सोबतच्या अनुसूचित दिलेले टप्पे निहाय दर स्विकारुन त्यांची प्रकल्प्र व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस, येणाऱ्या पर्यायी खर्चास व संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद यांना महानगरपालिकेने करारनाम्याचा जो मसुदा दिलेला आहे त्या मसुदयानुसारच करारनामा करावा. करारनाम्यानुसारच प्रक्रिया पुर्ण करुन घेण्यात यावी. तसेच फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद यांनी प्रस्तावा सोबतच्या अनुसुचीमध्ये (Appendix-II Financial Rate) (यासोबत दिलेल्या अनुसूचीमध्ये) जे दर दिलेले आहेत त्यामध्ये जी.एस.टी. व इतर करांचा समावेश केलेला आहे. (अनुसुचि Below rates are including 18% GST and all other taxes) त्यानुसारच अनुसूचित दिलेल्या टप्पेनिहाय दरात काम करुन घ्यावे मात्र याच्यामध्ये कोणताही बदल झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०७ :-** जळगांव शहराच्या भागातील रस्त्यांवर थर्मोप्लास्ट पेंन्टने रोड साईडला पट्टे व चौकात झेब्रा क्रॉसिंग करणे कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११५८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील अनेक रस्त्यांची नव्याने पुर्नबांधणी करण्यात येत असुन अश्या पुर्ण झालेल्या प्रमुख मार्गावर वाहतुकीस सुरळीत करणे, पार्कींग लाईन निश्चित करणेसाठी

पट्टे मारणे, तसेच चौका - चौकात झेब्रा क्रॉसिंग चे पट्टे आखणी करणे आवश्यक असल्याने सदर कामाचे सन २०२२-२३ चे राज्यदर सुचीनुसार रक्कम रु.४९,६७,८०९/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असुन त्यास तांत्रिक मान्यता देण्यात आलेली असल्याने उक्त काम करण्याकरीता शासनामार्फत / जिल्हा नियोजन समिती मार्फत निधी मागणी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच शासकीय निधी उपलब्ध न झाल्यास सदरचा खर्च मनपा निधीतुन मनपा अर्थसंकल्प सन २०२३-२४ मधील रस्ते व रहदारी सुखसोयी या लेखाशिर्षा अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.०८ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० मधील दर्गा ते स्वस्त धान्य दुकानापर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामाचा झालेल्या खर्चाचे सन २०२३-२४ या आर्थीक वर्षातुन अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत तरतुद करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा ६८ लक्ष निधी युटीलाईज न करता म्हणजे अखर्चीत राहिल्यामुळे हा निधी परत गेलेला आहे. तर याला मुदतवाढ मिळावी.

**मा.आयुक्त :-** आपण शासनाला पत्र दिलेले आहे आपण. खातेवरच जमा आहे. आपण शक्य तो तेच करणार आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे, अश्या पध्दतीने अखर्चीत रक्कमा जर परत जातात. किंवा शासनाने त्याला मुदतवाढ दिलेली आहे. मुदतवाढ का दिलेली आहे की, तो निधी त्यावेळेस प्राप्त झालेला होता आणि त्याच्या बाबतीत शासनाने वेळोवेळी दिलेल्या मुदतवाढीमध्ये सुध्दा आपण तो निधी खर्च करु शकलो नाही. तर आता याची जबाबदारी कोणाची. अश्या पध्दतीने तो निधी व्यपगत होणे किंवा निधी परत जाणे ही नामुस्की आहे. अश्या पध्दतीने अश्या गोष्टींमुळे जो निधी असलेली ज्यांच्या मुदती संपत असतील. प्रशासनाने अगोदर या गोष्टी ज्या आहेत ना. या सभागृहासमोर आणणे गरजेचे आहे. आपण ही बाब म्हणणे चुकीचे आहे की, शासन मुदतवाढ देईल. जिन्युन केस मध्ये काही तरी खुप मोठी अडचण आल्यामुळे समजा, आपण निधी खर्च करु शकलो नाही. तो भाग वेगळा आहे. परंतु दुर्लक्षीतपणामुळे अश्या पध्दतीने निधी व्यपगत होऊन जाणे ही नामुस्की आहे. तर याच्या बाबतीत प्रशासनाने अजुन काही हेड असतील आणि त्या हेड मध्ये असे काही अखर्चीत निधी असतील की, ज्यांच्या मुदती संपण्याच्या मार्गावर असेल. त्याचा विनियोग करण्याचे दृष्टीकोणाने त्या सर्व गोष्टी सभागृहाच्या निदर्शनात आणणे गरजेचे आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११५९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१० मधील दर्गा ते स्वस्त धान्य दुकानापर्यंतचा रस्ता कॉंक्रीटीकरण करणेचे काम विशेष रस्ता अनुदानाच्या शिल्लक रक्कम रु.६८.६७ लक्ष मात्रच्या अनुदानातुन प्रस्तावीत करुन त्यास जिल्हास्तरीय समिती विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक यांनी त्यांचे कडील पत्र क्रं.नपा/संकलन-३/३२६५/२०२२/२८४२ दि.२४/०२/२०२२ अन्वये रक्कम रु.६८.६५ लक्ष मात्रला प्रशासकीय मान्यता प्रदान केली परंतु सदरचे विशेष रस्ता अनुदान खर्च करणेची मुदत दि.२८/०२/२०२२ रोजी संपल्याने शासनाकडेस दि.१४/०३/२०२२ रोजी निधी खर्च करणे करीता दि.३०/०६/२०२२ रोजी पर्यंत मुदतवाढ मिळणेची मागणी केली असता शासनाकडुन मुदतवाढ मिळालेली नसल्याने सदरचे कामाचा खर्च मनपा निधीतुन सन २०२२-२३ चे आर्थिक वर्षाचे अर्थ संकल्प मधिल नविन रस्ते या लेखा शिर्षा मधील तरतुदीतुन करणेस महासभा ठराव क्रं.८७३ दि.०८/०८/२०२२ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानंतर मक्तेदार शिवशक्ती कंन्स्ट्रक्शन जळगांव यांना पत्र क्रं.पवडी ९८ दि.२६/०८/२०२२ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आल्यानुसार मक्तेदार यांनी कार्यादेशात नमुद मुदतीत सदरचे काम दि.१८/०२/२०२३

रोजी पुर्ण करुन दिलेले आहे त्यानुसार उक्त कामापोटीचे १ ले व अंतिम देयक रक्कम रु.६९,८९,९१८/- मात्र अदायगीकरीता अर्थ विभागात सादर करण्यात आलेले आहे.

उक्त कामाचा खर्च हा सन २०२२-२३ चे अर्थ संकल्पीय तरतुदीतुन करणेस मान्यता देण्यावर नमुद ठरावानुसार देण्यात आलेली आहे. सदरचे आर्थिक वर्ष संपलेले असल्याने नविन आर्थीक वर्ष सन २०२३-२४ चे अर्थ संकल्पीय तरतुद नविन रस्ते या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रु.२८ कोटी मधुन खर्च करणे संदर्भात महासभेची मान्यता घेण्यास अर्थ विभागाकडुन सुचित करणेत आलेले आहे.

माहे ऑगस्ट २०२२ मध्ये महासभा ठराव मंजुर होवुन देखील माहे मार्च २०२३ अखेर अर्थ विभागाकडेस देय्यक प्राप्त झालेले नाही त्यामुळे उक्त कामाचे देय्यक रक्कम रु.६९,८९,९१८/- मात्रचे १ले अंतिम देयक सन २०२३-२४ चे अर्थ संकल्पीय तरतुदीतुन नविन रस्ते या लेखाशिर्षातुन अदायगी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.०९ :-** मेहरुण तलाव परिसरातील स.नं.४१३ व ४०९ मधिल शिरसोली रोड वरुन मेहरुण तलावापर्यंत पूर्व पश्चिम १० गल्यांना 'लेकसिटी लेन क्रमांक ०१' लेकसिटी लेन क्रमांक ०१ पासुन दक्षिणेकडे श्रीकृष्ण लॉन पर्यंत 'लेकसिटी लेन क्रमांक १० ' असे नामकरण तसेच मेहरुण तलावाच्या लगत लेक्सिटी मधला स्पर्श अपार्टमेंट वडाच्या झाडापासून चिमणीघर ते तलाव ओव्हरफ्लो मंदिरापर्यंतचा ट्रॅक रोडला 'बलेश्वर महादेव मंदिर रोड' असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** लेक सिटी हे नांव मला काही योग्य वाटत नाही. म्हणजे मेहरुण ची बोरं प्रसिध्द होते. आणि माता शबरीने बोरं दिले होते.माता शबरीने बोरं खाऊ घातले होते, तर माझे असे म्हणणे आहे की, लेकसिटीच्या ऐवजी शबरी माला १, शबरी माला २, शबरी माला ३, असे नांव द्या काही तरी किंवा शबरी सिटी, शबरी माता सिटी, देणे किंवा न देणे पण ते मेहरुण भागाचे पण नांव राहील.

**मा.महापौर :-** नागरीकांनी मागणी केलेली आहे आणि तेथे ऑलरेडी लावुन झालेले आहे. त्या गल्ल्या बुक आहेत.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सर्व गल्ल्या बुक आहे पण कसे आहे. काही तरी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे, रस्त्यांचे नावे, किंवा स्ट्रीटचे नांव, ओपनस्पेसचे नांव प्रशासनाकडुन सविस्तर प्रस्ताव आला पाहिजे की, यापुर्वी कोणाचे नांवाने ठराव झालेले आहे का ? कारण याच्या संदर्भात मलाही फोन आलेला होता की, या मेहरुणच्या चौपाटीला यापुर्वी नांव देण्यात आलेले आहे. परंतु त्याचा खुलासा आपल्याकडे काही नाही. आणि प्रशासनालाही तसे काही माहित नाही. विशालजी नेहमी सांगत असतात की, याचे कुठेतरी रेकॉर्ड जतन व्हायला पाहिजे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी इतके सांगुनही चौकांचे नांव, रस्त्यांचे नांव काहीही होत नाही. ती यादी अजुन होत नाही.

**मा.आयुक्त :-** तसेच प्रभाग अधिकाऱ्यांनी सर्व्हे करुन तसे रेकॉर्ड तयार केलेले आहे सर. आपला डाटा तयार केलेला आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यापुर्वी माहिती तशी नाही की, यापुर्वी कुठले तरी नांव देण्यात आलेले होते असे मला एका माणसाचा फोन आलेला होता. म्हणुन मला वाटते माहिती घेऊन आपण याच्या संदर्भातला नंतर निर्णय घेऊ.पुढच्या महासभेत किंवा प्रशासनाने तश्या पध्दतीने खात्री करुन तसा प्रस्ताव द्यावा. हा प्रस्ताव तहकुब करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.९ मध्ये यापुर्वी नामकरण केलेला आहे की नाही प्रशासनाने पुर्ण माहिती घ्यावी आणि पुढील महासभेमध्ये सविस्तर हा प्रस्ताव आणावा. तो पर्यंत विषय क्र.०९ तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मेहरुण तलाव परिसरातील स.नं.४१३ व ४०९ मधिल शिरसोली रोड वरुन मेहरुण तलावापर्यंत पूर्व पश्चिम १० गल्यांना 'लेकसिटी लेन क्रमांक ०१' लेकसिटी लेन क्रमांक ०१ पासुन दक्षिणेकडे श्रीकृष्ण लॉन पर्यंत 'लेकसिटी लेन क्रमांक १० ' असे नामकरण तसेच मेहरुण तलावाच्या लगत लेक्सिटी मधला स्पर्श अपार्टमेंट वडाच्या झाडापासून चिमणीघर ते तलाव ओव्हरफ्लो मंदिरापर्यंतचा ट्रॅक रोडला 'बलेश्वर महादेव मंदिर रोड' असे नामकरण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

प्रशासनाने, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदर परिसरास यापूर्वी नांव दिले गेले आहे किंवा नाही याची माहिति घेवून पूढील सभेत प्रस्ताव सादर करावा.

**सर्वानुमते तहकुब**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.१० :-** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे आव्हाणे शिवार गट नं.७७४/सर्व्हे नं.३१३/१ यास 'समर्थ कॉलनी तपोवन परिसर' असे नाव देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदरचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हे कसे नांव दिले, समर्थ कॉलनी तपोवन परिसर. खरं तर नांव असे पाहिजे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आव्हाणे शिवार गट नं.७७४/सर्व्हे नं.३१३/१ या परिसरामधील नागरिकांचा सदर परिसरास समर्थ कॉलनी तपोवन परिसर असे नांव संबोधणे बाबत दिनांक २३/०५/२०२३ रोजीचा विनंती अर्ज प्राप्त झालेला आहे.

अर्जातील नमुद भुमीअभिन्यास आव्हाणे शिवार गट नं.७७४/सर्व्हे नं.३१३/१ यास सन १९८७ साली मंजूरी मिळालेली असुन सदर भुमी अभिन्यासाच्या प्रतवर नावाचा उल्लेख दिसून येत नसल्याने सदर अभिन्यासातील नागरिकांच्या मागणीनुसार जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील मौजे आव्हाणे शिवार गट नं.७७४/सर्व्हे नं.३१३/१ यास 'समर्थ कॉलनी तपोवन परिसर' असे नाव देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर परिसरास यापूर्वी कोणतेही नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुनच नियमानुसार पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.११ :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय ईमारतीमधील सभागृहाच्या नुतनीकरण करणेचे कामाचे अंदाजीत रक्कम रु.५ कोटी मात्र खर्च शासकीय निधीतुन करणे करीता शासनाकडे प्रस्ताव पाठविणे किंवा सदरचे काम म.न.पा.निधीतुन करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विशेष कोणता आहे ?

**नगरसचिव :-** विषय क्र.११, सभागृहाचा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतु शक्य तो त्याला शासन निधीतुन खर्च करण्यात यावा, जिल्हा नियोजन मंडळाचा निधी. महानगरपालिका निधीतुन एवढा खर्च करण्यात येऊ नये.

**मा.उपमहापौर :-** आपले यासोबत जळगांव महापालिकेच्या ज्या ॲसेटस आहे, जसे प्रभाग कार्यालय आहे,आपले महानगरपालिकेचे काही कार्यालय आहे. बगिचे असेल, त्या ठिकाणी कर्मचाऱ्यांची बसण्याची व्यवस्था असेल, यासाठी महापालिकेने शासनाकडुन जो निधी उपलब्ध करुन किंवा सी.एस.आर.फंडामधुन जर कोणी देणार असेल. तर त्याच्या बाबतीत पण एक सुचना ॲड करण्यात यावी. त्याच पध्दतीने आपल्या नगरसचिव विभागामध्ये आता पर्यंतचे जे डॉकेट येतात महासभेत, ते चांगल्या पध्दतीने स्कॅन करुन आपल्या जे.सी.एम.सी. महापालिकेच्या वेबसाईडवर टाकलेले आहे. अतिशय चांगल्या पध्दतीने नगरसचिव विभागाने ते मेनटेन केलेले आहे. मला असे वाटते की, त्यांचे याठिकाणी अभिनंदन तर केलेच पाहिजे. परंतु असेच आमचे टाऊन प्लॉनिंगचे जे दस्तऐवज आहे, जन्ममृत्युचे काही दस्तऐवज असतील. ते पण अश्याच पध्दतीने सर्व सामान्यांना पाहता यावे व त्याचे उपयोग घेण्यासाठी आपल्या ज्या इतर प्रभागांमध्ये दस्तऐवज असतील कागदपत्र असतील. ते अद्यावत करणेसाठी व ऑनलाईन पध्दतीने समावेश करणेसाठी ती प्रोसेस राबविण्या संदर्भात विचार करण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सभागृहाच्या बाबतीत एक सुचना द्यायची आहे. भविष्यात एक ५-७ वर्षानंतर या सभागृहाची संख्या वाढणार आहे नगरसेवकांची. जसे स्विकृत सदस्याचा आता मागे शासनाचा आदेश झालेला आहे की, आता ७ स्विकृत सदस्य होतील. तर येथे बसायला जी व्यवस्था आहे. त्यांच्यासाठी वेगळी, पत्रकाराची वेगळी व्यवस्था, नगरसेवकांची आपले एच.ओ.डी बसतात त्यांच्यासाठी वेगळी व्यवस्था, या ठिकाणी एक डिजीटल स्क्रिन पाहिजे. भविष्यात काही पी.पी.टी. किंवा आता डिजीटल असल्यामुळे प्रत्येक सदस्याला बोलण्यासाठी माईक असा. आता हे लोकं बसलेले आहे येथे टेबल टाकुन तर यांना बसण्याची व्यवस्था. कॅन्टीन सारखे तेथे एक छोटेसे. भलेही या भिंती थोडे वाढवुन घेतल्या पाहीजे. त्यासाठी त्याचे चांगल्या आर्किटेक्ट कडुन त्याचे प्लॅन करुन त्याचे ईस्टीमेट तयार करुन याला मंजुरी देत आहोत आम्ही. म्हणजे जेणे करुन भविष्यात. हे पहा आता गरम होते येथे कधी कधी.हे येथे पंखा नाही आमच्या डोक्यावर म्हणुन जास्त गरम होते. एक सेंट्रल ए.सी. करण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** चालेल. सेंट्रल ए.सी., ऑडीओ, एल.ई.डी.स्क्रीन, सगळयांना बसण्यासाठी सुसज्ञ व्यवस्था असे एक डिझाईन तयार करुन जेष्ठ सदस्यांना सर्वांना दाखवुन व सर्वांचे विचार घेवुन आपण फायनल करु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** जे विद्यार्थी सभा बघायला येतात किंवा काही महापौरांचे पत्र दिल्यानंतर सभा बघायला येतात.

**मा.आयुक्त :-** आपले सगळयांचे सजेशन घेवुन तयार करु.

**मा.महापौर :-** बोला गोराणे साहेब.

**नगरसचिव :-** मी आपल्यासमोर एक आनंदाची बातमी सांगु ईच्छितो की, या सन २०१८ पासुन आपण सर्व सोबत आहोत. सन्मा.सदस्य, सन्मा.पदाधिकारी, जे ही आयुक्त, उपायुक्त जे ही असतील. आपल्या सर्वांच्या सन्मा.सदस्य, सन्मा.पदाधिकारी, विशेषत: मा.महापौर महोदया, आयुक्त महोदया, मा.उपमहापौर, विरोधीपक्षनेते सुनिलभाऊ महाजन, जेष्ठ सदस्य नितीनभाऊ लढ्ढा आणि माझे नगरसचिव कार्यालयाचे सर्व सहकारी, यांच्या सहकाऱ्याने नाशिक झोन मधील ज्या महानगरपालिका आहे. या महापालिकेमध्ये जळगांव महापालिकेने दि.१८/०९/२०१८ ची पहिली मिटींग पासुन मागच्या मिटींगपर्यंत सर्व मिनीट्स आणि ठराव आपण वेबसाईडवर टाकलेले आहे. म्हणजे नाशिक झोन मध्ये आपली पहिली महानगरपालिका आहे ज्याचे मिनीट्स आणि ठराव आहे. मला एक मिनीट वेळ द्या, कारण माझ्या स्टाफमध्ये प्रामुख्याने माझ्याकडे वर्ग-४ वर कार्यरत फहिम शेख हा एक कर्मचारी आहे. यानी स्वत: याचे एफर्टस घेवुन हे सर्व वेबसाईटवर टाकायचे काम पुर्ण केलेले आहे. तर आपल्याला विनंती आहे. यानंतर जर यदा यथा कदाचित पहायचे असेल तर महापालिकेच्या वेबसाईटवर तंतोतंत मिनीटस आणि ठराव पहायला मिळतील आपल्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी आभारी आहे. धन्यवाद.

**सौ.शुचिताताई हाडा :-** नगरसचिवांचे आणि नगरसचिवांच्या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांचे विशेष अभिनंदन

**मा.महापौर :-** विषय क्र.११ मध्ये सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सर्व सुचनांची प्रशासनने नोंद घ्यावी. विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११६२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रशासकीय ईमारतीमधील माळा क्र.०२ येथे महानगरपालीकेचे सभागृह असुन त्यास २३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यामुळे तेथील फर्निचर, सोफे, टेबल, कार्पेट, ए.सी., पि.ओ.पी. कलरिंग, माईक सिस्टीम, विदयुत फिटींग इ. सर्व गोष्टी जुन्या झाल्यामुळे सभागृहाचे अदयावत पध्दतीने नुतनीकरण करणेबाबत मा.महापौर, नगरसचिव, महानगरपालिका यांनी पत्र देवुन मागणी केलेली आहे. तसेच याबाबत सन्मा.सदस्यांनी देखील वेळोवेळी नाराजी व्यक्त केलेली आहे. तसेच उन्हाळयात सभागृहात खुप गरम होत असल्याने संपूर्ण सभागृहात सेन्ट्रललाईज ए.सी करणेबाबत विदयुत विभागाने कळविले आहे. तसेच सभागृहाचे फर्निचर २३ वर्षेपेक्षा जुने झालेले असल्याने ते बदलविणे आवश्यक आहे.

मनपा प्रशासकीय इमारत मधील मजला क्र.०२ येथील अस्तित्वातील सभागृहाला २३ वर्षाचा कालावधी झालेला असुन त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक झाले आहे. तेथील बैठक व्यवस्था अपुरी असुन भविष्यातील मनपाचे सदस्य संख्या वाढणार असुन त्या अनुषंगाने आसन व्यवस्था, माईक सिस्टिम, सेंट्रलाईज ए.सी. एल.ई.डी. स्क्रीन इ. बाबी आधुनिक तंत्रप्रणालीचा वापरासाठी सुव्यवस्थीत करणेसाठी येणारा अंदाजित (ढोबळ) खर्च हा ५.०० कोटी असुन सदर खर्च हा जिल्हा नियोजन समिती तसेच शासकीय निधी अंतर्गत खर्च करणेस तसेच सदर निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडेस पाठविणेस व निधी प्राप्त न झाल्यास सदरचे काम मनपा निधीतुन करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांनूसार महानगरपालिका प्रभाग समिती क्रमांक ०१ ते ०४ चे कार्यालये सर्व सुविधांसह अदयावत करणे व त्याकामी येणारा खर्च हा जिल्हा नियोजन समिती तसेच शासकीय निधी अंतर्गत खर्च करणेस तसेच सदर निधी मागणीचा प्रस्ताव शासनाकडेस पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.१२ :-** जिओ डिजीटल फायबर प्रा.लि.कंपनीमार्फत जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये टेलिकॉम सर्व्हिस पुरविण्यासाठी पोल टाकणेसाठी परवानगी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मागच्याच सभेत मी या विषयासंदर्भात आवाज उचललेला होता आणि त्या संदर्भात मी अर्ज सुध्दा केलेला होता. परंतु त्याचे उत्तर मला मिळालेले नाही. दुसरा विषय त्यांनी जी अंडरग्राऊंड फायबर टाकुन दिलेली आहे त्याचे काय ? त्यांनी अंडरग्राऊंड केबल टाकलेली आहे. मी हे फोटो दाखवितो अजुन काही फोटो दाखवेल. ही टाकलेली आहे त्यांनी अंडरग्राऊंड. आयुक्त महोदया बघा, अजुन काही फोटोज आहे माझ्याकडे.

**मा.उपमहापौर :-** अंडरग्राऊंड पण टाकले आहे आणि पोल पण मोठे केले आहे. रस्त्यात उभे केलेले आहे रस्त्यात.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नंतर कोणत्या याच्यामध्ये काय केलेले आहे. फक्त १.५ कोटी रुपये आपल्याला देत आहे ते. आणि हा आपला करोडोंचा वसुल बुडत आहे याचे काय ?

**मा.उपमहापौर :-** असाच प्रस्ताव मागच्या वेळेस आला होता. १२ कोटी आपण त्यांना भरायला सांगितले होते.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १२ कोटीची त्याला डिमांड नोट दिली होती. १२ कोटीची डिमांड नोट त्यानी भरली, हो सांगितले तोपर्यंत ते काम करुन घेतले आणि नंतर दाखविले की, मला परवडत नाही. मग नंतर सांगितले की, मला पोल टाकायचे

आहे. पण अंडरग्राऊंड फायबर त्यानी टाकुन घेतलेली आहे. जर आपले १२ कोटीचे नुकसान होत आहे तर त्याची जबाबदारी कोणाची. ते कसे वसुल करणार.

**मा.उपमहापौर :-** त्यांनी खुपच रस्ते खराब केले हो.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** सन्मा.सभागृहाला याबाबत माहिती देतो. यापुर्वी आपण अनेक प्रायव्हेट कंपन्यांना नेटच्या जाळयासाठी व वेगवेगळया केबल टाकण्यासाठी परमिशन दिलेल्या होत्या. परंतु मागचा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हे ते नाही. आता जे दिलेले आहे त्यानुसार बोला. आपण दिले मग ते स्टार्ट केले मला सर्व माहिती आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** दि.१७/०२/२०२२ महासभेने व आपण महासभेसमोर या कामाचे दर निश्चितीसाठी आपण प्रस्ताव ठेवलेला होता की, आपले रस्ते ऑलरेडी खराब होते. त्यामुळेच केबल टाकण्यात यावी की, परत रस्ते खोदण्याची आवश्यकता राहणार नाही. त्यावेळेच्या रेटनुसार आपण जीओला पत्र दिलेले होते. १.२५ कोटी रुपये भरण्याचे. १.२५ कोटी रुपये त्यांनी भरले असते तर आपण त्यांना परमिशन देणार होते. परंतु त्यांनी पैसे भरले नाही. म्हणुन आपण त्यांना कुठलीही परवानगी दिली नाही. फक्त जिओलाच नाही आपण कुठलीही कंपनीला कुठलीही लेखी परमिशन दिलेली नाही. याच्यानंतर आपली जी तक्रार आहे. यानंतर आपण स्मार्ट पोल उभारण्याची एक परवानगी दिलेली आहे. शासनाचा जी.आर. होता.

**श्री.अश्विन सोनवणे :-** तो स्मार्ट पोलचा विषय आपण नंतर करु. ती त्यांनी जी अंडरग्राऊंड टाकले आहे.

**मा.उपमहापौर :-** शासन निर्णय काय आहे ते सांगा मला. शासन निर्णय काय झालेला आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** शासन निर्णय असा आहे की, आज रोजी लाईट ऑफ वे. आपल्याला शासन निर्णय दि.२८/०२/२०१८ च्या चलती वाहने प्रकल्पाची अंमलबजावणी आणि ई-गव्हर्नन्स सेवांचा रिटर्न च्याबाबतीमध्ये शासन निर्णय प्राप्त झाला होता. त्याच्या अनुषंगाने आपल्याला कार्यकारी अधिकारी कार्यालयातुन आपल्याला सुचना व पत्र मिळालेले होते की, ही शासनाची मोठी स्कीम आहे. ई-गव्हर्नन्ससाठी आपल्याला प्रत्येक ग्रामपंचायत पासुन शहरापर्यंत जी मोठे शासकीय कार्यालय आहेत. त्यांना एकमेकांना जोडणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी आपण हे थांबवु शकत नव्हतो. म्हणुन हा प्रस्ताव आपण महासभेपुढे ठेवलेला होता. आणि स्मार्ट पोलला त्यावेळेस परवानगी दिलेली होती. त्याबद्दल अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. काही लोकं दुकानांसमोर पोल उभारला तर काही डॉक्टर लोकांच्या पुढे उभारलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेब पुर्ण सांगा, जो जी.आर.होता त्याच्या मध्ये स्पष्ट म्हटलेले होते. पोल टाकतांना काय काय खबरदारी घ्यायची ते नमुद होते. कश्या पध्दतीने ते टाकल्या गेल्या पाहिजे. त्याचे त्याच्यामध्ये निर्देश देण्यात आलेले होते. आता अश्विनभाऊंची जी मागणी आहे की, आता ते अंडरग्राऊंड ड्रेनेज टाकलेले आहे किंवा जे पोल उभारले गेलेले आहे. तर तुम्ही ते काम चालु असतांना खातिरजमा केलेली होती की, ते सांगा. त्यात स्पष्ट नमुद आहे त्याची खातिरजमा झाली का ते सांगा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** बरोबर आहे. आपण स्मार्ट पोल उभारण्यासाठी ती परमिशन दिलेली होती. त्यानंतर महासभेमध्येच त्यावर ऑब्जेक्शन आले होते. अनेक तक्रारी आल्या आणि आपण ती परमिशन त्या वेळेला थांबवली की, या स्मार्ट पोलचे काम करण्यात येऊ नये. तेव्हा पासुन त्यांचे काम बंद आहे. आणि त्याच्यात अनेक अश्या तक्रारी होत्या की, शहरातल्या तक्रारी होत्या. त्या अनुषंगाने आता जो जी.आर. काढलेला आहे. त्या जी.आर.मध्ये त्यांनी पुर्णपणे गाईडलाईन्स दिलेल्या आहे. आता त्यांनी, यापुर्वी आपण त्यांची आकारणी करत नव्हतो. आता आपल्याला आकारणी करण्याचा अधिकार सुध्दा ठेवलेला आहे. आणि ते ही रस्ते खराब होतात म्हणुन ओ.एफ.सी.केबल अंडरग्राऊंड न टाकता, जी.आर.ए.चे पोल उभारणी करुन लाईन टाकायची आहे. अश्या प्रकारचा निर्णय आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ती जी टाकली अंडरग्राऊंड त्याचे काय ?

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ती फक्त ६० पोल साठी होती.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ६० पोल नाही. पुर्ण शहरात त्यानी अंडरग्राऊंड केबल टाकलेली आहे.

**मा.उपमहापौर :-** सभागृहाने जो ठराव केला होता ना, त्या ठरावाच्या अनुषंगाने आपल्याला पैसे भरायचे सांगितले होते. त्यानी पैसे काही भरले नाही. आणि प्रशासनाची अशी दिशाभुल केली की, त्याचा ठराव झालेला आहे. मी पैसे भरणार आहे. तर रात्रंदिवस काम चालु ठेवुन त्यानी त्याचे जवळपास ५०% काम करुन टाकलेला आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १२ कोटीची डिमांड होती त्याचे काय झाले ती कुठे गायब झाली.

**मा.उपमहापौर :-** त्यानी तर युज केली ना ती.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मग त्याला काम का दिले.

**मा.उपमहापौर :-** आता सभागृहाने ठरविल्याप्रमाणे शहरात त्यानी केलेली कामे. त्याच्या संदर्भात कार्यवाही प्रस्तावीत करुन आजच त्याच्यावर कार्यवाही करावी. नाही तर त्याचा ठराव रद्द करावा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मी आता सभागृहाला सांगु ईच्छितो की, आपण जी डिमांड नोट भरण्याची.

**श्री.अश्विन सोनवणे :-** त्यांचे भाडे रु.१०००/- कोणी ठरविले. त्यांचे भाडे रु.१०००/- घ्यायचे हे कोणी ठरविले.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** शासनाने जी.आर.मध्ये म्हंटलेले आहे ना भाऊ.

**श्री.अश्विन सोनवणे :-** १५ वर्षाकरीता रु.१००/- प्रती पोल भाडे द्या म्हणुन.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-**शासनाने आपल्याला जे परिपत्रक दिलेले आहे. त्याच्यामध्ये संपुर्ण दर त्यांनीच ठरवुन दिले. पुर्वी आपण रेट ठरवत होतो. आपला डांबरी रस्ता असेल, कॉंक्रीट रस्ता असेल, कच्चा असेल, पक्का असेल. तर त्या अनुषंगाने आपण पुर्ण साढेतिन मिटरच्या बिडसाठी येणारा खर्च कॅलक्युलेट करुन पैसे भरायला लावत होतो. परंतु शासनाने हे सर्व बंद करुन पुर्ण महाराष्ट्रभर एकच दर ठरवुन दिलेले आहे. ते पोल टाकण्यासाठी पोलचे भाडे १५ वर्षासाठी ठरविलेले आहे. आणि त्यासाठी रु.१०० /- प्रती कि.मी.चे भाडे या ठिकाणी त्यांनी लिहुन दिलेले आहे. त्याच्या अनुषंगानेच आपण हा प्रस्ताव दिलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** साहेब हे आता प्रस्ताव मंजुर करण्यासंदर्भातला विषय आहे तो. हा नंतरचा विषय झाला हा.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** मी तेच सांगतो, आपण जीओला जे पत्र दिलेले होते की, तुम्ही एवढे कोटी रुपये भरा. त्यानंतर आपल्याला परवानगी देण्यात येईल. असा ठराव झालेला होता. आपण त्यांना त्यासाठी पत्र दिले. आता त्यांचा जो रुट आहे त्या रुटवर जर त्यांनी काम केलेले असेल. तर नक्कीच त्याच्यावर कार्यवाही करण्यात येईल.

**श्री.अश्विन सोनवणे :-** कधीचेच काम करुन टाकले आहे त्यांनी पुर्ण शहरात वायरी टाकुन दिलेल्या आहे त्यांनी. टाकुन दिली आहे. पुर्ण शहरात टाकली आहे. तुम्हाला माहित नाही. फोटो काढले मी पुर्ण शहराचे.

**मा.उपमहापौर :-** थोडं फार भाग सुटला असेल पण ७०% शहरात त्यांनी पोल टाकलेले आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** ७० ते ८०% शहरात फायबर टाकुन दिलेली आहे त्यांनी.

**मा.उपमहापौर :-** सोनवणे साहेब जेव्हा रिटायरमेंटला होते. त्यावेळेला मी त्यांना सगळे फोटो, व्हिडीओज, कुठे कुठे काम चालु आहे. आपले सन्मा.नगरसेवक चेतन सनकत यांच्या घराजवळ जेव्हा त्या पोलच्या संदर्भात काम चालु होते. तेथे मोठा खड्डा खोदला गेला होता. आणि तेथे ४ दिवस काम बंद असल्यामुळे ॲक्सीडन्ट झाला होता. त्यावेळीही मी ते व्हिडीओ साहेबांना पाठविलेले होते.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** नाही, याच्या व्यतिरिक्त जर काम केलेले असेल. आपण जे परवानगीसाठी प्रस्ताव ठेवलेला होता.

**श्री.अश्विन सोनवणे :-** मी फोटो दिलेले आहे. असेल काय नसेल, त्यांच्यावर कार्यवाही व्हायला पाहिजे वसुली व्हायला पाहिजे त्यांच्याकडुन.

**श्री.चेतन सनकत :-** जे आता कुलभुषण भाऊंनी सांगितले, तर दिड वर्षा अगोदर झालेला किस्सा उपमहापौर साहेब सांगत आहे.

**मा.आयुक्त :-** सोनगिरे साहेब, याचे पुरावे पाहुन याची चौकशी करावी आणि त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करायची. ते केबल टाकणे कसे बंद होणार आहे किंवा तोडता येतील. जर कधी दंड नाही भरला तर, त्याची आपण कार्यवाही करु.

**मा.उपमहापौर :-** आणि तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** हो, तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने अवलोकन करुन त्याचा अहवाल ८ दिवसात महापौर कार्यालयात सादर करावा. तात्काळ कार्यवाही जिओ डिजीटल फायबरवर प्रशासनाने करावी. त्या अनुषंगाने विषय क्र.१२ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जिओ डिजीटल फायबर प्रा.लि.कंपनीमार्फत जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये टेलिकॉम सर्व्हिस पुरविण्यासाठी पोल टाकणेसाठी परवानगी देणेबाबत प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनूसार जिओ डिजीटल फायबर प्रा.लि.कंपनीमार्फत जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये टेलिकॉम सर्व्हिस पुरविण्यासाठी यापूर्वी अनेक भागात भुमिगत केबल टाकण्यात आलेली आहे. प्रशासनाने, शहराच्या प्रत्येक भागात सर्वे करुन सदर कामाची सविस्तर तपासणी केल्यानंतर पूढील महासभेत प्रस्ताव सादर करावा.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते तहकुब**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल** | **-** | **३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | |

**नगरसचिव -विषय क्र.१३ :-** जळगांव MIDC भागातील पुर्वीचे असलेले अग्निशमन केंद्र अदयावत करणे कामी नविन २ अग्निशमन वाहन अत्याधुनिक साहित्य सामुग्रीसह व अग्निशमन केंद्र सर्व सुविधांसह तयार करुन दुरुस्ती करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** MIDC भागातील पुर्वीचे असलेले अग्निशमन केंद्र अद्यावत करणे कामी प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे परंतु सोबत एक छोटीशी सुचना पण मांडायची आहे मॅडम. आपले जळगांव शहर हे ६ लाख लोकसंख्येचे शहर आहे. परंतु या ठिकाणी त्यानुसार जी अग्निशमन केंद्र असली पाहिजे त्या माझ या माहितीनुसार ८ असली पाहिजे. पण आपल्याकडे ४ च आहे. तरी आपण शासन दरबारी अजुन अग्निशमन केंद्रासाठी प्रस्ताव पाठविलेला होता. शासनाकडुन त्यासाठी निधी देखील अनुज्ञेय झालेला होता. त्या संदर्भात जिल्हाधिकारी व प्रशासनाने महानगरपलिकेला पत्र देखील दिले होते. परंतु त्याच्यामध्ये काही समस्या उत्पन्न झाल्या. राजकीय हेतुपुरस्कर तो प्रस्ताव रद्द केला गेला. परंतु महानगरपालिका प्रशासनाला विनंती आहे. पिंप्राळा भागामध्ये कुलभुषण पाटील उपमहापौर असले तरी त्याठिकाणी १ ते १.२५ लाख संख्येचे ते उपशहर आहे. तरी त्या ठिकाणी अग्निशमन केंद्र जे प्रस्तावीत केले होते. महानगरपालिका प्रशासनाने त्याचा पाठपुरावा करुन लवकरात लवकर त्या भागामध्ये अग्निशमन केंद्र कश्या पध्दतीने उभारता येईल. त्याच्या संदर्भात पाठपुरावाकरुन लवकरात लवकर पिंप्राळा भागामध्ये अग्निशमन केंद्र उभारण्याच्या बाबतीमध्ये प्रयत्न करुन पाठपुरावा करुन ते पुर्ण करावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** शिवाजी नगरमध्ये सुध्दा एक आरक्षित जागा आहे आपली गेंदालाल मिलची. त्याच्या संदर्भामध्ये टाऊन प्लॉनिंगने मला माहिती द्यायची की, आता काय पोजिशन आहे. माझी जी मागची माहिती आहे. हायकोर्टने पैसे भरायला सांगितले होते. त्यात काही एक हप्ता भरला,त्याच्यानंतर पुढचे पैसे भरले नाही. त्या जागेचे रिजर्वेशन, हे रिजर्वेशन ठरले आहे. अशी माझ्याकडे माहिती आहे. याच्या व्यतिरिक्त प्रशासनाने गांभिर्याने लक्षात घ्यावे. शिवाजी नगर परिसर पलीकडे लाख लोकांच्या वस्तीचा भाग आहे. त्या भागात अपघाताची शक्यता आहे, हायजीनची

शक्यता आहे. अश्या वेळेस त्या ठिकाणी महानगरपालिकेने आरक्षित केलेली जागा फक्त यांच्या दुर्लक्षामुळे किंवा इतर व्यक्तींमुळे ही रिजर्व झालेली आहे अशी माहिती आहे.त्या संदर्भात प्रशासनाने खुलासा करावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात मा.महापौरताई माहिती अशी आहे की, हे आरक्षण व्यपगत होण्याच्या दृष्टीकोणातुन जमिन मालक हायकोर्टात गेला होता. हायकोर्टाने ते आरक्षण व्यपगत केलेले आहे. आरक्षण व्यपगत झाल्यानंतर महानगरपालिका ही सुप्रीम कोर्टात गेली आणि सुप्रीम कोर्टात व्यपगत झालेले आरक्षण रिस्ट्रक्ट केलेले आहे. आणि तातडीने त्या संदर्भात भुसंपादनाचा मोबदला भरुन ती जागा ताब्यात घेणेचे निर्देश दिलेले आहे. तर त्या संदर्भात सुध्दा अजुन पर्यंत प्रशासन कुठलीही कार्यवाही करत नाही. अत्यंत गंभिर असा विषय आहे. ज्याची दखल व्यपगत झालेल्या रिजर्वेशनची सुप्रीम कोर्टाने सुध्दा दखल घेतली त्याच्यात की, हे आरक्षण शहराच्या विकासाच्या दृष्टीकोणातुन आवश्यक आहे. तरी सुध्दा महानगरपालिका प्रशासन त्याचा भुसंपादन मोबदला भरण्याच्या संदर्भात कुठल्याही गांभिर्याने दखल घेत नाही.तर त्या विषयावर सुध्दा आपण व्यक्तीश: लक्ष घालावे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१३ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.१६/०२/२०२३ रोजी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य जिल्हा दौऱ्या दरम्यान जळगांव विमानतळ येथे मा.ना.श्री.उदयजी सामंत उदयोगमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे समवेत जिल्हाधिकारी जळगांव, आयुक्त मनपा जळगांव, मु.का.अ.जिल्हा परिषद,जळगांव, शहर अभियंता मनपा,जळगांव, मुख्य अभियंता मऔविम, छ.संभाजी नगर व अधिक्षक अभियंता, मऔविम नाशिक उपस्थित होते. सदर विषयाबाबत झालेल्या सविस्तर चर्चे नुसार म.औ.वि.म.साठी अस्तित्वात असलेले फायर स्टेशन आधुनिक / अदयावत करणे, अग्निशमन केंद्राकरीता ०२ वाहनांची व्यवस्था करणे व त्याकामी लागणारा निधी हा जिल्हा नियोजन समिती कडून उपलब्ध करुन घेणे बाबत व संपुर्ण फायर स्टेशन हे जळगांव शहर महानगरपालिक जळगांव मार्फतच कार्यरत करणे बाबत मौखिक सुचना देण्यात आलेनुसार कार्यवाही योजावी याबाबत निर्देश / सुचित केलेले आहे. तसेच मा.मुख्य अग्निशमन अधिकारी व अग्निशमन सल्लागार म.औ.वि.म. मुंबई यांचे पत्र जा.क्र.मऔविम/अग्निशमन/ए-७५७७०/२०२३ दि.०९/०३/२०२३ नुसार दि.१६/०२/२०२३ रोजी “महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स” च्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जळगांव जिल्हा विकास परिषदेच्या जळगांव येथील चर्चा सत्रात देखिल उदयोजकांमार्फत अग्निशमन केंद्राचा विषय मांडण्यात आला. सदर चर्चा सत्रास मा.ना.श्री.उदय सामंत, मंत्री उदयोग, महाराष्ट्र राज्य हे देखिल उपस्थित होते. मा.उदयोग मंत्री यांच्या जळगांव दौऱ्याच्या परतीच्या प्रवासादरम्यान जळगांव विमानतळ येथे सदर विषयाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आले नुसार दरम्यान मा.मंत्री उदयोग यांनी मऔविम जळगांव औदयोगिक क्षेत्रातील जळगांव महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यात आलेले अग्निशमन केंद्र येथे कमीत कमी २ अग्निशमन वाहने आवश्यक साधन सामुग्री व प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची व्यवस्था करुन अग्निशमन केंद्र तातडीने जळगांव महानगरपालिकेमार्फतच कार्यान्वित करण्यात यावे असे निर्देश दिले.

म.औ.वि.म. अग्निशमन केंद्र अदयावत करीता १ अग्निशमन वाहन- वॉटर टँकर सह हाय-लो प्रेशर पंप, एक्सेंटशन लॅडर आत्याधुनिक साहित्य सामुग्री व उपकरणांसह व १ मल्टीपर्पज अग्निशमन वाहन- डी.सी.पी., फोम व $Co_2$ इ. अत्याधुनिक साहित्य सामुग्री व उपकरणांसह असे एकूण २ अग्निशमन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. म.औ.वि.म.जळगांव येथील अग्निशमन केंद्राचे बांधकाम सुमारे ३० वर्षा पुर्वीअसल्याने ८ ते १० वर्षापासून उक्त अग्निशमन केंद्र बंद स्थितीत असल्याने सदर अग्निशमन केंद्राकरीता अग्निशमन कार्यालय, वाहन तळ, अधिकारी/कर्मचारी क्वॉटर्स् इ.इमारतीची दुरुस्ती, सह इलेक्ट्रीक फिटींग, पिण्याच्या पाण्याचे नळ कनेक्शन, अग्निशमन वाहन भरणे करीता पाण्याचे नियोजन, संडास / बाथरुम, ओहरहेड टँक, दरवाजे, खिडक्या, संपुर्ण रंगकाम करणे आवश्यक आहे. याकरीता निधी जिल्हा नियोजन समिती मार्फत रु. अंदाजे ५ कोटी मात्र प्राप्त करुन घेण्यात येणार असून संबंधीत विभाग सार्वजनिक बांधकाम, पाणी पुरवठा, विदयुत इ.विभाग प्रमुखांना खर्चाचे अंदाजपत्रक मागविणेकामी आदेश होणे कामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच अग्निशमन अधिकारी यांनी प्रस्तावित केलेनुसार महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ (MIDC) जळगांव येथील स्थित असलेल्या अग्निशमन केंद्राचे बळकटीकरण व अदयावत करणेचे काम जिल्हा नियोजन समिती जळगांव यांचे कडून प्राप्त होणारे निधीतुन करुन घेणेकामी मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१४ :-** जळगांव सिल्लोड छत्रपती संभाजीनगर शहराकडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रं.७५३ F वर मनपा हद्दीत पथदिवे लावून प्रकाश व्यवस्था करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा हा प्रस्ताव मान्य करण्यात एक अडचण एवढीच आहे. आता प्रस्ताव जो आहे. मनपा निधीतुन निर्णय घेण्याच्या संदर्भातील ही भुमिका प्रशासनाने सभागृहासमोर ठेवलेली आहे. परंतु या संदर्भात मा.खासदार महोदय श्री.उन्मेशदादा पाटील यांची भेट घेतली होती आणि विनंती केली होती. आणि त्यांनी आश्वस्तही केलेले आहे. आणि १५ दिवसापुर्वी एका कार्यक्रमाच्या निमित्ताने भेट झाली होती. त्यावेळेला त्यांनी सांगितले की, निविदा प्रक्रिया सुध्दा सुरु आहे. परंतु निविदा प्रक्रिया सुरु आहे किंवा नाही याची खात्री अजुन पटलेली नाही. तरी सुध्दा या संदर्भात मा.खासदार महोदयांना आपण प्रशासनामार्फत मा.महापौरताई यांनी पत्र व्यवहार करुन किंवा व्यक्तीश: बोलुन तशी विनंती करावी. आणि त्यांनी ते मान्य ही केलेले आहे की, पथदिव्यांची व्यवस्था त्यांच्या माध्यमातुन करुन देतील आणि मेनटेनन्सची जबाबदारी ही महानगरपालिकेची राहिल. फक्त महानगरपालिका निधीतुन न करता खासदार निधी किंवा डी.पी.डी.सी.तुन करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनेला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ यांनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी व विषय क्र.१४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** त्याच रस्त्याबाबतीत माझी एक सुचना आहे. दोघी बाजुस मोठमोठी गटार तेथे सोडलेली आहे. पावसाळयाचे दिवस आहे आता. परंतु तेथे कुठेही त्या पाण्याची विल्हेवाट लावण्याची तरतुद केलेली नाही. काल एवढी तेथे गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे. २ फुट पाणी होते तेथे. बघा तेथे आपण सुशोभिकरण करतो आहे. आणि ती गटार तशी सोडुन देतो आहे. पाण्याची कुठेही विल्हेवाट लावलेली नाही.

**मा.महापौर :-** प्रशासनाने याची नोंद घ्यावी. हा जो प्रश्न आहे. त्याची पाहणी करुन त्याच्यावर काय कार्यवाही करता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काल जी परिस्थिती तांबापुरात झाली. त्याला सुध्दा मा.महापौर महोदया, हायवेच्या दोघी बाजुला पॅरेलल सर्व्हीस रोड आहे. म्हणजे सिंधी कॉलनीचा कॉर्नर तर पुढे येणारा तालाब, तर तितपर्यंत दोन्ही बाजुला जर गटारी झाल्या तर ती पर्यायी व्यवस्था सुध्दा उपयोगी पडु शकते कारण हा हायवे क्रॉसींगचा स्पॅन जो आहे तो जवळपास ८० फुटाचा आहे. आणि ८० फुटाच्या स्पॅन मध्ये खालती जाऊन काम करणे तसे खुप धोकेदायक आहे. काल सुध्दा आमच्या कर्मचाऱ्यांनी जे प्रयत्न केले. त्याची परिस्थिती पाहता असे वाटते होते की, जर कधी तो चोकअप झालेला काम करत असतांना चोकअप उघडला गेला आणि पाण्याचा प्रवाह इतका मोठा होता मागुन की, कर्मचारी त्यात वाहुन सुध्दा गेला असता. त्याच्यासाठी पर्यायी व्यवस्था ही सिंधी कॉलनी पासुन तर त्या नाल्यापर्यंत आणि इकडे ईच्छादेवी पासुन ते तिकडच्या नाल्यापर्यंत दोघी बाजुने गटारींचा युज करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११६५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, छत्रपती संभाजीनगर शहराकडे जाणाऱ्रा राष्ट्रीय महामार्ग क्रं.७५३ F हा जळगांव शहराच्या मनपा हद्दीतून जात असून शहरातील नेल्सन मंडेला चौक ते मानराज मोटर्स पर्यंत महामार्ग काम राष्ट्रिय महामार्ग विभाग धुळेच्या कार्यक्षेत्रात येत असल्याने या महामार्गावर पथदिव्यांची व्यवस्था करणेबाबत राष्ट्रिय महामार्ग विभाग धुळे यांना कळविण्यात आले असता त्यांचेकडील दि.०६/०२/२०२३ रोजीचे पत्र मनपास प्राप्त असून पत्रान्वये त्यांनी राष्ट्रिय महार्गा क्रं.७५३ F वर त्यांच्या विभागाच्या कार्यक्षेत्रात येत असलेल्या रस्त्यावर म्हणजेच नेल्सन मंडेला चौक ते मानराज मोटर्स पर्यंत जळगांव मनपा हद्दित प्रकाश व्यवस्था तथा पथदिवे व्यवस्था मनपामार्फत करणे त्यांची देखभाल दुरुस्ती करणे तसेच विज देयकाची अदायगी मनपामार्फत करणेबाबत कळविलेले आहे.

सार्व.बांधकाम विभाग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण प्रकल्प अंमलबजावणी युनिट जालना या विभागाच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिका हद्दीतील मानराज मोटारपासून कुसुंबा नाक्यापर्यंतचा रस्ता येत असल्याने मानराज मोटारपासून कुसंबा नाक्यापर्यंत पथदिव्यांची व्यवस्था करणेबाबत त्यांना कळविले असता त्यांच्याकडुन कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही.

सदरहु रस्ता हा महाराष्ट्र औदयोगीक विकास महामंडळाच्या कार्यक्षेतातुन जात असल्याने पुर्वी त्या रस्त्यावरील पथदिव्यांची देखभाल दुरुस्ती, वीज देयकाची अदायगी महाराष्ट्र औदयोगीक विकास महामंडळामार्फत यांचेमार्फत करण्यात येत होती. राष्ट्रीय महामार्ग घोषीत झाल्यानंतर संपुर्ण जुनी यंत्रणा महामार्गाचे काम करीत असतांना निष्कासीत करण्यात आलेली आहे. पुर्वीच्या या महार्गावरील महाराष्ट्र विकास महामंडळावर पथदिव्यांची व्यवस्था करणे व तदनंतर त्यांची देखभाल दुरुस्ती करणे त्यांच्या विज देयकाची अदायगी करणे हे काम महाराष्ट्र औदयोगीक महामंडळानेच करणे अपेक्षीत आहे. हा रस्ता राष्ट्रीय महामार्गातुन घोषीत झालेला आहे. सदरहु रस्त्यावर मनपामार्फत पथदिव्यांची सुविधा पुरवण्याची असल्यास मनपामार्फत राष्ट्रिय महामार्गावर पथदिव्यांची व्यवस्था करणे तदनंतर त्यांची देखभाल दुरुस्ती करणे, वीज देयकाची अदायगी करणे कामी मनपामार्फत खर्च करणे ही बाब धोरणात्मक असल्याने व या कामी अपेक्षित खर्च जास्त येणार असल्याने राष्ट्रिय महामार्ग क्र. ७५३ F नेल्सन मंडेला चौक ते मानराज मोटर्स पर्यंत मनपामार्फत पथदिव्यांची व्यवस्था करणे त्यांची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणे, वीज अदायगी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांनूसार सदरहु काम मा.खासदार,श्री.उन्मेश भैय्यासाहेब पाटील यांचे खासदार निधी अंतर्गत तसेच जिल्हा वार्षीक निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने खासदार निधी संदर्भात मा.खासदार,श्री.उन्मेश भैय्यासाहेब पाटील यांना पत्राव्दारे विनंती करावी.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१५ :-** मा.खासदार श्री.उन्मेश भैय्यासाहेब पाटील जळगांव यांचे खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत जळगांव शहरात विविध ठिकाणी हायमास्ट पोल उभारणीच्या कामांना मान्यता मिळणे व नाहरकत दाखला देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करावा परंतु याच्यातल्या ज्या अटीशर्ती आहे, १८ अटीशर्ती दिलेल्या आहे. त्या अटीशर्तींचे पालन करण्याची जबाबदारी सार्वजनिक विभागाची व विद्युत उपअभियंता आणि महानगरपालिकेच्या उपअभियंता यांच्यावरती ती जबाबदारी फिक्स करण्यात यावी. कारण काय होत सार्वजनिक विभागाच्या माध्यमातुन हे हायमस्ट उभे केले जातात. ३ वर्षाचा त्याचा मेनटेनन्सचा कॉंट्रॅक्ट असतो. परंतु त्याच्यानंतर वर्ष दोन वर्षानंतर पुन्हा काही लाईट बंद पडले, तर ते त्याला काही रिस्पॅंड करत नाही. आणि सार्वजनिक विभागही त्याची जबाबदारी स्विकारत नाही. दोघांवरती ती जबाबदारी फिक्स करण्यात यावी. जेणे करून या ज्या अटीशर्ती आहे याचे तंतोतंत पालन करता येईल.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** महापौरताई, थोडी दुरुस्ती करायची आहे याच्यामध्ये विषय क्र.१६ आहे. श्रध्दा कॉलनी अत्तरदे यांच्या घराजवळ, तर श्रध्दा कॉलनी येथे दत्त मंदिर, अ.क्र.१६, फक्त श्रध्दा कॉलनी दत्त मंदिर एवढी दुरुस्ती करायची आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु कसे आहे महापौरताई, आता ठिक आहे, आलेले विषयांना आपण मान्यता देतो आहे. परंतु याच्यावरती कुठेतरी निर्बंध लावणे गरजेचे आहे. कारण एकीकडे आपण उर्जा बचतीचे धोरण स्विकारलेले आहे. आपण एल.ई.डी.मध्ये कन्वर्ट करुन याच्या संदर्भात जे हायमस्ट वरती ३ लाईट लागतात. साधारणता ८५-८५ व्हॅटचा एक लाईट असतो. साधारणता २९५ व्हॅटचा होतो. आणि २९५ व्हॅटची जर कधी लाईट ११ तास ही कार्यरत असले, तर साधारणता

रु.२२/- प्रतिदिवस एका पोल वरती खर्च येतो. याचे जर कॅलक्युलेशन केले तर साधारणता जळगांव शहरामध्ये जवळपास ५०० असे पोल उभारले गेलेले आहे. आणि याच्यामुळे वर्षाला जवळपास ३६ लाख रुपये हे महानगरपालिकेला भरावे लागतात. प्रॉब्लेम काय होतो. म्हणजे अनावश्यक, यापुर्वी सुध्दा शहर होत. शहरामध्ये पथदिव्यांची व्यवस्था होती. परंतु हायमस्ट ही फॅशन नव्हती. आता काय झालेले आहे याच्यामुळे सुनिलभाऊंच्या प्रभागात लागलेले आहे मला वाटते माझ्याही प्रभागात पाहिजे. माझ्या प्रभागात लागले, बंटीभाऊंना वाटते माझ्याही प्रभागात पाहिजे. ही एक नगरसेवकांचे असते दुसरी नागरीकांची असते की, एका गल्ली मध्ये लागली आहे तर दुसऱ्या गल्लीत ही नागरीक म्हणतात की, आमच्या गल्लीत पण पाहिजे. म्हणजे अनावश्यक काम महानगरपालिकेवरती आर्थिक बोझा वाढविण्याचा प्रकार वाटत आहे. कालांतराने मेनटेनन्सचा पार्टही आपल्यावर येतो. मेनटेनन्स ३ वर्ष ही मक्तेदाराची जबाबदारी असतांना सुध्दा मक्तेदार याच्या मेनटेनन्सवर लक्ष देत नाही. पर्यायाने काय होते, नागरीक नगरसेवकांच डोक खातात, नगरसेवक आपल्या अधिकाऱ्यांच डोक खातात.आणि आपले अधिकारी त्याच्यावरती ३ वर्षाचा कॉन्ट्रॅक्ट पिरयेड त्याचा असल्याकारणाने महानगरपालिकेचा अधिकारी त्यांना विनंती करतो तो काम करत नाही. नगरसेवकांचा रोष अधिकाऱ्यांवर वाढतो, तर मला वाटत याच्या बाबतीत आता मंजुरी जी देतो आहे. परंतु भविष्यात याच्या बाबतीत विचार करणे गरजेचे आहे. याची संख्या कुठेतरी, एखादे चौक आहे, निश्चितपणे लावायला हरकत नाही. परंतु गल्ली बोळ जिथे वाटेल तिथे. अश्या पध्दतीच्या मागण्या येतात. आणि त्या मागण्या मान्य केल्याने, जरी ते आमदार निधीतुन मिळत असेल, खासदार निधीतुन मिळत असेल. डी.पी.डी.सी.मधुन मिळत असेल. परंतु त्याचा ईलेक्ट्रीसिटीचा भ्रुदंड जो आहे. तो या महानगरपालिकेवर पडत असतो. ज्याच्यामुळे महानगरपालिकेचे आर्थिक नियोजन जे आहे. ते कोसळत असते. याचा गांभिर्याने प्रशासनाने पुढे विचार करावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.खासदार श्री.उन्मेश भैय्यासाहेब पाटील जळगांव यांनी सुचित केलेनुसार उपअभियंता, विदयुत उपविभाग सा.बां. विभाग जळगांव यांचेकडील पत्र क्रं./जाविक्रवि/३८०/२०२३ दिनांक ४/०५/२०२३ अन्वये जळगांव शहरात विविध ठिकाणी हायमास्ट पोल उभारणीच्या कामांना मान्यता मिळणे व नाहरकत दाखला मिळणेबाबत मागणी केलेली आहे. ती कामे खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.५ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| २ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१५ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ३ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१८ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ४ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१९ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ५ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०९ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ६ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०८ मध्ये आणि गट नं.३३ पिंप्राळा शिवार लाड मंडळ SMIT जवळ ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ७ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०१ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ८ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०२ मध्ये ०२ नग हायमास्ट बसविणे. |
| ९ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१६ ब येथील गणेश कॉलनी,साईबाबा मंदिराजवळ, लक्ष्मी नगर येथे हायमास्ट बसविणे. |
| १० | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१७ ब येथील म्हाडा कॉलनी कॉर्नर मातोश्री हॉटेल जवळ तसेच साईबाबा मंदिरा जवळ, लक्ष्मी नगर येथे हायमास्ट बसविणे. |
| ११ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१७ ड येथील शांतिनिकेतन चौक अयोध्या नगर आणि माऊली मित्र मंडळ यमुना नगर येथे हायमास्ट बसविणे. |
| १२ | जळगांव शहरातील शिवाजी नगर पोलिस चौकी मागील शिव मंदिराजवळ आणि धडपड परिसर मितेश चौधरी यांच्या घराजवळ चौक येथे हायमास्ट बसविणे. |
| १३ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१३ ड येथील सर्वे नं.४१२ पतंजली दुकानाजवळ नेहरु नगर आणि सर्वे नं.४४९ रुंदावण बार्डन मोहन नगर येथे हायमास्ट बसविणे. |
| १४ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१४ क येथील गायत्री नगर चौक आणि गणपती नगर चौक येथे हायमास्ट बसविणे. |
| १५ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१४ ड येथील गुगे पाटील ट्रान्सपोर्ट रामनगर आणि पाणी पुरवठा कार्यालय, मेहरुण येथे हायमास्ट बसविणे. |

| | |
|---|---|
| १६ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१२ ब येथील चर्चजवळ आणि श्रध्दा कॉलनी दत्त मंदीराजवळ हायमास्ट बसविणे. |
| १७ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१२ क येथील प्रभात चौक आणि विदयानगर महाजन यांच्या घराजवळ हायमास्ट बसविणे. |
| १८ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१३ अ येथील रायसोनी नगर मराठे वकील यांच्या घरासमोर आणि गणपती मंदिर मोहन पाटील यांच्या घराजवळील ओपन स्पेस येथे हायमास्ट बसविणे. |
| १९ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.९ ब येथील आर एल कॉलनी शंकर पांचाल यांच्या घराजवळ आणि दांडेकर नगर नंदु पाटील यांचया घराजवळील ओपन स्पेस येथे हायमास्ट बसविणे. |
| २० | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०९ ड जिल्हा बँक कॉलनी मेन रोडवर आणि शिंदे नगर मेन चौक येथे हायमास्ट बसविणे. |
| २१ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१० अ ख्वाजा नगरी मस्जिद शेजारी हुडको आणि गट नं.१९ बुध्द वसाहत हुडको परिसर येथे हायमास्ट बसविणे. |
| २२ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.१० ब नामदेव नगर पुढे खंडेराव नगर झोपडपट्टी जवळ येथे हायमास्ट बसविणे. |
| २३ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.८ ब भोईटे लताबाई रंजीत यांच्या घराजवळ आणि गट नं.७६ महादेव मंदिर ओपन स्पेस जुनी पाईप येथे हायमास्ट बसविणे. |
| २४ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.८ क तालुका पोलीस स्टेशन मागे विश्राम नगर ओपन स्पेस येथे आणि गट नं.१०७ वाटिका आश्रम येथे हायमास्ट बसविणे. |
| २५ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.८ ड येथील शिवम नगर येथे आणि कल्याणी नगर परिसरात हायमास्ट बसविणे. |
| २६ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.९ अ इंद्रनील सोसायटी महादेव मंदिर परिसराजवळ आणि द्रोपदी देवकीनंदन हॉल येथे हायमास्ट बसविणे. |
| २७ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.४ ड येथील श्रीकृष्ण मंदिर परिसराजवळ आणि अनिल वाणी यांच्या घराजवळ शनीपेठे येथे हायमास्ट बसविणे. |
| २८ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.६ अ दत्त कॉलनी जे.टी.भंगाळे यांच्या घराजवळ आणि दत्त मंदिरात दत्त कॉलनी येथे हायमास्ट बसविणे. |
| २९ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.६ ब नानीबाई चौक आणि कासमवाडी चौक कासमवाडी येथे हायमास्ट बसविणे. |
| ३० | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.६ क पायघन हॉस्पीटल जवळ कंजरवाडया समोर जितेंद्र राजपुत यांच्या घरासमोर शाहुनगर येथे हायमास्ट बसविणे. |
| ३१ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.३ ब आसोदा रोड टॉवर जवळ ओपन स्पेसमध्ये आणि मा.गणेश सोनवणे यांच्या घराजवळ येडी माता मंदिर येथे हायमास्ट बसविणे. |
| ३२ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.३ क मेक्सोमाता जवळ आणि श्री.ईश्वर पाटील यांच्या घराजवळ खेडी येथे हायमास्ट बसविणे. |
| ३३ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.४ ब बारीवाडा, विठ्ठलपेठ येथे हायमास्ट बसविणे. |
| ३४ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.४ क येथील जोशी पेठ नंदु येवले यांच्या घराजवळ आणि बागवान चौक जोशी पेठ येथे हायमास्ट बसविणे. |
| ३५ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.६ ड येथील शाळा क्रं.४५ सबजेलच्या मागे आणि राजेश शिरसाळे चौक येथे हायमास्ट बसविणे. |
| ३६ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं. ७ अ वार्ड क्रं.१ सत्यम पार्क ओपन स्पेस बहिणाबाई नगर येथे आणि प्रभाग क्र.८ गट नं.२१४ आर.एल.कॉलनी पुष्प हौसिंग सोसायटी येथे हायमास्ट बसविणे. |
| ३७ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.७ ब हरेश्वर नगर, अंकुर हॉस्पीटल जवळ आणि भगिरथ कॉलनी खुल्या भुखंडावर हायमास्ट बसविणे. |
| ३८ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं. ७ क रेल्वे कॉलनी आणि चंद्रप्रभा कॉलनी येथे हायमास्ट बसविणे. |

वर नमुद असलेल्या कामांकरीता खालील नमुद केलेल्या अटीशर्तीस अधिन राहुन नाहरकत दाखला देता येईल.

**अटी व शर्ती**

१. स्थळ निश्चित केलेनुसार निश्चित केलेल्या मनपा जागेवरच ९ मीटर उंचीचा Octagonal पोल उभारणी करणे आवश्यक राहील.

२. हायमास्ट पोल उभारणी करणे व कार्यान्वीत करण्याची जबाबदारी विदयुत उपविभाग सार्व.बांधकाम यांची असेल.

३. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी पुर्वी हायमास्ट पोल उभारलेल्या असल्यास सदर ठिकाणी पोल उभारु नये, कामाची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. हायमास्ट पोलवरील LED पथदिव्यांमुळे मिळणारा प्रकाशाचा फायदा हा कोणालाही व्यक्तीगत होणार नाही. याची दखता घ्यावी.

५. हायमास्ट पोल हा मनपाच्या वहीवाटीच्या जागेवर उभारणे बंधनकारक राहील.

६. सदर हायमास्ट पोल उभारणी केल्याबाबत नागरिकांनी अथवा लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतल्यास व घेतलेला आक्षेप संयुक्तीक असल्यास हायमास्ट उभारणे कामीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.

७. हमी काळात दुरुस्तीचे काम निघाल्यास त्याची दुरुस्ती करणेची जबाबदारी ही आपल्या विभागाची राहील व हमी काळानंतर आपण यंत्रणा मनपाकडेस हस्तांतरीत केल्यानंतर मनपा वेळोवेळी त्याची दुरुस्ती व देखभाल करेल.

८. हायमास्ट पोलचे वेळोवेळी येणारे विज देयक मनपा अदा करेल.

९. हायमास्ट पोल उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार शासनाच्या निर्देशानुसार हायमास्ट पोलवर उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार एलईडी पथदिवे हे नॅशनल कोडनुसार बसविण्यात यावे. जास्त क्षमतेचे तसेच जास्त संख्येने एलईडी पथदिवे बसविल्यास त्यांची देखभाल दुरुस्ती तसेच वीज देयकाची अदायगी करणेची जबाबदारी आपल्या विभागाची असेल.

१०. शासनाच्या निर्देशनानुसार काम केलेले नसल्यास व भविष्यात असे निदर्शनास आल्यास त्या करिता आपला विभाग सर्वस्वी जबाबदार राहिल.

११. ज्या ठिकाणी हॅड्रोलीक लॅडर वाहन जाणार नाही अश्या ठिकाणी, अरुंद गल्लीबोळ, चौक नसलेले ठिकाण तसेच स्ट्रिट लाईट करीताचा वीज पुरवठा नसलेले ठिकाणी हायमास्ट पोलची उभारणी करु नये.

१२. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी आर्थिंग व इतर विदयुत साहित्य हे तांत्रिक दृष्टया (Technical Specification) नुसार वापरात घेण्यात यावे व भविष्यात अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी.

१३. हायमास्ट पोल उभारणी केलेनंतर पोलवर काम पुर्ण केले बाबतची दिनांक टाकणे आवश्यक राहील. जेणे करुन ३ वर्षाचा हमी कालावधी बाबत माहिती उपलब्ध होईल.

१४. काम पुर्ण केल्यानंतर ३ वर्षा पर्यंतच्या हमी कालावधीत संपुर्ण यंत्रणेची व एलईडीची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही आपल्या विभागाची असेल.

१५. हमी कालावधीनंतर संपुर्ण यंत्रणा सुस्थितीत मनपाकडेस हस्तांतरीत करावी लागेल.

१६. काम पुर्ण झाल्यावर महानगरपालिकेस कळविण्यात यावे.

१७. वर नमुद कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रस्तावित कामांना यापुर्वी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असल्यास ते नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात यावे.

१८. अटीशर्तीनुसार काम केलेले नसल्यास कुठल्याही प्रकारचा हस्तांतरण दाखला देणेची जबाबदारी मनपाची राहणार नाही.

मा.खासदार श्री.उन्मेश भैय्यासाहेब पाटील जळगांव यांचे खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत अ.क्रं.१ व ३८ करिता जळगांव शहरात पोल उभारुन त्यावर एलईडी पथदिवे बसविणे कामी नाहरकत दाखला मिळण्याबाबत उप अभियंता, सा.बां. विदयुत उप विभाग जळगांव यांचे मागणीनुसार नाहरकत दाखला देणेस महापौर यांनी महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली असल्याने सदर कामी नाहरकत दाखला देणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांनुसार प्रस्तावातील यादीतील अ.क्रं.१६ मधील श्रध्दा कॉलनी अत्तरदे यांच्या घराजवळ हायमास्ट बसविणे याऐवजी श्रध्दा कॉलनी दत्त मंदीराजवळ हायमास्ट बसविणे अशी दुरुस्ती करुन त्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त नमूद १८ अटी-शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी ही सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिका विदयुत विभाग यांची राहील.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी. तसेच महानगरपालिकेचा लाईट बिलावर बऱ्याच मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याने भविष्यात शहरात अनावश्यक ठिकाणी हायमास्ट बसविले जाणार नाहीत याबाबत प्रशासनाने योग्य विचार करणे व त्याबाबत नियोजन करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१६ :-** मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत जळगांव शहरात विविध ठिकाणी हायमास्ट पोल उभारणीच्या कामांना मान्यता मिळणे व नाहरकत दाखला देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतु ज्या अटीशर्ती मागच्या याला आहे तेच याला लागू कराव्यात.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे परंतु सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊंनी ज्या ज्या सुचना मांडल्या या सर्व सुचनांचे महानगरपालिका प्रशासनाने काटेकोरपणे पालन करून त्याची शाहनिशा करूनच संबंधीत प्रस्तावाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जळगांव शहरात आपण जे एल.ई.डी. लाईट लावलेले आहे. परंतु ते दिवसा चालु राहतात, रात्री बंद असतात. प्रत्येकाच्या वार्डामध्ये असेच असेल. जर आपण जो ठेकेदार आहे एल.ई.डी.चा. त्याला ही जबाबदारी दिलेली आहे. महापालिकेसारखे झाले ते.माझ्या वार्डात २ महिन्यापासुन तिच परिस्थिती होती. दोन तिनदा साहेबांना फोन लावले. संपुर्ण जळगांवात असे आहे. का होत आहे असे. दिवसा लाईट लावलेले दिसतात. लोकं आपल्याला फोटो पाठवितात.

**श्री.सुनिल महाजन :-** जळगांव किती पुढे चालले आहे याचे उदाहरण आहे हे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २४ x७ सर्व्हीस आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** तो रात मे चालु होना ना वो. दिनमे चालु रात मे बंद.

**मा.महापौर :-** विद्युत विभागाने याची नोंद घ्यावी. एस.एस.पाटील साहेब बघुन घ्या.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपण जर फोन लावले ना तर ते काय म्हणतात की, सेन्सर वरती ठेवलेले आहे.जर ते सेन्सरवरती ठेवलेले आहे. मग ते दिवसा कसे सुरु होतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** वो सेन्सर आपने ऑनलाईन टी.पी. जैसे हो गए है.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जर सेन्सरवरती आहे तर रात्री चालु व्हायला पाहिजे.

**मा.महापौर :-** बसा भाऊ, विषय क्र.१७ घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे जळगांव यांनी सुचित केलेनुसार उपअभियंता, विदयुत उपविभाग सा.बां. विभाग जळगांव यांचेकडील पत्र जा.क्रं./जविउवि/४७५/२०२३ दिनांक ८/०६/२०२३ अन्वये जळगांव शहरात विविध ठिकाणी हायमास्ट पोल उभारणीच्या कामांना मान्यता मिळणे व नाहरकत दाखला मिळणेबाबत मागणी केलेली आहे. ती कामे खालीलप्रमाणे.

| अ.क्रं. | कामाचे नांव |
|---|---|
| १ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.५ अंतर्गत जळगांव शहरातील सेन्ट्रल फुले मार्केट मध्ये ५ ठिकाणी पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे.<br>प्रभाग क्र.१८ अंतर्गत गट नं.३७४/४ गृहकुल कॉलनी, काशिनाथ लॉजच्यामागे श्री.सोनगिरे यांच्या घरासमोरील ओपन स्पेसमध्ये पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे. |

| | |
|---|---|
| | प्रभाग क्र.१८ अंतर्गत गट नं.३७/३ गृहकुल कॉलनी, काशिनाथ लॉजच्या मागे सौ.तडवी यांच्या घरासमोरील ओपनस्पेस मध्ये पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे.<br>प्रभाग क्रं.०६ अंतर्गत गट नं.१९७५ मुस्लीम कॉलनी येथे पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे. |
| २ | जळगांव शहरातील प्रभाग क्रं.०६ अंतर्गत जळगांव शहरातील पोलीस वसाहतीमध्ये टेनिस ग्राउंडजवळ पोल उभारुन एलईडी पथदिवे बसविणे. |

वर नमुद असलेल्या कामांकरीता खालील नमुद केलेल्या अटीशर्तीस अधिन राहुन नाहरकत दाखला देता येईल.

**अटी व शर्ती**

१. स्थळ निश्चित केलेनुसार निश्चित केलेल्या मनपा जागेवरच ९ मीटर उंचीचा Octagonal पोल उभारणी करणे आवश्यक राहील.
२. हायमास्ट पोल उभारणी करणे व कार्यान्वीत करण्याची जबाबदारी विदयुत उपविभाग सार्व.बांधकाम यांची असेल.
३. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी पुर्वी हायमास्ट पोल उभारलेल्या असल्यास सदर ठिकाणी पोल उभारु नये, कामाची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी.
४. हायमास्ट पोलवरील LED पथदिव्यांमुळे मिळणारा प्रकाशाचा फायदा हा कोणालाही व्यक्तीगत होणार नाही. याची दखता घ्यावी.
५. हायमास्ट पोल हा मनपाच्या वहीवाटीच्या जागेवर उभारणे बंधनकारक राहील.
६. सदर हायमास्ट पोल उभारणी केल्याबाबत नागरिकांनी अथवा लोकप्रतिनिधींनी आक्षेप घेतल्यास व घेतलेला आक्षेप संयुक्तीक असल्यास हायमास्ट उभारणे कामीचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल.
७. हमी काळात दुरुस्तीचे काम निघाल्यास त्याची दुरुस्ती करणेची जबाबदारी ही आपल्या विभागाची राहील व हमी काळानंतर आपण यंत्रणा मनपाकडेस हस्तांतरीत केल्यानंतर मनपा वेळोवेळी त्याची दुरुस्ती व देखभाल करेल.
८. हायमास्ट पोलचे वेळोवेळी येणारे विज देयक मनपा अदा करेल.
९. हायमास्ट पोल उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार शासनाच्या निर्देशानुसार हायमास्ट पोलवर उभारणीच्या स्थळी आवश्यकतेनुसार एलईडी पथदिवे हे नॅशनल कोडनुसार बसविण्यात यावे. जास्त क्षमतेचे तसेच जास्त संख्येने एलईडी पथदिवे बसविल्यास त्यांची देखभाल दुरुस्ती तसेच वीज देयकाची अदायगी करणेची जबाबदारी आपल्या विभागाची असेल.
१०. शासनाच्या निर्देशनानुसार काम केलेले नसल्यास व भविष्यात असे निदर्शनास आल्यास त्या करिता आपला विभाग सर्वस्वी जबाबदार राहिल.
११. ज्या ठिकाणी हॅड्रोलीक लॅडर वाहन जाणार नाही अश्या ठिकाणी, अरुंद गल्लीबोळ, चौक नसलेले ठिकाण तसेच स्ट्रिट लाईट करीताचा वीज पुरवठा नसलेले ठिकाणी हायमास्ट पोलची उभारणी करु नये.
१२. हायमास्ट पोल उभारणी करतेवेळी आर्थिंग व इतर विदयुत साहित्य हे तांत्रिक दृष्टया (Technical Specification) नुसार वापरात घेण्यात यावे व भविष्यात अपघात होणार नाही याची काळजी घ्यावी.
१३. हायमास्ट पोल उभारणी केलेनंतर पोलवर काम पुर्ण केले बाबतची दिनांक टाकणे आवश्यक राहील. जेणे करुन ३ वर्षाचा हमी कालावधी बाबत माहिती उपलब्ध होईल.
१४. काम पुर्ण केल्यानंतर ३ वर्षा पर्यंतच्या हमी कालावधीत संपुर्ण यंत्रणेची व एलईडीची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी ही आपल्या विभागाची असेल.
१५. हमी कालावधीनंतर संपुर्ण यंत्रणा सुस्थितीत मनपाकडेस हस्तांतरीत करावी लागेल.
१६. काम पुर्ण झाल्यावर महानगरपालिकेस कळविण्यात यावे.
१७. वर नमुद कामांची व्दिरुक्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रस्तावित कामांना यापुर्वी नाहरकत प्रमाणपत्र दिलेले असल्यास ते नाहरकत प्रमाणपत्र रद्द समजण्यात यावे.
१८. अटीशर्तीनुसार काम केलेले नसल्यास कुठल्याही प्रकारचा हस्तांतरण दाखला देणेची जबाबदारी मनपाची राहणार नाही.

मा.आमदार श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२३-२४ अंतर्गत अ.क्रं.१ व २ करिता जळगांव शहरात पोल उभारुन त्यावर एलईडी पथदिवे बसविणे कामी नाहरकत दाखला मिळण्याबाबत उप अभियंता, सा.बां. विदयुत उप विभाग जळगांव यांचे मागणीनुसार नाहरकत दाखला देणेस महापौर यांनी महासभेच्या मान्यतेच्या अधिन राहुन कार्योत्तर मान्यता प्रदान केलेली असल्याने सदर कामी नाहरकत दाखला देणेस कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच उपरोक्त नमूद १८ अटी-शर्तीचे पालन करण्याची जबाबदारी ही सार्वजनिक बांधकाम विभाग व महानगरपालिका विदयुत विभाग यांची राहील.

प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी. तसेच महानगरपालिकेचा लाईट बिलावर बऱ्याच मोठया प्रमाणावर खर्च होत असल्याने भविष्यात शहरात अनावश्यक ठिकाणी हायमास्ट बसविले जाणार नाहीत याबाबत प्रशासनाने योग्य विचार करणे व त्याबाबत नियोजन करावे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१७ :-** जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता व खुल्या जागांचे GIS tag प्रणाली व्दारे खाजगी एजन्सी मार्फत सर्वेक्षण करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री. नितीन लढ्ढा :-** शुचितातार्इंना शुभेच्छा त्यांची मागणी पुर्ण झाली, प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**सौ.शुचिता हाडा :-** अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अॅड.सौ.शुचिता अतुलसिंग हाडा,सन्मा.नगरसेविका मनपा जळगांव यांनी पत्रात नमुद केल्याप्रमाणे जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या सर्व मालमत्तांचे / जागांचे सर्वेक्षण करुन व्हॅल्युएशन ठरवून घेण्यासाठी नमुद केले आहे. मात्र तत्कालीन जळगांव नगरपालिका, व विदयमान जळगांव शहर महानगरपालिका मालकीच्या मिळकत मालमत्ता, जागा भाडेपट्टयाने, कराराने देण्याबाबत विनियोग करणे बाबतची कार्यवाही या अगोदर प्रकल्प विभाग बांधकाम विभाग, नगररचना विभागा मार्फत करणेत येत होती. मात्र तत्कालीन आयुक्त यांच्याकडील जा.क्र./आ.का./२३/२०२१ दि.०८/०४/२०२१ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये मनपाच्या विविध मालमत्तांचे व्यवस्थापन योग्य रीतीने व्हावे. त्यातुन महानगरपालिकेच्या उत्पन्नात भर पडावी. त्यांचे व्यवस्थापन एकाच विभागाव्दारे करणे शक्य व्हावे व कामकाज प्रभाविपणे व्हावे या हेतुने मालमत्ता व्यस्थापन (Estate Management) हा स्वतंत्र विभाग या आदेशान्वये निर्माण करण्यात आला आहे. तसेच आदेशात सर्व मिळकतीचे व जागांची कागदपत्रे, धारीका मालमत्ता व्यवस्थापन विभागात जमा करणेबाबत नमुद केलेले होते परंतु तत्कालीन जळगांव नगरपालिका, व विदयमान जळगांव शहर महानगरपालिका कालावधीत मनपा मालकीच्या बांधीव मालमत्ता, खुल्या जागा कोणत्या सामाजिक संस्थेस, क्रीडा मंडळ, धार्मिक स्थळे, समाज मंदिर, शैक्षणीक संस्था, व्यक्ती, इत्यादीना दिर्घ मुदतीने, कराराने, भाडेतत्वावर देण्यात आल्या आहे या बाबतची कोणतीही माहिती दस्ताऐवज या विभागाकडे उपलब्ध नाही.

सबब जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अगर क्षेत्रालगत असलेल्या शिवारा मध्ये उदा.जळगांव शहर, मोहाडी, शिरसोली, मेहरुण, मन्यारखेडा, कुसुंबा, चिंचोली, उमाळे, नशिराबाद, खेडी, असोदा, आव्हाणे, तरसोद, ममुराबाद, निमखेडी, पिंप्राळा, सावखेडा, इत्यादी शिवारातील तत्कालीन नगरपालिका व विदयमान जळगांव महानगरपालिका मालकीच्या मालमत्ता व खुल्या जागांचे खालील प्रमाणे दस्तावेज असणे आवश्यक आहे.

१) बांधीव मिळकती, खुल्या जागांचे नाव

२) ठिकाण

३) पत्ता

४) सर्व्हे नंबर

५) खुल्या जागेचे,बांधीव मिळकतीचे आरक्षण क्रमांक
६) बांधीव मिळकतीचे एकुण क्षेत्र, बांधीव क्षेत्र व खुल्या जागांचे क्षेत्रफळ
७) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे छायाचित्र
८) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे नकाशे
९) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे ७/१२ उतारे
१०) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे संपुर्ण नोंदीचे ड पत्रक
११) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे डाटे उतारे
१२) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे चतु:सिमा नोंदी
१३) मालकी हक्काचे पुरावे व त्या संबंधीचे इतर दस्तावेज
१४) बांधीव मिळकतीचे व खुल्या जागांचे मुल्यांकन

याबाबत जळगांव महानगरपालिका मालकीच्या मिळकती व खुल्या जागांची संपुर्ण माहिती संगणकीकृत (सॉफ्टकॉपी) व दस्तावेज,कागदपत्रे (हार्ड कॉपी) स्वरुपात महानगरपालिकेकडे असणे आवश्यक आहे. महानगरपालिका मालकीची मालमत्तांची व खुल्या जागांची सर्व माहिती उपलब्ध नसल्याने महानगरपालिका मालकीच्या सर्व मिळकती, खुल्या जागांचे यांचे सर्वेक्षण करणे, GIS tag करणे, डाटाबेस तयार करणे, संगणीकृत डाटा एन्ट्री करणे, मालमत्तांचे मुल्यांकन करणे इत्यादी आवश्यक कामे करणे आवश्यक आहे. परंतु मनपाकडे आवश्यक पुरेसे व प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नाही. त्यामुळे सदरील कामे करण्यासाठी अभिकर्ता (Agency) नेमुन सदरची कामे करुन घेणे योग्य होईल.

प्रस्तुत प्रकरणी महानगरपालिका मालकीच्या मालमत्तांचे व खुल्या जागांचे सर्वेक्षण होणे कामी महानगरपालिकेच्या सन २०२३-२४ च्या अर्थ संकल्पमध्ये महासभेने लेखाशिर्ष मिळकती सर्वेक्षण व व्हॅल्युएशन शिर्षाखाली महसुली खर्च रु.१,००,००,०००/- मात्रची अंदाज पत्रकात तरतुद करण्यात आली आहे. तरी महानगरपालिका मालकीच्या मालमत्तांची व खुल्या जागांचे सर्वेक्षण करणे, GIS tag करणे, डाटाबेस तयार करणे, संगणीकृत डाटा एन्ट्री करणे, Software पुरविणे, मालमत्तांचे मुल्यांकन करणे इत्यादी आवश्यक कामे करुन वरील प्रमाणे १ ते १४ मध्ये नमुद केलेले कागदपत्रांची पुर्तता करणे, संगणकीकृत (सॉफ्टकॉपी) व दस्ताऐवज, कागदपत्रे (हार्ड कॉपी) स्वरुपात पुरविणे कामी अभिकर्ता (Agency) मार्फत काम करण्यास अंदाजीत रक्कम रु.७५,००,०००/- (पंच्याहत्तर लक्ष) मात्र खर्च अपेक्षीत आहे. तरी प्रस्तावित केल्याप्रमाणे मनपाच्या अटी-शर्ती नुसार काम करणे कामी अभिकर्ता (Agency) नेमणूक करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास वितीय व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- अॅड हाडा शुचिता अतुलसिंह**

**नगरसचिव -विषय क्र.१८ :-** मनपा मालकीची जाणता राजा व्यायाम शाळेची मुदत संपल्याने अर्जदार राष्ट्रीय क्रीडा मंच यांची सुरक्षा अनामत रक्कम परत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१८ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११६९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मालकीची स.नं.४४० आ.क्र.१५६ भाग ४४२ मेहरुण जळगांव, काव्यरत्नावली चौक या ठिकाणी जाणता राजा व्यायाम शाळा स्पोर्टस सेंटर व्यवस्थापन व देखभाल करणे कामी कार्यादेश क्र.जमनपा/पवडी/३८/२०१५ दिनांक ०८/१०/२०१५ नुसार ७ वर्षाकरीता निविदेनुसार सुरक्षा अनामत रक्कम रु.२,००,०००/- मनपा खजिन्यात धनादेशव्दारे भरणा पावती क्र.४०५२८ दि.०८/०८/२०१५ भरणा करुन अभिकर्ता म्हणून राष्ट्रीय क्रीडा मंच,जळगांव यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर जाणता राजा व्यायाम शाळा व्यवस्थापन व देखभाल मुदत संपलेली असल्याने जाणता राजा व्यायाम शाळा मालमत्ता व्यवस्थापन विभागामार्फत राष्ट्रीय क्रीडा मंच,जळगांव यांच्याकडून दि.०९/११/२०२२ रोजी मनपाच्या ताब्यात घेतली आहे व त्याबाबत ताबा पावती करुन घेण्यात आली. तसेच सुरक्षा अनामत रक्कम रु.२,००,०००/- मनपा खजिण्यात जमा असल्याने तसेच क्रिडा विभागाचे काही

थकबाकी नसल्याने अभिकर्ता राष्ट्रीय क्रीडा मंच,जळगांव यांना सुरक्षा अनामत रक्कम रुपये २,००,०००/- मात्रच्या रकमेस तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्याने अर्जदार अध्यक्ष,राष्ट्रीय क्रीडा मंच,जळगांव यांचा दि.२८/०२/२०२३ रोजीचे अर्जानुसार मागणी केलेली जमा सुरक्षा अनामत रक्कम रुपये २,००,०००/- मात्र राष्ट्रीय क्रीडा मंच,जळगांव यांना महाराष्ट्र नगरपरिषदा लेखा संहिता २०११ प्रकरण २० मधिल २९९ नियमानुसार अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.१९ :-** अतिक्रमण निर्मुलन विभागाचे जप्त साहीत्य सोडणेकामी मा.महासभा ठराव क्र.६११ दि.२८/०२/२०१७ रद्द करुन नविन दंडाची रक्कम व इतर निर्णयांची अंमलबजावणी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता याच्या संदर्भातला धोरण ठरविण्याच्या संदर्भात सद्या आपण दंडाची रक्कम वाढवली. पण याच्यामुळे अतिक्रमण निर्मुलन होईल का ? अतिक्रमण शिस्तीत लागेल का ? दंड हा पर्याय होऊ शकत नाही. कुठेतरी आपली यंत्रणा किंवा त्यांच्याकडे असलेला मनुष्यबळ या सगळया गोष्टींचा कुठेतरी ताळमेळ जमत नाही. आज प्रचंड प्रमाणावरती शहरामध्ये कुठेही पहा. म्हणजे गेल्या याच पंचवार्षिक मध्ये म्हटले तर हरकत नाही की, इतक्या प्रचंड प्रमाणावर अतिक्रमण वाढलेले आहे आणि सगळया नविन नविन भागामध्ये अतिक्रमण वाढलेले आहे. तर त्याच्या संदर्भात प्रशासनाची काय उपाययोजना होईल. जोपर्यंत प्रशासनाची पकड याच्यावर येणार नाही. नुसता दंड हा पर्याय होऊ शकत नाही. याचे कुठेतरी एक डिसीप्लीनरी ॲक्शन म्हणा किंवा कुठेतरी यांचा एक प्लॅन म्हणा, काय होतं, बरेच आरोप जे होतात ना ते आपल्याच कर्मचारींवर आरोप होतात. त्यांच्याकडुन काही तरी वसुली होते. आणि मग ते त्यांना प्राधान्य देतात किंवा अतिक्रमण विभागाचा तेवढा दराडा राहिला नाही, धाक नाही की, आपली गाडी गेली नाही गेली. पुन्हा अतिक्रमण जैसे थे तैसे होतो. आज गणेश कॉलनीची परिस्थिती बघाल. तुम्ही महाराणा प्रतापच्या पुतळयाजवळ बघाल. किंवा नविन नविन भागात, कलेक्टर ऑफिसचा रोड बघाल. सगळीकडे वेगवेगळया पध्दतीच्या अतिक्रमणाची संख्यामध्ये दिवसांदिवस वाढ होत चालली आहे. तर याच्या संदर्भात निर्णय होणे खुप गरजेचे आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आयुक्त महोदया, अतिक्रमण विभागाच्या माध्यमातुन अतिक्रमण केलेला लोकांकडुन दंड वसुल करणे हा महापालिकेचा उद्देश नाही. शहरातुन अतिक्रमण निर्मुलन झाले पाहिजे. हा महापालिकेचा उद्देश असायला हवा. आणि आपण दंडात वाढ जरी केली. वाढ केल्यानंतर हे मनपाच्या तिजोरीत येईल का? हा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. जर दंडाची रक्कम वाढवली तर ते जागेवरतीच तडजोडी होतील. कमीत कमी दंड कमी असल्यामुळे तो महापालिकेच्या तिजोरीत तरी येईल. असे मला वाटते. तर आपण दंडामध्ये वाढ न करता आपल्याला अतिक्रमण निर्मुलन कसे करता येईल. याच्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे. आता आपण बघतो चौका चौका मध्ये अतिक्रमण झालेले आहे. माझी भाऊंशी पण चर्चा झाली. की एका ठिकाणी चौकामध्ये अतिक्रमणाच्या जागेवर कार्यालय केलेले आहे. आणि त्या कार्यालयाच्या मागे सट्टा हा घेतला जातो आहे. आणि त्याकडे कोणाचेही लक्ष नाही. आम्ही उघडया डोळयांनी बघतो. आणि सर्वेच बघत आहे. परंतु मला वाटते, याला फोडायला कोणी तयार नाही. ते कोणाचे आहे मला माहित नाही. परंतु असे प्रकार शहरामध्ये होत आहे. आणि आपण भाजी विक्रेता असेल, हात लोटगाडीवाला असेल, त्याचा माल जप्त करतो फेकुन देतो. त्याच्या गाडया जमा करुन घेतो. कपडेवाले असतील. त्यांची रोजीरोटी, त्याच्यावर उदर्निर्वाह आहे. म्हणजे त्रास देतो असे माझे म्हणणे नाही. तो आपला अधिकार आहे. ते आपण केलेच पाहिजे. परंतु हे करीत असतांना हे जे लोकं करत आहे. याच्यावरती आपण दुर्लक्ष करतो आहे.तर त्यांच्यावरती कार्यवाही झाली पाहिजे. अशी मी या विषयाच्या माध्यमातुन प्रशासनाला विनंती करेल.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आपण या विषयाला आळा घालण्यासाठी काही गोष्टी लक्षात घेतल्या पाहिजे. अतिक्रमणाचा विषय जळगांव शहर म्हणुन अत्यंत गंभिर होत आहे. कोणत्याही मोठया शहरात शहराच्या मध्यवर्ती

रस्त्यांवर, प्रमुख रस्त्यांवर कधीही अतिक्रमण नसते. पण आपल्या शहराची कथाच वेगळी आहे. माझा प्रभाग हा शहराचा मध्यवर्ती प्रभाग आहे. नितीनभाऊंचा प्रभाग हा मध्यवर्ती प्रभाग आहे. संपुर्ण अतिक्रमण आहे. आम्ही सगळेच नगरसेवक वारंवार तक्रार करुन कंटाळलो आहोत.माझ्या प्रभागात महाराणा प्रतापांच्या पुतळया बद्दल जर बोलायचे राहिले.तो पुतळा झाल्यानंतर तेथे जेव्हा पहिले दोन भाजीवाले बसायला सुरुवात झाली. तेव्हापासुन मी प्रशासनाकडे तक्रारी केलेल्या आहे की, हा अतिक्रमणाचा स्पॉट बनु देऊ नका. खरं तर त्याच्या बाजुला भास्कर मार्केट आहे. त्या भास्कर मार्केट मधील ओटे आपण यापुर्वी भाजी वाल्यांना दिले होते. पण तेथे बसत नाही. काही काळ बसत होते तेथे भाजीवाले पण त्यानंतर काय झाले. आपले लोकांनी ज्या वेळेला अभय दिले. त्यावेळेला ती संख्या वाढत जाते. आणि नंतर तो त्यांचा हक्क होतो. त्यांच्यासाठी आपण जागा शोधणे त्यांना जागा अलॉट करणे ही आपली जबाबदारी होते. हे सगळ आपल्या चुकांमुळे आपल्याच मानगुटीवर बसतात. दुसरा मुद्दा राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी आपल्याकडे झालेली नाही. आणि त्यामुळे सुध्दा या अतिक्रमणाशी रिलेटेड प्रकरण हाताळतांना आपल्याला अनेक अडचणी येत आहे. तर या सगळया गोष्टींचा ओहापोह झाला पाहिजे. या सगळया गोष्टींचा इमप्लीमेंटेशन झाले पाहिजे.अतिक्रमण हे निघालेच पाहिजे. अतिक्रमणाचा त्रास सगळयांनाच होत आहे. रहदारीला सगळयात मोठा त्रास आहे. आणि शहराचे विद्रुपीकरण पण होत आहे. प्रशासनाने सांगावे या सगळयावर कश्या पध्दतीने कार्यवाही करणार. कारण नुसते रेट वाढुन दंडाची रक्कम वाढवुन अतिक्रमण नियंत्रणात येऊच शकत नाही.

**श्री.महेश चौधरी :-** अतिक्रमण संदर्भात चर्चा होत असतांना मुळात संध्याकाळी ६.०० नंतरच अतिक्रमण सुरु होते. आपण पुर्वी जेव्हा उपायुक्त साहेबांनी मॅनेजमेंट हाती घेतली होती. तेव्हा संध्याकाळी ६.०० नंतर पण टिम होती. आता काय होत आहे. ६.०० वाजेपर्यंत हे सगळे जण असतात. त्यांचे काम चांगले आहे. त्यांच्या कामावर तर काही शंकाच नाही आम्हाला. पण हे संध्याकाळी ५.००-६.०० वाजेपर्यंत अतिक्रमण काढतात. पण सगळया गाडया ज्या आहे. गणेश कॉलनी रोडवरच्या त्या संध्याकाळी ६.०० वाजेनंतर लागतात. त्यामुळे आपल्याकडुन कार्यवाहीच होत नाही. पण ही आमची हार आहे. दुसरा विषय असा आहे की, बजरंग बोगद्याजवळ एक गणपतीचे मंदिर आहे. नवसाचा गणपती म्हणुन ते खुप मोठे मंदिर आहे तेथे भाविक येतात. खुप मोठया प्रमाणात. आणि तिथे एक मच्छी विक्रेता मच्छी विकतो. जळगांव शहरातील त्या प्रभागातील लोकांच्या भावना तिव्र आहे. सर्व लोकं खुप त्रासलेले आहे. आणि तो मच्छी विक्रेता बेकायदेशीर मच्छी विकतो. अतिक्रमण विभागातील, साहेबांना सगळे सांगितले, ते ५.०० वाजता, ६.०० वाजता तेथे गेले. पण तो ६.०० वाजेनंतर लावतो. मग ६.०० वाजेनंतर बेकायदेशीर गोष्टींना आपली मान्यता आहे का? माझा प्रश्न आहे प्रशासनाला. ६.०० वाजेनंतर बेकायदेशीर कामे चालतील का संध्याकाळी. या गोष्टींचा ही विचार केला पाहिजे. टीम तयार करा. सेनसेटीव्ह जेथे विषय आहे. कमीत कमी तेथे तरी ६.०० वाजेनंतर ते लोक पोहचले पाहिजे. याची काळजी घेतली पाहिजे.

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई, आयुक्त मॅडम, माझ्या माहितीनुसार, मला जी माहिती मिळालेली आहे. १५ दिवस अगोदर गोलाणी मार्केटच्या पाठीमागे एका भंगार दुकानावर ३ ट्रॅक्टर अतिक्रमणाचा माल विकला गेला. तुमच्या मान्यतेने विकला गेलेला आहे.

**मा.आयुक्त :-** विषय समजुन सांगा.

**श्री.चेतन सनकत :-** विषय भंगार विकला गेलेला आहे. आपल्या अतिक्रमणच्या कर्मचाऱ्यांनी त्यामध्ये कोण कोण लोकं, काय लोकं असतील मला माहित नाही. अतिक्रमण विभागाचा विषय आहे. १५ दिवस अगोदर गोलाणी मार्केटच्या पाठीमागे एक भंगारची दुकान आहे. त्या ठिकाणी ३ ट्रिप भंगार विकला गेलेला आहे.

**मा.महापौर :-** अतिक्रमण मध्ये जमा केलेला असेल तो.

**श्री.चेतन सनकत :-** भंगार, भंगार, अतिक्रमणमध्ये जप्त केलेला माल. आणि विकणारे आपले पथक.

(सभागृहात अनेक सन्मा.सदस्य एकाच वेळी बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही.)

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** मा.महापौर व सन्मा.सभागृह, असे तर काही भंगार आपण विकलेले नाही. पण जर विक लेले असेल तर संबंधीतांवर आपण शिस्तभंगाची किंवा जी असेल ती कठोर कार्यवाही करु

**श्री.चेतन सनकत :-** साहेब, ३ ट्रॅक्टर भंगार विकला गेलेला आहे. तेथील सी.सी.टीव्ही फुटेज तुम्हाला सापडेल.कोणत्याही दुकानाच्या सी.सी.टी.व्ही.फुटेज मध्ये बघा. आपल्या पथकाचे ट्रॅक्टर आणि त्या निर्मुलन समिती मध्ये असणारे काही जण, ३ ट्रॅक्टर भंगार घेऊन जाऊन विकला गेलेला आहे. एका चांगल्या व्यक्तीच्या दुकानावर.

**श्री.प्रशांत नाईक :-** नांव सांगा ना.

**श्री.चेतन सनकत :-** खात्री करुन आणि सी.सी.टी.व्ही. बघुन कार्यवाही करावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** सांगा ना. सांगायला पाहिजे.

**श्री.चेतन सनकत :-** भाऊ एकच भंगाराचे दुकान आहे तेथे. १५ दिवसा अगोदर, तुम्ही जाणार आहे का तेथे. त्यांना समजले ना.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** यानंतर अतिक्रमणाच्या संदर्भात मी सभागृहाला सांगु ईच्छितो की, अतिक्रमण ही खुप मोठी समस्या आहे. पुर्वी आपल्या जळगांव शहरातील जो एरिया होता तो खुप छोटा होता. जुना जळगांव, त्यानंतर फुले मार्केटचा परिसर, दाना बाजार आणि पंचमुखी हनुमानचा काही भाग, गरजेनुसार शहर वाढले, वाढीव एरिया, पिंप्राळा परिसर असेल,गणेश कॉलनीचा परिसर असेल, रामेश्वर कॉलनी मेहरुणचा परिसर असेल, असे खुप मोठे शहर वाढले. त्या प्रमाणे आपल्या जश्या सुविधा वाढायला पाहिजे होत्या त्या वाढल्या नाही. त्याच्यानंतर कोविड काळात बऱ्याच ठिकाणी डिसेंट्रलाईज करुन भाजीपाला विक्रेत्यांना आपण परवानगी दिली. मग वेगवेगळया ठिकाणी जेव्हा भाजीपाला विक्रेते बसायला लागले,किंवा किरकोळ विक्रेते बसायला लागले ज्याच्यामुळे हे अतिक्रमण कोविडनंतर जास्त वाढला, त्यानंतर विषय जेव्हा अतिक्रमण निर्मुलनाची कार्यवाही करायचो. त्याच्यामध्ये ५ ते ६ प्रकारचे ते एक होल्डर होते जसे आता भाऊंनी सांगितले की, आमचे प्रशासनाचे काही चुका असतील. अतिक्रमणाची एक गाडी पकडली की, १० फोन आम्हाला येतात. त्यानंतर दुसरा एक विषय असा आहे. जर आम्ही अतिक्रमण निर्मुलन केले तर दुसऱ्या दिवशी हॉकर्सचा मोर्चा येतो, एका दिवशी आमची बातमी लागुन दसऱ्या दिवशी हॉकर्सच्या पोटावर पाय देत आहे अशी बातमी लागते.या सगळयांचा जर विचार केला तर मला वाटते, एक सोल्युशन असे आहे की, आपण वेगवेगळया संस्थांना ओपन स्पेस वेगवेगळया ठिकाणी दिलेले आहे. आपण जळगांव शहराचे जर ३ ते ४ झोन करुन प्रत्येक वाढीव एरियात एक पर्यायी जागा जर भाजीपाला विक्रेत्यांना भाजी मंडी म्हणुन दिली. तर हे लोक रस्त्यावर बसणार नाही. जो पर्यंत आपण पर्यायी जागा देत नाही. तो पर्यंत आम्हालाही कठोर कार्यवाही करता येत नाही. ही वस्तुस्थिती आहे. मला वाटते आपण मेहरुण परिसरात एक, पिंप्राळा परिसरात एक, जुन्या जळगांवात एक, नविन भाग असलेले एक, असे ४-५ वेगवेगळे झोन करुन एक पर्यायी जागा, ती ओपन स्पेस का असे ना. एक भाजी मंडी जर आपण प्रत्येक प्रभागाला दिली. तर आपल्या जळगांव शहराचे रस्ते पण असे आहे की, आपण त्यांना साईड पट्टे आखुन जागाही देऊ शकत नाही. तर त्या त्या एरियाचे जे हॉट स्पॉट आहे. त्यांचा विषय संपुन जाईल.त्या त्या एरियातील लोकं त्या त्या एरियात बाजार करतील. गावाकडे येणार नाही. अशी एक परिस्थिती निर्माण होईल. असा जर निर्णय घ्यायचा असेल तर अभ्यास करुन एक आराखडा तयार करुन टी.पी.कडुन मंजुरी घेऊन एक प्रस्ताव तयार करतो आणि पुढच्या महासभेत प्रस्ताव सादर करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चाटे साहेब, ख्वाजामियॅाची जागा जी होती. ती भाजीपाले वाल्यांना उपलब्ध करुन दिली होती. तेथे व्यवस्थीत भरती करुन दिलेली होती. तेथे काही काळ भाजीवाले बसले, परंतु कालंतराने तो भाजी बाजार रस्त्यावरच आलेला आहे. प्रायोरिटी तत्वावरती

**श्री.अश्विन सोनवणे :-** दिवसा तेथे असतो, ते संध्याकाळ वाले सगळे रस्त्यावर बसतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे तो एक प्रयोजन तत्वावरती यशस्वी करुन टाका म्हणजे तो एक रस्ता जरी मोकळा झाला ना तर प्रचंड रहदारीचा रस्ता मोकळा होवुन जाईल.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** ठिक आहे भाऊ.

**श्री.**नितीन लढ्ढा :- आणि इतर स्पॉटच्या बाबतीत नियोजन असेल तर त्याचा आराखडा द्या. त्याला ही मान्यता देऊ.

**श्री.गणेश चाटे, उपायुक्त :-** विषय कसा आहे, सर्वात मोठे अतिक्रमण जे आहे ते फुले मार्केट मधले आहे. मला वाटते, जळगांव शहरात पहिल्यांदा २ ते अडीच महिन्यापासुन फुले मार्केट हे पुर्णपणे अतिक्रमण मुक्त झालेले आहे. परंतु आपण पण तेथे पुर्ण वेळ थांबले म्हणुन आणि तेथे जवळपास ३५०-४०० हॉकर्स जे आहे ते तेथे बसत होते. तर त्यांना सुध्दा आपण काही तरी पर्यायी व्यवस्था करुन दिली पाहिजे. म्हणजे ते कायमस्वरुपी बंद होईल.

**श्री.**नितीन लढ्ढा :- प्रत्येक गोष्टीला पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी नाही एक दुसरे काय की, एकाला पर्यायी जागा उपलब्ध करुन दिल्याने, नंतर काय होतं, जसे मी त्या पर्यायी जागेवर जाऊन बसतो,आणि माझ्या मुलाला पुन्हा त्याच जागेवर पाठवितो, तर अश्या पध्दतीने हा पर्याय होऊ शकत नाही. याला कुठेतरी इन्स्पेक्ट करावे लागेल, नाही तर ही संख्या दिवसेंदिवस वाढत जाईल. पर्यायी जागा पुरवता पुरवता महानगरपालिका थकुन जाईल.

**श्री.अनंत जोशी :-** साहेब, चाटे साहेब, यांचे लेटेस्ट प्रकरण सांगतो तुम्हाला,वाहुळे साहबांनी कार्यवाही केली होती.आपल्या काव्यरत्नावली पासुन महाबळ रोड पर्यंत कोविड काळातला विषय सांगतो तुम्हाला, तेथील सगळे हॉकर्स जे होते त्यांना सगळयांना संभाजी राजे नाट्यगृहाजवळ बसविले, आजतर पक्के ओटे होऊन गेलेले आहे त्यांचे. ते कोण लोकं आहे सगळे, त्या महाबळच्या रस्त्यावरचे ते तिथे बसतात तेथे ओटे झाले शेड झाले, ते संभाजी राजे नाट्यगृह इतक्या सुंदर जागेवर आणि आता महाबळच्या रस्त्यावर परत हॉकर्स आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** फुले मार्केटचा जो विषय आहे तो क्लिअर झालेला नाही अजुन तेथील काहीच अतिक्रमण निघालेले नाही. जसे आहे तसेच आहे.

**श्री.महेश चौधरी :-** आयुक्त मॅडम, संध्याकाळचे पथक तयार करा.

**मा.आयुक्त :-** दंड वाढविणे आणि त्यासाठी हा ठराव पाठविणे हा उद्देशच नव्हता या ठरावाचा. त्याच्यामध्ये जर आपण सुरुवातीचा पॅरा वाचला, तर २५०, १००० असे हे होते. आता मागच्या वेळेस आम्ही जे काही साहित्य जप्त केले त्याचा आम्हाला लिलाव करायचा होता. हे लोकं रु.५००/- ची पावती फाडतात घेऊन जातात.पुन्हा आणतात. म्हणुन यावेळेस आपण असे केले, दंडाची रक्कम फिक्स केली, फस्ट टाईम पकडले की, दंड लावणे, सेकंड टाईम पकडले की, सामानाचे लिलाव करणे ही एक याच्यामध्ये पॉलिसी होती. दुसरे सरांनी जसे सांगितले की, जुने शहर जेव्हा छोटे होते तेव्हा एकाठिकाणी बाजार भरत होता, जस जस शहर मोठे होत गेले, तर आपल्याला पण फेरीवाले किंवा बाजार हे डिसेंट्रलाईज करावे लागले. वेगवेगळया भागांमध्ये तो एक पर्याय असु शकतो. आणि प्लस मग आपले पथक ॲक्टीव्ह करणे आणि अजुन तुम्ही जे म्हणत आहे संध्याकाळचे, तर त्याअनुषंगाने आम्ही मॉर्निंगला एक टिम, दुपारी गॅप आणि संध्याकाळी एक टिम, असे आम्ही नियोजन करतो, जेणे करुन संध्याकाळी ८.०० पर्यंत आपले लोकं फिरत असतील.

**श्री.महेश चौधरी :-** मॅडम, त्या मच्छीवाल्यावर कार्यवाही करा.

**मा.आयुक्त :-** बिल्कुल बिल्कुल.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, गेल्या टर्मचा विषय सांगतो तुम्हाला, याच्या पुर्वी मी स्वत: खुप काम केलेले आहे. त्यावेळेस खान साहेब होते अतिक्रमणला, आणि कापडणीस साहेब होते, याच्यात मी व्ययक्तीक इनव्हालमेंट होऊन ते सगळे साक्षीदार आहेत. आता चाटे साहेब म्हटले ना की, इतिहासात पहिल्यांदा फुले मार्केट तर त्यावेळेस बळीराम पेठ, सुभाष चौक, छत्रपती शिवाजी महाराज रोड जो आहे, फ्रुट गल्ली,फुले मार्केट, येथे तुमच्या महापालिकेच्या बोळीत बसलेले सगळे, हे महापालिकेच्या दारात होते. हे सगळ मी केलेले आहे. सागर पार्कचे आय.टी.आय.कडे मी नेलेले आहे. बहिणाबाईच्या मागे लोकं मी टाकलेले आहे. शिवाजी महाराजच्या पुतळया जवळचे सगळे शाहुनगर ट्रॅफिक गार्डनला मी टाकलेले आहे. याच्यावर जर आपल्याला मेहनत जर कमी करायची असेल ना. तर खान साहेबांना एकदा बोलवा तुम्ही. किंवा संजुभाऊ ठाकुर आहे तेथे. यांना सगळी माहिती आहे. तुम्ही जे वेगवेगळया भागात करायचे म्हणत आहे ना. हे सगळ कागदोपत्री तयार आहे. संजु ठाकुर आहे त्या ठिकाणी, खान साहेबांना बोलवा काही दिवसांसाठी, तुम्हाला काहीच मेहनत करावी लागणार नाही. कारण याच्यावर खुप कामाचा ताण झालेला आहे. तुम्हाला सोपे होईल.

**मा.आयुक्त :-** आम्ही ते रेकॉर्ड पण बघतो आणि सगळी चर्चा करुन पुढच्या जी.बी.मध्ये धोरणात्मक प्रस्ताव ठेवु.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** माझी एक सुचना अशी आहे की, प्रभाग समिती निहाय अतिक्रमण पथक तयार करण्यात यावे. जेणे करुन त्या त्या प्रभाग समिती मधील अतिक्रमणावर कंट्रोल राहील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याचे काय करायचे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** करा. मंजुर करा.

(सभागृहात काही सन्मा.सदस्य आपआपसात चर्चा करत होते.)

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदर प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.१९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महासभा ठराव क्र.६११ दिनांक २८/०२/२०१७ रोजी अतिक्रमण निर्मुलन विभागाने जप्त केलेला माल, साहीत्य तसेच

१. भाजीपाला फळे, वजन काटे व इतर किरकोळ सामान प्रथम सापडल्यास रु.२५१/- दंड, तोच सामान दुसऱ्यावेळी सापडल्यास रु.५०१/- तसेच तिसऱ्यावेळेस सापडल्यास रु.१००१/- दंड
२. लोटगाडी व टपरी प्रथम सापडल्यास रु.५०१/- दंड, दुसऱ्यावेळस सापडलयास रु.१००१/- व तिसऱ्यावेळेस सापडल्यास रु.१५०१/- चौथावेळेस सदरचे साहीत्य जप्त करण्यांत येईल.
३. नमुद कार्यवाही करतांना अतिक्रमण धारकास दुसऱ्यावेळेस दंड आकारुन अतिक्रमण धारकाकडुन अतिक्रमण न करण्यांचे हमी पत्र लिहुन घ्यावे तिसऱ्यांदा दंड आकारुन माल,साहीत्य सापडल्यास यापुढे अतिक्रमण न करण्यांचे व केल्यास माल व साहीत्य जप्त केले जाईल ते नंतर परत केले जाणार नाही. असे १०० रु. मुदांकपेपरावर हमी पत्र लिहुन घ्यावे तसेच जप्त केलेले साहीत्य ३० दिवसाच्या आत परत करण्यांत यावे तसेच अतिक्रमण विभागाच्या कार्यवाहीस सापडलेला माल व साहीत्याचा जाहीर लिलाव हा प्रत्येक महीन्यात करणे बाबत महासभा ठराव क्र.६११ दि.२८/०२/२०१७ रोजी प्रदान करण्यांत आलेला आहे.

सदयस्थितीत अतिक्रमण मोहीम ही मनुष्य बळ मिळाल्यामुळे तिव्र करण्यात आलेली असुन से.फुले मार्केट, महात्मा फुले मार्केट व सार्व.रहदारीच्या ठिकाणी व मेन चौकातील अतिक्रमण विभागाकडुन दररोज साहीत्य जप्त करुन अतिक्रमण काढण्यांत येत आहे. वर नमुद अ.नं.१,२,३ नुसार जप्त केलेले सामान नियमानुसार दंड आकारुन परत करण्यांत येत आहे मात्र सदर अतिक्रमण धारक हे साहीत्य पुन्हा त्याच ठिकाणी ठेवुन अतिक्रमण करीत असल्याचे निर्देशनास येत आहे. यावर कायम स्वरुपी नियंत्रण ठेवायचे झाल्यास यापुढे जप्त केलेले साहीत्य अतिक्रमण धारकांकडुन रु.१००/- च्या मुद्रांकपेपरवर हमीपत्रात मी त्याठिकाणी पुन्हा व्यवसाय करणार नाही व केल्यास जप्त केलेला सामान मनपाने जाहीर लिलाव केल्यास माझी काही हरकत राहणार नाही याबाबत हमी पत्र घेवुन खालील प्रमाणे यापूढे दंड वसुल करणेस तसेच महासभा ठराव क्र.६११ दिनांक २८/०२/२०१७ रद्द करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. तराजु काटा व इतर लहान वस्तु रु. - ५००/- प्रति वस्तु
२. लोटगाडी व टपाच्या गाडया रु. - १०००/- प्रति वस्तु
३. टपरी तसेच मोठे साहीत्य रु. - २०००/- प्रति वस्तु

तसेच प्रशासनाने सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२० :-** जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील शिक्षिका व मदतनिस यांच्या मानधनात वाढ करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत बालवाडयांची संख्या २९ असून बालवाडी शिक्षिका २९ व मदतनिस १९ आहेत. बालवाडी मधील विदयार्थी संख्या १३०० इतकी आहे. जळगांव शहर महानगरपालिका अंतर्गत बालवाडया मधील शिक्षिका व मदतनिस यांचे मानधन वाढ होणेकामी महिला व बालविकास शासन निर्णय क्र.एबावि.२०२२/प्र.क्र./२३५/का-६ दि.०३/०४/२०२३ नुसार दि.०१/०६/२०२३ पासून दरमहा बालवाडी शिक्षिका यांना रक्कम रु.१०,०००/- व मदतनिस यांना रक्कम रु.५,५००/- प्रमाणे मानधन वाढ करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच बालवाडी शिक्षिका व मदतनिस यांचे मानधन वाढीवर होणारा जादा खर्च रक्कम रु.८,५८,३७५/- मात्र महिला व बालकल्याण विभागाकडील सन २०२३-२४ या वर्षाकरीता असलेल्या ५ टक्के तरतुदीनुसार २ कोटी मधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२१:-** महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी महानगरपालिकेमार्फत अंमलबजावणी करावयाच्या योजनाबाबत सुधारीत धोरण ठरविणे कामी निर्णय घेणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. त्याच्यामध्ये अ.क्र.०७ मध्ये महानगरपालिकेतील विद्यार्थीना गणवेश वाटप करणे, हा एक प्रस्ताव आहे. त्याच्यामध्ये बालवाडीच्या मुलांना सुध्दा मोफत गणवेश वाटप करण्यात यावा. एवढे ॲडिशन करुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११७२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.जी.ई.एन.-१०९३/१९९२/नवि-१४ दि.३०/०६/१९९२ नुसार महिला व बालकल्याणाच्या कार्यक्रमासाठी महानगरपालिका/ नगरपालिकेने त्यांच्या अर्थसंकल्पात तरतूद केलेल्या वार्षिक महसुली उत्पन्नातील बांधील खर्च वजा जाता उर्वरीत रकमेच्या ५ टक्के राखून ठेवावा असे निर्देश करण्यात आलेले होते.

तसेच शासन निर्णय एस.यु.एन./२०६१/प्रक्र ३८५/नवि-१७ दि.२९/०३/२०२२ नुसार महिला व बालकल्याण यासाठी महानगरपालिकेच्या वार्षिक एकूण उत्पन्नापैकी बांधील खर्च वजा जाता राहीलेल्या निव्वळ महसुलातील ५ टक्के तरतुदीमधून महिला व बाल कल्याण याकरीता असलेल्या योजना / कार्यक्रम / कामे राबविणेस शासनाने मान्यता दिलेली आहे.

त्याचप्रमाणे सन्मा.सदस्या सौ.कांचन विकास सोनवणे यांनी देखील महिला व बालकल्याण विषयी २०२३-२४ करीता विविध उपक्रम राबविणेबाबत दि.१७/०४/२०२३ रोजी पत्र दिले आहे.

यापूर्वी महासभा ठराव क्रमांक ६९२ दि.१५/१२/२०२२ अन्वये महानगरपालिकेमार्फत महिला व बालकल्याण विभागाचे १ ते १५ उपक्रम राबविण्यात येत होते. परंतु उक्त नमुद शासन निर्णयातील निर्देशानुसार तसेच सुचनेनुसार महिला व बालकल्याणाच्या संबंधीत उपक्रम/योजनेत सुधारणा करणेस तसेच अतिरीक्त योजना/ उपक्रमांचा समावेश करुन त्यानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

| योजना क्रमांक | योजनेचे नांव |
|---|---|
| योजना क्र.०१ | ८ मार्च जागतिक महिला दिन साजरा करणे. |
| योजना क्र.०२ | कवयत्री बहिणाबाई जळगांवभुषण पुरस्कार. |
| योजना क्र.०३ | लेक लाडकी या घरची योजना. |
| योजना क्र.०४ | शिष्यवृत्ती योजना. |
| योजना क्र.०५ | विधवा/निराधार महिलांच्या कन्याविवाहासाठी अर्थसहाय्य देणे योजना. |

| | |
|---|---|
| योजना क्र.०६ | महिला बचत गटांच्या माध्यमातुन कापडी पिशव्यांची निर्मीती करुन विकत घेणे व नागरीकांना मोफत वितरीत करणे. |
| योजना क्र.०७ | महानगरपालिका माध्यमिक शाळेतील विदयार्थीनीना मोफत गणवेश वाटप करणे. |
| योजना क्र.०८ | महानगरपालिका प्राथमिक शाळेतील सर्व विदयार्थ्यांना मोफत दप्तर, शैक्षणिक साहित्य, पाण्याची बॉटल वाटप करणे. |
| योजना क्र.०९ | दुर्धर आजाराने ग्रासलेल्या महिलांना व बालकांना (HIV ग्रस्त, कॅन्सरग्रस्त, अर्धांगवायू, क्षय रोग इ.सारखे गंभिर आजार) झालेल्यांना NEFT, RTGS व्दारे उदरनिर्वाहाकरीता अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.१० | मुलींना, महिलांना व महिला बचतगटांना व्यावसायीक, रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.११ | महिलांकरीता व्यक्तीमत्व विकास कार्यक्रम राबविणे. उदा.संभाषण कौशल्य, सभा धीटपणा, सुत्रसंचालन, इव्हेंट मॅनेजमेंट इत्यादींचे प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.१२ | गुणवंत विदयार्थी विदयार्थीनीचा गुणगौरव करणे. |
| योजना क्र.१३ | क्रिडा स्पर्धेतील विजेत्या महिलाखेळाडूंना अर्थ सहाय्य महिला |
| योजना क्र.१४ | महिला व मुलींकरीता विविध स्पर्धांचे आयोजन करणे. |
| योजना क्र.१५ | महिला व मुलींच्या स्वयंरक्षणाकरीता प्रशिक्षण देणे. |
| योजना क्र.१६ | आधार योजना ६५ वर्षावरील जेष्ठ महिला, विधवा, निराधार, परित्यक्ता महिलांना उदरनिर्वाहसाठी अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.१७ | महिला व बालकांसाठी असणाऱ्या योजनेच्या माहितीचा प्रचार करुन जनजागृती करणे.(IEC) |
| योजना क्र.१८ | महिला बचत गट निर्मीत खादयपदार्थ व इतर वस्तू विक्री करीता महोत्सव आयोजीत करणे. |
| योजना क्र.१९ | महिला बचत गटांना व्यवसायाकरीता शिलाई मशिन, कांडप मशिन, शेवया मशिन इत्यादी मशिनसाठी अर्थसहाय्य देणे. |
| योजना क्र.२० | बचतगटांमार्फत उपहारगृह (कॅन्टीन) चालवणे. |
| योजना क्र.२१ | महिला बचत गटांनी तयार केलेल्या खादयपदार्थाना कायमस्वरुपी विक्री केंद्र उपलब्ध करुन देणे. |
| योजना क्र.२२ | मुली व महिलांना ई-दुचाकी, ऑटो रिक्षा (EV) करीता अर्थसहाय्य करणे. |
| योजना क्र.२३ | माझी कन्या माझा अभिमान योजना. |

उक्त शासननिर्णयातील निर्देशांचा व सूचनेंचा अभ्यासपूर्ण विचार करुन वरील १ ते २३ योजना/ उपक्रमांचा आराखडा तयार करण्यात आलेला असून सदर योजनांचा/उपक्रमांचा आराखडा व त्यानुसार योजना / उपक्रम राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सचूनेप्रमाणे उपरोक्त यादीतील योजना क्रमांक-७ मध्ये नमूद विदयार्थीनींन सोबतच महानगरपालिकेच्या बालवाडयांच्या मुलांना सुध्दा मोफत गणवेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२२ :-** स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (City Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक ‘Transfer Station’ करिता सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणेसाठी All India Institute of Local Self Government, Pune संस्थेची नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** मला याच्यामध्ये काही सुचना मांडायच्या आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.० अंतर्गत स्वॉलिड वेस्ट मॅनेजमेंटसाठी पहिला शासन निर्णय झालेला आहे व City Solid Waste Action Plan साठी वेगळा शासन निर्णय झ ाालेला आहे. चौथ्या महिन्यात २४ तारखेला हा शासन निर्णय झालेला आहे. याच्यामध्ये आपल्याला जे Transfer Station जे तयार करायचे आहे. आरोग्य अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली तर शहराचे ४ वेगवेगळया भागांमध्ये Transfer Station तयार करायचे आहे. ठिक आहे ४ होतील ५ होतील आपल्या आवश्यकतेनुसार Transfer Station तयार करायचे आहे. मॅडम ११२५ कोटी रूपयाचे Transfer Station आपल्याला तयार करायचे आहे. याच्यामध्ये तुम्ही सांगितल्या प्रमाणे त्या ठिकाणी जो दैनंदिन कचरा निर्माण होणार आहे तो कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सेग्रीगेशनचे ट्रान्सफर हे ट्रान्सपोर्टेशनला करायचे आहे. बरोबर आहे ना. तर त्याच्या मध्ये आपल्याला किती मोठे ठेवायचे आहे. याचा सर्व्हे पाहता जो डी.पी.आर. तयार करावयचा आहे. तो आता मागच्या काळामध्ये पाणी पुरवठेच्या आणि मलनिस्सारण योजनेच्या संदर्भात जो डी.पी.आर. तयार करावयचा आहे. तर आमची याच्यात छोटीशी अपेक्षा अशी असते मॅडम, सर्व सभागृह, गटनेते, नगरसेवक, पदाधिकारी, सिटी इंजिनिअर किंवा आयुक्त, यांनी जर असे मोठमोठे निर्णय घेणे पुर्वी जर सर्वपक्षीय गटनेतांची बैठक बोलवली आणि असे मोठमोठे प्रोजेक्ट बद्दल चर्चा केली. तर मला असे वाटते की, याच्यामध्ये हा जो सभागृहाचा वेळ जातो. हा जाणार नाही. आता इतका मोठा प्रोजेक्ट जर आलेला असेल. Transfer Station आपल्याला उभे करावयाचे आहे. जवळपास ११२५ कोटी रूपयांचा आहे. तर मला असे वाटते की, याच्या संदर्भात एक मिटींग झाली पाहिजे होती. प्रशासनाचा जो प्रस्ताव आहे. २४/०६/२०२३ तारखेला म्हणजे मागच्या महिन्यात दोन महिन्यापुर्वी हा डी.पी.आर. तयार झालेला आहे.तर दोन महिन्यापर्यंत कुठल्याच सदस्याला सांगण्यात आलेला नाही . आपला नेहमी चर्चा करीत असतांना महापौरांकडे मिटींग असतांना आम्ही वारंवार आपल्याला सुचना देतो की, शासन स्तरावर जे शासन निर्णय होतील किंवा राज्य शासनचे जे पत्र व्यवहार होतील. महापौर कार्यालय, उपमहापौर कार्यालय, सर्व पक्षीय गटनेते यांना सांगायला पाहिजे ना. पण असे होत नाही मॅडम, आणि याच्या संदर्भात सविस्तर माहिती द्या.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** आदरणीय महापौर, सन्मा.सभागृह स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेमध्ये घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवालचे डी.पी.आर. तयार करण्यासाठी मागच्या महासभेमध्ये आपला सविस्तर अहवाल हा तयार केलेला होता. त्यामध्ये शासनाने तीन एजन्सीजचे नाव दिलेले होते. तिघी एजन्सीजचा प्रस्ताव आपण महासभेपुढे सादर केला. त्यामध्ये मिटकॉन कन्सलटन्सी, पुणे, एम.ए.आय.एल. इंजिनिअरींग, गुजरात आणि ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पुणे असे तीन कंपन्यांना शासनाने इम्प्लीमेंन्ट दिलेले आहे. या तिन पैकी एकाला काम द्यायचे आहे. आणि त्याला किती रक्कम द्यायची ते सुध्दा दिलेले आहे. याचा सविस्तर प्रस्ताव आपल्या मागील महासभेमध्ये ठराव क्र. ११०५ दि.३०/०५/२०२३ रोजी मान्यता दिलेली आहे. आता एस.बी.एम. २.० मध्येच शासनाने आपल्याला ११ कोटी रूपये दिलेले आहे. ११ कोटी रूपये हे एस.बी.एम.२.० बद्दल आहे. आणि एस.बी.एम. २.० अंतर्गत मा.महासभेने सादक बादक चर्चा अंती त्या ठिकाणी ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पुणे या संस्थेला ठराव करून काम दिले आहे. आता हा जो निधी मंजुर झालेला आहे ना. ११ कोटीचा हा एस.डब्ल्यु.एम. अंतर्गत मंजुर झालेला आहे. मा.आयुक्त महोदयांनी मला सांगितले की, तुम्ही असा विषय घेण्याची आवश्यकता नव्हती. ऑल रेडी एजन्सीची नेमणुक महासभेने प्रशासनाद्वारे करण्यात आलेली आहे. हा त्याच्यातला एक घटक आहे. सॉलिड वेस्ट मेनेजमेंट मधील एक घटक आहे. फक्त ११ कोटी रूपये आपल्याकडे जे आलेले आहे. ते खर्च करणेसाठी महासभेची मान्यता कर्मप्राप्त आहे. निव्वळ त्याच्यासाठी आम्ही याच्यामध्ये घेतलेला आहे. आणि एजन्सीची नेमणुक शासनाने आपल्याला झालेल्या निर्णयानुसार दिलेली आहे का दिलेली आहे कारण यापुर्वी सविस्तर ठराव आपला मंजुर आहे. आणि याच्यामध्ये जो दिलेला आहे १४ फेब्रुवारी २०२३ चा शासन निर्णय तो शासन निर्णय आहे. त्या शासन निर्णयावर आपली महासभेची बरीच चर्चा झालेली आहे. हा शासन निर्णय तोच आहे.

**मा.उपमहापौर :-** आता तुम्ही दि.३०/०५/२०२३ चा ठराव वाचुन दाखवा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** करायचे काय नेमके कुलभुषणभाऊ.

**मा.उपमहापौर :-** हा विषय, दि.३०/०५/२०२३ चा जो ठराव आहे ना. सॉलिड वेस्ट मटेरिअलच्या संदर्भातला आहे. हा विषय वेगळा आहे तो विषय वेगळा आहे. यांचे म्हणणे आहे की, दि.३०/०५/२०२३ चा जो ठराव केलेला आहे. तो दि.११/०४/२०२३ ला मिळालेला आहे. पण तो पर्यंत काय केले यांनी. त्याच्या पुर्वीचा हा सुध्दा शासन निर्णय झालेला होता मग त्याच ठरावामध्ये हा विषय का घेतला गेला नाही.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** सन्मा.महापौर व उपमहापौर साहेब, त्यावेळेला शासनाने आपल्याला जो निर्णय दिलेला होता तो आपण महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवला होता. तद्नंतर आपल्या सभेचा ठराव झालेनंतर जे पत्र प्राप्त झ ालेले आहे ते मी तुम्हाला वाचुन दाखवतो,

**मा.उपमहापौर :-** महासभेने ठराव कधी केला.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** दि.३०/०५/२०२३ ला.

**मा.उपमहापौर :-** पत्र कधी मिळाले.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** हे पत्र आपल्याला.

**मा.उपमहापौर :-** दि.११/०४/२०२३ ला. चौथ्या महिन्यात,शासन निर्णय प्राप्त झालेला आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** आपल्याला दि.११/०४/२०२३ ला पत्र प्राप्त झालेले आहे. आपल्याला पत्र आलेले आहे आपल्या महासभेचा ठराव झाल्यानंतर परंतु शासनाने जे आदेश दिलेले होते. त्याच्यावर दि.११/०४/२०२३ प्रत्यक्षात महानगरपालिकेला प्राप्त झालेले आहे. जर हे अगोदरच प्राप्त झाले.

**मा.उपमहापौर :-** कधी इनवर्ड झालेले आहे तुमच्याकडे. ठरावाच्या पहिलेच झालेले आहे ना. महासभा निघण्याच्या पहिलेच झालेले आहे ना.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** शासनाच्या काढलेल्या आदेशाची जी तारीख आहे. भाऊ शासनाच्या आदेशाची तारीख आहे. हे दोन्ही विषय वेगळे आहे. ना.

**मा.उपमहापौर :-** याच्यामध्ये शासनाच्या परिपत्रकानुसार जी एजन्सी झाली एकट्याचच नाव दिलेले आहे का ? एकटा आहे का हा ? प्रस्तावात किती लोकं आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** शासनाने मागच्या महासभेत विट्रॅन कंपनी, पुणे, एम.ए.आय.एल. इंजिनिअरींग, गुजरात आणि ऑल इंडिया इन्स्टीट्युट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट, पुणे .

**मा.उपमहापौर :-** तो जो ठराव झालेला आहे सॉलिड वेस्ट मॅनेजमेंटच्या संदर्भात झालेला आहे. तो ठराव वेगळा आहे हा शासन निर्णय वेगळा आहे. तो सॉलिड वेस्ट मटेरियलसाठीचा ठराव आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** तोच आहे.

**मा.उपमहापौर :-** तो सॉलिड वेस्ट मटेरियलसाठीचा ठराव आहे. हा ट्रान्सफर स्टेशन तयार करणे संदर्भातला आहे. जरी लेखाशिर्ष एकच असले तरी दोघी कामे वेगवेगळे आहे. कामे एकच आहे का ?

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** हो एकच काम आहे.

**मा.उपमहापौर :-** कसे काय ?

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** आपल्याला १७ मजली महापालिका बांधायची आहे. दुसरा मजला बांधला आपण मग तिसऱ्या मजल्याची परवानगी घेऊन बांधकाम करण्यात आले तर दोन कामे नाही सांगता येणार ना भाऊ. सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट मध्ये घनकचरा प्रकल्पामध्ये आपल्याला जो निधी मंजुर झालेला आहे. त्या प्रकल्पाकरीता २८.१९ कोटी सुरुवातीला मंजुर झाले पण त्या अंतर्गत ट्रान्सफर स्टेशन, त्या ट्रान्सफर स्टेशनसाठी आहेत.

**मा.उपमहापौर :-** ट्रान्सफर स्टेशन उभारणे हा सिव्हील वर्कचे काम आहे.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** घनकचरा प्रकल्प उभारणे हे पण सिव्हील वर्कचे काम आहे.

**मा.उपमहापौर :-** १००% सिव्हील वर्क नाही ना ते.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** प्रकल्प उभारणे हे पण १००% सिव्हील वर्कचे काम नाही भाऊ.

**मा.उपमहापौर :-** प्रकल्प उभारणे हा १००% सिव्हील वर्क आहे की, हो १००% सिव्हील वर्क आहे. याचा डी.पी.आर. तयार करणेकरीता पॅनलवर तिन लोकं होते. तुम्ही एकाचाच का प्रस्ताव सादर केला. तुम्ही सांगितले असते की, पॅनलवर तीन आहे महासभेने ठरविले असते कोणाला द्यायचे ते. एक सर्व पक्षीय गटनेत्यांची बैठक बोलविली असती, त्याच्यामध्ये हा विषय घेतला असता, त्यांना विश्वासात घेऊन काम केले असते तर आपण आता जी चर्चा करतो आहे ती केली नसती. हे पहा काम करणे संदर्भात व काम देण्यासंदर्भात आम्हाला काही अडचण नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कुलभुषण भाऊ ह्या अडचणी आहे ना.

**मा.उपमहापौर :-** अडचण नाही. पण वारंवार हाच प्रकार का घडतो. एवढे मोठमोठे प्रोजेक्ट हेतुपुरस्कर अश्या पध्दतीने, टाईम प्रॉब्लम होतो ना भाऊ. अगोदरच दि.३०/०५/२०२३च्या ठरावासोबत घ्यायला काय प्रॉब्लम होता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुढे दक्षता घ्या याच्या संदर्भातली.

**श्री.उदय पाटील, आरोग्यधिकारी :-** भाऊ हे फक्त.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बापु राहु द्या बसा बापु. घ्या पुढचा विषय घ्या. ताई पुढचा विषय घ्या. हा प्रस्ताव पारीत करुन घ्या. ताई पुढचा विषय घ्या.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांचे CSWAP मंजूर करण्यात आलेला आहे. सदर मंजूर CSWAP मधील 'Transfer Station' या घटकांसाठी प्रकल्पास जळगांव शहर महानगरपालिकेस खालील प्रमाणे मंजूर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव | प्रस्तावित Transfer Station ची क्षमता (मे.टन/प्रती दिन) | प्रकल्पाची किंमत (रु.४.५ लक्ष/प्रती मे.टन दरानुसार) |
|---|---|---|---|
| ८ | जळगांव | २५० | ११२५.०० |

वरील दिलेल्या 'Transfer Station' या घटकाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी एजन्सीची नियुक्ती करणे. तद्नंतर अहवाल मा.राज्य अभियान संचालक यांना पाठविणे आवश्यक आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) शासन परिपत्रक स्वमअ/नावि-३४ दि.१४ फेब्रुवारी २०२३ अन्वये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प (SWM) - स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे कामी प्रकल्प सल्लागार म्हणून कामकाज करणेसाठी शासन परिपत्रकातील परिशिष्ट-१ मधील नाशिक विभागातील All India Institute of Local Self Government, Pune या एजन्सीचे कामाचा अनुभव पहाता महासभा ठराव क्रं.११०५ दि.३०/०५/२०२३ अन्वये SBM २.० अंतर्गत रु.२८.१९ कोटीचा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाचा DPR तयार करण्यासाठी करारनामा करुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

स्वच्छ महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) यांचेकडील पत्र क्रं.जा.क्र.स्वमअ २.०/टि.एस./२४ दि.११/०४/२०२३ रोजीचे पत्रानुसार स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' २५० मे.टन प्रती दिन क्षमतेचा प्रकल्प किंमत रु.११२५.०० लक्ष मात्रचा DPR तयार करणे हे काम देखील SWM अंतर्गत येत असल्यामुळे सदरचे काम देखील All India Institute of Local Self Government, Pune या संस्थेकडून करणे योग्य होईल.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' करिता सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी (DPR) Estimated Project Cost ११.२५ कोटी दर्शविलेली असून महाराष्ट्र नागरी विकास अभियान संचालनालय स्वच्छ भारत मिशन यांचेकडील एम.यु.डी.एम.एस./एसएमएम/१४१० दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजीची Empanelment Order मधील Annerxure A- मधील D नुसार नाशिक विभागाकरिता Consulting Fees Project Cost च्या २.५५% अदा करणे आवश्यक असून स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेस CSWAP (Ciy Solid Waste Action Plan) मधील मंजूर घटक 'Transfer Station' करिता सविस्तर प्रकल्प

अहवाल (DPR) तयार करणेसाठी All India Institute of Local Self Government, Pune संस्थेची नियुक्ती करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२३ :-** जळगांव रेल्वे स्टेशन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पोलीस चौकी पर्यंत रस्ता नो - हॉकर्स झोन घोषित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा परंतु येथे मोठया संख्येने मोठया प्रमाणावरती अतिक्रमण झालेले आहे. नो-हॉकर्स झोन मंजुर करणे ही झाली आपली कागदोपत्री प्रक्रिया.

**मा.आयुक्त :-** नाही, काढत आहे ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, मी म्हणतो ना, कागदोपत्री प्रक्रिया ही पार पडली आज. परंतु याची अंमलबजावणी. येथे जशी तक्रार यांनी सांगितली, येथे ६.०० वाजेनंतर आपल्या कर्मचाऱ्यांची ड्युटी संपल्यानंतर येथे खऱ्या प्रमाणात अतिक्रमण जे होते. एकतर सकाळी ६.०० वाजेपासुन सुरु होते. आणि रात्री १२-०१ वाजेपर्यंत चालते. याच्या संदर्भात एक वेगळे पथक रात्रीच्या कार्यवाहीसाठी गठीत करणे गरजेचे आहे. कारण तेथे खुप भयानक परिस्थिती असते. म्हणजे एका दिवशी तेथे मर्डर सुध्दा होऊ शकतो.

**मा.आयुक्त :-** आपण वेगळे पथक तयार करुन त्यांना तेथे कायमस्वरुपी ठेवु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या बाबतीत प्रशासनाने गांभिर्याने दखल घ्यायला पाहिजे.

**मा.आयुक्त :-** हे एक आणि गणेश कॉलनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो.

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम या विषयाला अनुसरुनच एक विनंती आहे. बऱ्याच ठिकाणी आपण दुसऱ्या शहरामध्ये जातो. जे काही तेथे शासकीय निवास स्थान आहे मुख्य अधिकाऱ्यांचे किंवा शासकीय कार्यालय आपल्याला बघायला मिळतात. आपण स्वातंत्र चौक सोडले की थेट महाबळ चौक पर्यंत शासकीय निवास स्थान किंवा कार्यालय आहे. म्हणजे कलेक्टर ऑफिस झाले, एस.पी.साहेबांचा बंगला, जजेसचे बंगले आहे तेथे. कलेक्टर साहेबांचा बंगला तिथपर्यंत सगळया ठिकाणी अतिक्रमण असते. आमचे जाऊ द्या पण मोठया अधिकाऱ्यांचे रस्त्यांवर कमीत कमी नको. हे नो-हॉकर्स झोन मध्ये ते पण घ्या. नसाल तुम्ही स्वातंत्र चौक पासुन तर आकाशवाणी चौक ते महाबळ पर्यंत आणि काव्यरत्नावली पासुन ते कलेक्टर साहेबांच्या बंगल्यापर्यंत हे पण नो-हॉकर्स झोन करा माझी विनंती आहे. आणि या संदर्भात मी प्रत्येक वेळेस बोलतो अतिक्रमण वाल्यांना की, तो रस्ता क्लिअर ठेवा. आकाशवाणी ते महाबळ पर्यतचे दोन दिवस तिन दिवस होते मग चौथ्या दिवशी परत तेच असतं. त्यामुळे माझी विनंती आहे की, नो-हॉकर्स झोन करुन टाका. सगळे मोठे अधिकारी राहतात.एस.पी. साहेब आहे, कलेक्टर साहेब आहे. कलेक्टर बंगला आहे. शासकीय कार्यालय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याचेही याच्यामध्ये समावेश करण्यात यावा.

**श्री.अनंत जोशी :-** याचेही याच्यामध्ये समावेश करण्यात यावा.

**सौ.शुचिता हाडा :-** बस स्टॅण्डच्या रोड पासुन ते शिवाजी पुतळयापर्यंत जिल्हा परिषद अध्यक्षांच्या बंगल्यापासुन पुढे पुर्ण अतिक्रमण आहे.

**श्री.अनंत जोशी :-** मी तेच बोललो ना स्वातंत्र चौक पासुन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शिवाजी महाराजांच्या पुतळयापासुन ते एस.पी. साहेबांच्या निवास स्थानापर्यंत.

**श्री.अनंत जोशी :-** संभाजी राजे नाट्यगृह जवळ त्या लोकांना वाहुळे साहेबांनी जागा दिली होती. म्हणुन माझे असे म्हणणे आहे की, मी स्वातंत्र चौकापासुन म्हणतो. ताई म्हणत आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळया पासुन तर थेट महाबळ पर्यंत घ्या आणि इकडे काव्यरत्नावली पासुन ते कलेक्टर साहेबांच्या बंगल्यापर्यंत, सगळे मोठे जजेस राहतात, अधिकारी राहतात, एस.पी.साहेब आहे, कलेक्टर साहेब आहे. शहरातला सगळयात मुख्य रस्ता आहे. आणि सगळे अतिक्रमण असते. घाण, अतिशय घाण पध्दतीने असते ते. गोराणे साहेब याचाही समावेश करण्यात यावा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे टॉवर पासुन आपले मेन रोड.

**मा.आयुक्त :-** नवीपेठ,

**मा.महापौर :-** नेहरु चौक ते टॉवर,

**श्री.अनंत जोशी :-** मॅडम, एक शंका आहे. विचारु का ? पुढे काय होईल माहित नाही. पुढे नविन अधिकारी येतील आम्ही पण नसु तुम्ही पण नसणार. पण तुम्ही आहात तो पर्यंत हे अमलात येईल का ? नो-हॉकर्स झोनचा जर ठराव केला तर आम्हीही फक्त ठराव करुन मोकळे होणार आहोत. याची पण खात्री द्या तुम्ही.

**श्री.नितीन लद्ढा :-** विद्याताई, काही तरी अशी कामगिरी करुन दाखवा जळगांव शहरासाठी की, जळगांव शहरात तुमचे नाव राहील.

**श्री.अनंत जोशी :-** अधिकारी खुप येतात आणि जातात.वेगळा ठसा उमटविण्याची, आपली कार्यशैली दाखविण्याची, धमक दाखविण्याची एक पुर्व संधी देतो मी. दुपारी व सकाळी पण तुम्हाला एक संधी दिली होती.तुम्ही दाखवत नाही, तुमचा ठसा उमटवत नाही. त्या विषयी पुढच्या महासभेत पण चर्चा करणार आहे. त्यातले काही विषय राहिलेले आहे. मी परत पत्र देतो आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, आपण नो- हॉकर्स झोनच्या बाबतीत रेल्वे स्टेशन पासुन सुरुवात केली, मला वाटते, महाबळ चौकापासुन शिवाजी पुतळया पासुन टप्या टप्याने टॉवर चौका पर्यंत आलो आहे. आता हे सगळे करत असतांना आपण त्या जागी जे जे नो-हॉकर्स झोन असेल.महापौर महोदया, महापौर महोदया, हे जे आता आपण हॉकर्स झोन डिक्लेअर केले आहे. याचा ठराव करतो आहे. तर जागेवरती या ठिकाणी बोर्ड पण लागले पाहिजे. नो-हॉकर्स झोन आदेश आयुक्त म.न.पा.जळगांव असे जर बोर्ड लागले तर नागरीकांना पण माहिती होईल. आपण ठराव करतो. परंतु आपल्या कर्मचाऱ्यांना पुर्ण माहिती नसतं. अधिकाऱ्यांना माहिती नसतं. जर आपल्याकडुन आपल्या कर्मचाऱ्याकडुन दुर्लक्ष झाले. तर नागरीक आपल्यापर्यंत, आपली जी वेबसाईट आहे किंवा आपला हेल्प लाईन नंबर आहे. त्याच्यावरती सुध्दा नागरीक तक्रार करतील. अशी सुविधा नागरीकांना मिळाली पाहिजे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य बंटीभाऊ जोशी आणि सन्मा.सदस्य पोकळे साहेब यांनी दिलेले रस्त्यांचे सुध्दा या कामामध्ये समावेश करण्यात यावे. आणि विषय क्र.२३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.महेश चौधरी :-** कोर्ट चौक ते गणेश कॉलनी, तेथे खुप त्रास आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य महेशभाऊ चौधरी यांनी दिलेला कोर्ट चौक ते गणेश कॉलनी हा रस्ता सुध्दा नो हॉकर्स झोन मध्ये समावेश करण्यात यावा. सर्वानुमते विषय क्र.२३ मंजुर करण्यात येत आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, पोलीस अधिक्षक जळगांव तसेच पोलीस निरिक्षक शहर पोलीस स्टेशन जळगांव, जळगांव रेल्वे स्टेशन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पोलीस चौकी परीसरातील हॉकर्स यांचे अतिक्रमण काढुन सदरचे परीसर हॉकर्स प्रतिबंधक क्षेत्र म्हणुन घोषित करण्याबाबतचे पत्र प्राप्त झालेले असुन पत्रात दिनांक १४/०४/२०२३ रोजी रात्री १२ वाजेपासुन मोठया संख्येने पुजनासाठी नागरीक येतात त्यावेळी त्याठिकाणी मोठयाप्रमाणात गर्दी होत असते व सदर ठिकाणी दिवसा व रात्री चहा, नास्ता, पान मसालाविक्रीचे तसेच खादय पदार्थ विक्रेते यांची प्रचंड प्रमाणात वर्दळ असते व या हॉकर्सच्या व्यवसायामुळे त्यांच्याकडे येणारे नागरीकांचे वाहने पार्कींग करुन नेहमी वादविवाद होतात. सदर ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक असुन तेथिल होणाऱ्या वादातुन स्मारकास इजा पोहचवुन किंवा नुकसान होऊन कायदा व सुव्यस्थेच्या प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणुन जळगांव रेल्वे स्टेशन डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते पोलीस चौकी पर्यंत रस्ता नो - हॉकर्स झोन घोषित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे खालील रस्ते नो-हॉकर्स झोन म्हणून घोषीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महाबळ चौक
२. काव्यरत्नावली चौक ते मा.जिल्हाधिकारी बंगला
३. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते ॲक्सिस बँक ते नेहरु पुतळा ते टॉवर चौक
४. कोर्ट चौक ते गणेश कॉलनी चौक पर्यंत

प्रशासनाने सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी. तसेच ज्या ज्या ठिकाणी नो-हॉकर्स झोन महानगरपालिकेने घोषीत केलेले आहे त्या त्या ठिकाणी प्रशासनाने नो-हॉकर्स झोनबाबत फलक लावणेबाबतची कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२४ :-** जळगांव शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना पाईपलाईन दुरुस्ती देखरेख करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२४ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आता हे दुरुस्तीवर खर्च करतो आहे. पाणी पुरवठ्याचा विषय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता हा पाणी पुरवठ्याचा मक्ता आपण याच्यासाठी काढला की, आता आपल्याकडे कर्मचाऱ्यांची संख्या कमी झालेली आहे. दुरुस्ती नाही. ते म्हणजे ऑपरेशन ॲण्ड मेनटेनन्स आहे. म्हणजे योजना चालविणे आणि व्यवस्थीत ठेवणे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आपला वेळोवेळी त्यांना जो खर्च लागतो त्यांना ती मान्यता देतो. पण माझे एकच म्हणणे आहे. गिरणाची आपली जी पहिली पाईप लाईन होती. त्या ठिकाणी जो भंगार होता. तो कुठे गेला,

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही लोकांनी उचलुन घेऊन गेले पाईप.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** लिलाव कर दिया.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** लिलाव बेचा ही नही. सिर्फ चोरी का गुन्हा दाखल कर लिया. और सामनेवाले ने बेच डाला.उसपर कार्यवाहीच हुई नही. तसाच हा ड्रेनेज वाल्यांचा विषय आहे. शाहु नगर शिवाजी नगरच्या टाईमाला जुन्या ज्या ड्रेनेज होत्या. त्याचे मोठमोठे चेंबर होते बिडचे. ते ड्रेनेज वाल्यांनी जमा केले. मी ३ वर्षापहिले साहेबांना सांगितले होते. हे लोकं ड्रेनेजचे चेंबर जमा करत आहे. जाऊ द्या आपण जमा करु. त्यांनी विकुन खावुन गेले. मग त्याची भरपाई कोण देणार. नगरपालिकेच्या प्रॉपर्ट्या विकत आहे लोकं. त्याची भरपाई कोण देणार. जुन्या ड्रनेज होत्या. मोठमोठे चेंबर होते शाहु नगर, शिवाजी नगरला, त्या टाईमाला जुन्या लाईनी होत्या. त्याचे वरचे झाकणे त्यांनी जमा केल्या होत्या. माझ्याकडे फोटो आहे त्या टाईमाचे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, आयुक्त मॅडम,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** कार्यवाही करा. जे असतील ते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौर महोदया, पाण्याचा प्रश्न आहे. आज आपण जळगांव शहराला अमृत योजनेतुन पाणी देतो आहे. रात्री माझ्या वार्डात ३.०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा चालला, ३.०० ते ४.०० वाजेपर्यंत आता एवढे रात्री बे रात्री महिलांसाठी त्रासदायक होतो. लोकांचे ३.०० वाजेपर्यंत फोन आले. मग आपण त्याचे नियोजन का करत नाही. टाकी तयार झालेली आहे. फक्त जोडणी बाकी आहे. जर टाकीतुन आम्हाला पाणी पुरवठा सुरळीत झाला तर आमचा टाईम पण वाचेल. ३.०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा चालत आहे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ईबाभाऊ आपण जे म्हणतात, काल रात्री ३.०० वाजेपर्यंत पाणी पुरवठा झाला, आपल्याकडे जसे जसे अमृत लाईनचे कामे पुर्ण होत आहे. ज्या ज्या लाईन आपण कार्यान्वीत करत आहोत. अमृतचे शिफ्टींग चालु आहे आता.शिफ्टींगमुळे आपला पाणी पुरवठा पुर्णपणे संतुलित नाही. काही भागात अमृतचे पाणी पोहचते काही भागात पोहचत नाही. काही लोकांना पाणी बंद करण्याची सवय नसल्यामुळे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** या रोजच्या गोष्टी आहे. माझे फक्त इतके म्हणणे आहे, टाकी तयार आहे तर तुम्ही आम्हाला टाकी वरुन जॉईंट का करुन देत नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तेच सांगत आहे. आता याची फ्लॅशींग, टेस्टींग सर्व करत आहोत आपण, आणि अमृतची शिफ्टींग झाल्यानंतर अमृतचे पाणी पुरवठा सगळयांना करता येईल. पाणी जातांना खालच्या भागात पोहचत नाही.वरचे लोकं जो पर्यंत बंद नाही करतील तो पर्यंत पाणी खाली पोहचत नाही. म्हणुन त्या लोकांना पाणी पुरवठा करणेसाठी हा वेळ वाढवावा लागतो नाईलाजाने.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आमच्या वार्डातील टेस्टींग संपली, रस्ते तयार आहे. पाण्याचा त्रास आहे ३.०० वाजेपर्यंत.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ठिक आहे आपण त्यांना तश्या सुचना देऊ.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सोनगिरे साहेब महापौर महोदया, पाण्याचा जो विषय आहे या संदर्भात मी लिहुन आणलेले आहे. पाण्याच्या टाकीच्या संदर्भात मी लिहुन आणलेले आहे. ईबाभाईंनी विषय काढला म्हणुन नाही बोलत, मी याच्यासाठी लिहुन आणलेले आहे. आणि मला वाटते, नेमाडे साहेब आहे का येथे. नेमाडे साहेब याइकडे एक मिनीट.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** राजुभाऊ रात्री ४.०० वाजेपर्यंत आमच्याकडे पाणी पुरवठा चालु होता,मी स्वत: रात्री ३.०० वाजेपर्यंत जागी होतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** सुनिलभाऊ, सुनिलभाऊ, महापौर मॅडमांना, आयुक्त मॅडमांना मी ६ महिनेपुर्वी पत्र दिलेले होते की, मेहरुन मध्ये, रामेश्वर कॉलनी मध्ये अमृतच्या माध्यमातुन पाण्याची टाकी बांधली जात आहे. ६ महिन्यापासुन सांगत आहे मी ही सुचना. ६ महिन्यापासुन साहेब सांगत आहे. टेस्टींग झालेले आहे, वॉशआऊट झालेले आहे. सांगता आहेत ना साहेब. किती महिन्यापासुन मी हा विषय करत आहे.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** टेस्टींग झाली आहे, त्याची जी मेन पाईप लाईन आहे ना ती जोडायची बाकी राहिलेली आहे. त्याच्यामुळे त्याला आपण भरुन घेतो.पण पाणी पुरवठा करता येत नाही. म्हणुन पाणी पुरवठा करता येत नाही.

**श्री.राजेंद्र पाटील :-** साहेब ४ महिन्यापासुन आम्ही नागरीकांना उत्तर देत आहोत. ईबाभाईंनी सांगितले १२-०१ ला पाणी येते. २ ला पाणी येते.रात्री २.०० वाजता नागरीक आम्हाला फोन करतात की, साहेब आमच्या नळाला पाणी येत नाही. रात्री २.०० वाजता तेथे जावे लागते. हनुमान नगर मध्ये दोन नळ आहे पाणी पुरवठयाचे. आपला पुरवठा होता. रात्री २.०० वाजेपर्यंत तेथे थांबलो मी, कशासाठी की, एक तास आपण पाणी देतो. तासाभरापर्यंत त्या नागरीकांच्या मोटारी कोरड्या फिरतात. पाणीच येत नाही तासाभरापर्यंत आणि आपला पाणी पुरवठयाचा व्हॅालमन जो असतो त्यालाही मर्यादा आहे. एक तासाच्या ठिकाणी जर तो दिड तास द्यायला लागला. तर त्यांना पुर्ण रात्र अपुर्ण पडते. आम्ही व्हॅालमनला रिक्वेस्ट करतो की, भाऊ दे त्यांना अर्धा तास त्यांना. म्हणजे गरज आहे ती. पाणी सगळयांना मिळायला पाहिजे. दोन दिवसामध्ये त्यांना एक तास आहे, आम्ही पाणी सगळयांना मिळायला पाहिजे प्रयत्न करतो. आम्ही तुम्हाला फोन करतो, चौधरी साहेबांना फोन करतो आपले पाणी पुरवठ्याचे शाखा अभियंता,त्यात प्रत्येक व्हॅालमनला माहिती आहे. प्रत्येक पाण्याचा पुरवठा झाला की, आम्हाला फोन येतात की, भाऊ पाणी पुरवठा झाला नाही. माझ्या स्वत:च्या घरी रात्री दोन वाज्याला पाणी येते. ज्या दिवशी माझ्या नळाला बिना मोटरने पाणी येते. त्या दिवशी समजत मला की, आज पाणी सर्वांना मिळेल, ज्या दिवशी बिना मोटरने पाणी नाही आले, आजपुर्ण दिवसभर नागरीकांचे फोन वाजतील.मला त्याच्यावरुनच कळुन जात. आणि मी व्हॅालमनला सांगतो की, भाऊ अर्धा तास वाढुन दे. आणि ते अर्धा तास ही मोजके पाणी मिळते त्यांना. कारण व्हॅाल पासुन ज्या नागरीकांचे नळ जवळ आहे. ते मोटर बंद करायचे नावच घेत नाही. अर्धा तास जरी वाढुन दिले तरी त्यांच्या मोटारी सुरु असतात. काही नागरीक संडास टॉयलेट मध्ये नळया सोडुन देतात.काही गटारीत सोडुन देतात. डायरेक्ट मोटारी लावलेल्या आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** राजुभाऊ, राजुभाऊ,

**श्री.राजेंद्र पाटील :-** ऐका ना, जुनी जी पाण्याची पाईप लाईन होती. त्याच्यावर १०० कनेक्शन होते. आता अमृतच्या माध्यमातुन आता एका व्हॅालवर २००-३०० कनेक्शन झालेले आहे. मग आपण जर १०० कनेक्शनला एक तास पाणी देत होतो. तर तेथे ३०० कनेक्शन झाले, मग आपला एक टप्पा कमी झाला, तर आपण तो वेळ वाढवुन द्यायला पाहिजे. ते वाढवुन दिला जात नाही आणि याच्यामुळे आम्हाला त्रास होतो. तर ती टाकी जी आहे किती दिवसात सुरु होईल.

**श्री.संजय नेमाडे, पाणी पुरवठा अभियंता :-** ८ दिवसात सुरु करतो.

**श्री.राजेंद्र पाटील :-** २७ तारखेपर्यंत मला चौधरी साहेबांनी सांगितले होते. २७ तारखेपासुन आपण अमृतचे पाणी देऊ.आज ७ तारीख आली तरी सुरु झालेली नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** साहेब, त्या पाईप लाईनवरती ४-४, ५-५ नळ कनेक्शन आहे आता. ते चालतात.

**श्री.सुनिल महाजन :-** सुनिलभाऊ, ओ सुनिलभाऊ.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, एकच मिनीट, काय झाले सोनगिरे साहेबांनी सुरवातीला सांगितले की, प्रभाग अधिकाऱ्याला ५-५ लाखापर्यंतची मंजुरी द्यायची. आता नेमके काल आमचे प्रभाग अधिकारी जे होते. ते त्या प्रकरणामध्ये निलंबीत झाले. आता कोण येईल त्या ठिकाणी.

**मा.आयुक्त :-** लक्ष्मण सपकाळेंची ऑर्डर केली आहे त्या ठिकाणी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** चला ठिक आहे. एकदम योग्य मनुष्य दिला तुम्ही. आवडला मला, चांगले काम तरी होईल.

**मा.महापौर :-** पण चव्हाण साहेब जे होते त्यांना नॉलेज होते. ते पण वाईट वाटत आहे मला थोडेसे, त्यांना सगळ माहित आहे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई, का झाले याचे कारण ही सांगा.

**मा.उपमहापौर :-** जाऊ द्या ना बंटीभाऊ.

**मा.महापौर :-** नाही नाही, पण मला असे वाटते की, आपण सगळयांनी मिळुन त्यांना पुर्ववत त्या ठिकाणी आणायला पाहिजे. परत तिथे द्यायला पाहिजे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** तेथे प्रभाग अधिकारीची नियुक्ती लवकरात लवकर करावी.

**मा.उपमहापौर :-** चला सदर विषयाला माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मध्ये पाणी पुरवठा विभागामध्ये मनपा स्थायी कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले असल्याने कर्मचाऱ्यांची कमतरता होत आहे. त्यामुळे नागरीकांना पाणी पुरठा बाबत आवश्यक त्या सुविधा देताना अडचणी उद्भवत आहे. विषेशता नळ दुरुस्ती करणे, नळ कनेक्शन करणे. या कामाबाबत उशिर होत आहे. तसेच यापुढील कालावधीमध्ये सुध्दा कर्मचारी हे बऱ्याच जास्त संख्येने सेवानिवृत्त होणार असल्याने पाणी पुरवठा सुरळीत ठेवण्या करीता मक्तेदारामार्फत पाणी पुरवठा विभागातील पाईपलाईन दुरुस्ती, नळ संयोजन दुरुस्ती, नविन नळ संयोजन देणे, याप्रकारची व तसेच पाणी पुरवठा करण्याकरीता व्हॉलमन म्हणुन कर्मचारी आवश्यकता आहे.

तसेच अमृत योजना अंतर्गत संपुर्ण शहरामध्ये पाणी पुरवठा करता एचडीपीई पाईपलाईन टाकण्यांत आलेले आहेत तसेच करता एमडीपीई नळ संयोजन देण्यांत आलेले आहेत. सदरचे अमृत योजनेचे काम अंतिम टप्प्यात असून काम पुर्ण झालेनंतर योजना मनपाकडे हस्तांतरीत झालेनंतर पाणी पुरवठा सुरळीत ठेवणे, करीता पाईपलाईन, व्हॉल, नळ संयोजन देणे इ. मध्ये उद्भवणारी गळती दुरुस्ती, पाणी पुरवठा मधील नागरीक तक्रारी निरसन करणे, नळ संयोजन देणे इ. काम मनपास तातडीने करावी लागतील.

मनपा हद्दीत होणारी रस्ते, गटार नाले इ. विकास कामांच्या बांधकामात होणारी पाईप लाईन गळती, तुटणारे नळ कनेक्शन यांची तातडीने दुरुस्ती कामे करणे आवश्यक असते. तसेच या पाईपलाईन गळती दुरुस्ती करीता आवश्यक पाईप व साहित्य, प्रशिक्षीत कर्मचारी लागणार असून ती मनपा कडेस उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही दुरुस्ती मक्तेदाराकडुन करुन घेणे सोयीचे होईल. त्याकरीता उक्त कामी खालील सन २०२३-२४ व २०२४-२५ या दोन वर्षाकरिता पाणी पुरवठा योजनेची देखरेख व दुरुस्ती कामी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यानुसार सदरचे कामी अंदाजीत रक्कम रु.३,८९,२४,४८६/- इतका खर्च अपेक्षीत आहे.

शहरातील पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेसाठी विविध प्रकारची आवश्यक दुरुस्ती, नळ संयोजन व इतर कामे सन २०२३-२४ व २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी कामगार मजुर, मशिनरी व इ साहित्यासह काम करणेसाठी अंदाजपत्रक तयार करुन मान्यतेस्तव सादर केले आहे. याकामी येणारा (दोन वर्षासाठीचा) खर्च रु.३,८९,२४,४८६/- असुन चालु आर्थिक वर्षाकरीता अर्थसंकल्पीय तरतुद २.०० कोटी आहे. व उर्वरीत खर्च वजा जाता त्यापैकी झालेला खर्च वगळता रु.१,४९,५१,०४०/- मात्र शिल्लक आहे. त्यातुन चालु वर्षाकरीताचा खर्च करणे व उर्वरीत रक्कमेसाठी पुढील आर्थिक वर्षात तरतुद करणेचे नियोजन आहे.

प्रशासनाने उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे जळगांव शहर महानगरपालिका पाणी पुरवठा योजना पाईपलाईन दुरुस्ती देखरेख करणेबाबतची कामे मक्तेदारामार्फत करणे कामी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन निविदा प्रक्रिया राबविणेस व प्रशासकीय तसेच वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.२५ :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर, मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करून मिळणेबाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते ९३ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधुन करणेबाबत मा.महापौर ,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सर्व सन्मा.नगरसेवकांनी विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असुन ते विविध शासकीय योजनांतुन घेणे बाबत विनंती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन मंडळ तसेच राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत मा.महापौर कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केलेले आहेत. जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलितवस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभुत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्ट्यपुर्ण योजना,शासनाच्या प्रादेशिक पर्यटन विकास योजना निधी, जळगांव मनपा निधीतुन कामे सुचविलेली असुन त्यास मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले आहे. तरी या सोबत सादर केलेल्या यादीतील अ.क्र.०१ ते ९३ या विकास कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

**महासभा ठराव क्र.** **विषय क्र.२५** **दि.०७/०७/२०२३**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | अॅड.दिलीप पोकळे | 1 | सुरेश कलेक्शन पासुत ते मारोती चौक (टी पॉईट पर्यंत) रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व रस्त्याच्या दोन्ही बाजुस २ मिटर मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | 28000000 |
| 2 | 22,30,00,000 | | दुध फेडरेशन मुख्य रस्त्यापासुन ते एम. एस. सी.बी. ऑफीस ते सिटी कॉलनी पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजुस २ मिटर मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | 8000000 |
| 3 | | | सिटी कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 10000000 |
| 4 | | | केशर बाग मधील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 5 | | | राजमालती नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| 6 | | | खडकेचाळ मधील मेन रोड व गल्ली बोळातील रस्ते कॉंक्रीटीकरण करणे | 8000000 |
| 7 | | | गेंदालाल मिल मधील ७२ बोळी मधील गटार बांधणे स्लॅब टाकणे | 35000000 |
| 8 | | | लक्ष्मी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 8000000 |
| 9 | | | सोपान नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे | 30000000 |
| 10 | | | पिवळी चाळ मधील रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे | 3000000 |
| 11 | | | रघुनाथ नगर रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे | 20000000 |
| 12 | | | बहिणाबाई नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे व आर.सी.सी. गटार बांधणे | 20000000 |
| 13 | | | प्रभागातील सर्व प्रमुख चौकात CCTV कॅमेरा बसविणे | 35000000 |
| 14 | | | प्रभागातील प्रमुख चौकात हायमस्ट लावणे | 2000000 |
| 15 | | | प्रभागातील ओपन स्पेस मध्ये हायमस्ट लावणे | 2000000 |
| 16 | श्री.किशोर बाविस्कर | 2 | प्र.क्र. 2 श्री.प्रकाश तायडे यांचे घरापासून ते श्री.गणेश ठाकरे यांचे घरापर्यत दोन्ही बाजुस आरसीसी गटारी बांधणे | 6000000 |
| 17 | 2,35,00,000 | | प्र.क्र.2 वाणी मंगलकार्यालयाच्या परिसरामध्ये 1) धनसिंगदादा चक्कीवाले यांचे गल्ली 2) रतिलाल झेंडू सपकाळे यांची गल्ली 3) स्वामी नारायण मंदीर परिसरातील गल्ली 4) शालिक आप्पा सपकाळे यांचे घराच्या पाठीमागे ते महेश पोलिस यांचे घरापर्यत अश्या चार गल्ल्यांमध्ये आरसीसी बांधणे | |
| 18 | | | प्र.क्र.2 उज्ज्वल चौक ते प्रशांत चौक दोन्ही बाजुने आरसीसी गटार बांधणे | 6500000 |
| 19 | | | प्र.क्र.2 उज्ज्वल चौक ते सावित्री आजी यांचे घरापर्यत दोन्ही बाजुने आरसीसी गटार बांधणे | |
| 20 | | | प्र.क्र.2 गणपती मंदीर ते श्रीराम चौक व अशोक सोनवणे यांची गल्ली दोन्ही बाजुने आरसीसी गटार बांधणे | |
| 21 | | | प्र.क्र.2 कांचन नगर परिसरामध्ये आवश्यक ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हर्ट टाकणे | 1000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 22 | | | प्र.क्र.2 रेल्वे लाईन सार्व. शौचालयापासून ते हरिओम नगरच्या कोपऱ्या पर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 5500000 |
| 23 | | | प्र.क्र.2 रेल्वे लाईन सार्व. शौचालयापासून ते हरिओम नगरच्या कोपऱ्या पर्यत आरसीसी गटार बांधणे | 1800000 |
| 24 | | | प्र.क्र.2 कालंकामाता मंदीर परिसरातील जैस्वाल दादा ते गोटू रिक्षावाल व मनोज गाढवे ते काजल किराणा व बंटी गवळी, दत्तु चहावाला व आशाताई यांच्या गल्लीमध्ये दोन्ही बाजुस तसेच आजुबाजूच्या परिसरात आसीसी गटार बांधणे | 2700000 |
| 25 | श्री. नवनाथ दारकुंडे | 2 | प्र.क्र. 2 मधील श्री मोटर्स ते राजवाडा पर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 26 | 8,68,00,000 | | प्र.क्र. 2 मधील गोविंद ओझा यांचे घरापासुन ते मकरा अपार्टमेन्ट पर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 2100000 |
| 27 | | | प्र.क्र. 2 मधील मकरा अपार्टमेंन्ट ते अशोक सपकाळे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 1000000 |
| 28 | | | प्र.क्र. 2 मधील जाफर चौक ते सुनिल शिंदे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 7000000 |
| 29 | | | प्र.क्र. 2 मधील शेख बिसमिल्ला यांचे घरापासुन ते जाफर चौका पर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 650000 |
| 30 | | | प्र.क्र. 2 मधील परवेज पटेल यांचे घरापासुन ते शेख अलताफ यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 450000 |
| 31 | | | प्र.क्र. 2 मधील महाराष्ट्र दालमिल पासुन ते हुडको रस्त्यापर्यंत मोठी गटार बांधणे व रोडक्रॉसींग स्लॅब टाकणे | 4000000 |
| 32 | | | प्र.क्र. 2 अंतर्गत ठिकठिकाणी स्लॅब कल्व्हेट व आर.सी.सी. गटार बांधणे | 1600000 |
| 33 | | | प्र.क्र. 2 मधील पाठक चक्की पासुन ते कोल्हे यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 2500000 |
| 34 | | | प्र.क्र. 2 मधील सार्व. शौचालय पासुन ते दर्गा पर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 2500000 |
| 35 | | | प्र.क्र. 2 मधील सतिश कंडारे यांचे घरापासुन ते भनगर यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 5000000 |
| 36 | | | प्र.क्र. 2 नागला किराणा पासुन ते तिवारी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 6000000 |
| 37 | | | प्र.क्र.2 पाठक चक्की ते दर्ग्याच्या कोपऱ्यापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 5000000 |
| 38 | | | प्र.क्र. 2 गोविंद ओझा यांचे दालफळ पासुन ते शिव मंदीरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 4000000 |
| 39 | | | प्र.क्र. 2 शाळा क्रं. 1 पासुन ते क्रांती चौका पर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 4000000 |
| 40 | | | प्र.क्र. 2 शिवाजी नगर मधील मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते डांबरी करण करणे | 3000000 |
| 41 | | | प्र.क्र. 2 मधील स.नं. 342/6ब, 342/अ 1,अ 2 व इतर ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटी करण करणे | 6000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 42 | | | प्र.क्र. 2 मधील स.नं. 342/6ब, 342/अ 1,अ 2 मधील ओपनस्पेस तसेच शिवाजी नगर मधील अहिल्याबाई होळकर बगीच्या या दोन्ही ठिकाणी वॉल कंपाऊड करणे | 7000000 |
| 43 | | | प्र.क्र. 2 हितेंद्र रायसिंग यांचे घरापासुन ते मनोज वाणी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 1500000 |
| 44 | | | प्र.क्र. 2 रमेश हरिचंद्र यांचे घरापासुन ते साईनाथ यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे | 2000000 |
| 45 | | | प्र.क्र. 2 अशोक सोनवणे यांची गल्ली व रमेश इंगळे यांची गल्ली संदीप सपकाळे बाजुची गल्ली रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3000000 |
| 46 | | | प्र.क्र. 2 जैस्वालदादा यांचे घरापासुन ते रिक्षावाला जाधव यांच गल्ली ते काजल किराणा, छोटु काका ते गणेश गाळवे व बंटी गवळी राहुल दिनकर यांचे घराजवळील स्लॅब कल्व्हेट व रस्ता कॉक्रीटी करण करणे | 3500000 |
| 47 | | | प्र.क्र.2 शिव शंकर नगर मधील ठिकठिकाणी ओपनस्पेसवर पेव्हर ब्लॉक बसविणे व रंगरंगोटी करणे व गेटचे व इतर काम करणे | 2000000 |
| 48 | | | प्र.क्र. 2 मधील गोंविदा ओझा यांचे दालफळ पासुन ते शिवशक्ती नगर शिव मंदीरा पर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 4000000 |
| 49 | | | प्र.क्र. 2 मधील मंजुर खान यांचे घरापासुन ते सावरकर चौक जवळील रस्ते तसेच ठाकरे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 6000000 |
| 50 | श्री.प्रविण कोल्हे | 3 | प्र.क्र. 3 जळगांव शिवार स.नं.92/4, 92/1+5 शंकरराव नगर व परिसरात रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 51 | 1,50,00,000 | | प्र.क्र. 3 जळगांव शिवार स.नं.92/4, 92/1+5 शंकरराव नगर व परिसरात आरसीसी गटारी तसेच स्लॅब कल्व्हेट बांधणे | 4000000 |
| 52 | | | प्र.क्र.3 अंतर्गत जुना खेडी रोड मुरलीधर नगर व परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 5000000 |
| 53 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र. 3 गट नं. 129/1 जुना खेडी रोड ते जान्हवी हॉटेल पर्यंत रस्ता कॉक्रीट करणे | 4000000 |
| 54 | 67,00,000 | | प्र.क्र. 3 गट नं. 10 विनायक नगर मध्ये आर.सीसी. गटार बांधणे | 2700000 |
| 55 | श्री.चेतन सनकत | 4 | प्र.क्र.4 जुने जळगांव भागात ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 56 | 1,60,00,000 | | प्र.क्र.4 इस्लामपुरा भागात ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 57 | | | प्र.क्र.4 भिलपुरा भागात ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 58 | | | प्र.क्र.4 चंदनवाडी व गवळीवाडा भागात ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 59 | श्री.नितिन लड्ढा | 5 | प्रभाग क्र. 05 जयकिसनवाडीमध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 7215357 |
| 60 | 2,00,67,400 | | प्रभाग क्र. 05 दिक्षितवाडी मध्ये सिव्हील हॉस्पिटल रोड ते वानखेडे सोसायटी पर्यत व दिक्षितवाडी बगिचा ते मोरया मेडिकल्स पर्यतचा रस्ता व लगतचे रस्ते कॉक्रीटींग करणे | 6301481 |
| 61 | | | प्रभाग क्र. 05 बळीराम पेठ, रुबी अर्पाटमेंट ते दत्त मंदिर चौक (डॉ.बी.एन.पाटील) पर्यतचा रस्ता कॉक्रीटींग करणे | 3134651 |
| 62 | | | प्रभाग क्र. 05 बळीराम पेठ कोहिनूर कॅफे ते दायमा शाळा पर्यतचा रस्ता कॉक्रीटींग करणे | 3415911 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 63 | श्री.ललित कोल्हे | 11 | प्र.क्र.11 मधील सायली प्ले सेंटर ते कुलगुरु यांचे घरापर्यत आरसीसी नाला व पुल बांधणे | 65608566 |
| 64 | 8,36,08,566 | | प्र.क्र.11 यशवंत नगरमध्ये व अर्जुन नगर, व्यंकटेश नगर, मुकूंद नगर ई. ठिकठिकाणी आरसीसी गटार बांधून त्यावर स्लॅब कल्व्हेट बांधणे | 8000000 |
| 65 | | | प्र.क्र.11 मध्ये नेहरु नगर, यशवंत नगर ई. ठिकठिकाणी डांबरी रस्ता करणे | 5000000 |
| 66 | | | प्र.क्र.11 मध्ये गट नं. 101 व ई. ठिकठिकाणी कॉक्रीट रस्ते करणे | 5000000 |
| 67 | सौ.ज्योती चव्हाण | 13 | प्र.क्र. 13 मध्ये ठिकठिकाणी रस्त्यांवर झेब्रा क्रॉसींग पट्टे रंगविणे | 100000 |
| 68 | 7,00,000 | | प्र.क्र. 13 मध्ये ठिकठिकाणी रस्त्यावंर थर्मल पेंटव्दारे पट्टे रंगविणे | 600000 |
| 69 | श्रीमती रेखा पाटील | 14 | प्र. क्र. १४ मधील स. न. ४२७, ४२८, ४३४,४३५ मधील रस्ते कॉक्रिटिकरण करणे | 34000000 |
| 70 | **94300000** | | प्र. क्र. १४ मधील स. न. ४३६, ४३७, ४३८ मधील रस्ते कॉक्रिटिकरण करणे | 38300000 |
| 71 | | | प्र. क्र. १३ मधील स्. न. ४१६ जीवन मोती सोसायटी व हटकर मंगल कार्यालय मागील रस्ते कॉक्रिटिकरण करणे | 22000000 |
| 72 | श्री.सुनिल महाजन | 15 | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत मोहम्मदीया नगर अजमेरी गल्ली, खोचा गल्ली भागात रस्ते कॉक्रीटींग करणे | 3000000 |
| 73 | 1,27,04,890 | | प्र.क्र. 15 मेहरुण अंतर्गत भिलवाटी मागील बाजुस आरसीसी गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 800000 |
| 74 | | | प्र.क्र.15 मेहरुण अंतर्गत विठ्ठल मंदीर जवळील सार्व.मुतारी नव्याने बांधणे | 999000 |
| 75 | | | प्र.क्र.17 श्रीकृष्ण नगर मधील विविध गल्लीमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे | 999000 |
| 76 | | | मौजे नेरीनाक्याजवळील पांझरापोळ माजी नगरसेवक डिगुदादा यांच्या घरासमोरील गल्लीत कॉक्रीटीकरण करणे | 999900 |
| 77 | | | जुना नशिराबाद रोड एस.टी. वर्कशॉक जवळील बारा ज्योर्तीलींग समोरील गल्लीत कॉक्रीटीकरण करणे | 997000 |
| 78 | | | जळगांव शहरातील योगेश्वर नगर जवळील आर्शीवाद मोटर्स गॅरेज समोरील गल्ली विद्यहर्ता तपस्या गणेश मंदीर परिसरात नागरीकांच्या दृष्अीने पेव्हर ब्लॉक बसविणे | 980000 |
| 79 | | | एस.टी. वर्कशॉप समोरील श्रीकृष्णा मोटर्स जवळील लक्ष्मी नगर मधील गल्ली कॉक्रीटीकरण करणे | 980000 |
| 80 | | | शहरातील स्मशानभुमी जवळील श्री.विनायक काळे यांच्या घरापासून ते माटर्स गॅरेज पर्यत परिसरात पेव्हर बलॅक सुशोभिकरण करणे | 990000 |
| 81 | | | प्र.क्र.17 मधील श्रीकृष्ण नगर ते झिपरु अण्णा नगर येथे रहिवासी नगरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने सोलर स्ट्रीट लाईट बसविणे | 999990 |
| 82 | | | प्र.क्र.17 बुनकरवाडा येथे रहिवासी नगरातील सुरक्षिततेच्या दृष्टीने सोलर स्ट्रीट लाईट बसविणे | 960000 |
| 83 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र.16 येथे सर्वे नं. 508/1/2 साईबाबा मंदीर परिसरातील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड चेनलिंक फेन्सींग व पेव्हर ब्लॉक बसविणे | 6000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 84 | 2,68,00,000 | | प्र.क्र.16 टि.पी.स्किम 2 – सर्वे नं. 518 पंचमुखी हनूमान मंदीर परिसरातील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड चेनलिंक फेन्सींग व पेव्हर ब्लॉक बसविणे | 6000000 |
| 85 | | | प्र.क्र.16 मधील ईश्वर कॉलनी परिसरातील दत्त मंदीर परिसरातील ओपन स्पेसला वॉल कंपाऊंड चेनलिंक फेन्सींग व पेव्हर ब्लॉक बसविणे | 5000000 |
| 86 | | | प्र.क्र.16 मध्ये विविध ठिकाणी आरसीसी गटार बांधणे | 9800000 |
| 87 | श्री.सुनिल खडके | 17 | वार्ड क्र. 17 अंतर्गत भाग्यलक्ष्मी टेन्ट हाऊस ते तलाठी कार्यालय पर्यतचा रस्ता सिमेंट कॉक्रीटींग करणे | 3584021 |
| 88 | 1,32,54,387 | | वार्ड क्र. 17 अंतर्गत अर्चना पान सेंटर ते नाल्यापर्यत सिमेंट कॉक्रीटींग रस्ता बनवणे | 3473774 |
| 89 | | | वार्ड क्र. 17 अंतर्गत बुनकरवाडा परिसरात कॉक्रीटींग रस्ता तयार करणे | 4000000 |
| 90 | | | वार्ड क्र. 17 अंतर्गत पिरबाबा दर्गा ते माऊली प्रोव्हीजन (भोकर) रस्ता सिमेंट कॉक्रीट करणे | 2196592 |
| 91 | श्री.रियाज बागवान | 18 | प्र.क्र.18 दत्त नगर व इतर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 92 | 3,00,00,000 | | प्र.क्र.18 अक्सा नगर, रजा कॉलनी व गणेशपुरी मध्ये रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 10000000 |
| 93 | | | प्र.क्र.18 अक्सा नगर, गणेशपुरी, शेरा चौक, रजा कॉलनी आरसीसी गटार बांधुन स्लॅब कल्व्हेट टाकणे | 10000000 |
| | 65,24,35,243 | | | 65,24,35,243 |

**नगरसचिव -विषय क्र.२६ :-** प्र.क्र.१७ अंतर्गत विविध १ ते ७ कामे शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा मनपा निधी अंतर्गत करणेबाबत मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१७ मधील खालील नमुद कामे नागरीकांना विविध सोईसुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतूकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरीकांकडून सदर कामांना लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे खालील नमुद अ.नं.०१ ते ०७ कामे शासनाकडुन प्राप्त होणाऱ्या विविध निधी किंवा मनपा निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | जुनी भागवत कॉलनी बाबुराव नगर काशीबाई उखाजी कोल्हे शाळेमागील भाग येथे रहिवासी एरियात कॉंक्रीटीकरण करणे. | ९,८०,०००/- |
| २ | प्र.क्र.१७ स्मशान भुमी जवळील नाला ते श्रीकृष्ण नगर पर्यंत नाला मधील आरोग्याच्या दृष्टीने नाल्यातील सर्व प्लॉस्टीक कचरा पोकलॅन्डच्या सहाय्याने काढुन विल्हेवाट लावणे. | ९,९९,०००/- |
| ३ | सदोबा नगर चौक आजुबाजूच्या गल्ल्यांमध्ये कॉंक्रीटीकरण करणे. | ९,७०,०००/- |
| ४ | प्र.क्र.१७ मधील पुरातन श्री.स्वामी नारायण मंदीर त्या जागेला कुंपनभिंत करुन मंदीर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,७०,६००/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्र.क्र.१७ मधील नागरीकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने गोपाळपुरा, सावित्री नगर, सदोबा नगर येथील परिसरात स्ट्रीट लाईट बसविणे. | ९,८५,०००/- |
| ६ | श्री कालिंका माता मंदीर रोड परीसरात बाजुला कमल लॉन लागुन श्री.मुरलीधर नगर येथे पेव्हींग ब्लॉक बसविणे. | ९,९९,०००/- |
| ७ | गोपाळपुरा जवळील विविध गल्ल्या सुरक्षिततेच्या दृष्टीने परिसरात अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे. | ९,८८,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२७ :-** जळगांव मनपा महासभा ठराव क्र.८७७ दिनांक ०८/०८/२०२२ रोजी झालेला ठराव रद्द करणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा. याच्यात काय झाले होते, रामदास कॉलनी पार्कच्या जागेवर आपण उद्यान विकसीत करणे संदर्भात पिपल बँकेला विंनती केलेली होती. परंतु बऱ्याच कालावधीपासुन त्यांचा प्रतिसाद मिळत नव्हता. म्हणुन बंटीभाऊंनी ही भुमिका घेतली. ही त्यांच्या जागी योग्य होती. पण बंटीभाऊच्या आलेल्या प्रस्तावानंतर मी परत यांच्याशी चर्चा केली. त्यांना याची कल्पना दिली.

**मा.महापौर :-** त्यांना होकार कळविलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो, होकार कळविलेले आहे. त्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला ती जागा ताब्यात द्या आणि ती लवकर द्या की, या पावसाळयात आम्ही वृक्षरोपणाचे काम करुन उद्यानाच्या विकासाला सुरूवात करु या. तर याच्या संदर्भात हे काम आपण तातडीने करावा. सोनगिरे साहेब, करारनाम्यासाठी त्यांना जास्त फिरवु नका.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.अनंत जोशी :-** माझ्या दिलेल्या प्रस्तावाने झालेले निष्पण आहे हे. तुमच्याकडचे पत्र पोहचले महापौर मॅडम, तो याच्यानंतरच पोहचले आणि सोनगिरे साहेब मी आहे आपण आहोत सोबत.

**मा.महापौर :-** विषय क्र.२७ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव मनपा हद्दीतील मेहरुण शिवारातील सर्वे नं.४९४/१+२ (नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड क्र.सी) या जागेवर लोकसहभागातून उदयान विकसित करणे करीता जळगांव मनपा महासभा ठराव क्र.८७७ दिनांक ०८/०८/२०२२ अन्वये दि जळगांव पिपल्स बँक संचलित रामदास पाटील स्मृति सेवा ट्रस्ट (रजि.नं.ई ४६०) या संस्थेस देण्याचा ठराव पारित करण्यात आलेला आहे

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे दि जळगांव पिपल्स बँक संचलित रामदास पाटील स्मृति सेवा ट्रस्ट ही संस्था उपरोक्त ठिकाणी उदयान विकसित करणेस तयार असल्यामुळे महासभा ठराव क्र.८७७ दिनांक ०८/०८/२०२२ रोजी झालेला ठराव रद्द करणेबाबतचा सन्मा.सदस्य,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी सादर केलेला प्रस्ताव अमान्य करण्यात येत आहे. प्रशासनाने दि जळगांव पिपल्स बँक संचलित रामदास पाटील स्मृति सेवा ट्रस्ट या संस्थेशी तातडीने करारनामा करुन घेण्याची दक्षता घ्यावी.

प्रशासनाने सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२८ :-** जळगांव शहर मनपा हद्दीत येणाऱ्या नेरीनाका मुख्य स्मशान भुमीतील दुरुस्ती कामांबाबत सन्मा.सदस्य,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.अनंत जोशी :-** महापौरताई, आयुक्त मॅडम, मीच दिलेला प्रस्ताव आहे. दुरुस्तीचा आपण दिलेला आहे. कारण त्याची अवस्था एकदमच वाईट आहे. याला अनुसरुनच एक विषय आहे. गेल्या टर्ममध्ये मागच्या पंचवार्षिक मध्ये पण मी बोललेलो आहे. माझी विनंती आहे आपल्याला. महापौरताई, आयुक्त मॅडम, आपल्या हिंदु धर्मात पण लहान बाळ जरी मेले तर त्याचा अंतविधी आपण दफनविधीच्या हिशोबाने करतो आपण. आपल्या जळगांव शहरात दोन ठिकाणी एक नेरीनाका स्मशानभुमी तेथे सगळा कचरा राहतो मॅडम. जेव्हा लहान मुलांना दफन करण्यासाठी तेथे जातात, तेथे सगळी आपल्या गावातली घाण असते त्या ठिकाणी, तेथे लोडींग, अनलोडींग सुरु असते. ती जागा आहे आणि ती पण खुप छोटी जागा आहे. दुसरी एक जागा आहे आपली मेहरुण स्मशानभुमीमध्ये. त्या ठिकाणी पण दफनविधी होते आपल्या हिंदु समाजाच्या बाळांचे. आता मी गेल्या १५ दिवसापुर्वी माझ्या मित्राचा लहान बाळ गेला, मी तिथे त्याला ठेवायला गेलो सकाळी मी अर्धा पौन तास तेथे उभा होतो मॅडम, ती जागा इतकी छोटी आहे. आपल्या मेहरुण स्मशानभुमीतली की, त्या ठिकाणी प्रेत अगदी लागुन लागुन होते. अनेक ठिकाणी जास्त ही असेल. अनेक ठिकाणी तर असेही असते की, महिन्या दोन महिन्यातुन अजुन मरुन गेले की, त्याच्यावरच परत दफन होते.कारण कालांतराने होतो. दोन पाच वर्षानंतर जर झाले तर तोपर्यंत पहिल्याची बॉडी ही झालेली असते. त्याला मी हे करत नाही. पण त्या ठिकाणी इतकी घाण असते. मेहरुणच्या स्मशानभुमीत पण आणि नेरी नाक्या जवळ पण आणि त्या दिवशी अर्धा पौन तास मी चित्र बघितले त्या ठिकाणी मॅडम. सगळे जे लोकं आलेले होते. अक्षरश: तेथे जे लहान बाळांचे प्रेत दफन केलेले होते त्याच्यावर पाय ठेवुन जात होते मॅडम, म्हणजे ज्याच्या घरातले लहान बाळ गेलेले असेल. त्या आई बाबांनी जर चुकुन ते बघितले. कारण त्यांना माहित असत की, माझा बाळ येथे आहे माझा पोरगा येथे आहे. त्याच्या मनाला काय वेदना होईल विचार करा. मी पौन तास हे सर्व बघितले. त्या मित्राच्या बाळाच्या प्रेत यात्रेत जितके आलेले होते ते सगळे त्या दफन केलेल्या मुलांवरुन, त्या बाळांवरुन चालत होते. याच्यात एका जागेची व्यवस्था करा. नाही तर त्या ठिकाणाचे काही तरी करा. लहान मुलांच्या दफन विधीसाठी आपल्याकडे जागा नाही. नेरी नाका येथे अतिशय घाण आहे. म्हणजे पुर्ण कचरा तेथे जमा होतो आपला. ही जी आहे मेहरुणची जागा ही छोटी आहे आणि तेथे एकावर एक प्रेत दफन केले जात आहे. लोकं त्याच्यावरुन चालत आहे. घाण असते स्वच्छता नसते. मी गेल्या पंचवार्षिकला ही बोललो होतो. ही टर्मही संपत आली. याच्यावर कोणीही गांभिर्याने विचार करत नाही. केले पाहिजे. दुरदैवीय चित्र आहे, जर मनापासुन तेथे तुम्ही बघितले ना तर वेदना होते बरं.तेथे जाऊन बघा एकदा वाईट वाटते ते.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, मेहरुणच्या स्मशानभुमी बद्दलच बोलायचे आहे मला. मी स्थायी समिती सभापती असतांना आपण मेहरुणच्या स्मशानभुमीसाठी ३८ लाखाची तरतुद केली होती. आता ते ३८ कोटीमध्ये, ४२ कोटी मध्ये रोडांचे काम चालु आहे. तर त्याच्यामध्ये मेहरुणच्या स्मशानभुमीसाठी आपण ३७ लाखाची तरतुद केलेली होती. तर आपण रस्त्यांची कामे झाली पाहिजे.म्हणुन आपण ती कामे बदलवली. ते बदलवत असतांना मी महापौर महोदयांना, आयुक्त महोदयांना, पत्र पण दिलेले होते. जितके रस्ते आवश्यक आहे तितकेच मेहरुणच्या स्मशानभुमीचे विकास कामे करणे सुध्दा आवश्यक आहे. परंतु माझ्या पत्राची कुठलीही दखल न घेता,सदरचे काम रद्द केले गेलेले आहे. आणि तो जो निधी आहे. मंजुर झालेला निधी ज्याचे टेन्डर झालेले होते. ते काम रद्द करुन आपण शहराच्या विकासासाठी त्याच्यावर जास्त चर्चा न करता, आपण त्याला संमती दिली. या मागच्या दोन महासभेपुर्वी मेहरुणच्या स्मशानभुमिसाठी काही तरतुद करावी म्हणजे निधी उपलब्ध करुन द्यावा. काही शासकीय नाही तर मनपा निधीतुन ५० लाखाची मागणी केलेली आहे. तर मेहरुणची स्मशानभुमी महापौर महोदया आपल्याला माहित आहे. आणि सुनिलभाऊंचे रोज येणे जाणे आहे तेथुन आणि त्यांना पण याव लागत. त्याची दयनिय अवस्था जी आहे मेहरुणच्या स्मशानभुमीची त्यांना सगळ अवगत आहे.

तरी त्याच्यासाठी मनपा निधी का होईना त्यातुन आपण मेहरुणच्या स्मशानभुमीचा विकास करावा.अशी आपल्याकडे मागणी करतो.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य राजेंद्रभाऊ यांनी जे मांडलेले आहे. मेहरुणच्या स्मशानभुमीची खरच दैनिय अवस्था आहे. त्याच्यासाठी महापालिका फंडातुन तरतुद करण्यात यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मॅडम शिवाजीनगरच्या स्मशानभुमीच्या मागचा जो नाला आहे, त्याची साईटची भिंत बांधणे. तो नाला दिवसेंदिवस धसत चाललेला आहे.

**मा.महापौर :-** यासाठी पण प्रस्ताव सादर करा. विषय क्र.२८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११७९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर मनपा हद्दीत नेरीनाका परिसरात शहराची मुख्य स्मशान भुमी स्थित असून तेथे शहरातील बहुसंख्य अत्यंविधीचे कार्ये करण्यात येत असतात. मात्र असे दिसून येते की, सदर स्मशान भुमीतील अंत्यविधीसाठीचे लोखंडी कठडे जिर्ण होवून तुटलेल्या स्थितीत आहेत. काही ठिकाणी कठडेच नाहीत. परिणामी अत्यंविधी करतांना मृतदेहाची अवहेलना होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच यामुळे संबंधितांना अत्यंविधी करतांना अनेक अडचणी निर्माण होत असल्याने जळगांव शहर महानगरपालिका नेरीनाका स्थित मुख्य स्मशान भुमीतील अंत्यविधीसाठी उभारलेल्या ओटयांवरील जिर्ण व तुटलेले लोखंडी कठडे तात्काळ निष्काशित करुन त्याठिकाणी नव्याने लोखंडी कठडे बसविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सूचनांप्रमाणे प्रशासनाने मेहरुण येथिल स्मशानभुमीसाठी निधी उपलब्ध करुन दयावा तसेच नेरी नाका येथील स्मशानभुमीमध्ये लहान मुलांच्या दफन विधी साठी जागा उपलब्ध करुन दयावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.२९:-** जळगांव शहरातील स्टेट बँक मुख्य शाखेजवळ व स्टेडियम समोर राष्ट्रीय सेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार चौक सुशोभीकरण करणे संदर्भात सन्मा.सदस्य, श्री.राजेंद्र नारायण मराठे दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.२९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११८० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील स्टेट बँक मुख्य शाखेजवळ व स्टेडियम समोर राष्ट्रीय सेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार चौक असे नामकरण करणेस दिनांक १३ डिसेंबर १९८८ रोजी तत्कालीन जळगांव नगरपालिका असताना मंजूरी दिलेली आहे. डॉ.केशव बळीराम हेडगेवार चौक हा शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने सदरील चौक सुशोभीकरण करणे अत्यावश्यक असल्याने सदर जळगांव शहरातील स्टेट बँक मुख्य शाखेजवळ व स्टेडियम समोर राष्ट्रीय सेवक संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार चौक सुशोभीकरण करणे कामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.१०/- लक्ष मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३० :-** म.न.पा.कर्मचारी श्री.मोहन रामकृष्ण पालवे, चौकीदार/व्हॉलमन, पाणी पुरवठा विभाग यांनी त्यांचे शिक्षेसंबंधी सादर केलेले अर्जानुसार त्यांची मुळ वेतनावर आणणेची शिक्षा रद्द करणेबाबत व कमी शिक्षा देणेबाबत सन्मा.सदस्य, श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११८१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जा.क्र./आस्था/५०८/२०२२ दि.२४/०५/२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.मोहन रामकृष्ण पालवे, म.न.पा.कर्मचारी यांना मुळ वेतनावर आणण्यात आले आहे. श्री.मोहन रामकृष्ण पालवे हे सुमारे २५ वर्षापासून मनपा सेवेत असुन त्यांची घरची परिस्थिती लक्षात घेता त्यांना दिलेली शिक्षा अन्यायकारक असून ते चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी असल्याने त्यांना म.न.पा.अधिनियमांची तरतुद माहिती नसल्याने त्यांना अपिल करणेस उचित कालावधीची माहिती नसल्याने त्यांचे अर्ज प्रशासनाकडून फेटाळण्यात आले असून त्यांची सेवा ही अदयाप ८ ते १० वर्ष बाकी असुन त्यांना दिलेली शिक्षा त्यांचे आर्थिक बाबींशी अन्यायकारक अशी वाटते.

श्री.मोहन रामकृष्ण पालवे यांना मुळ वेतनावर आणल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खुप डबघाईस आलेली आहे. त्यांचे दोघे मुले इंजिनिअरींगचे शिक्षण घेत आहेत. श्री.पालवे यांना त्यांचे म्हातारी आई त्यांचा दवाखान्याचा खर्च मुलांची शैक्षणिक फी तसेच कर्जाचे हप्त भरणे एवढया पगारात शक्य होत नसल्याने श्री.पालवे यांचे अर्जाचा सहानुभुतीपुर्वक विचार करता त्यांना दिलेली मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा रद्द करुन कमी शिक्षा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३१ :-** लहान मुलांना खेळण्यासाठी तसेच विविध सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषय कार्यक्रम आयोजित करण्यासाठी जळगांव शिवार गट नं.३४०/१ हा ओपनस्पेस मिळणेबाबत अध्यक्ष,सुबोध बहुउद्देशिय युवा विकास प्रतिष्ठान,जळगांव यांचा सन्मा.सदस्य, श्री.नवनाथ विश्वनाथ दारकुंडे यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओपनस्पेसचे जितकेही विषय असतील ना ते सर्व प्रशासनाचे डॉकेट आल्याशिवाय सभागृहात पाठविण्यात येऊ नये.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मागच्या काही सभांमध्ये आपली चर्चा झाली होती. प्रशासनाचे डॉकेट आल्यानंतर प्रस्ताव घेण्यात यावे. पण मागच्या महासभेमध्ये असे अशासकीय प्रस्ताव मंजुर झालेले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, हे ३१,३२,३३ विषय जे आहे हे मंजुर करावे. आणि प्रशासनाची पुढची जी प्रक्रिया आहे. ती चालु ठेवावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय कसा आहे, जसा हा नवनाथभाऊंचा प्रस्ताव आला, सकाळी बंडुदादांचा फोन आला की, ही आमच्या क्षेत्रातील ओपनस्पेस आहे आणि तुम्ही कस काय दिले. काय होतं की, अश्या पध्दतीने जो पर्यंत प्रशासनकडुन येत नाही ना हे सगळे प्रस्ताव, काय होते की, हा चुकीचा पायंडा पडत चाललेला आहे. आपल्याला काय आहे पुढच्या

मिटींगमध्ये येतील ना प्रस्ताव जितके आता खुल्या जागेच्या संदर्भात येतील ते सगळे जे आहे प्रशासनाकडुनच येऊ द्या. नाही तर नंतर वाद होतात.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाची जी प्रक्रिया असेल ती करा, जी तुम्ही आदी करतात ती नंतर करा पुर्ण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो ना मग आपण उगाच म्हणतो ना, एकाच्या बाबतीत एक धोरण ठरवु, दुसऱ्याच्या बाबतीत एक धोरण ठरविण्यापेक्षा सगळे प्रस्ताव जे आहे त्यांना प्रशासनातर्फेच येऊ द्या. आणि याच्या पुढे ही जर आलेले प्रस्ताव जे आहे ना. प्रत्येक खुल्या जागांचा प्रस्ताव जो आहे ना. तो प्रशासनाकडुनच पाठवा. आणि प्रशासनाने पुर्णता खात्री करावी. प्रशासनाने फक्त सुप्रिम कोर्टाचा निवाडा काय आहे. UTCR चे क्लॉजेस काय आहे ते बघता यापुर्वी या ओपनस्पेसेस कुठल्यासंस्थेला देण्यात आलेल्या आहे का ? कारण काय होते. एखाद्या प्रभागामध्ये एखाद्या ओपनस्पेस वरती वेगवेगळे गट असतात. काही मंडळी इकडची येते ती नगरसेवकाला सांगते, नगरसेवक प्रस्ताव देतात. त्याच्यामागे त्यांचा हेतु चांगलाच असतो. परंतु त्याच्यातुन अजुन काही उर्वरीत भागातील व्यक्ती येतात. आणि ती सुध्दा म्हणते की, आमच्या प्रभागातील ओपन स्पेस तुम्ही या संस्थेला का दिली. असेही प्रकरण वारंवार येतात. त्याच्यामुळे ओपन स्पेसचे सगळे प्रस्ताव जे आहे. ते तहकुब करण्यात यावे. आणि त्यांना प्रशासनाकडून डॉकेटसह प्रस्ताव मागविण्यात यावे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ हे जे प्रस्ताव आहे ना, मागच्या ६ महिन्यापासुन टाकलेले आहे. आता जे प्रस्ताव आहे ना भाऊ, हे सन्मा.महापौरांकडे दाखल झाले, तेथुन ते टाऊन प्लॅनिंगकडे गेले, टाऊन प्लॅनिंगकडे ते पडुन राहिले. ते पडुनच राहतात. ते काहीच कार्यवाही करत नाही त्याच्यावर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आपण थोडासा पाठपुरावा केला असता तर ते डॉकेटसह आले असते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** नागरीक केव्हाचे चकरा मारत आहे त्याठिकाणी, तेथे कोणी योग्य उत्तर देत नाही. मागच्या महासभेत ते धोरण वेगळे , या महासभेत वेगळे धोरण.

**श्री.**नितीन लढ्ढा :- डॉकेटसह येऊ द्या ना. पोकळे साहेब आपण करु ना. मान्य करु परंतु डॉकेटसह येऊ द्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मला मा.महापौर आणि टाऊन प्लॅनिंगच्या अधिकारींकडुन शब्द पाहिजे की, हे सर्व प्रस्ताव पुढच्या महासभेत येतील. ६ महिनेपासुन हे प्रस्ताव फिरत आहे. आपल्याकडुन टाऊन प्लॅनिंगला गेले, ते थांबत नाही जागेवर. ते काही फॉलोअप घेत नाही. नागरीक फिरुन त्रस्त झाले. आणि मागच्या महासभेमध्ये अशासकीय प्रस्ताव आले ते मंजुर झाले. तेच नागरीक म्हणाले की, जर त्यांचे मंजुर होत आहे तर आम्हाला काय अडचण आहे. म्हणुन मी विनंती केली की, तुम्ही या महासभेमध्ये अशासकीय प्रस्ताव / ठराव करून घ्या. आणि आपले जे नियम आहे, जी प्रोसेस आता करायची आहे तीच नंतर करायची. तेथील नागरीकांनी संमती नाही दिली, त्यांचे कागदपत्र पुर्ण नसले तरीही आपण थोडी त्यांना करारनामा करून देणार आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** माझ्याकडे येऊन नागरीकांनी विरोध दर्शविलेला आहे. माझ्याच वार्डाचा विषय आहे तो. माझ्याकडे आलेले ते. काहींना नको आहे काहींना हवं आहे ते. माझ्याकडे आले होते ते.

**सौ.शुचिता हाडा :-** विरोध आहे नागरीकांचा तर रद्द करा विषय.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ज्यांचे लेखी विरोध प्राप्त झालेले आहे त्यांचे रद्द करा. आहेत का काही लेखी ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आहेत ना आहे.

**श्री.अमित काळे :-** आहे ना ३१ नंबरचा.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** ज्याचे लेखी आहे ते रद्द करा ना. ज्याचे टायटल क्लियर आहे ते मंजुर करावे, सर्व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतरच त्यांनी करारनामा करुन द्यावा.

**श्री.अमित काळे :-** मॅडम, ३१ नंबर च्या डॉकेट मध्ये एकाचीही पण परमिशन नाही तरी हा डॉकेट घेतले कसे मग प्रस्ताव आला कसा काय ? काय मजाकमस्ती चालु आहे का येथे ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही संबंध नाही त्या संस्थेची, कुठली संस्था कुठलीही जागा मागते.

**श्री.अमित काळे :-** त्या ओपन स्पेसच्या बाजुला १६-१७ घरे आहे. प्रत्येकाचे नामंजुर आहे.आणि याच गट मध्ये या लेआऊट मध्ये ४५ प्लॉट आहे. एकाची पण परमिशन घेतली का तुम्ही. आणि हा डॉकेट मध्ये येतोच कसा काय हा

विषय. हे खाली नगरसेवकाने दिला म्हणजे घ्यायचे का ? टर्मस ॲण्ड कन्डीशन तर बघा तुम्ही. माहिती घ्या पहिले. दर वेळेस हेच चालतं.

**मा.महापौर :-** अशासकीय प्रस्ताव आहे ना ते म्हणुन घेतले गेलेले असेल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** प्रस्ताव आम्ही दिला कश्यासाठी की, नागरीक आमच्यापर्यंत येतात. आम्ही प्रस्ताव येथे मांडतो. तो मांडल्यानंतर तो टाऊन प्लॅनिंगला जातो. आणि तो टाऊन प्लॉनिंगला गेल्यानंतर संबंधीत जे नागरीक आहे. जे संस्था धारक आहे त्यांना त्या अटीशर्ती पुर्ण करावे लागतात. आणि त्या अटीशर्ती पुर्ण झाल्यानंतरच ते करारनामा करतात.

**श्रीमती सरीता नेरकर :-** त्या ठिकाणच्या नागरीकांचाही विरोध आहे.

**श्री.अमित काळे :-** मॅडम हे ओपन स्पेसेसचे विषय आहे ना हे प्रशासकीय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सरसकट तहकुब करुन प्रशासनाकडुन येऊ द्या.

**ॲड.दिलीप पोकळे :-** ही नोंद घ्यावी, मागच्या महासभेत अशासकीय प्रस्ताव मंजुर केलेले आहे. याची नोंद घ्यावी.

**मा.महापौर :-** त्याची पण शाहनिशा करुनच आणले असेल ना.

**ॲड.दिलीप पोकळे :-** नाही, याच्या पहिले जी महासभा झाली. भाऊ जे सांगत आहे तेच ठरलेले होते की, सर्व शासकीय प्रस्ताव आले पाहिजे. ते झाल्यानंतर ज्या वेळेस आपल्याकडे प्रस्ताव सादर केले. त्यानंतर टाऊन प्लॅनिंगला पाठविले, तेथे ६ महिने चकरा मारल्या, नागरीकांनीही मारल्या आम्ही ही मारले. आम्ही या विश्वासात होते की, आमचेही प्रस्ताव शासकीय येतील. पण मागच्या महासभेत तुम्ही पहा अशासकीय प्रस्ताव आलेले आहे. अशासकीय प्रस्ताव मंजुर झाले.आमच्या पर्यंत नागरीक येतात सांगतात की, ही काय पध्दत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अशासकीय जे असे प्रस्ताव येतात, ते तात्काळ प्रशासनाकडेच पाठवत जा. ते सभागृहात पाठवायचेच नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** महापौरताई, आता अशासकीय प्रस्तावांबद्दल नितीनभाऊंनी जी सुचना मांडली की, प्रशासकीय होऊनच आले पाहिजे आणि ती सुचना अगदी रास्त आहे. आणि पोकळे साहेबांचे म्हणणे आहे की, आम्ही बऱ्याच दिवसापासुन प्रयत्न करतो आहे. ते झाले नाही म्हणुन याला मंजुरी देऊन टाका. असे करता येणार नाही. विषय क्र.३१ बद्दल स्पष्ट येथे विरोधाची भुमिका सांगितली जात आहे. तर तो रद्दच झाला पाहिजे. तो तहकुब पण व्हायला नको.

**ॲड.दिलीप पोकळे :-** मी ३१ बद्दल बोलत नाही, मी ३२,३३ बद्दल बोलत आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** प्रशासकीय होऊन येऊ द्या. असे ठराव करुन करणार काय आपण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पोकळे साहेब जसे बोलले ना. पुढच्या महासभेपर्यंत तो प्रस्ताव ठेवा ना प्रशासनाकडुन, का होऊ शकत नाही. जे काही त्यांचे मत असेल.

**सौ.शुचिता हाडा :-** आजच्या या महासभेत काही प्रशासकीय प्रस्ताव आहे ओपन स्पेसचे. त्या प्रस्तावांचाही प्रशासनाने विचार करावा.

**ॲड.दिलीप पोकळे :-** जे काही अशासकीय प्रस्ताव मागच्या वर्षामध्ये आले असतील ते सर्व रद्द करावे. ते सर्व रद्द करा. मला माहिती द्या किती अशासकीय संस्थांचे प्रस्ताव टॉऊन प्लॅनिंगला आज रोजी पेंडींग आहे. महासभेने ठराव करुन दिल्यानंतर द्या माहिती. मागच्या दोन वर्ष, पाच वर्षामध्ये महासभेने ठराव करुन दिलेल्या टॉऊन प्लॅनिंग कडे किती प्रस्ताव पेंडींग आहे. जे मंजुर झालेले आहे. माहिती द्या. तुमच्या प्रमाणे आलेले प्रस्ताव मंजुर करायचे. आम्ही दिलेले नामंजुर करायचे. ही काय पॉलिसी आहे. मागचे झालेले सगळे अशासकीय प्रस्ताव रद्द करा.

**श्री.सुनिल महाजन :-** १५ वर्षामध्ये अनेक ए.डी.टी.पी. पाहिले, एक सामान्य आहे त्यांच्यामध्ये सर्वे असे आहे, ते हलतच नाही किती ही बोला तुम्ही.

**ॲड.दिलीप पोकळे :-** हे महासभेचे धोरण मला अत्यंत चुकीचे वाटते, मागच्या महासभेमध्ये अशासकीय ठराव मंजुर झाले, हे सर्व सभागृह होते हिच मंडळी होती. मग हे तेव्हा का बोलले नाही. तो प्रस्ताव मेहरुण मधला होता म्हणुन मंजुर झाला का ?पाहा तुम्ही मागच्या इतिवृत्तात पहा. म्हणजे तुमच्या संमतीने आलेले प्रस्ताव मंजुर करायचे. आणि आमच्या

प्रभागातले आलेले ना मंजुर करायचे. असे पण ठरवुन घ्या. हेच सगळे बसलेले होते. सदस्य पदाअधिकारी, यांनीच प्रस्ताव मंजुर केलेला आहे. आणि तो पाहुनच मी आपल्याला भेटलो होतो. आपली जेव्हा मिटींग झाली, त्या मिटींगमध्ये सुध्दा मी हा विषय मांडला होता.

**श्री.जितेंद्र मराठे :-** सुनिलभाऊ, आपण मागच्या वेळेला विषय क्र.४५ झाला हा तसाच आहे. आपले बोलणे पण झाले होते महापौरताई. त्यावेळेला मला असे सांगितले की, तेथील नागरीकांची एक संस्थांचे रजिष्टर झालेले पाहिजे. त्यांचे महासभेपुढे आपण प्रस्ताव घेऊ. पण ती संस्था रजिष्ट्रेशनला टाकली होती. शेख साहेबांशी बोलणे झाले. त्यांनी सांगितले की, तुमचे प्रमाणपत्र आले की, आपण ते महासभेपुढे ठेवणार. मग आता ते प्रमाणपत्र आले ते आता जोडले, त्या सगळया नागरीकांच्या सह्या करुन तो कागद पण या अर्जासोबत या ठिकाणी जोडला, या वेळेस पण तशीच अडचण झाली होती. मी सुनिलभाऊंशी बोलुन की, प्रशासनाने ज्या पध्दतीने सांगितले आहे, ते कागदपत्र आम्ही लावु. इतपर्यंत आणलेले आहे. पण परत नव्याने तुम्ही सांगाल की, प्रशासनाकडुन येऊ द्या. आता मला सांगा तुम्ही सांगितलेले प्रमाणपत्र आम्ही जोडले. प्रशासनाने आणि आता परत प्रशासनाकडुन ते प्रस्ताव मागवावे मग हीच कार्यवाही सुरुवातीपासुन करायला पाहिजे होती ना. आम्ही नागरीकांना सांगतो की, आम्ही या महासभेत तुम्हाला ही करुन देऊ. तुमच्या गटाच्या नावाने ती जागा होऊन जाईल. मग असे नको झाले पाहिजे. तुम्ही अटीशर्ती लावा ना त्याच्यामध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यात काय होतं महापौरताई की, खऱ्या अर्थाने जर आपण खुल्या जागा कुठल्या संस्थेला दिल्यानंतर ती संपुर्ण विकसीत करण्याची जबाबदारी असते. आपण करारनामा पण त्याच पध्दतीने निश्चित करतो. परंतु कुठलीही संस्था त्या ओपन स्पेसला दिलेल्या वेळेत डेव्हलप करत नाही. परत त्याच्यावर आमदार निधीचा खर्च पडतो कारण उतारा त्याच्यावरती महानगरपालिकेचाच असतो. मग महानगरपालिकेच्या निधीतुन किंवा डी.पी.डी.सी.कडुन मिळालेल्या निधीतुन मग त्या संस्थेला देण्याचा उपयोग काय ? संस्थेला देण्याच्या मागचा लॉजिकच हे असतं की, ती त्यांनी विकसीत करावी. आणि त्यांनी सुस्थितीमध्ये ठेवावी. परंतु त्याच सगळ जर महापालिकेलाच करावा लागत असेल. तर मग उपयोग काय त्या संस्थेला देण्याचे.

**श्री.अनंत जोशी :-** लाईट पाणी सुध्दा महापालिकेचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे हा चुकीचा पायंडा पडत चाललेला आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** जितुभाऊंनी, मागे विरोध केला,एका शाळेला ओपन स्पेस दिलेला आहे. मी बोललेलो आहे. तसे देण्यात यावे. धोरण तसे ठरविले. आता ओपनस्पेस देण्यासाठी सपोर्ट करत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाऊ एक मिनीट ऐका ना.शेख साहेबांनी सांगितले ते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपली भुमिका स्पष्ट करावी.

**मा.उपमहापौर :-** ईबाभाई, याबाबत असे निर्णय घेतले पाहिजे असे मला वाटते.जे कोणते अशासकीय प्रस्ताव या ठिकाणी असतील. एक पाच मिनीट फक्त, याच्यामध्ये जे कोणतेही अशासकीय प्रस्ताव आलेले असतील.आपण या पुर्वी जे कोणते अशासकीय ठराव याच्यात नमुद केलेले आहे. नगररचना विभागाने योग्य ते कायदेशीर मार्गदर्शन मागवुन व शहर विकास योजना अंमलात आलेली आहे. त्या कायद्याप्रमाणे आणि अटीशर्तीनुसार त्या भागात त्या अटीशर्तीनुसार त्या संबंधीत संस्थांना देण्यासंदर्भात आपण जसे यापुर्वी ठराव केलेले आहे तसा ठराव करायला काही प्रॉब्लेम नाही ना.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** ओपनस्पेस बाबतीत आपण १० वर्षापासुन अशासकीय प्रस्ताव मधुनच त्याला दिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा:-** कधी तरी या गोष्टींना बदलावे लागेल.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** कायदेशीर आपण देऊच शकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा:-** कधी तरी तुम्हाला सुधारणा कराव्या लागतील ना.

**श्री.जितेंद्र मराठे :-** नितीनभाऊ हे जे कागदपत्र आहे ना, हे आम्ही स्वत:च्या मनाने नाही जोडले ना. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनीच सांगितले ना. त्यांनाच पुर्ण ज्ञान नाही तर आम्हाला कसे काय राहणार.

**मा.उपमहापौर :-** कसे आहे, हे जे संस्था धारक आहे ना. ती त्या सोसायटीची गृहनिर्माण संस्था असली पाहिजे. बरोबर आहे का साहेब ?

**श्री.जितेंद्र मराठे :-** कुलभुषणभाऊ तुमचे म्हणणे बरोबर आहे.

**मा.उपमहापौर :-** तुमचे म्हणणे ही बरोबर आहे तुम्हाला जे सांगितले त्या कागदपत्रांचीच तुम्ही पुर्तता करणार आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** पोकळे दादा एक मिनीट, मला जर नागरीकांनी मागणी केली की, ही जागा या भागातील या संस्थेला पाहिजे. मी कागद घेऊन कुठे जाणार आहे. महापालिकेतच जाणार आहे ना.

**श्रीमती सरीता नेरकर :-** माझ्या महावीर नगरमध्ये ओपनस्पेसचे उद्‌घाटन केले, त्याचा मला अत्यंत राग येतो. अत्यंत राग येतो. तिथे बोर्ड लावले, ज्या वेळेला काम सुरु झाले.

**ॲड.श्री दिलीप पोकळे :-** भाऊ, माझी सभागृहाला विनंती आहे की, हा ठराव मंजुर करावा आणि पुढच्या सभेपासुन धोरण ठरावावे तुम्ही .आणि पुढच्या महासभेपासुन धोरण ठरवा ना तुम्ही.

**मा.महापौर :-** आमच्याकडे काहीच समज नाही. एकावेळेला एक जण बोला.

**श्रीमती सरीता नेरकर :-** सोनगिरे साहेबांशी बोलायचे आहे परत मला आता,

**श्री.जितेंद्र मराठे :-** ताई, एक मिनीट एकच मिनीट फक्त.

**श्रीमती सरीता नेरकर :-** मला बोलुन घेऊ द्या. सोनगिरे साहेबांनी माझ्याशी इतका अन्याय केला आहे. मी तेव्हाच सांगायची मी येथे राहते. रात्रंदिवस लोकं माझ्या घराजवळ येऊन शिव्या घालतात. हे काम जर पुर्ण करायचे नसेल तर चालु करु नका. ताई नाही. ताई नाही. किती वेळा सांगितले, माझ्या ओपन स्पेसचे काम पुर्ण केले नाही. राहु दिले. आता माझ्या वार्डातील नागरीकांनाही हे वाटले की, चैनलिंग फेंसिंगचे काम पुर्ण झाले बगिच्याचे पण ते अपुर्ण आहे. सगळे लोकं माझ्याकडे रात्रीच्या १२.०० ला बायका आल्या माझ्याकडे आता पण व्हिडीओ आहे आणि मला अक्षरश: म्हणत होते तुम्ही किती पैसे खाल्ले याच्यातुन माझा पण फोटो याच्यात आहे. हे सोनगिरे साहेबांनी का असे करावे. कसे काय काम केले हे पुर्ण, का करत आहे हे असे.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई, मी आपल्याला वारंवार सांगितलेले आहे की, जे ईस्टीमेट होते त्याप्रमाणेच काम झालेले आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** माझा फोटो का टाकला तुम्ही, माझे फोटो टाकतांना का विचारले नाही. काम जर पुर्ण नाही झालेले तर पुर्ण का दाखविले. रात्रीच्या १२.०० वाजता माझ्याकडे लोकं आले. विचारत आहे की, ते काम पुर्ण नाही, तुम्ही पैसे खालले, मी पैसे खाल्ले आहे तिथले. तुम्ही कसे काय म्हणतात. असे जर पुर्ण काम नाही तर कसे काय देतात. का म्हणुन तुम्ही असे करत आहात.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई, हा विषय वारंवार झालेला आहे. मी तुमच्या घरी येऊन हा विषय समजुन सांगिलेला आहे. ईस्टीमेटनुसार जेवढे काम होते ते १००% पुर्ण केलेले आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** यांची चुकी आहे यांनी काम पुर्ण केलेले नाही ना.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** ताई, ईस्टीमेट प्रमाणेच काम केलेले आहे ते. ईस्टीमेटच्या बाहेर मी काम करु शकत नाही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** मग याच्यात कसे लिहले आहे की, काम झाले आहे. अपुर्ण आहे ते.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** पुर्ण म्हणजे जेवढे ईस्टीमेट होते तेवढे काम पुर्ण झालेले आहे.

**श्रीमती सरीता नेरकर :-** नाही झालेले, नाही झालेले तेथे. ते काम पुर्ण झालेले नाही. ते पुर्ण करा. ते पुर्ण करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** दुसऱ्याच्या वार्डाची वकीली करायची नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** चांगले वातावरण आहे चांगले राहु द्या.

**श्रीमती सरीता नेरकर :-** असे अर्धवट कामे सोडुन द्यायचे आणि मग दुसरे कामे करायचे. मी तिथे राहते. तिथेच राहते. मी खोटं बोलत नाही. आता पण व्हिडीओ दाखवु शकते. महिला माझ्याकडे येतात रात्री. म्हणतात का हो तुम्ही काय काम केलेले आहे असे अपुर्ण, किती पैसे खाल्ले तुम्ही. काय उत्तर दिले पाहिजे मी.

**मा.महापौर :-** पैसे खाल्ल्याचा विषयच नाही येत तेथे,

**श्रीमती सरीता नेरकर :-** मग काम पुर्ण का नाही झाले.

**मा.महापौर :-** मला वाटते, एक साईड अपुर्ण आहे त्याची.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** त्याला एकासाईडने क्रॉप आहे. त्याला त्या साईडने कंपाऊंड करायची गरज नव्हती. दोन साईडने आपण कंपाऊंड केले. आणि तिसरी जी बाजु आहे त्या जमिन मालकाने अद्यापपावेतो एन.ए.केलेली नाही. त्याची अखंड एकच जागा आहे. तो ज्या वेळेला तेथे ले-आऊट टाकेल, डेव्हलप करेल. या ओपनस्पेसला लागुन तो आणखी ओपनस्पेस टाकु शकतो. आणि तो रस्ता तुमचा तो कंटीन्यु करु शकतो. आणि म्हणुन ज्या वेळेस मी ईस्टीमेट बनविले होते त्याला रक्कमेचे लिमिटेशन होते. १० लाखाला मंजुरी दिलेली आहे. १० लाख पेक्षा जास्त तो ईस्टीमेट मी बनवु शकत नाही. त्या १० लाख मध्ये त्यानी दोन्ही बाजुने चैनलिंग फैंसिंग घेतले, उरलेल्या पैश्यांमध्ये तुम्ही जॉगींग ट्रॅकसाठी लावले. तुमच्या म्हणण्याप्रमाणे, तेथे एकच गेट असतांना त्या कॉन्ट्रॅक्टर कडुन मी दुसरे छोटे गेट बसवुन घेतले, त्याचा पैसा त्याला बिलात दिलेला नाही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** गेट बसुन दिले सांगितले पण गेट बसवलेले नाही तेथे. मी तेच सांगत आहे तुम्हाला. गट नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** आपल्या ईस्टीमेटमध्ये एकच गेट होते, तेवढे असतांनाही आपण दुसरे गेट बसविले.

**श्रीमती सरीता नेरकर :-** तेथे गेट नाही.

**श्री.सोनगिरे, शहर अभियंता :-** तेथे बोरींगची प्रोव्हीजन करुन दिली.

**श्री.जितेंद्र मराठे :-** तेथे जाऊन पाहुन घ्या ना.

**श्रीमती सरीता नेरकर :-** अहो, गेट नाही ना, गेट नाही तेथे.

**मा.महापौर :-** ताई काय परिस्थिती आहे तेथे आपण बघुन घेऊ.

**श्रीमती सरीता नेरकर :-** महापौर महोदया, मी किती वेळा म्हटली की, तेथे गेट नाही. हे राहिले आहे ते राहिले आहे, पण ते साहेब म्हणत आहे की, गेट बसुन दिल तुमच्या करीता, माझ्या करीता, आमच्या करीता, लोकं मला शिव्या घालत आहे. माझ्या करीता केले का हे त्यांनी.

**श्री.जितेंद्र मराठे :-** महापौरताई, महापौरताई

**मा.महापौर :-** ताई, तुम्ही बसुन घ्या.

**श्री.जितेंद्र मराठे :-** हे जे मी सांगत आहे ना, ही काही माझी संस्था नाही. स्थानिक ले-आऊट मधले, ६० प्लॉट धारक आहे तिथले, ज्यांच्या स्वत:च्या स्वाक्षऱ्यांनी, त्यांची प्रमाणित असलेली संस्था आहे. त्यांनी मागितलेले आहे तर त्यांना तुम्ही देऊ शकता ना. ६० च्या ६० लोकांच्या सह्या आहेत ना.

**मा.महापौर :-** ३१ नंबरच्या विषयाला कोणी हरकत घेतली आहे का ?

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ३१ नंबरचा ठराव नामंजुर करण्यात येत आहे. तो नामंजुर करा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** बाकीचे द्या, जर त्या प्रभागातल्या लोकांचेच आहे. त्याला काही प्रॉब्लम नाही मंजुरी द्यायला. हो. बाकीचे मंजुर करा.

**सौ.शुचिता हाडा :-** विषय क्र.३१ नामंजुर करा.

**मा.महापौर :-** विषय क्र.३१ सर्वानुमते नामंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** अनुमोदक कोण आहे, विषय क्र.३१ ला अनुमोदक कोण आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** महापौर महोदया, विषय क्र.३१ ला विरोध असल्यामुळे तुम्ही तो ना मंजुर केलेला आहे.

**नगरसचिव :-** याचे अनुमोदक कोण ? सुचक ते झाले.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३१ सर्वानुमते ना-मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११८२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे सदरचा प्रस्ताव नामंजूर करण्यात येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- ॲड हाडा शुचिता अतुलसिंह**

**अनुमोदक :- काळे अमित पांडुरंग**

**नगरसचिव -विषय क्र.३२ :-** प्रभाग क्रं.१ मधिल परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यासाठी १)जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/१/ब/१ ओपन स्पेस हा कैकाडी समाज आघाडी व २)जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/२/३/३११/२/४/२२४ चे ३ ते ४ ओपन स्पेस दामिनी महिला वस्ती स्तर संस्थेस मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी सभागृहाला परत ही विनंती आहे मॅडम, विषय क्र.३१ ला विरोध असल्यामुळे तो नामंजुर करण्यात यावा, परंतु विषय क्र.३२,३३,३४ ला कोणाचाच विरोध नाही.तो अशासकीय प्रस्ताव आहे , मागच्या महासभेमध्ये जसा अशासकीय प्रस्ताव मंजुर केलेला होता. तसेच हाही प्रस्ताव आपण मंजुर करावा आणि प्रशासनाच्या ज्या काही अटीशर्ती आहे त्या पुर्ण करून त्याच्या कडून सगळे कागदपत्र आले तरच त्यांना जागा देण्यात यावी.

**श्री.अश्विन सोनवणे :-** जर त्याच भागातील ओपनस्पेससाठी लोकं असतील तर त्याची मंजुरी देऊन टाका.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** शासकीय प्रस्तावाला जी प्रोव्हीजन आहे. तिथलेच नागरीक आहे. फक्त काय आहे. ठराव झाल्यानंतर आम्हाला वारंवार शासनाकडे जाता येते, आम्हालाही अंमलबजावणी करता येते. पुर्तता करा ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजमाता नगरच्या ओपन स्पेसचे कैकाडी समाज आघाडी, आता मला सांगा कैकाडी समाजाच्या संस्थेला तो खुला भुखंड देण्यात येतो आहे. आता तेथे संपुर्ण वस्ती ही कैकाडी समाजाची आहे का ? म्हणजे एखाद्या परटीक्युलर संस्थेच्या ताब्यात गेल्यानंतर इतर दुसऱ्या समाजाचेही नागरीक असतील. तर त्यांच्यामध्ये नंतर वाद होतात. याच्यामध्ये वारंवार महानगरपालिका प्रशासनाकडे निवेदने घेऊन येतात नागरीक. म्हणजे प्रशासनाचा जास्त वेळ ही भांडणे सोडविण्यामध्ये जातो. कैकाडी समाज समजा एक असेल त्या भागात, १०% असेल, २०% असेल, २५% असेल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तेथे राहतात ते लोक भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु ५०%- ७५% दुसरे लोकं असेल.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तेथे तपास करा, जर तेथे विरोध झाला तिथल्या लोकांचा.

**मा.महापौर :-** त्याच्यावर नागरीकांच्या सह्या नाही आहे ?

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हा जो प्रस्ताव आहे, अशासकीय प्रस्ताव आहे, अर्ज आणला आहे. या शासकीय प्रस्तावाच्या हिशोबाने जी पुर्तता करायची आहे तीच पुर्तता करायची आहे.

**मा.महापौर :-** नाही, नाही, बरोबर आहे पण त्यासाठी नागरीकांच्या सह्या लागतात ना. तसा जर प्रस्ताव केला असेल, त्याला जर तिथल्या नागरीकांची संमती आहे. मग आपण करु.

**श्री.चेतन सनकत :-** संमती असेल तर मान्यता देऊ असे त्यांचे म्हणणे आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** बरोबर आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे. १००%, त्या समाजाची १००% वस्ती नाही. समजा ५०% कैकाडी समाजाची वस्ती असेल, ५०% इतर समाजाची वस्ती असेल, एखाद्या समाजाच्या संस्थेला एक जागा ॲलोकेट केल्यानंतर ते त्या पध्दतीने तेथे वागतात की, ती आमच्या समाजाला मिळालेली आहे. मग त्या इतर समाजांचा रोष सहन करावा लागतो. किंवा इतर समाज तक्रारी घेऊ प्रशासनाकडे येतात. आणि प्रशासनाला काम धंदे सोडुन हीच प्रोसेस करावी लागते. आपले महणणे ते आहे. तेथे परटीक्युलर जर ते समाज असेल तर द्यायला काही अडचण नाही ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** भाऊ आता जर हाच विषय प्रशासकीय आणायला म्हटला तर प्रशासनाला तेच कराव लागणार जे आज ठराव झाल्यानंतर करावं लागणार आहे. ठराव झाल्यानंतर पण तेच करणार ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता कसे होऊन जातो. यांनी त्या भागातील ५० लोकांच्या सह्या आणल्या. आणि त्या भागात समजा अजुन ५०% उर्वरीत लोकं असतील,त्यांना या गोष्टी अज्ञात असतील, त्यांना जेव्हा माहित पडेल. ही जागा

कुठल्या तरी समाजाला दिलेली आहे. त्यानंतर ते लोकं जागृत होतात.मग ते प्रशासनाकडे येतात. आणि ते ठराव रद्द करा किंवा ती जागा परटीक्युलर दोन याच्या मध्ये वाद निर्माण होतात.आणि ते वाद सोडविण्यामध्ये महापालिका प्रशासनाचा विनाकारण वेळ खर्ची पडतो,

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच्या आधी ही महासभेपुढे असे प्रस्ताव आलेले आहे. नागरीकांचे विरोध पण आलेले आहे. नागरीक १००-१०० च्या संख्येने सभागृहात आलेले आहे विरोध घेऊन विरोध कोणाला करायचा राहिला असता तर येऊन गेला असता आता पर्यंत सभागृहासमोर. आठ दिवसापासुन अजेंडा प्रसिध्द झालेले आहे. वर्तमान पत्रात पण आलेले आहे. सगळयांनी वाचलेले आहे की, असे असे ठराव येत आहे म्हणुन.

**मा.महापौर:-** नाही पण आपणही पाहिलेले असेल की, ओपनस्पेसचा कुठलाही ठराव आलेला असेल तर त्याला नागरीकांच्या सह्या आहेतच. दुसरा असा विषय आहे की, यावर आपण जो उतारा जोडलेला आहे तो महानगरपालिकेच्या नावावर नाही. महानगरपालिकेच्या नावावर जर तो उतारा नाही तर आपण ती जागा संस्थेस देऊ शकतात का ? हा अधिकार आपला आहे का ? हे पण एक प्रश्न चिन्ह आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हा विषय नगररचनेचा आहे ना. नाही, नाही, नाही. मग आपल्याला असे म्हणायचे आहे का ? ती जी जागा आहे ती मुळ मालकाची आहे महापालिकेची नाही. ले-आऊट मंजुर करतांना आपण ताबा नाही घेतला का त्याचा. ७/१२ उतारा करतांना, ले-आऊट मंजुर करतांना आपण ताबा घेतला नाही. आपल्याकडे ताबा पावती नाही हे डिक्लेअर करा.

**मा.महापौर :-** ७/१२ च्या उताऱ्यावर नांव आपल असेल तर आपण अधिकार दाखवु शकतो. उताऱ्यावर नाव नाही तर आपण अधिकार कसे काय दाखवु शकतो.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तो ले-आऊट मंजुर होऊन १५-२० वर्ष झाले इतके वर्ष महानगरपालिकेने काय केले.आपले असे म्हणणे आहे का ? ज्या खुल्या जागेवर महानगरपालिकेच नांव नाही. ती जागा महापालिकेची नाही. ते पहिले स्पष्ट करा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १००% महानगरपालिकेची नाही. कायदा ओपन स्पेसच्या बाबतीतला अत्यंत स्पष्ट आहे. सुप्रिम कोर्टाने सुध्दा निवाडा दिलेला आहे की, ओपन स्पेस ही कायद्याने खुली जागा ठेवण्याच्या संदर्भातच त्याला बंधन आहे. कारण जमिन मालकाला खुल्या जागेच्या संदर्भात कुठलाही मोबदला, कायद्याने त्याला टी.डी.आर. म्हणा किंवा मोबदला, महानगरपालिका देत नाही. त्या जागेच टाईटल हे महानगरपालिकेच्या नावावर लावता येऊ शकत नाही. हे आपण काय झाले आहे पुर्वीच्या काळामध्ये अश्या पध्दतीने खुल्या जागेंचे टाईटल मुळ मालकच्या नावावर राहिल्यानंतर काही मुळ मालकांनी मिसयुज करुन त्याचे पण खडे प्लॉट करुन विकुन टाकले.म्हणुन त्यावेळेला महानगरपालिकेने किंवा तत्कालीन नगरपालिकेने बेकायदेशीर दादागीरी करुन त्यांच्यावर ती सक्ती लादली गेली की, पहिले तुम्ही महानगरपालिकेचे किंवा तत्कालीन नगरपालिकेचे नाव लावुन आणा, परंतु ते कायद्याने बंधनकारक नाही. कायद्याने त्या जमिनीचा मालक जो आहे त्याच्याकडेच ती खुली जागा राहते. त्याच्यावर कायदेशीर बंधन एवढेच आहे की, ती जागा कायमस्वरुपी खुली राहिली पाहिजे.

**मा.महापौर :-** करवंदे साहेब काय तुम्हाला वाटते योग्य. त्या उताऱ्यावर आपले नाव नाही. आपण काय करु शकतो. तुमचे काय मत आहे याच्यावर. माईक घ्या.

**श्री.अशोक करवंदे, सहा. नगररचनाकार :-** नितीनभाऊंनी जे सांगितले ना. ती जी ओपन स्पेस आहे. महानगरपालिकेच्या मालकीची नाही. त्याच्यावरती हक्क त्या प्लॉट धारकांचाच आहे. प्लॉट धारकांनी मोबदला म्हणुन जर दिले त्या मुळ मालकाला, त्याच्यामध्ये त्या रस्त्यांच वेटेज,त्या ओपन स्पेसचा आकार, क्षेत्र, साईज, विडथ, याच्यावर ते घेतलेले असते. तेच प्लॉट धारकांनी त्याचे पैसे हे मुळ मालकाला दिलेले असते.महापालिका ही फक्त त्याची कस्टडियन आहे. त्याचे पालकतत्व फक्त महापालिकेकडे आहे.

**मा.महापौर :-** मग आपल्याला अधिकार आहे का असे असतांना देऊ शकतो आपण.

**श्री.अशोक करवंदे, सहा. नगररचनाकार :-** त्याच सोसायटीतल्या लोकांनी काही ट्रस्ट केले, किंवा काही संस्था निर्माण केली आणि त्यांनी ती वापरायला मागितली तर आपण कस्टडियन आहे म्हणजे आपले काम आहे ते. आपण देऊ शकतो. पण त्याच सोसायटीतले पाहिजे. मेहरुण मधील जर मी मागेल तर असे नाही चालणार.

**श्रीमती सरीता नेरकर :-** (आवाज स्पष्ट नसल्याने काय बोलले समजले नाही) माझ्याकडे महिला नाव नंबर सकट आलेल्या, त्याच काही महिला तुमच्या पर्यंत विषय आला, तुम्ही फोन लावुन शाहनिशा केली आणि असे विचारण्यात आले की, मला का तेथे बोलविले, हे तुम्ही काही तरी खरं खोटे केले. अक्षरश: रडल्या त्या महिला घाबरायला लागल्या की, आम्ही आता तुम्हाला बोलविणार नाही. हा विषय तुम्ही का केला आता तुम्ही तो विषय क्लियर करा. महापौर साहेब तुम्ही फोन लावला होता आमच्या वार्डामध्ये. आमच्या वार्डामध्ये तुम्ही फोन लावला कोण सहकार्याने तक्रार केली असेल. तुम्ही का शाहनिशा केली त्याची की, माझ्याकडे का आल्या. ही ओपन स्पेस माझे सहकारी डेव्हलप करणार आहे का ? माझ्याकडे आले मी पण तेच काम करणार ते पण तेच काम करणार. म्हणुन धमकावले गेले. हे तुम्ही त्याची हे केली. आहे का खरं की खोटे आहे.

**मा.महापौर :-** आठवत नाही काय विषय आहे. लक्षात नाही येत विषय.

**श्रीमती सरीता नेरकर :-** तुमच्याकडे माझे सहकारी आले की, अशी अशी, आपल्या महानगरपालिकेची कर्मचारी आहे महिला, तीला, ती माझ्याकडे आली, ती बिचारी ४ वेळा सांगत आहे मी गेली नाही मी गेली नाही. तीने सांगितले की, शेवटी फोन लावला, मग तुम्ही तेथे स्थानिक कोणी एका जणाला फोन लावला, मग त्या बाईने सांगितले आम्ही गेलो, ती कर्मचारी बिचारी गेली नव्हती. तीला रडु आणले, का असे, बरोबर आहे की नाही. मॅडम याचा आतुन दुख: होतो. तुम्ही नाव सांगा ना.

**मा.महापौर :-** बसा, बसा.

**श्रीमती सरीता नेरकर :-** नाही मॅडम, कसे बसा बसा, नाही मॅडम हा विषय क्लियर करुन घ्या. माझे सहकारींनी सांगा, आपले कर्मचारी.

**मा.महापौर :-** आपल्याला आपले नगरसेवकांमध्ये वाद करायचं नाही ताई. बसुन घ्या तुम्ही.

**श्रीमती सरीता नेरकर :-** ताई तेच महिला माझ्याकडे रडत आल्या. ताई आम्ही आता तुम्हाला काही सांगणार नाही. असे नाही, तसे नाही. असे नका करु. असे धमकावु नका. धमकावु नका. जो विषय आहे क्लियर करुन घ्या.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी सभागृहाला विनंती आहे. ३१ ला विरोध आहे ते राहु द्या परंतु ३२,३३,३४ हे मंजुर करा.आणि याच्यापुढच्या महासभेपासुन ते धोरण पाडा काही हरकत नाही. या ३ विषयांना तुम्हाला जी पुर्तता करायची आहे ती पुर्तता करुन घ्या. कायद्यात बसत असेल त्यांना द्या कायद्यात नाही बसत असेल त्यांना नका देऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करा, प्रशासनाने कायदेशीर पुर्तता करावी.

**नगरसचिव :-** विषय क्र.३२

**श्री.धीरज सोनवणे :-** ३७ पर्यंत तेच विषय आहे.

**मा.उपमहापौर :-** नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनेला व या ठरावांना माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या प्रत्येक सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यायची आहे. आणि त्याच पध्दतीने कार्यवाही करायची आहे. विषय क्र.३२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११८३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ अंतर्गत १) जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/१/ब/१ ओपन स्पेस व २)जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/२/३/३११/२/४/२२४ चे ३ ते ४ ओपन स्पेस स्थित असून या परिसरात अनुक्रमे कैकाडी समाज आघाडी व दामिनी महिला वस्ती स्तर संस्था या स्थानिक सामाजिक संस्थांव्दारे परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यात येतात. सदयस्थितीत उपरोक्त नमुद खुला भुखंड हे बखळ स्वरुपात असून या परिसरातील नागरीकांना त्याचा काहीएक उपयोग होत नाही. तसेच या परिसरात मोठया संख्येत रहिवासी

वस्ती स्थित असून या नागरीकांना सामाजीक कार्यक्रमांसाठी कोणतीही व्यवस्था नाही. परिणामी वर नमुद खुला भुखंड विकसित करणेसाठी याच परिसरातील वर नमुद दोन्ही संस्था व सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेसह नागरीकांची मागणी असल्याने १)जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/१/ब/१ ओपन स्पेस हा कैकाडी समाज आघाडी व २)जळगांव शिवार राजमालती नगर मधील गट नं.३११/२/३/३११/२/४/२२४ चे ३ ते ४ ओपन स्पेस दामिनी महिला वस्ती स्तर संस्थेस मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने सदर ओपनस्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३३ :-** प्रभाग क्रं.१ मधिल परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यासाठी राधाकृष्ण नगर जळगांव मधील गट नंबर ३०१/१+३०१/२ मधील ओपन स्पेस मिळणेबाबत आदियोगी श्री राधाकृष्ण नगर बहुउद्देशीय संस्था यांचा सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११८४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, राधाकृष्ण नगर जळगांव मधील प्रभाग क्रमांक १ अंतर्गत राधाकृष्ण नगर जळगांव मधील गट नंबर ३०१/१+३०१/२ मधील ओपन स्पेस स्थित असुन या परिसरातील स्थानिक सामाजिक संस्थाव्दारे परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यात येतात. सदयस्थितीत उपरोक्त नमुद खुला भुखंड हा बखळ स्वरुपात असून या परिसरातील नागरीकांना त्याचा काहीएक उपयोग होत नाही. तसेच या परिसरात मोठया संख्येत रहिवासी वस्ती स्थित असून या नागरीकांकरीता सामाजीक कार्यक्रमांसाठी कोणतीही व्यवस्था नाही. परिणामी वर नमुद खुला भुखंड विकसित करणेसाठी याच परिसरातील संस्था व सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेसह नागरीकांची मागणी असल्याने परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम, तसेच कॉलनीतील महिलांसाठी /वृध्दांसाठी ध्यान केंद्र आदी कार्यक्रम घेण्यासाठी राधाकृष्ण नगर जळगांव मधील गट नंबर ३०१/१+३०१/२ मधील ओपन स्पेस आदियोगी श्री राधाकृष्ण नगर बहुउद्देशीय संस्थेस मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने सदर ओपनस्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- पोकळे दिलीप बबनराव**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३४ :-** प्रभाग क्रं.१ मधिल परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यासाठी बहिणाबाई नगर निमखेडी शिवार गट नंबर ६५/३ मधील ओपन स्पेस मिळणेबाबत कावेरी बहुउद्देशीय संस्था यांचा सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११८५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १ अंतर्गत बहिणाबाई नगर निमखेडी शिवार गट नंबर ६५/३ मधील ओपन स्पेस स्थित असुन या परिसरातील स्थानिक सामाजिक संस्थाव्दारे परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम हाती घेण्यात येतात. सदयस्थितीत उपरोक्त नमुद खुला भुखंड हा बखळ स्वरुपात असून या परिसरातील नागरीकांना त्याचा काहीएक उपयोग होत नाही. तसेच या परिसरात मोठया संख्येत रहिवासी वस्ती स्थित असून या नागरीकांकरीता सामाजीक कार्यक्रमांसाठी कोणतीही व्यवस्था नाही. परिणामी वर नमुद खुला भुखंड विकसित करणेसाठी याच परिसरातील संस्था व सन्मा.सदस्य,श्री.दिलीप बबनराव पोकळे यांचेसह नागरीकांची मागणी असल्याने परिसरात विविध समाजपयोगी उपक्रम, तसेच कॉलनीतील महिलांसाठी /वृध्दांसाठी ध्यान केंद्र आदी कार्यक्रम घेण्यासाठी बहिणाबाई नगर निमखेडी शिवार गट नंबर ६५/३ मधील ओपन स्पेस कावेरी बहुउद्देशीय संस्थेस मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने सदर ओपनस्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ३१** |
| **सूचक** | **:- पोकळे दिलीप बबनराव** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.३५ :-** प्र.क्र.११ अंतर्गत पिंप्राळा शिवार गट नंबर १५४/१ मधील खुला भुखंड परिसरात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कामांसाठी कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्थेस देणेबाबत अध्यक्ष, कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्था,जळगांव यांनी दिलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या अश्या पध्दतीने तुम्ही धार्मिक आणि शैक्षणिक कामासाठी तुम्ही ते भुखंड देऊ शकणार नाही.शैक्षणिक आणि धार्मिक कारणांसाठी भुखंड देता येणार नाही. फक्त त्यांनी त्याचा विकास करुन विकासासाठी म्हणा किंवा ज्या काही त्याच्यामध्ये नियमाप्रमाणे ज्या काही परवानग्या अनुज्ञेय असतील त्या पध्दतीनेच देता येतील.

**नगरसचिव :-** हे मंजुर आहे की काय ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११८६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.११ अंतर्गत वाघ नगर परिसरात छत्रपती कॉलनी मध्ये पिंप्राळा शिवार गट नंबर १५४/१ मध्ये खुला भुखंड स्थित असून सदयस्थितीत बखळ स्वरुपात आहे. सदर परिसरात रहिवासी नागरीकांकडून कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्थेची स्थापना करण्यात आलेली आहे व त्याव्दारे तेथे विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यक्रम नित्याने होत असतात. सदर परिसर रहिवास क्षेत्र नव्याने विकसित होत असुन या भागात मोठया प्रमाणावर दाटीची लोकवस्ती रहिवास आहे. सदर परिसरातील खुल्या जागेचा विकास करुन तेथे मुलांच्या खेळण्यासाठी, अबालवृध्दांसाठी विरंगुळा असा उपयोग होवू शकतो तसेच तेथे कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्थेचा मंदीर बांधण्याचा

देखिल मानस आहे. याबाबत सदर भुखंड संस्थेस मिळणेसाठी संस्था पदाधिकारी व नागरीकांनी सहयांचे निवेदन दिलेले असून सदर खुला भुखंड सदर संस्थेस दिल्यास त्यात नियमित साफसफाई, स्वच्छता ठेवून उपरोक्त नमुद अनेक प्रयोजनार्थ विविध सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, धार्मिक कार्यक्रमांसाठी सोयीचे व सुलभ होईल याकामी कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्था सर्व आर्थिक तरतूद स्व:खर्चाने करणार आहे.

उपरोक्त कारणास्तव जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.११ अंतर्गत वाघ नगर परिसरात छत्रपती कॉलनी मध्ये पिंप्राळा शिवार गट नंबर १५४/१ मधील खुला भुखंड परिसरात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कामांसाठी कुंदकेश्वर महादेव बहुउद्देशिय संस्थेस मनपा अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने सदर ओपनस्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिली गेली नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.३६ :-** जळगांव शहर महानगरपालिका हायस्कुल क्र.१ चे नामकरण 'मेमन हाजी इब्राहीम रानानी' असे करणे व सदर शाळा रानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांना दत्तक देणेबाबत अध्यक्ष,रानानी चॅरिटेबल ट्रस्ट,जळगांव यांचा मा.महापौर,सौ.जयश्री सुनिल महाजन यांचेमार्फत आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्यामध्ये फक्त एक सुचना आहे की, ज्या कोणत्या संस्थांना आपण शाळा दत्तक देतो किंवा जे काही आपल्या महापालिकेच्या प्रिमायसेस मध्ये आपण सेवाभावी संस्थांना आपण उपक्रमासाठी देतो.तर माझी एकच विनंती आहे की, त्या ठिकाणी डोनेशन, जसे आपण पिपल बँकेला जागा दिली आहे तेथे शाळा सुरु आहे. आज त्या जागेवर रु.६०००/- डोनेशन घेतात ते. आपण पिपल बँकेला शाहु महाराज हॉस्पीटल दिलेले आहे. तेथे त्यांनी आता कमर्शियल उद्योग सुरु केला आहे. असे त्यांच्या अटीशर्तीमध्ये करुन देत जावे ही माझी विनंती आहे.

**मा.महापौर :-** ही जी शाळा आहे ५ वी ते ८ वी पर्यंत आपण त्यांना दिलेली आहे. महापालिकेची शाळा आहे, आणि ते व्यवस्थीत चालवत आहे. म्हणुन ती १ ली ते ४ थी आपण त्यांना देतो आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११८७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका मेहरुण परिसरात महानगरपालिका हायस्कुल क्र.१ कार्यरत असून या परिसरातील बहुसंख्य नागरीक तसेच रानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांचेकडून सदर शाळेस मेमन हाजी इब्राहीम रानानी असे नामकरण करुन रानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांना सदर शाळा दत्तक देण्याची विनंती केलेली असून सदर शाळेचा सर्व प्रकारचा खर्च करण्यास तयार असल्याने जळगांव शहर महानगरपालिका हायस्कुल क्र.१ चे नामकरण 'मेमन हाजी इब्राहीम रानानी' असे करणे व सदर शाळा रानानी चॅरीटेबल ट्रस्ट यांना दत्तक देणेस म.न.पा. अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने मनपा हायस्कुल क्र.१ चे यापूर्वी नामकरण झाले नसलेबाबत तसेच सदर शाळा यापूर्वी कोणत्याही संस्थेस दत्तक दिली गेली

नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी. तसेच त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे डोनेशन घेण्यात येऊ नये.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३७ :-** प्र.क्र.३ अंतर्गत खेडी बु॥ शिवार गट नं.१६/२अ, १६/३ या मंजूर अभिन्यासातील खुला भुखंड परिसरात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कामांसाठी "लोणी कुणबी पाटील समाज बहुउद्देशीय संस्था,जळगांव,ता.जि.जळगांव" यांना देणेबाबत अध्यक्ष, लोणी कुणबी पाटील समाज बहुउद्देशीय संस्था,जळगांव यांचा सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांचेमार्फत आलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावे अटीशर्ती त्याच घेण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** अटीशर्तींच्या अधिन राहुन विषय क्र.३७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११८८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्र.क्र.३ अंतर्गत खेडी बु॥ शिवार गट नं.१६/२अ, १६/३ मध्ये खुला भुखंड स्थित असून सदयस्थितीत बखळ स्वरुपात आहे. सदर खुला भुखंडासाठी लोणी कुणबी पाटील समाज बहुउद्देशीय संस्था,जळगांव ता.जि.जळगांव हि सामाजिक संस्था धर्मदाय आयुक्त,जळगांव यांचेकडे रजि नं. महा.१६५७४/जळगांव, एफ १६०६९ ने नोंदणीकृत असून सदर संस्थेने आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका यांचेकडे या संस्थेच्या माध्यमातून विविध सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक कार्यक्रम घेण्याच्या उद्देशाने सदर भुखंड विकसित करण्यासाठी या गटातील प्लॉटधारक यांच्या संमतीने मागणी केलेली आहे.

सदर परिसर रहिवास क्षेत्र नव्याने विकसित होत असून परिसरातील खुल्या जागेचा विकास करुन तेथे लग्नकार्य, मुलांच्या खेळण्यासाठी, अबालवृध्दांसाठी विरंगुळा असा उपयोग होवू शकतो. तसेच खेडी बु॥ शिवार गट नं.१६/२अ, १६/३ मध्ये खुला भुखंड याच परिसरातील लोणी कुणबी पाटील समाज बहुउद्देशीय संस्थेस मिळणेबाबत त्यांचे निवेदनानुसार संस्था पदाधिकारी व नागरीकांकडून सतत मागणी होत असून या प्रभागातील सन्मा.सदस्य, श्री.प्रविण रामदास कोल्हे यांची देखिल कुठलीही हरकत नसून सदर खुला भुखंड या संस्थेस दिल्यास त्यात नियमित साफसफाई, स्वच्छता ठेवून उपरोक्त नमूद अनेक प्रयोजनार्थ विविध सामाजिक, शैक्षणिक, क्रिडा, धार्मिक कार्यक्रमांसाठी सोयीचे व सुलभ होईल. उपरोक्त कारणास्तव जळगांव शहर महानगरपालिका प्र.क्र.३ अंतर्गत खेडी बु॥ शिवार गट नं.१६/२अ, १६/३ खुला भुखंड परिसरात सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक अशा अनेक कामकाजासाठी लोणी कुणबी पाटील समाज बहुउद्देशीय संस्था जळगांव ता.जि.जळगांव यांना महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनूसार व सन्मा.सदस्यांच्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, सदर खुला भुखंड यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिला गेला नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.३८ :-** महासभा ठराव क्र.८२१ दि.३०/०५/२०२२ अन्वये खेडी गावात प्रवेशाच्या ठिकाणी रिक्षा स्टॉप जवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशव्दार तयार करणेस मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे मात्र सदरचे प्रवेशव्दार स्व.प्रकाश आनंदा देवकर यांचे स्मरणार्थ स्व:खर्चाने बांधण्यात येणार असल्याने महासभा ठराव

क्र.८२१ दि.३०/०५/२०२२ चे ठरावान्वये छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशव्दार सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी कमान उभारुन त्यावर "स्व.प्रकाश आनंदा देवकर यांचे स्मरणार्थ" असे नांव देणे असा बदल करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा. आणि कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.३८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११८९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका महासभा ठराव क्रमांक ८२१ दिनांक ३०/०५/२०२२ अन्वये प्रभाग क्रमांक ३ खेडी गावठण परिसरातील तमाम नागरीकांकडून महामार्गापासून खेडी गावात प्रवेशाच्या ठिकाणी रिक्षा स्टॉप जवळ प्रवेशव्दार कमान सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी तयार करुन त्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेश कमानव्दार महानगरपालिकेच्या अटीशर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

खेडी गावात प्रवेशाच्या ठिकाणी रिक्षा स्टॉप जवळ छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशव्दाराचे बांधकाम स्व.प्रकाश आनंदा देवकर यांचे नातेवाईक त्यांच्या स्व:खर्चाने करणार असल्याने त्यांनी मागणी केलेनूसार सदर महासभा ठराव क्रमांक ८२१ दिनांक ३०/०५/२०२२ मध्ये बदल करुन छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशव्दार सिमेंट कॉंक्रीटव्दारे आरसीसी कमान उभारुन त्यावर "स्व.प्रकाश आनंदा देवकर यांचे स्मरणार्थ" असे नांव देणेस महानगरपालिकेच्या अटीशर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, सदर ठिकाणी यापूर्वी प्रवेशव्दार तयार करणेस तसेच नांव देणेबाबत परवानगी दिली आहे किंवा कसे याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.३९ :-** प्रवासी तसेच शहरातील नागरीकांकरिता नविन व जुने बस स्टॅण्ड या ठिकाणी आधुनिक सुलभ स्वच्छता गृह बांधकाम करणेस व यासाठी लागणारा खर्च स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत सामुदायीक शौचालय बांधकाम करणे कामी SBM १.० आणि SBM २.० अंतर्गत प्राप्त निधीतून व आवश्यकता भासल्यास म.न.पा. निधीतून करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.अनंत हरिश्चंद्र जोशी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** यादी प्रस्ताव मान्य करण्यात यावा पण त्याच्या मध्ये सुप्रिम इंडस्ट्रीज ही चालविणार आहे. तर हे मनपा तर्फे उभारण्यात यावे. आणि त्याच्यानंतर या संदर्भात अधिकृत जे काही आहे ते मागविण्यात याव्या.

**श्री.चेतन सनकत :-** नविन बस स्टॅण्ड या ठिकाणी सुविधा सॅनिटाईजेशन सर्व्हीसेस यांना आपले एस.टी.महामंडळ यांनी ३० वर्षासाठी करारनामा करुन तेथे शौचालय बांधुन देणे या संस्थेने आणि या संस्थेच्या कराराचे ५ वर्ष बाकी आहे. आणि त्याला अजुन अत्याधुनिक करण्याचा प्रस्ताव तेथे पेंडींग आहे. त्या ठिकाणी ते स्वत: स्वखर्चाने करणार आहे. आणि दुसरी गोष्ट जुन्या बस स्टॅण्ड जवळ शिवसदन बहुउद्देशिय मागासवर्गीय संस्था, या संस्थेला त्याच्या पाठीमागे जागा दिलेली आहे. त्या ठिकाणी ती संस्था स्वखर्चाने टॉयलेट बांधणार आहे. त्याची प्रोसेस आपल्या बांधकाम विभाग आणि टाऊन प्लॉनिंग विभाग मध्ये फक्त ऑर्डर आणि नकाशासाठी पेंडींग आहे.हे सर्व संस्था स्वखर्चाने करत असतांना आपण मनपा फंड किंवा शासनाकडुन स्वच्छ भारत अभियानांतर्गत येणारा फंड तेथे युज करणे चुकीची बाब होणार आहे म्हणुन हा प्रस्ताव नामंजुर करण्यात यावा. असे माझे मत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** या संदर्भात एस.टी.महामंडळाने एन.ओ.सी. सुध्दा दिलेली आहे महानगरपालिकेला,

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** मा.महापौर आणि सभागृह, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत SBM १.० साठी शासनाकडुन आपल्याला ४६ कोटी रुपये मिळालेले आहे. ४६ लाख रुपये आणि SBM २.० अंतर्गत आपल्याला शासनाकडुन १ कोटी ११ लाख रुपये मिळालेले आहे. टोटल ६५ लाख मधील १८ लाख रुपये आपल्याकडे शिल्लक आहे. आणि आपल्याला ही रक्कम खर्च करुन शासनाला सर्टीफिकेट द्यायचे आहे. जळगांव शहरामध्ये आज जर आपण बघितले, तर सुप्रिम इंडस्ट्रीने या धरतीवर सामुदायीक शौचालय बनविलेले आहे. जो आपल्या जळगांव शहरातला सिटी आदर्श आहे. त्याच धरतीवर अश्या प्रकारचे शौचालय बांधण्यात यावे असा हा आरोग्य विभागाचा मत आहे. यापुर्वी आपण जर बघितले असेल तर त्यांनी जळगांव शहरात सार्वजनिक शौचालय बांधलेले आहे. दर वर्षी स्वच्छ भारत मिशन यावर आपण करोडो रुपये खर्च करतो. ते केल्यानंतर त्याची परिस्थिती जशीची तशीच राहते. आपला लावलेला पैसा वाया जातो आणि आपल्याला आऊटपुट मिळत नाही. तर त्या बाबीचा विचार करुन शहरामध्ये अशी दोन ठिकाणी आहे जेथे नागरीकांची वर्दळ आहे. खुप मोठया प्रमाणावर नागरीक आहे. नागरीक आणि जनता आहे. त्या ठिकाणी आपल्याला असे शौचालय बांधण्याचे आपले मानस आहे. आणि त्यासाठी शासनाकडुन आपल्याला प्राप्त झालेले एक करोड रुपये आहे. ते आपल्याला खर्च करणे अपेक्षित आहे. संपुर्ण जळगांव शहरामध्ये भरपुर जागा बघितल्या.आणि त्या जागा बघितल्यानंतर वर्दळीच ठिकाण म्हणजे बाजार पेठ, सुभाष चौक, दाणा बाजार या भागामध्ये पण त्या भागामध्ये आपल्याकडे जागा उपलब्ध नाही. नंतर जेव्हा बघितले तर जळगांव शहरातील बस स्टॅण्ड आणि रेल्वे स्टेशन या शहरातील सर्वात जास्त वर्दळीचे ठिकाण आहे. तर आपण राज्य परिवहन विभाग आयुक्त त्यांना पत्र दिले होते. एस.टी स्टॅण्ड आणि आणि जुना बस स्टॅण्ड या शहराच्या मध्यवर्ती भागांमध्ये आणि त्याच्या मुख्य रस्त्या लगत आपल्याला शौचालय बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत महापालिकेला पत्र दिलेले होते. मग निबंधक, राष्ट्रीय परिवहन विभागाने आपल्याला नविन बस स्टॅण्ड ज्या ठिकाणी मेन रस्त्याला लागुन, त्याच्या बाजुला एक मोठी जागा आणि जुन्या बस स्टॅण्डला फ्रंटला एकदम जेथे आता पुस्तकालय आहे. त्या ठिकाणी दोघी जागांची आपल्याला एन.ओ.सी. दिलेली आहे. दोघी जागांचा त्यांनी मंजुर नकाशा आपल्याला दिलेला आहे. तर मला असे अभिप्रेत आहे की, या ठिकाणी जाहिर ऑनलाईन निविदा मागवुन सुप्रीम कंपनीच्या धरतीवर दोन शौचालय उभारुन आपल्या शहराचा स्वच्छ सर्वेक्षणाचा जो भार आहे तो कमी होईल आणि शहराच्या सौंदर्यकरणामध्ये किंवा विद्रुपीकरणा मध्ये जो आपला आजपर्यंतचा अनुभव आहे. तो सुध्दा कमी होईल. असे माझे मत आहे. तर याबाबत महासभेने निर्णय द्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**श्री.अश्विन सोनवणे :-** (आवाज स्पष्ट नसल्यामुळे काय बोलले समजले नाही)

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** हा जो विषय आहे ना भाऊ यामध्ये सन्मा. सदस्यांनी जो विषय मांडला, त्या ठिकाणी ऑलरेडी एक शौचालय आहे. त्या शौचालयाशी त्या संस्थेचे काही संबंध नाही. ती शौचालय जुनी शौचालय आहे. त्यांच्यावर हे डेव्हलप केल्याने कोणतीही बाधा येणार नाही. आणि दुसरा भाग जो यांनी सांगितले नव्या बस स्टॅण्डच्या एजन्सीला ठराव करुन दिलेला आहे. जुन्या स्टॅण्डला ठराव केलेला नाही.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब, त्याच्या भिंतीला लागुन पाठीमागे, जुन्या बस स्टॅण्डच्या भिंतीला लागुन.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** बघितला मी तो प्रस्ताव परंतु हा जो प्रस्ताव आहे शासनाचा आहे. तो वेगळा आहे हा वेगळा आहे. दोन्ही प्रस्ताव वेगवेगळे आहे. आणि जर का आपण अशी शौचालय बांधली, तर शहरातल्या खुप मोठया गर्दीच्या ठिकाणी आणि शहराच्या दृष्टीकोणातुन हिताचे होईल.

**श्री.चेतन सनकत :-** साहेब, तुमच्या मताशी मी सहमत आहे. पण माझे म्हणणे असे आहे. शिवसदन मागासवर्गीय बहुउद्देशिय संस्था यांना आपण ऑलरेडी तेथे जागा दिलेली आहे. आपल्या विभागामार्फत काही डॉक्युमेंट्री पुर्ततेमुळे बांधकाम सुरु होत नाही. आपण त्याठिकाणी फ्रीमध्ये अत्याधुनिक शौचालय बांधण्याचे तिथे मानस होता. शुचितांताईच्या सभापती काळामध्ये आम्ही त्याचा पाठपुरावा करुन आम्ही स्वत: त्यांना बोलवुन विनंती केली होती की, तुम्ही शौचालय बांधा स्वखर्चाने, ताई बरोबर आहे ना, या विषयाला त्यावेळेपासुन मान्यता भेटलेली आहे पण प्रशासकीय बाबीमुळे तुम्ही नकाशा देत नाही. जागा मोजणी करुन देत नाही. म्हणुन हा विषय पेंडींग आहे.बरोबर ते पण अत्याधुनिक आणि चांगली

शौचालय बांधत आहे. दुसरी गोष्ट राहिला आता स्टॅण्डची, भिंतीला लागुन जर शौचालय होत असेल, ती मान्यता भेटलेली आहे. तर आपण हा निधी जळगांव शहरामध्ये दुसऱ्याठिकाणी कुठेही शौचालय बांधण्यासाठी किंवा स्मशानभुमी आहे, शिरसोली रोड मेहरुणकडे, त्याठिकाणी चांगली गर्दी असते, जे.के.पार्क तेथे लोकं जातात. अश्या वेगवेगळया ठिकाणी जर असेल तर तेथे बांधायला काही अडचण नाही. ज्या ठिकाणी मेन स्पॉट आहे तेथे टाका.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, काय झालेले आहे. ज्यांना आपण ठराव करुन दिलेले आहे ना. ते कुठेतरी आपल्या महानगरपालिकेच्या जागेवरती आहे. या दोघीही जागा ज्या आहे. या जागेमध्ये एस.टी.महामंडळाने जागा दिलेली आहे आपल्याला,म्हणजे जागेचा प्रश्न आपला सुटतो. यांना दिलेली जागा जी आहे ती कुठेतरी रस्त्यावरती आहे. आणि रस्त्यावर आल्याने त्याला रहदारीला अडथळा निर्माण होऊ शकतो किंवा वेगळया अडचणी निर्माण होऊ शकतात. ही सुरक्षीत जागा आहे. आणि स्वतंत्र जागा असल्यामुळे वाया जात नाही. म्हणुन याचा योग्य तो विचार करावा.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** आदरणीय महापौर, यांनी जो प्रस्ताव दिलेला आहे. त्या प्रस्तावातुन पुन्हा एक शौचालय बांधला गेला तर शहरात ते असायला हरकत नसावी. परंतु तो अशासकीय ठराव जो झालेला आहे. तो ६ मिटरचा रस्ता आहे. त्या पुर्ण सुभाष चौक, दाणा बाजार, पोलन पेठ, जोशी पेठ,या संपुर्ण भागात टॉवर चौकापासुन ते कोर्ट चौकापर्यंत आपल्याला कुठलीच जागा सापडत नाही. आपण दाणा बाजारातल्या त्या सुभाष चौकामधल्या ज्या सार्व.मुताऱ्या होत्या त्या ठिकाणाचा विचार करत होतो. पण ती जागा इतकी छोटी आहे. त्या ठिकाणी देखील आपले होत नाही. मनपाला आपली स्वत:ची जागा उपलब्ध होत नाही म्हणुन आपण शासनाला विनंती केलेली आहे. आणि त्यांनी आपल्याला परवानगी दिलेली आहे. सन्मा.सदस्यांचा जो प्रस्ताव आहे. त्याला आपण कुठलीही बाधा न येता.

**श्री.चेतन सनकत :-** याच्यामध्ये एक अट टाकुन घ्या की, बांधकाम झाल्यानंतर ऑनलाईन प्रक्रिया राबवुन मागासवर्गीय संस्थेला त्याच्यामध्ये प्राधान्य देण्यात यावे. जेणे करुन महानगरपालिकेला काही तरी मिळेल. महानगरपालिकेकडुन आपण शासनाचे निधी खर्च करुन डायरेक्ट एखादी संस्थेला बांधकाम करुन देऊ शकत नाही. माझ्या मते, शुचिताताईंनी बहिणाबाई जवळ टॉयलेट बांधली होती ती पेंडींग आहे. बंद आहे फक्त याच कारणामुळे डायरेक्ट कोणाला देऊ शकत नाही. ऑनलाईन प्रक्रियेमुळेच ती बंद होती. टेन्डर प्रक्रिया करावी लागते त्याला. डायरेक्ट आपण कोणाला देऊच शकत नाही. ते जर कधी स्वखर्चाने बांधत असतील.तर आपण सुप्रीमला किंवा कोणाला देऊ शकतो. कारण की या ठिकाणी मागासवर्गीय संस्थांना आपण ढावलतो आहे. आणि डायरेक्ट ठराव असा करतो आहे की, त्यांना पण देऊन द्यावे. बांधकाम आपण शासकीय निधी मधुन करत आहोत. किंवा मनपा निधीतुन करत आहोत. आणि एखाद्या कंपनीला आपण ते डायरेक्ट हॅण्ड ओवर करत आहोत. तर कायद्यामध्ये तशी हॅण्ड ओवर करायची तरतुद नाही तिसऱ्या व्यक्तीला, जो खर्च करतो आहे जो बांधतो आहे.त्याला हॅण्ड ओवर करु शकतात. पण शासकीय निधी किंवा मनपा निधी मधुन जर कधी करत असाल तर तुम्ही सुप्रीमला किंवा कोणत्याही संस्थेला हॅण्डओवर करु शकत नाही.

**श्री.उदय पाटील, सहा.आयुक्त (आरोग्य) :-** आदरणीय महापौर, सन्मा.सदस्यांनी जे सांगितले, नक्कीच आपण हा शौचालय कुठल्याही संस्थेला देत नाही. सर्वात पहिले शासन निधीतला आपल्याला जो बांधकाम करायचा आहे त्या जागेवर आपण जाहिर निविदा करणार. जो कोणी ही निविदा प्राप्त करेल. ज्या कोणाला सुप्रीमच्या धरतीवर सर्व अटीशर्ती मान्य राहतील. एक आदर्श एक ए.सी. शौचालय, फी भाड्याने, त्या फी भाडयाचे त्याला अनुभव असेल. असे आपण निविदा मागवु. याच्यातुन ज्याला या अटीशर्ती मान्य असेल त्याला आपण काम देऊ. ते कोणाला द्यायचे आहे हे नंतरचा तो विषय निर्माण होईल. त्याची सुध्दा आम्ही निविदा मागु. आणि त्याचा मेनटेनन्स जो कोणी आपल्याला खात्री पटवेल. त्या संस्थेला आपण देऊ.

**श्री.चेतन सनकत :-** बरोबर, म्हणजे याच्यामध्ये ठराव आपण असा करत आहोत. भाऊ, एक मिनीट उल्लेख करुन घेऊ द्या.आपण ठराव असा करतो आहे की, येथे सुप्रीम इंडस्ट्रीजला देण्याच्या संदर्भातला जो विषय होता तो बाळगडलेला आहे. त्यांना हॅण्डओवर न करता ऑनलाईन प्रक्रिया राबवुन मागासवर्गीय संस्थेंना किंवा कोणत्या संस्थेंना द्यावी. ऑनलाईन प्रक्रियेमध्ये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ओपन टु ऑल, ज्याची निविदा चांगली येईल त्याला देण्यात यईल.

**श्री.चेतन सनकत :-** म्हणजे कोणालाच नाव ठरवुन असे आपण देणार नाही. बांधकामला आपण मान्यता देत आहोत.
**श्री.अनंत जोशी :-** माझे याच्यात म्हणणे काय आहे. बऱ्याच वेळेपासुन चर्चा सुरु आहे. माझ्या लेटरहेडवर मी प्रस्ताव दिलेला असता, अशासकीय प्रस्ताव द्यायचा होता, प्रशासनाकडुन प्रस्ताव द्यायचे म्हटले तर खुप प्रक्रिया करावी लागेल वेळ जाईल आणि आपल्याला आहे घाई. उदय पाटील साहेब म्हणाले, हे सोपे आहे बाकीचे आपण नंतर करु. दुसरा विषय असा मगाशी चर्चा चाललेली आहे. शेवट विषय येथे आला की, सुप्रीमला द्यायचे की नाही. ते मी याच्यासाठी प्रस्ताव दिलेला होता. जे करायचे ते करा माझे काही संबंध नाही त्याच्याशी. ते मला काही देत नाही. मला काही त्याच्यात इंट्रेस्ट नाही. विषय असा आहे की, आजपर्यंत गेल्या अनेक वर्षांमध्ये महापालिकेने फुले मार्केट असेल, बी.जे.मार्केट असेल, येथे जवळचा असेल, कुठलेही असतील,महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बांधलेले टॉयलेट आहे. नंतर त्यांनी निविदा प्रक्रिया राबवुन ते चालवायला दिलेले आहे. २० वर्ष ३० वर्ष काय अवस्था आहे. तुम्ही पाय ठेवु शकत नाही तेथे, महापालिकेने स्वत:च्या खर्चाने बांधलेले आहे .चालवायला दिलेले आहेत. जी प्रक्रिया आहे राबवली गेलेली आहे. तुम्ही मला पाय ठेवुन दाखवा. लोकं प्रत्येक ठिकाणी स्वच्छतागृह महापालिकेचे आहे त्याठिकाणी लोकांना पर्याय नाही म्हणुन लोकं जातात. महिलांना पर्याय नाही म्हणुन महिला जातात.बाहेर येऊन ओकतील ही अवस्था आहे महिलांची. अशी अवस्था चालवायला दिलेले लोकं शौचालयाची करुन ठेवतात. त्याच्यामुळे मी टाकत होता सुप्रीमला, कारण की आज आपण बघतो आहे. सुप्रीमने ३ ऑलरेडी बनविलेले आहे.दोनचे काम सुरु आहे. ५ ते रन करत आहे. आणि ते म्हणजे काय ? सुप्रीम कंपनी थोडी येईल तेथे, ते पोरंच ठेवतात. ते पोरं कोण असतात. ते सगळे याच समाजाचे बांधव असतात ना. आपले त्यांनाच मिळतं. त्याचा रोजगार त्यांनाच मिळत. ती काय सुप्रीम कंपनी चालवत नाही स्वत:हुन उल्टा त्यांचा पैसा जातो त्याच्यामध्ये. आज रामदास कॉलनीमध्ये बांधलेले आणि एम.जे.कॉलेज जवळ बांधलेले. तेथे जे लोकं आहे. त्या पोरांना तेथे रोजचे जे रु.२/-, रु.५/- घेत आहे.त्याच्यामधुन त्यांना रु.१५०/-, रु.२००/- मिळतात. किती रु.१५०/-, रु.२००/- म्हणजे रु.५०००/-, रु.६०००/- मिळत आहे त्यांना. सुप्रीम एका माणसाचे रु.१२०००/- पगार देत आहे तेथे. म्हणजे रु.५०००/-, रु.६०००/- त्या पोरांना मिळत आहे ते आणि रु.१२०००/- पगार आहे तेथे. म्हणजे रु.५०००/-, रु.६०००/- जे त्या पोरांना मिळत ते. आणि रु.१२०००/- पगार म्हणजे एका माणसावर रु.१८०००/- ते रु.२००००/- सुप्रीम खर्च करते. शिवाय रु.५०००/- ते रु.६०००/- त्या सफाईच्या सामानावर. जे काही तेथे साफसफाईला लागतो सामान ते. आणि तिसरा विषय त्याच्यात ए.सी. करतो आहे आपण. सगळं ते हायटेक करत आहोत. सगळे ते सेन्सरवर असतो. ते खराब झाल्यानंतर महापालिका दुरुस्त करेल का ? आपल्या महापालिकेच्या टॉयलेट मध्ये एखादा जर कमोडचे भांडे , तुटले, युरीनलचे भांडे तुटले ते २-२,४-४ महिने बदलले जात नाही. आणि बदलले जरी तर लोकं पाय मारुन तोडतात तेथे. कोण मेनटेन करेल. कोण मेनटेन करेल भाऊ. सुप्रीमच टाकण्याचा उद्देश असा होता. ते लोकं आज खुप सुंदर चालवत आहे. म्हणजे त्यांनी ५०-५० लाख रुपये लावुन बांधले, त्याच्यानंतर रु.२००००/- माणसांना पगार देतात. रु.५०००/-, रु.६०००/- निघतात. रु.१२०००/-, रु.१५०००/- हे देतात. रु.५०००/- ते रु.६०००/- साफ सफाईच्या सामान दर महिन्याला खर्च आहे. शिवाय तुमचा ए.सी. खराब झाला,तुमचा नळ खराब झाला, भांडे खराब झाले. तुमचा सेन्सर खराब झाला, सगळ मेनटेन करतात. माझे एवढे म्हणणे आहे. माझे याच्यात काही रोल नाही. हा महानगरपालिकेचा स्वच्छ भारत अभियान मधला पैसा आहे. माझे काही घेणे देणे नाही. उदय पाटील साहेबांनी सांगितले होते की, शासकीय प्रस्तावाला खुप वेळ जाईल, आपल्याला घाई आहे आपल्याला काम सुरु करायचे आहे. म्हणुन मी ते दिलेले आहे. याच्यावर जे तुम्हाला वाटेल ते करा.
**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे सुप्रीम जे शहरात काम करत आहे, हे त्याचे सी.एस.आर.फंड आहे. त्यांची जबाबदारी आहे. आणि ती जबाबदारी पुर्ण करण्याच्या हिशोबाने मदत करत आहे.
**श्री.अनंत जोशी :-** अहो, या शहरामध्ये या जिल्ह्यामध्ये अनेक कंपन्या आहेत.ज्यांना सी.एस.आर. फंड असतो.कुठल्या कंपन्या करतात कोण येतो. हे बोलु नका, हा माणुस येथे बसलेला आहे. नितीनभाऊ लढ्ढा , सुप्रीमचे जे मॅनेजींग डायरेक्टर आहे ना तापडीया जी, त्यांनी नितीनभाऊंच्या शब्दाला मान देऊन आज ते दिड कोटी, दोन पाच, अडीच कोटी

रुपये शहरामध्ये लावले. फक्त टॉयलेटवर. त्या तापडीयाजींनी फक्त या माणसाच्या शब्दामुळे. हे तेथे सुप्रीम मध्ये मेहनत घेतात. आणि मी महापालिकेत मेहनत घेतो, हे सगळे अधिकारी सांगतील, त्या टॉयलेटसाठी, माझा वार्ड असो नसो, मी मेहनत घेतो. हे महनत घेतात सुप्रीमला. म्हणुन ते दिसत आहे शहरामध्ये, हे बोलणे सोपे आहे. किती कंपन्यांना सी.एस.आर. फंड आहे. या शहरामध्ये या जिल्ह्या मध्ये अनेक कंपन्या मोठमोठया आहे. कोण करतो शहरासाठी. एक जैन जर सोडले आणि आता सुप्रीम, कोणती कंपनी सी.एस.आर.फंड खर्च करते. आहे का तुमच्या शब्दाला किंमत, आणा, कंपन्यांकडे जा तुम्ही कुठल्याही कंपनीकडे जा. आणा २ कोटी ३ कोटी रुपये, देता का तुमच्या शब्दाला किंमत ते. आणि करता का शहरासाठी बोलणे सोपे असते. या गोष्टी करायच्या नाही.

**मा.उपमहापौर :-** सुप्रीमने ज्या शौचालय बांधल्या आहे त्यांनी फक्त बांधल्याच नाही ते वेल मेनटेन पण केलेल्या आहे. ते चांगल्या पध्दतीने करत आहे.

**श्री.चेतन सनकत :-** या विषयाच विषयांतर झालेल आहे.

(सभागृहात एकाच वेळी अनेक सन्मा.सदस्य बोलत असतांना कोण काय बोलले समजत नाही)

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. सुप्रीम इंडस्ट्रीजने चालविण्यास देण्याच्या संदर्भातली प्रस्तावामध्ये जी अट आहे ती वगळण्यात यावी. टॉयलेटचे बांधकाम पुर्ण झाल्यानंतर निविदा ओपन टु ऑलसाठी मागविण्यात याव्या. जी निविदा पात्र होईल. त्याला काम देण्यात याव.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी दिलेल्या सुचनांची प्रशासनाने नोंद घ्यावी. विषय क्र.३९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव जिल्हयातून मोठया प्रमाणात प्रवासी तसेच शहरातील नागरीकांसाठी नविन व जुने बस स्टॅण्ड या ठिकाणी येत असतात. त्यांच्या सुविधे करिता तसेच जळगांव शहरातील स्थानिक नागरीकांकरिता आधुनिक सुलभ स्वच्छता गृह असणे आवश्यक आहे.

तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत शासनामार्फत सामुदायीक शौचालय बांधकाम करणे कामी SBM १.० अंतर्गत रु.४६,०३,६२९/- + SBM २.० अंतर्गत रु.३९,२०,०४०/- असे एकूण रक्कम रु.८५,२३,६६९/- आरोग्य विभागाकडे निधी शिल्लक असून राज्य परिवहन, जळगांव नविन व जुने बस स्टॅण्ड या ठिकाणी मुख्य रस्त्यालगत दर्शनी भागात सामुदायीक / सुलभ शौचालय बांधकाम करता येईल.

त्यासाठी राज्य परिवहन,जळगांव यांना आरोग्य विभागामार्फत जागा मिळणे कामी पत्र देण्यात आलेले आहे. याबाबत संबंधीत अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिलेला असून लवकरच राज्य परिवहन,जळगांव यांचेकडून जागेबाबत परवानगी प्राप्त होईल व प्रत्यक्ष कामाला सुरुवात करता यावी म्हणून राज्य परिवहन,जळगांव हे जागा उपलब्ध करुन देणार असून बांधकामसाठी लागणारा खर्च SBM १.० आणि SBM २.० अंतर्गत प्राप्त निधीतून व आवश्यकता भासल्यास म.न.पा. निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, नविन व जुने बस स्टॅण्ड या ठिकाणी आधुनिक सुलभ स्वच्छता गृह बांधकाम झालेनंतर सदर स्वच्छता गृह चालविणेस / देखभाल व दुरुस्तीसाठी योग्य त्या अटी-शर्तीचा समावेश करुन ऑनलाईन निविदा प्रक्रिया राबवावी व त्यानूसार नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.४० :-** मेहरुण शिवार गट नं.४५४/१अ मधील खुली जागा (ओपन स्पेस) शिवनंदन चॅरिटेबल ट्रस्टला देणेबाबत न्यु पार्वती काळे नगर मधील सर्व स्थानिक रहिवाशांच्या मागणी नुसार सन्मा.सदस्य,श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचेमार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** आमच्या प्रभागामध्ये गट नं.४५४/१अ मधील न्यु पार्वती काळे नगर मध्ये शिवनंदन चॅरिटेबल ट्रस्टला, स्थानिक रहिवाश्यांची ही ट्रस्ट आहे. ते जवळ जवळ ६० ते ६५ जे प्लॉट धारक आहे. त्याच्या सर्वांच्या सह्या झालेले आहे. तर हा ठराव या ठिकाणी आपण मंजुर करावा. या विषयासाठी मी सुचक म्हणुन आहे.

**श्री.चेतन सनकत :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.जितेंद्र मराठे :-** ईबाभाऊ देऊन द्या अनुमोदन.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मेहरुण शिवार गट नं.४५४/१अ न्यू पार्वती काळे नगर मधील सर्व स्थानिक रहिवाशी यांचा सन्मा.सदस्य,श्री.जितेंद्र भगवानराव मराठे यांचे मार्फत मेहरुण शिवार गट नं.४५४/१अ मधील खुली जागा (ओपन स्पेस) शिवनंदन चॅरिटेबल ट्रस्टला देणेबाबत केलेल्या मागणी अर्जानुसार न्यू पार्वती काळे नगरातील रहिवाशी वयोवृध्द, आजोबा महिला, पुरुष, तरुण, तरुणी लहान मुले या सर्वांना आरोग्याच्या दृष्टीने महिलांचा व लहान मुलामुलींचा सर्वांगीण विकास होणेसाठी शिवनन्दन चॅरिटेबल ट्रस्ट नावाची ट्रस्ट स्थापन करीत असल्याने मेहरुण शिवार गट नं.४५४/१अ मधील खुली जागा (ओपन स्पेस) विकसित करणेसाठी शिवनंदन चॅरिटेबल ट्रस्ट यांना मनपा अटीशर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, सदर ओपन स्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिला गेला नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

| | |
|---|---|
| **अनुकूल** | **:- ३१** |
| **सूचक** | **:- मराठे जितेंद्र भगवान** |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** |

**नगरसचिव -विषय क्र.४१ :-** शासकीय निधी अंतर्गत एल.ई.डी पथदिवे लावण्याबाबत व पी.डब्ल्यु.डी. ला ना-हरकत प्रमाणपत्र देणेबाबत मा.सभागृह नेता,श्री.ललित विजयराव कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरात ठिकठिकाणी एल.ई.डी. पथदिवे पी.डब्ल्यु.डी. मार्फत लावण्यात येणार असल्याने खालील नमूद सर्व ठिकाणी पथदिवे लावणे साठी नाहरकत प्रमाणपत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | पिंप्राळा उड्डाण पुलावर एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | ५५,००,०००/- |
| २ | प्र.क्र.३ व ४ मध्ये एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | २५,००,०००/- |
| ३ | प्र.क्र.११ मध्ये एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | २५,००,०००/- |
| ४ | प्र.क्र.१४ मध्ये एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | २५,००,०००/- |
| ५ | प्र.क्र.१९ व ९ मध्ये एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | २५,००,०००/- |
| ६ | प्र.क्र.१६ व ८ मध्ये एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | २५,००,०००/- |

| अ.नं. | प्र.क्र.२ | अ.नं. | प्र.क्र.२ |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानदेव नगर कृष्णा प्रोव्हीजन जवळ | १ | शिवतीर्थ पार्क जवळ मेन चौक |
| २ | सदाशिवनगर दत्त मंदिर मस्कर बुवा च्या घराजवळ | २ | के.एन.एम.पार्क जवळ मेन चौक |
| ३ | सदाशिवनगर सुधीर नारखेडे यांच्या गल्लीत | ३ | समर्थ पार्क नागोरी डेअरी जवळ मेन चौक |
| ४ | गट नंबर ५० श्रीराम नगर अनिता सोनार यांच्या घराजवळ | ४ | बाबा बिल्डींग जवळ मेन चौक |
| ५ | साईगीता नगर गट नंबर १३० विजय पाटील सर यांच्या घरा जवळ ओपन स्पेस | ५ | आथम पार्क मेन चौक जवळ |
| ६ | गट नंबर ८ चेतन राणे यांच्या घराजवळ | ६ | शान भूमी जवळ मेन रोड |
| ७ | जुना खेडी रोड संजय शालिग्राम पाटील यांच्या घराजवळ | ७ | अहिल्याबाई होळकर बगीच्या मध्ये |
| ८ | ग.नंबर ७२ ओपन प्लेस दामू कोल्हेच्या घरासमोर | ८ | मदन किराणा जवळ |
| ९ | सागर नगर किरण पवार यांच्या घराजवळ | ९ | के के यांच्या घराजवळ |
| १० | वसंत दयाराम पाटील योगेश्वर नगर | १० | कंडारे यांच्या घर जवळ |

| अ.नं. | प्र.क्र.१४ | अ.नं. | प्र.क्र.१४ |
|---|---|---|---|
| १ | महाजन नगर | ११ | प्रियंका क्लासेस जवळ महादेव मंदिर |
| २ | गणपती मंदिराजवळ | १२ | व्हि.आय.पी.गल्ली |
| ३ | मंगलपुरी चौक | १३ | दिनेश किराणा जवळ |
| ४ | तुळजामाता नगर | १४ | विश्वकर्मा नगर - २ |
| ५ | सप्तशृंगी मंदिर | १५ | नीलकंठ नगर |
| ६ | हनुमान नगर - २ | १६ | मंगलपुरी मंदिर |
| ७ | जय भवानी शाळेजवळ | १७ | चावरिया बंगला चौक |
| ८ | सुधाकर महाजन यांच्या घराजवळ | १८ | एकनाथ नगर |
| ९ | गजानन महाराज मंदिर | १९ | सरोदेबाई यांच्या घराजवळ |
| १० | रेणुका नगर - २ | २० | एकनाथनगर पाटचारी जवळ |

| अ.नं. | प्र.क्र.११ | अ.नं. | प्र.क्र.११ |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्र.११ मध्ये जागृती हाऊसिंग सोसायटी | ८ | गट नं.१२८ व्यंकटेश नगर |
| २ | रामानंद नगर श्रीराम मंदिर | ९ | अंबिका हाऊसिंग सोसायटी |
| ३ | किसनराव नगर महादेव मंदिराजवळ | १० | डिंगबर सोसायटी |
| ४ | गट नं.११५, ११६, ११७, ११९, ११२, १३४ मध्ये ६ पोल | ११ | विवेकानंद नगर |
| ५ | मुंदडा नगर मध्ये | १२ | हनुमान नगर |
| ६ | शास्त्रीनगर मध्ये | १३ | सी संस्कार कॉलनी मध्ये |
| ७ | जीवन नगर | | |

| अ.नं. | प्र.क्र.१९ | अ.नं. | प्र.क्र.९ |
|---|---|---|---|
| १ | प्र.क्र.१९ कोल्हे बिल्डिंग | १ | गट नं.३० ओपन स्पेस |
| २ | अशोक किराणा | २ | डी.एस.पाटील यांच्या घराजवळ |
| ३ | नागसेन नगर | ३ | गट नं.३४ बेंडाळे नगर ओपन स्पेस |
| ४ | एम.डी.एस.कॉलनी | ४ | स्वामी समर्थ केंद्र निवृत्ती नगर |
| ५ | साईप्रसाद कॉलनी | ५ | व्यसनमुक्ती केंद्र निवृत्ती नगर |
| ६ | गजानन नगर | ६ | गट नं.३१ नरहरी मंदिर ओपन स्पेस |
| ७ | मंगलपुरी | ७ | गट नं.२८ धनंजय पाटील यांच्या घराजवळ |
| ८ | शांतिनारायण नगर | ८ | जे.डी.सी.सी.बँक ओपन स्पेस गट नं.३४८ |
| ९ | पाटणा देवी | ९ | ओंक्षणी नगर ओपन स्पेस गोशाळा |
| १० | यशोदा नगर | १० | बढे मॅडम यांच्या घराजवळ |
| | | | निमंडी शाळा पिंप्राळा |

| अ.नं. | प्र.क्र.१६ |
|---|---|
| १ | नानीबाई शाळा |
| २ | लाठी शाळा |
| ३ | लक्ष्मी नगर |
| ४ | जोशी कॉलनी |
| ५ | सम्राट कॉलनी - २ |
| ६ | सम्राट कॉलनी मळया जवळ |
| ७ | सालार नगर मज्जीद जवळ |
| ८ | टॉवर बिल्डिंग जवळ |
| ९ | हॉटेल मिनार जवळ |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४२ :-** शासनाच्या व जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२३-२४ च्या निधीतुन प्रभाग क्रं.०९ मध्ये १ ते ६ कामे करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.प्रतिभा गजानन देशमुख यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासनाच्या व जिल्हा नियोजन मंडळांतर्गत येणाऱ्या वार्षिक योजनेच्या सन २०२३-२४ च्या निधीतुन प्रभाग क्रं.०९ मध्ये खालील नमूद अ.क्र. १ ते ६ कामे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.२९ मुक्ताई नगर ओपनस्पेसला चैनलींग फेंसीग सामाजिक सभागृह बांधणे. | ३५ लक्ष |
| २ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत विविध भागात कॉंक्रीटी गटारी व स्लॅब कल्व्हेट टाकणे. | १ कोटी |
| ३ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.२८,२९,३० सामाईक रस्ता कॉंक्रीटी करण करणे. | १ कोटी |
| ४ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत गट नं.३७/१, गट नं.३१, गट नं.२४, गट नं.२९ मध्ये ओपनस्पेस मध्ये चैनलींग फेंसीग पेव्हर ब्लॉक बसविणे. | १ कोटी |
| ५ | प्रभाग क्रं.०९ अंतर्गत विविध ठिकाणी डांबरी रस्ते तयार करणे. | १.५० कोटी |
| ६ | प्रभाग क्रं.०९ गट नं.२८९,२९० भिकमचंद जैन नगर मधील म्हाडा कॉलनी समोरील ओपन स्पेस मध्ये सामाजिक सभागृह बांधणे व पेव्हर ब्लॉक बसविणे. | २० लक्ष |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४३ :-** प्रभाग क्रं.१४ मधील सर्व्हे नं.४३४/१ अ प्लॉट नं.१७ मधील ओपन स्पेस विकसित करणे कामी मिळणेबाबत अध्यक्ष,मध्यवर्ती गणपती नगर बहुउद्देशीय संस्था यांचा सन्मा.सदस्या,श्रीमती रेखा चुडामण पाटील व सन्मा.सदस्या, सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांचे मार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, गणपती नगर येथील रहिवाशी प्रभाग क्रं.१४ मेहरुण सर्व्हे नं.४३४/१ अ प्लॉट नं.१७ मध्ये सार्वजनिक उत्सव साजरे करित असतात व हया जागेची साफ-सफाई व देखरेख करित असतात व सर्व रहिवाशी मिळुन स्वखर्चाने ही जागा विकसीत करण्यास तयार असल्याने अध्यक्ष,मध्यवर्तीय गणपती नगर बहुउद्देशीय संस्था यांचा प्रभाग क्रं.१४ मधील सन्मा.सदस्या,श्रीमती रेखा चुडामण पाटील व सन्मा.सदस्या, सौ.सुरेखा सुदाम सोनवणे यांचे मार्फत सदर जागा मिळणेबाबत आलेल्या विनंती अर्जानुसार प्रभाग क्रं.१४ मधील सर्व्हे नं.४३४/१ अ प्लॉट नं.१७ मधील ओपन स्पेस स्वखर्चाने विकसित करणे कामी अध्यक्ष,मध्यवर्तीय गणपती नगर बहुउद्देशीय संस्था,जळगांव यांना मनपा अटीशर्तीस बंधनकारक राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, सदर ओपन स्पेस यापूर्वी कोणत्याही संस्थेस दिला गेला नसल्याबाबतची खात्री करुनच नियमाप्रमाणे पूढील कार्यवाही करावी.

प्रशासनाने, सभागृहात झालेली चर्चा व सदस्यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४४ :-** खॉजानगर पिंप्राळा येथील सिटी सर्व्हे नं.२१४/३ शादी हॉल देखभाल करणे करीता दत्तक देणेबाबत अध्यक्ष, महेश्वर वेलफेअर एज्युकेशन सोसायटी,जळगांव यांचा सन्मा.सदस्या, हसीना बी शरीफ शेख यांचे मार्फत आलेल्या अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** भाऊ, या हॉलचा विषय असा आहे, मी परिस्थिती सांगत आहे तेथील, तो दोघांचा वाद आहे मला त्याची कल्पना आहे. परंतु त्या ठिकाणी आज जर आपण त्या हॉलची परिस्थिती पाहिली. या ठिकाणी अक्षरश: अवैध धंदे चालत आहे भाऊ. आणि या हॉलमुळे ज्या भानगडी झाल्या आहे. त्या भानगडीचे रुपांतर दंग्यामध्ये झाले होते. जे आपण मागच्या काळात पाहिलेले आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करायला काही हरकत नाही.

**मा.उपमहापौर :-** आपण ज्या संस्थेला देतो आहे ती संस्था दोघांशी संबंधीत नाही. ही जी संस्था आहे ती मुस्लीम कम्युनिटीची संस्था आहे, त्या परिसरात काम करणारी संस्था आहे. तो जो शादी हॉल आहे आज आपण आज जर त्याची परिस्थिती पाहिली तर अतिशय दयनिय झालेली आहे. त्या ठिकाणी ते स्वखर्चाने करणार आहे. स्वखर्चाने करुन

**श्री.ईब्राहिम पटेल :-** त्या जाकीरने तेथे पाठपुरावा करुन तो हॉल बांधलेला आहे.

**मा.उपमहापौर :-** मग देखभाल दुरुस्ती पण करायला पाहिजे होती ना. लक्ष ठेवल पाहिजे, मेनटेन ठेवल पाहिजे की, तेथे अवैध धंदे होणार नाही. तेथे सट्टे पत्ते चालणार नाही. ते त्यांनी लक्ष द्यायला पाहिजे होते नाही. त्यांनी मेनटेन ठेवायला पाहिजे होती. त्या ठिकाणी संध्याकाळी अक्षरश: महिला जाऊ शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ज्यांचा प्रस्ताव आहे तेच नाही येथे सभागृहात. ज्यांचा प्रस्ताव आहे तेच नाही.

**मा.उपमहापौर :-** मंजुर करा भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तहकुब करुन टाका.

**श्री.सुनिल महाजन :-** अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सुचक नाही, अनुमोदक नाही, तहकुब करा तहकुब

**मा.महापौर :-** विषय क्र.४४ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११९५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे खॉजानगर पिंप्राळा येथील सिटी सर्व्हे नं.२१४/३ शादी हॉल देखभाल करणे करीता दत्तक देणेबाबत अध्यक्ष, महेशर वेलफेअर एज्युकेशन सोसायटी,जळगांव यांचा सन्मा.सदस्या, हसीना बी शरीफ शेख यांचे मार्फतआलेला प्रस्ताव तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडु**

**नगरसचिव -विषय क्र.४५ :-** प्रभाग क्रं.२ अंतर्गत गट नं.३४४ संजु किराणा पासुन गट नं.४१४ के.जी.एन पार्क निसार भाई गॅरेज ते मोठा नाला पर्यंत मोठी आर.सी.सी.गटार मनपा निधी अंतर्गत बांधणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्या,सौ.भारती कैलास सोनवणे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ११९६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रं.२ मध्ये नागरीकांच्या मागणी नुसार विकास काम करणे आवश्यक असल्याने प्रभाग क्रं.२ अंतर्गत गट नं.३४४ संजु किराणा पासुन गट नं.४१४ के.जी.एन पार्क निसार भाई गॅरेज ते मोठा नाला पर्यंत मोठी आर.सी.सी.गटार बांधणेस व याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.९० लक्ष मात्र खर्च मनपा निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४६ :-** प्रभाग क्रं.८ मधील विविध १ ते १० कामे करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.मनोज सुरेश चौधरी यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रं.८ मधील खालील नमूद विविध १ ते १० कामे करणेस व याकामी येणाऱ्या अंदाजित रक्कम रु.४,३५,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | विकास कामे | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | खोटे नगर परिसरातील रस्ते काँक्रीट करणे. | ३०,००,०००/- |
| २ | गट नं.१०२/२ निमखेडी शिवार जिवराम नगर मधील रस्ते काँक्रीट करणे. | ६०,००,०००/- |
| ३ | गट नं.१०३ धनश्रीनगर निमखेडी शिवार रस्ते डांबरीकरण करणे. | ५०,००,०००/- |
| ४ | शुभम नगर, छत्रपती संभाजी राजे कॉलनी गट नं.७६७ व ७७२, ७६७ या परिसरातील आर.सी.सी. गटारी बांधणे (आव्हाणे शिवार) | ३०,००,०००/- |
| ५ | गट नं.१११ व ११२ निमखेडी शिवार परिसरातील आर.सी.सी.गटारी बांधणे. | ३०,००,०००/- |
| ६ | गट नं.१२२/२/१, १२२/२/२, १२२/२/३ वैष्णवी पार्क मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ८०,००,०००/- |
| ७ | गट नं.३१६/६ श्री संत सावतानगर परिसरातील रस्ते खडीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| ८ | गट नं.७६५/२, ७६५ शुभमनगर आव्हाणे शिवार परिसरातील रस्ते खडीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| ९ | निमखेडी शिवार गुजराल पेट्रोल पंपापासुन जुना हायवे निमखेडी शिवार पर्यंत जाणारा रस्ता डांबरीकरण करणे. | ७०,००,०००/- |
| १० | गट नं.१०५ श्रीराम समर्थ कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे. | २५,००,०००/- |
| | एकूण रक्कम :- | ४,३५,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४७ :-** प्रभाग क्र.१४ अंतर्गत विविध ०१ ते ०५ कामे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी,जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत व ०२ कामे मनपा निधी अंतर्गत करणेस मान्यता मिळणेबाबत सन्मा.सदस्य,श्री.राजेंद्र झिपरु पाटील यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. यापुढे ओपनस्पेसचे जे काही प्रस्ताव येतील ते प्रशासकीय डॉकेटसहच येतील. त्यामुळे मागच्या मिटींगला मंजुर झाले होते. असे कोणीही न सांगता, डायरेक्ट प्रशासनाकडुन डॉकेट यायला पाहिजे अशी सुचना देण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग क्र.१४ मधील नागरिकांना विविध सोयी सुविधा पुरविणे तसेच रहदारी व वाहतुकीच्या सेवा पुरविणे कामी करुन घेणे गरजेचे असून याबाबत सदर परिसरातील नागरिकांकडून सदर कामे लवकरात लवकर करणेबाबत सतत मागणी होत असल्यामुळे प्रभाग क्र.१४ अंतर्गत खालील नमूद अ.नं.०१ ते ०५ कामे शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत व अ.नं.०६ व ०७ मध्ये नमूद कामे मनपा निधी अंतर्गत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील मेहरुण सर्वे नं.२६७/६ अ, ६ब मधील रस्ते काँक्रीटीकरण करणे. | १८,००,०००/- |
| २ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील रामेश्वर कॉलनीतील हनुमान नगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | ३८,००,०००/- |
| ३ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील गणपतीनगर LIC कॉलनी, पायोनिअर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | ३०,००,०००/- |
| ४ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत गणपती नगर प्रभाग क्र.१४ व प्रभाग क्र.१२ चे सीमेवरील रस्ता डांबरीकरण करणे. | २५,००,०००/- |
| ५ | शासनाकडून प्राप्त होणाऱ्या विविध निधी, जिल्हा नियोजन समिती निधी अथवा मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१४ मधील मधील गायत्री नगरातील गायत्री मंदिरासमोरील व परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | १५,००,०००/- |
| ६ | प्रभाग क्र.१४ मधील गणपती नगर इच्छापूर्ती मंदिराला लागून असलेली गटार मनपा निधी अंतर्गत बांधणे. | ५,००,०००/- |
| ७ | प्रभाग क्र.१४ मधील रामेश्वर कॉलनीतील हनुमान नगर परिसरातील गटार मनपा निधी अंतर्गत बांधणे. | ३,००,०००/- |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४८ :-** केंद्र शासनाच्या अमृत २.० अभियाना अंतर्गत मलनि:स्सारण योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार कामे करणेसाठी सल्लागार फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांची नियुक्ती करणे व प्राप्त दरानुसार पर्यायी खर्चास, संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, काही बोलायचे आहे आपल्याला,

**सौ.शुचिता हाडा :-** जळगांव शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असे मलनि:स्सारण प्रकल्प आणि त्याच डॉकेट अत्यंत शॉर्ट पध्दतीने आणण्यात आलेल आहे. त्याच्यामुळे बऱ्याच गोष्टीची स्पष्टता येथे दिसुन येत नाही. प्रकल्प अभियंतांनी यावर उत्तर द्यावे येथे. अजुन काही गोष्टी क्लियर होतील. बोरोले साहेब तुम्ही येथे डॉकेटमध्ये असे म्हटलेले आहे. ९ जुन २०२३ ला तुम्ही मेल केले सात एजन्सीजला, बरोबर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरोबर.

**सौ.शुचिता हाडा :-** आणि त्या ७ पैकी यांनी तुम्हाला रिप्लाय दिला, यांना काम देण्यासंदर्भातला प्रशासनाने प्रस्ताव आणला.यांना जो मेल केलेला आहे तुम्ही. त्या मेलचा जो काही ड्राफ्ट तयार करण्यात आला तो ड्राफ्ट कोणी तयार केला. प्रकल्प अभियंता म्हणुन आपण तयार केला.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** सर्वांची चर्चा झालेली होती, आयुक्त मॅडम, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांच्याशी सर्वांशी चर्चा झालेली होती. आणि त्या चर्चेनुसार तो ड्राफ्ट तयार करुन तो पाठविण्यात आला.

**सौ.शुचिता हाडा :-** तुमच्या डॉकेट मध्ये, टिप्पणी मध्ये आहे का ? असे काही आहे का ? चर्चा झाल्या, ड्राफ्टचा मसुदा ठरला. असे काही आहे का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही. टिप्पणी मध्ये नाही. पण तो समक्ष ठरलेले होते. त्याच्यानुसारच ड्राफ्ट तयार केला.

**सौ.शुचिता हाडा :-** कारण मला तुमच्या या डॉकेटमध्ये कुठल्याही टिप्पण्या दिसुन आले नाही. इतका महत्वाचा आणि इतका मोठा विषय आहे हा. सभागृहाचे लक्षवेधु ईच्छिते मी या विषयाकडे. आयुक्त महोदया हे जवळपास १३४२ कोटींचा प्रकल्प असल्याचे येथे म्हटले जात आहे. ५ वर्ष देखभाल आणि दुरुस्तीसाठी व्यवस्थापन सल्लागार म्हणुन आपण नियुक्ती करणार आहोत.याचे आपण मेल पाठविले हा विषय महासभेसमोर आला होता का ? जसे पाणी पुरवठयाचा विषय तुम्ही महासभेसमोर आणला. मलनि:स्सारणच विषय महासभेसमोर का नाही आणला. बरं यांचा जो डॉकेट आहे तो सुध्दा ऐवढाच आहे. मलनि:स्सारण बद्दलच. त्याच्यामध्ये सुध्दा कोणताही ओहापोह नाही. तुम्ही ९ जुन २०२३ ला मेल केलेला आहे. ७ एजन्सीजला मेल केले. काय रिप्लाय आले त्यांचे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ७ एजन्सीज पैकी ३ च एजन्सीजने रिप्लाय दिले. त्याच्यामध्ये पण यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन यांनी ऑफर दिलेली आहे. आणि बाकीचे जे दोन होते त्याच्यापैकी एकाने काही दिवसाची मुदत मागितली होती. आणि दुसरे जे आहे त्यांना त्या अटीशर्ती मान्य नव्हत्या. ते म्हणाले की, अटीशर्तीत बदल करा. त्याच्यानंतर आपण पाहु.

**सौ.शुचिता हाडा :-** याच्यावर तुमची चर्चा झाली, टिप्पणी झाली, टिप्पणी आहे का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही, चर्चा झाली होती.

**सौ.शुचिता हाडा :-** काहीच टिप्पणी नाही तुमच्याजवळ.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** टिप्पणी झाली होती. आम्ही प्रस्ताव मागितले. समक्ष सर्वांचे निविदा समितीकडे ठेवले होते. त्याच्यानंतर प्रस्ताव मागितले. त्याच्यानंतर त्याच्यावर टिप्पणी लिहली. टिप्पणीवरती सर्वांचे शेरे झाले. त्यानंतरच प्रस्ताव केले.

**सौ.शुचिता हाडा :-** सभागृहाच्या मी निदर्शनात आणुन देते. महापौरताई, ९ तारखेला मेल करण्यात आलेले आहे ७ एजन्सीजला. शुक्रवारी. मेल किती वाजेला केलेले आहे आपण.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** तसे पाहिले मॅडम तर हे मेल ८ तारखेलाच केलेले होते.

**सौ.शुचिता हाडा :-** ८ तारखेला जो मेल केलेला आहे तो तुम्ही गृहीत धरु शकतात का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो धरु शकतो ना मॅडम.

**सौ.शुचिता हाडा :-** त्याच्यात तुम्ही सेवरेजच उल्लेख नाही केलेले तुम्ही वॉटर सप्लाय केलेले आहे फक्त

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही. त्याच्यामध्ये सेवरेज पण आहे ताई. पण एका ठिकाणी फक्त वॉटर सप्लाय आल्याने मी पुन्हा मेल केले त्यांना.

**सौ.शुचिता हाडा :-** पण त्या ई-मेल मध्ये आपल्या मागच्या ई-मेल मध्ये काही चुकलेले आहे असे काहीच उल्लेख नाही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही आपण तो करेक्ट करुन दिल त्यांना.

**सौ.शुचिता हाडा :-** करेक्ट करुन दिल. म्हणजे ९ तारखेला तुम्ही मेल केलेल आहे. ठिक आहे तुमच ८ तारखेचं जरी मेल बघितले. तो मेल सुध्दा संध्याकाळी ०७.०३ वा. केलेला आहे ८ तारखेचा मेल. ९ तारखेचा मेल तुम्ही केलेला आहे. दुपारी १२.०४ वा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो,

**सौ.शुचिता हाडा :-** शुक्रवारचा दिवस होता शनिवार रविवार सुट्टीच दिवस आहे. मग किती वर्कींग डेज मिळाले या लोकांना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** आपण ५ दिवस दिले.

**सौ.शुचिता हाडा :-** ५ दिवस दिले.२ दिवस मिळाले त्यांना. २ दिवस सुट्टीचे होते. तुम्ही संध्याकाळी मेल केलेले आहे त्यांना.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो.

**सौ.शुचिता हाडा :-** मग जर कोणी तुम्हाला मागणी करत आहे. मला मुदत द्या. आम्ही इनट्रेस्टेड आहोत.आपण का नाही मुदत दिली. मलनि:स्सारण हा विषय खुप वर्षापासुनच पेंडींग आहे आपल्याकडे आताच प्रशासनाला याची इतकी काय घाई झाली होती की, ५ दिवसात याचा निर्णय करुन डॉकेट करुन याला द्यायचे असे ठरविले.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** तसे काही नाही मॅडम. ७ लोकांना आपण एकाच वेळी मेल केलेले आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** ७ लोकांना तुम्ही मेल केले. हे सभागृहाला ज्ञात झाले, ३ लोकांनी रिप्लाय दिले. एकाने अटीशर्तीत बदल मागितले, एकाने मुदत मागितली. तुमच्या टिप्पण्यांमध्ये नाही कोणताही त्याच्या बद्दल उल्लेख.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** या तीन लोकांबद्दल आमची चर्चा झाली होती.

**सौ.शुचिता हाडा :-** सगळे तोंडी चाललेले आहे, ऐवढया मोठया प्रोजेक्ट बद्दल सगळ तोंडी चाललेले आहे महापौरताई. बरं आता मला पुढच सांगा, काय रेट दिले त्याने.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** रेट त्यांनी दिले की, अपेंडीक्स मध्ये जे रेट दिलेले आहे त्याप्रमाणे महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाने त्याच्यावरती दिलेल्या रेटप्रमाणे त्यांनी करुन दिलेले आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** तुम्ही आता येथे जे दिलेले आहे प्रिंट आऊट मध्ये We are ready to provide services on charges approved by empanelment order dt.०८/०४/२०२३. दि.०८/०४/२०२३ ची ऑर्डर कोणती आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाची empanelment order.

**सौ.शुचिता हाडा :-** empanelment तर त्यांचे आधीचेच झालेले आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो.

**सौ.शुचिता हाडा :-** ती तर १६ सप्टेंबरची ऑर्डर आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही, १६ सप्टेंबरचा महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय आहे. शासन परिपत्रकाचा जो उल्लेख आहे येथे. दि.०८/०४/२०२१ चे जे empanelment आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** २०२३ म्हटले आहे येथे. त्यांच्या पत्रामध्ये २०२३ उल्लेख आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** २०२३ नाही, दि.०८/०४/२०२१ ची आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** त्यांच्या पत्रातील उल्लेख बद्दल सांगा आम्हाला. त्यांच्या पत्रानुसार दि.०८/०४/२०२३ नुसार आम्ही दर देत आहोत. दि.०८/०४/२०२३ च पत्र दाखवा आम्हाला. कोणती empanelment केली दाखवा आम्हाला.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** नाही, दि.०८/०४/२०२१ म्हटलेले आहे येथे.

**सौ.शुचिता हाडा :-** त्यांचे पत्र माझ्या हातात आहे. ही झेरॉक्स काढुन तुम्हीच मला दिलेली आहे बोरोले साहेब. तुमच्याच ऑफिस मधील प्रिंटआऊट आहे ही.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो बरोबर आहे परंतु त्याच पत्रामध्ये वरच्या साईडला म्हटलेले आहे. जी empanelment ची जी ऑर्डर आहे. त्याची दि.०८/०४/२०२१ ची तारीख त्यांनी वर दिलेली आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** दि.०८/०४/२०२१ त्यांनी दिलेली आहे empanelment बद्दल की, We are ready to provide services on charges म्हणजे दर on charges approved by empanelment order dt.०८/०४/२०२३. एक्सप्लेन करा मला दि.०८/०४/२०२३.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** दि.०८/०४/२०२३ नाही मॅडम दि.०८/०४/२०२१ चीच ऑर्डर आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** हे तुमच्या कोणाच्या लक्षातच आले नव्हते का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** त्यांनी क्लियर केले ना आपल्याला नंतर.

**सौ.शुचिता हाडा :-** कुठे ? त्यांनी क्लियर केलेले तुम्ही काही घेतले का रेकॉर्डवर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** दि.०८/०४/२०२१ लाच त्यांची empanelment झालेली आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** रेकॉर्डवर घेतले का तुमच्या पहिल्या पत्रामध्ये वॉटर सप्लाय येते वॉटर सेवेजच्या ऐवजी. त्यांच्या उत्तरामध्ये येथे तारीख चुकवतात. रेकॉर्डवर काय घेतले तुम्ही हे सगळे तोंडी कारभार चाललेले आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-**आपल्या रेकॉर्डवर empanelment च्या पत्रानुसारच कळविलेले होते.

**सौ.शुचिता हाडा :-** कळवले होते, पण त्यांनी उत्तर देतांना चुकवले ना काही तरी. हे सगळ माझे महापौरताई स्पष्ट आरोप आहे की, या एजन्सीला हे काम देण्यासाठी प्रशासनाने हा थाट घातला. ७ एजन्सींना मेल केले. शॉर्टटर्म दिला. कोणी जरी मुद्दत मागत आहे. मुदत नाही दिली. आणि कोणत्याही गोष्टीचे लेखी घेतलेले नाही रेकॉर्डवर. दोन वर्कींगडेस मध्ये यांच्याकडुन सगळे डॉक्युमेंटस आले. प्रशासनाने प्रस्ताव डायरेक्टली स्टँडींगच्या याच्यावर टाकुन दिले. पाणी पुरवठेच्या वेळेस आपण याबद्दल मेल केले होते का ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** पाणी पुरवठेच्या वेळेस पण मेल केले होते मॅडम.

**सौ.शुचिता हाडा :-** मेल केलेले होते, दर मागविले होते, प्रिझेन्टेशनला बोलविले होते. पाणीपुरवठेच्या वेळेला लोकप्रतिनिधींचा सहभाग तुम्ही नोंदवुन घेतला होता. या वेळेस महापौर, उपमहापौर आपल्याशी झाली का या विषयाबाबत काही चर्चा. असे मेल केलेले आहे ९ जुन ला. त्यांचे असे रिप्लाय आलेले आहे. आणि आता यांचे काम करण्याचे ठराव ठेवतो आहे, डॉकेट ठेवतो आहे. अशी काही चर्चा झाली का? कोणत्या गटनेत्यांना बोलविले का ? कोणासोबत झ ाली या संबंधीत चर्चा. हे सगळे संशयास्पद आहे. एवढे मोठे काम चाललेले आहे देण्याचे.प्रशासकीय थाट घातला जातो आहे. फेअर कॉम्पीटीशन येथे झालेले नाही असे माझे स्पष्ट आरोप आहे. आयुक्त महोदया आपण उत्तर द्यावे. फेअर कॉम्पीटीशन दाखवा मला याच्यातली. एजन्सी जर तुम्हाला मुदतवाढ मागत आहे.

**मा.आयुक्त :-** तसे काही नाही. शासनाचा जो जी.आर.होता. त्याच्यामध्ये स्पष्ट म्हटलेले होते. एकतर तुम्ही एम.जी.पी.ला द्या किंवा आम्ही इमपॅनलमेंट केलेल्या एजन्सी आहे त्यांना द्या किंवा तुम्ही टेन्डर करा. त्याअनुषंगाने वाटर सप्लायचा अनुभव बघता आपण त्या एजन्सीला पाठविलेले होते. एजन्सीजला मेल पाठविले, त्यांना वेळ दिली. त्या अनुषंगाने मागच्या वेळेस आपल्याला जे अनुभव आलेले होते वॉटर सप्लायच्या वेळेस. ॲग्रीमेंटवर पहिले ऑडीट ऑबजेक्शन घेतले होते की, ॲग्रीमेंट आम्हाला नंतर मिळाल, आम्हाला कळत नाही तुमची टर्मस ॲण्ड कन्डीशन काय आहे. त्यामुळे यावेळेस ॲग्रीमेंट दिलं. प्लस आम्ही हा मुद्दा टाकला की, कोणी जर एस.पी.केलेला असेल. पण तो चालत असल्याचे आम्हाला एक्सपीरियंस सर्टीफिकेट पाहिजे. हे दोन मुद्दे ॲड करुन आम्ही त्या इमपॅनलम एजन्सीजला मेल केलेला आहे. त्यानुसार ते आलेले आहे आणि त्या अनुषंगाने इमपॅनलमेंटमध्ये जे जमा केलेले आहे आम्ही तेच ग्राहय धरावे. असे म्हणुन मी दिली मान्यता, त्यानुसार आम्ही सादर केलेला आहे. आणि त्या अनुषंगाने प्रस्ताव आहे. माझे असे म्हणणे आहे की, या सगळे आरोपांना काही तथ्य नाही. कोणाला काही तरी करण्यासाठी म्हणुन हे केलेले आहे खटाटोप. या आरोपाला काही तथ्य नाही. ठराव अत्यंत पारदर्शकपणे मा.निविदा समिती जी असते मु.ले.अ., मु.ले.प., सिटी इंजिनिअर, प्रकल्प अधिकारी, सी.एल.ए. यांची सगळयांशी एकत्रीत चर्चा करुन हे मेल केलेले आहेत. निर्णय घेतलेले आहे. अत्यंत पारदर्शक पध्दतीने काम झालेले आहे. त्यामुळे जनरल बॉडी समोर ठराव आहे. त्यांनी निर्णय घ्यावा.

**सौ.शुचिता हाडा :-** तुमच्या टिप्पण्यांमधुन दिसुन येत नाही मॅडम, सगळे हे ओरलीच चाललेले आहे. एवढया मोठया प्रोजेक्टचे काम ओरली चालणार आहे का प्रशासकीय लेव्हलवर. कोणती फेअर कॉम्पीटीशन आहे. तुम्हाला एखादी

एजन्सी जर मुदत मागत आहे. का मुदत नाही दिली तुम्ही. का मुदत नाकारण्यात आली. नाकारण्यात पण नाही आली. काहीच कळविण्यात पण नाही आले. त्याच्यावर काहीच कम्युनिकेशन पण नाही. कोणतेच कम्युनिकेशन नाही. फेअर कॅम्पीटीशन का होऊ दिली नाही. कोणतीच फेअर कॅम्पीटीशन होऊ दिलेली नाही. हा सगळा बनाव येथे झालेला आहे. अत्यंत तोटक पध्दतीने डॉकेट आणण्यात आलेला आहे. याच्यात अजुन एक महत्वाचा मुद्दा आहे. तुमच्या अनुसुची मध्ये तुम्ही जे म्हणत आहे बोरोले साहेब. त्याच्यातल्या याच्यानुसार दर घेणार. बरोबर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हो.

**सौ.शुचिता हाडा :-** तुमच मेल काय ? त्या ७ ही एजन्सीजला तुम्ही जे केले मेल. इमपॅनलमेंट सुचीनुसार तुम्ही दर स्विकारणार हे तुमचं ठरलेले होते प्रशासकीय लेव्हलवर.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** बरोबर.

**सौ.शुचिता हाडा :-** पण तुमच्या मेल मध्ये. Submit your offer excluding GST असे का मेन्शन केलेले आहे तुम्ही. तुमच्या ॲनेक्चरवर सगळयात वरतीच हेडींगवरच लिहलेले आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** प्रत्येक व्यक्ती हा आपल्याला GST इनक्ल्युड करुन टाकत नाही. आता ही जी ऑफर आहे. आता अपेन्डीक्स मध्ये यांची ऑफर जी आहे ती याच्यानुसार इन्क्ल्युडींग GST आहे.पण काही काही लोक एक्सक्ल्युडींग GST सबमीट करतात. त्यामुळे सगळयांना कॉमन द्याव्या. आपण हे ७ लोकांना दिलेले होते. सगळयांना आम्ही असेच सांगितले की तुमचे दर जे आहे ते एक्सक्ल्युडींग GST द्या.

**सौ.शुचिता हाडा :-** तुम्ही जर दर या इमपॅनलमेंटनुसारच मागवत आहे. या ॲनेक्चरनुसार मागवत आहे. तर वेगळे दर तुम्ही का मागवले. जसे तुम्ही पाणी पुरवठयाचे सांगत आहात.शाह वाल्याच १.२० होता, यश वाल्याच २.४० होता. तर याचे काहीच सांगितले नाही तुम्ही की, याचे काय दर आहे.

**मा.आयुक्त :-** कृपया जनरल बॉडीची दिशाभुल करण्यात येऊ नये. मी पुन्हा पुन्हा सांगते. एम.जी.पी.च्या पत्रामध्ये क्लिअरकट म्हटलेले होते. ३% पर्यंत तुम्ही दर मागवु शकतात. परंतु एखाद्या एजन्सीला देतांना हा बायसपणा येऊ नये म्हणुन आम्ही स्पेसिफिकली दर मागवले, जब की आपण ३% पर्यंत देऊ शकतो. मी याच्या आदी ही वॉटर सप्लायच्या वेळेस एक्सप्लेनेशन दिलेले आहे. पण एखाद्या एजन्सीला देतांना तिलाच का सिलेक्ट केले. हे आरोप होऊ नये म्हणुन आपण दर मागविलेले आहे.

**सौ.शुचिता हाडा :-** आयुक्त महोदया, तेच विचारत आहे मी की, या एजन्सीला का सिलेक्ट केले, याचे दर सांगा. कारण याच्या सोबत तर कॉम्पीटीशन होऊच दिलेले नाही. अबाऊच्या पुढे आपण जाऊच शकत नाही. बिलो ३% ने काम करायचे आहे. पाणी पुरवठयाला पण तुम्ही हाच रेशो लावला की, ३% च्या आत मध्ये कोण आम्हाला कमीतकमी मध्ये करुन देत आहे. याच्यात तुम्हे फेअर कॉम्पीटीशनच होऊ दिले नाही. याचे दर सांगा. १.४०% मध्ये करणार का हा ? १.३०% मध्ये करणार का हा ?

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** हा प्रकल्प अहवाल जेव्हा होईल. त्याचे हे दर या अपरेंडीक्स मध्ये दिलेले आहे. त्याच प्रमाणे तो करेल.

**सौ.शुचिता हाडा :-** काय दर आहे तुमचा तो प्रशासनाचा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** उरलेल्या ९०० ते १००० कोटीचे उरलेल्या ३ झोनचे काम द्यायचे.

**सौ.शुचिता हाडा :-** मग आम्हाला साद्या भाषेत सांगा. ९०० ते १००० कोटीला गेले तर आपल्याला काय दर लागणार आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ०.७४%

**श्री.नितीन लढ्ढा :-** ०.७४%

**सौ.शुचिता हाडा :-** आकड्यांमध्ये सांगा. या परसेंटेज मध्ये काही होणार नाही. आकडयांमध्ये सांगा.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** ०.७४%

**सौ.शुचिता हाडा :-** आकड्यांमध्ये सांगा किती रक्कम.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** त्याचे कॅलक्युलेशन जर आपण केले तर ७ कोटी ४० लाखाचे ते काम होते.

**सौ.शुचिता हाडा :-** ७ कोटी ४० लाखाचा काम नितीनभाऊ आपण जेव्हा देतो आहे. एवढा मोठा विषय जेव्हा सभेसमोर येतो आहे. तेव्हा डिटेल डॉकेट असायला नको का ? सगळी त्यांची ओरल चर्चा आहे. जे फक्त त्यांना माहिती आहे. ते कागदावर कुठेच नाही. सभागृहाला जर या पध्दतीने करायचे असेल मान्य.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, जर कधी इमपॅनलमेंट मध्ये असलेले जे काही कन्सलटन्टचे पॅनल असेल, त्याच्या मध्ये ३% पर्यंत देण्याची मुभा शासनाने दिलेली आहे. आणि आपल्या त्याच्यातुन एखाद्याला सिलेक्ट केले असते. आणि डायरेक्टली त्याला दिले असते काम तर ते कुठेतरी संशयास्पद वाटल असत.

**सौ.शुचिता हाडा :-** नितीनभाऊ फेअर कॅम्पीटीशन त्या ७ लोकांमध्ये होऊ दिले असते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मागविले ना. ज्यांचे ज्यांचे दर आले.

**सौ.शुचिता हाडा :-** मागविले पण मुदत म्हणुन २ च दिवस दिले. बाकी सगळ शिजलेले होते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** काय आहे ताई. त्याच्यातुन प्रतिसाद मिळालेले दिसुन येत नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** बोरोले साहेब, आम्हाला मुदत द्या असे त्या एजन्सीने म्हटले आहे ना. बर त्याच्यामध्ये याचे काहीच ओहापोह नाही.काहीच टिप्पणी नाही. हे ओरली ठरवुन टाकले सर्व.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही, त्यालाही मुदत दिली. त्यानी १० दिवसाचा कालावधी मागितला, प्रॉब्लम काय होता की, आपण बघतो साधारणता प्रत्येक वेळेला काही ना काही कारणाने या पध्दतीने विषय लांबत जातात.

**सौ.शुचिता हाडा :-** विषय हा खुप मोठया काळापासुन लांबत आहे. हे मान्य आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** घनकचरा प्रकल्पाचे काय झाले.

**सौ.शुचिता हाडा :-** आता प्रशासनाने जी भुमिका दर्शवलेली आहे ती संशय निर्माण करणारी आहे हे सुध्दा तेवढच खरं आहे.

**मा.उपमहापौर :-** भाऊ एक मिनीट, मला असे वाटते, प्रशासनाने जो प्रस्ताव दिलेला आहे. त्याच्या आपल्याला काय सुचना मांडायच्या आहे. त्या पध्दतीने प्रशासनाने कराव आणि पाणी पुरवठ्याच्या संदर्भात हीच एजन्सीला डी.पी.आर. करण्याच्या संदर्भात आपण नेमलेले आहे. आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर.

**मा.उपमहापौर :-** तर हीच आता आपल्या मलनिस्सारणचे काम करतांना त्यांच्यासाठी आपल्या काय सुचना आहे ते आपण प्रशासनाला मांडाव्या. त्याच्यामध्ये प्रशासन सुधारणा करुन घेईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याच्यात पण कसे आहे कुलभुषणभाऊ, आपले जे क्रायटेरीयाज शासनाने ठरवुन दिलेले आहे ना. ते क्रायटेरीया याच्यावर ॲपलिकेबलच आहे.

**मा.उपमहापौर :-** त्यांच फॉरमेटच आहे ना भाऊ ते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या व्यतिरिक्त जर काही सुचना मांडायचे असेल ना तर मांडु शकता.

**मा.उपमहापौर :-** तेच म्हणतो मी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** उलटपक्षी काय झाले. यापुढे जाऊन मी बोलतो, साधारणता याच्यामध्ये कन्सल्टन्सी फी ७ कोटी ४८ लाख रुपये जाईल. मी याच्या संदर्भात नेहमी म्हणतो. अजुन आपल्या ताब्यात जागा नाही. सदरहु कन्सल्टन्ट ने आपल्याला आय.डी.बी. फायनल करुन द्याव्या. आणि त्याच्यानंतरच कार्यादेश जो आहे. डी.पी.आर. बनविण्याच्या संदर्भात कार्यादेश इशु करण्यात यावा म्हणजे असे नाही आहे की, जागा नसतांना फक्त डी.पी.आर. तयार करुन घेतला, आणि कन्सल्टन्सी फी अदा केली, असे ही नाही. पहिले जागा आयडेन्टीफाय करुन द्यायच्या, याच कन्सल्टन्टच्या माध्यमातुन आणि कन्सल्टन्टने जागा आयडेन्टीफाय केल्यानंतर त्याला उर्वरित कामाचा डी.पी.आर. बनविण्याकरीता कार्यादेश देण्यात यावा. जेणे करुन आपल्या पैश्यांचे अपव्यव होणार नाही त्याच्यामध्ये. म्हणजे जितकी काळजी आपल्याला घ्यायची आहे. ती आपण घेतोच आहे. आणि जे कॉम्पीटेट्यु रेट आलेले आहे ना.आज जर कधी हा आपण ऑफर न मागविता ३% शासनाने दिलेल्या मुभेचा गैरफायदा घेतला असता, एखाद्या एजन्सीला ३% २.७५% देऊन

दिले असते, जसे निसर्गच्या बाबतीत घडलेले होते. जे काम २.५% मध्ये होणार होते ते काम आता फक्त ०.७५% मध्ये काम आपले मार्गी लागत आहे. म्हणजे एका प्रकारे निसर्गच्या बाबतीत आपली घेतलेली भुमिका महापालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीकोणातुन योग्यच ठरलेली आहे. आणि आता कमीत कमी या कामाला गती मिळण्याचे दृष्टीकोणातुन त्याच्यावरती निर्णय घेणे हे आवश्यक ठरते. याच्या मध्ये कुठे, ताई म्हणत आहे तशी शंका निर्माण झाली असेल तर निश्चितपणे सभागृहाने आपण पण विचार केला असता, आपल्याला कुठेही असे ना की, कोणाचे हित संबंध साध्य करण्याच्या अश्यातला काही हेतु दिसत नाही.

**सौ.शुचिता हाडा :-** हे आता इनक्ल्युडींग GST आहे की, एक्सक्ल्युडींग GST आहे.

**श्री.योगेश बोरोले, प्रकल्प अभियंता :-** इनक्ल्युडींग GST आहे की, एक्सक्ल्युडींग GST आहे आता.

**श्री.नितीन लढ्ढा :-** इनक्ल्युडींग GST आहे

**सौ.शुचिता हाडा :-** त्याच उल्लेख ठरावात आला पाहिजे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई, त्यांनी जे ॲनेक्चर दिलेला आहे ना ते इनक्ल्युडींग GST च दिलेल आहे. आणि जो डॉकेट आलेल आहे. सोबत जोडलेल्या ॲनेक्चर मध्ये स्पष्ट केलेलेच आहे की, Below rates are including १८% GST and all other taxes. म्हणजे GST व्यतिरिक्त अजुन ही काही टॅक्सेस असतील ते ही त्याच्यामध्ये समाविष्ट आहे या मध्ये.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ते ठरावात आल पाहिजे.

**सौ.शुचिता हाडा :-** जो आपला करारनाम्याचा मसुदा दिलेला आहे त्यानुसारच करारनामा झाला पाहिजे. या सगळया याच्यात कोणताही बदल प्रशासनाने परस्पर केला तर त्याला सर्वस्वी प्रशासन जबाबदार राहणार.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ही एक ओळ टाकुन घ्या ठरावात, नियमानुसार कार्यवाही करावी लेखापरिक्षणात काही आक्षेप निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. हे वाक्य आपल्या पुर्ण ठरावात टाकुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** सदरील पत्राचा गैरवापर झाल्यास.

**श्री.नितीन लढ्ढा :-** फक्त त्याच्यामध्ये एक सुचना नमुद करुन घ्यायची. पहिले जागा झाल्यानंतर तदनंतरच कार्यादेश देण्यात यावे. प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.११९९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अमृत २.० अभियाना अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेसाठी शासन परीपत्रक क्रं.अमृत-२०२२/प्र.क्रं.२०३/नवि-३३ दिनांक १६ सप्टेंबर २०२२ अन्वये शासनाने सुचना निर्गमित केलेल्या आहेत. महानगरपालिकेने अमृत अभियाना अंतर्गत सिटी वॉटर ॲक्शन प्लॅन दिलेला असून यात मलनिस्सारण योजनेचे उर्वरीत झोन क्रं.०२,०३ व ०५ साठी एकुण तरतूद रु.१३४२.७३ कोटी (०५ वर्षे देखभाल दुरुस्तीसह) करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रं.५ नुसार मलनिस्सारण योजनेचा प्रकल्प अहवाल तयार करणेकामी शासनाने निर्धारीत करुन दिलेल्या सुचीतील सल्लागारांना दर सादर करणेबाबत ई मेल संदेशाव्दारे दि.०९/०६/२०२३ कळविलेले होते. यात कामाचे विस्तृत विवरण, करार मसुदा व किमान रु.२०० कोटी रकमेचे मलनिस्सारण योजनेचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम पूर्ण केले असल्याचे व आजमितीस प्रकल्प यशस्वीरित्या कार्यान्वित असल्याचे संबंधित प्राधिकरणाचे अनुभव प्रमाणपत्र मागितलेले होते.

सदर कामासाठी शासनाच्या सुचीवर सुचीबध्द असलेले ०७ सल्लागारांपैकी फक्त फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांनी मनपास दर व अनुभव प्रमाणपत्र मुदतीत सादर केले आहे. सदर सल्लागार यांनी सोबत जोडलेल्या अनुसुचीत दिलेले टप्पेनिहाय दरानुसार काम करणेस तयारी दर्शविली असून याबाबत ईमेल व्दारे कळविले आहे.

मलनिस्सारण योजनेसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे काम करणेसाठी फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांचे सोबतच्या अनुसूचीत दिलेले टप्पे निहाय दर

स्विकृत करणेस व त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्ती करणेस तसेच येणाऱ्या पर्यायी खर्चास व संविदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचनांप्रमाणे प्रशासनाने, फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि.ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांना महानगरपालिकेने जो आपला करारनाम्याचा मसुदा दिलेला आहे. त्या मसुदयानुसारच करारनामा करावा. सदर करारनाम्यात प्रशासनाने कोणताही परस्पर बदल केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

तसेच फोस्ट्रीस इन्फ्राकॉन लि ठाणे - यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन्स,औरंगाबाद संयुक्त उपक्रम करार (जेव्ही) यांचे प्रस्तावासोबतच्या अनुसूचीमध्ये (Appendix-II Financial Rate) (यासोबत दिलेल्या अनुसूचीमध्ये) जे दर दिलेले आहेत त्यामध्ये जी.एस.टी. व इतर सर्व करांचा समावेश केलेला आहे. (Below rates are including 18% GST and all other taxes) त्यानुसारच अनुसूचीत दिलेल्या टप्पेनिहाय दरात काम करुन घ्यावे. त्याअगोदर प्रथमत: (मलप्रक्रिया केंद्रासाठी लागणारी जागा) STP प्लॅन्टची जागा निश्चीत करुन झाल्यानंतरच कार्यादेश देण्यात यावा.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. लेखा परिक्षणात आक्षेप निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील. प्रशासनाने, सभागृहात सन्मा.सदस्य यांनी केलेल्या सूचनांची नोंद घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.४९ :-** केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन १.० व २.० अंतर्गत कचऱ्यावर बायोमायनिंग प्रक्रिया करणेच्या कामासाठी ई- निविदा क्रं.२९० मध्ये निविदा धारक मे.कोर प्रोजेक्ट इंजि. अँड कन्स्लटंट प्रा.लि.अमरावती यांचे प्राप्त निविदा दर हे सर्वात कमीचे प्राप्त झालेले असल्याने दरास, त्यानुसार येणाऱ्या खर्चास व संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.४९ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२०० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत मिशन १.० व २.० अंतर्गत असलेल्या बायोमायनिंग (कचऱ्यावर प्रक्रिया) करणेकामी शासन निर्णय क्रं.स्वमअ/२०२१/प्र.क्रं.२६(४)/नवि-३४ दि.१४/०५/२०२१ नुसार ८०,२९९ घन मीटर व शासन निर्णय क्रं.स्वमअ/२०२२/प्र.क्रं.९३/नवि-३४ दि.१०/०८/२०२२ नुसार ८०,००० घन मीटर परीमाणाच्या कचऱ्यावर प्रक्रिया करणेसाठी एकुण रु.७,१३,१४,९४५/- खर्चास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदर कामास तांत्रिक मान्यता जा.क्रं.मु.अ./नाशिक/चिशा/तां.मा./७८२ दिनांक २०/०५/२०२१ व तांत्रिक मान्यता जा.क्रं.मजीप्रा मंज/तांत्रिक मान्यता/३३८/२०२३ दिनांक २७/०४/२०२३ नुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे. या कामाची निविदा सुचना दैनिक टाईम्स ऑफ इंडीया राष्ट्रस्तर व दैनिक लोकमत राज्यस्तर वृत्तपत्रातून दि.१६/०५/२०२३ रोजी प्रसिध्दीस दिलेली होती. सदर कामाची निविदा पूर्व बैठक ही दिनांक १९/०५/२०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती यात ०३ निविदाकारांनी सहभाग घेतलेला होता. निविदाकारांनी निविदेबाबत दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने त्यांना दि.२६/०५/२०२३ रोजी स्पष्टीकरण / सुधारणा कळविण्यात आलेल्या आहेत. सदर कामी निविदा कालावधीत एकुण ०३ निविदाकारांनी निविदेस प्रतिसाद दिलेला असून तांत्रिक लिफाफा दि.०१/०६/२०२३ रोजी उघडलेला आहे. लिफाफा क्रं.०१ मधील कागदपत्रांची छाननी केली असता ०३ ही निविदाकार हे पात्र ठरत असून आर्थिक देकार लिफाफा क्रं.०२ दिनांक २२/०६/२०२३ रोजी उघडलेला असून त्यात प्राप्त दर खालील प्रमाणे आहेत.

| निविदा धारकाचे नांव | निविदेत भरलेले दर |
|---|---|
| १) मे.कोर प्रोजेक्ट इंजि. अँड कन्स्लटंट प्रा.लि.अमरावती | रु.४२७/- प्रति घन मीटर |
| २) मे.हिंद अॅग्रो अँड केमीकल्स, कोल्हापुर | रु.४३६/- प्रति घन मीटर |
| ३) मे.साई गणेश इंटरप्राईजेस, वसई, पालघर | रु.४६०/- प्रति घन मीटर |

(वरील दर हे सर्व प्रकारचे करांसह मागविण्यात आलेले आहे)

वरील प्रमाणे प्राप्त झालेले दरांचे अवलोकन केले असता, मे.कोर प्रोजेक्ट इंजि. अँड कन्स्ल्टंट प्रा.लि.अमरावती यांनी दिलेले दर रु.४२७/- प्रति घन मीटर साठी सर्वात कमीचे दिलेले असून या कामासाठी एकुण परीमाण १,६०,२९९ घन मीटर साठी एकुण रु.६,८४,४७,६७३/- (सर्व करांसह) खर्च येणार असुन सदर खर्च मंजूर प्रशासकीय मान्यतेच्या रकमेपेक्षा (रु.७,१३,१४,९४५/-) रु.२८,६७,२७२/- कमी खर्च येणार आहे. सदर कामी स्वच्छ भारत अभियान २.० अंतर्गत मंजूर कामसाठी रु.४२५/- प्रति घन मीटर (करा व्यतिरीक्त) दराप्रमाणे मान्यता दिलेली असून निविदेत प्राप्त दर रु.४२७/- प्रति घन मीटर (करांसह) वाजवी व योग्य असल्याने स्विकारण्यास, त्यानुसार येणारा खर्च रक्कम रु.६,८४,४७,६७३/- ला (सर्व करांसह) व मे.कोर प्रोजेक्ट इंजि. अँड कन्स्ल्टंट प्रा.लि.अमरावती यांचेशी संविदा करणेस, महानगरपालिका निविदा समीतीच्या शिफारशीसह महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ०७ संविदा मधील कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५० :-** जळगांव शहर महानगरपालिका जळगांव सन २०२३-२४ साठी विविध विभागांना लागणारी ऑफसेट छपाई ई-निविदेत आलेले दर निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५० सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव सन २०२३-२४ साठी विविध विभागांना लागणारी ऑफसेट छपाई वार्षीक दर कराराने छपाई करणेकामी ई-निविदा सुचना क्रं.३७/ २०२३-२४ (२nd call) (Tender ID २०२३_JCMCJ_८९१०७४_१) http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने मुदतीत तीन निविदा प्राप्त झालेल्या आहे. निविदा समिती यांच्या मान्यतेने तीन निविदाधारकांपैकी पात्र झालेले तीन निविदाधारकांचे दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आलेला असून सदर निविदेतील बाब क्रं.१ ते १६२ मध्ये खाली नमुद केल्याप्रमाणे सर्वात कमीचे बाबनिहाय दर १)भारत प्रिंटर्स,जळगांव २)ललवाणी प्रिंटींग प्रेस,जळगांव ३)लोकशाही महिला गृह.सह.सो.लि.,जळगांव यांचे प्राप्त झालेले दर स्विकृत करणेस व त्यासाठी येणारा एकूण रक्कम रु.३३.२५/- लक्ष मात्रचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ७ मधील संविदा कलम ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| पुरवठादारांचे नांव | बाब क्रं. |
|---|---|
| भारत प्रिंटर्स,जळगांव | २,५,७,१०,११,१२,१५,१७,१८,३१,३२,४५,४६,४७,५०,५१५६,५७,५८,५९,६०,६३,६५,६६,६९,७६,७९ ,८11०,८४,८८,८९,९०,९१,९२,९९,१०३,१०४,१११,११२,११४,११५,११७,११८,१२५,१२८,१३०,१३१ ,१३६,१३८,१४१,१४२, १४८,१४९,१५०,१५२,१५४ व १६०. |
| लोकशाही महिला गृह.सह.सो.लि.,जळगांव | ३,६,९,१४,१६,१९,२०,२१,२४,२५,२६,३२,३४,३५,३९,४८,५३,५४,५५,६२,६४,७२,७४,७७,७८,८३,८५,८६, ८७,९५,९८,१००,१०२,१०५,१०८,१०९,११०,१२०,१२२,१२७,१३७,१४३,१४४,१५३,१५६,१५७,१५९ व १६२. |
| ललवाणी प्रिंटींग प्रेस,जळगांव | १,४,८,१३,२२,२३,२७,२८,२९,३०,३२,३३,३६,३७,३८,४०,४१,४२,४३,४४,४९,५२,६१,६७,६८,७०,७१,७३, ७५,८१,८२,९३,९४,९६,९७,१०१,१०६,१०७,११३,११६,११९,१२१,१२३,१२४,१२६,१३२,१३३,१३४,१३५, १३९, १४०,१४१,१४५,१४६,१४७,१५१,१५५,१५८ व १६१. |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५१ :-** सन २०२३-२४ या शालेय वर्षाकरिता जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील मुलांना पुरक पोषण आहार पुरविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५१ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाने पारित केलेला शासन निर्णय याचिका २०१९/प्र.क्र.५/का-५ दि.०३ एप्रिल २०१९ अन्वये पोषण आहार दर रु.८.००/- मात्र करण्यात आलेला आहे. त्यानुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रती बालक प्रती दिन रु.८.००/- पै. मात्रचा आहाराचा दर विहीत करण्यात आलेला आहे. जळगांव शहर महानगरपालिकेव्दारे सदया मराठी माध्यमाच्या ९ व सेमी इंग्रजी माध्यमाच्या २० अशा एकुण २९ बालवाडया चालवील्या जातात. शैक्षणिक सत्रातील सर्व सुट्टया वगळता साधारणता विदयार्थी संख्या १३०० X पोषण आहाराचा प्रती विदयार्थी दर रु.८.००/- X पोषण आहाराचे दिवस २४५ = रुपये २५,४८,०००/- मात्र याप्रमाणे खर्च लक्षात घेता सन २०२३-२४ या शैक्षणीक सत्रासाठी जळगांव शहर महानगरपालिका संचलित बालवाडीतील मुलांना पुरक पोषण आहार पुरविणेसाठी येणारा अंदाजित रक्कम रु.२६,००,०००/- मात्रचा खर्च महिला व बालकल्याण या लेखाशिर्षका खाली सन २०२३-२४ च्या महिला व बाल कल्याण विभागाच्या आर्थिक तरतुदीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५२ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.२४/०५/२०२३ नुसार अखेर डिझेल साठा शिल्लक ४३२० लिटर असुन सदर साठा ०३ ते ०४ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.२४/०५/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९४.२४८३१५/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,३०,९७९.७८/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,६५९.७८/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,६५९.७८/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,६५९.७८/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| एकूण रक्कम रुपये - | | | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ मा.महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०४४ दि.२१/०३/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९३ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९४ दि.२१/०४/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणीनुसार दि.०६/०५/२०२२ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२२-२३/०२ दि.२४/०५/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने तात्काळ निविदा प्रक्रिया पुर्ण करावी निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कार्यादेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून डिझेल खरेदी बंद करावी तसेच वाहनांसाठीची इंधनाची मागणी व सदर वाहनाचे इंधनासाठीची गरज याबाबत खात्री करुन डिझेल पुरवठा करणेची वाहन विभागाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५३ :-** महानगरपालिका विविध विभागात कार्यरत वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) १२००० लिटर खरेदी करणे कामी येणाऱ्या रक्कम रु.११,२९,३२०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा (साठा) करणे बाबत पंप ऑपरेटर यांनी मागणी दिलेली असून दि.२०/०६/२०२३ नुसार अखेर डिझेल साठा शिल्लक २९६० लिटर असुन सदर साठा ०३ ते ०४ दिवसांसाठी पुरवठा होईल इतका शिल्लक आहे.

जळगांव शहर महानगरपालिकेकडील कार्यरत असलेली विविध वाहनांसाठी मा.महासभा ठराव क्र.७४३ दि.१४/०२/२०२२ अन्वये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) स्वरुपात डिझेल खरेदी केली जाते. दि.२०/०६/२०२३ रोजी डिझेल (ठोक/बल्क) खरेदी आणि किरकोळ डिझेल खरेदी यांच्या दराचा (रेट) तफावत दर्शविणारा तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड (ठोक/बल्क) डिझेल खरेदी दर | सर्वोदय सर्व्हिस स्टेशन जळगांव (किरकोळ) डिझेल खरेदी दर |
|---|---|---|
| १ | प्रती लिटर दर रु.९४.२४७३२२५/- | प्रती लिटर दर रु.९४.११/- |
| २ | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,३०,९६७.८७/- | १२००० लिटरसाठी खर्च रक्कम रु.११,२९,३२०/- |
| ३ | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम रु.१,६४७.८७/- | १२००० लिटर प्रमाणे तफावत रक्कम निरंक |

नमुद तक्ता पाहता इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.लि.पानेवाडी डेपो मनमाड यांचेमार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी एकत्रीत करतांना रक्कम रु.१,६४७.८७/- मात्र अधिक खर्च १२००० लिटर डिझेल खरेदी करतांना होणार आहे. महानगरपालिकेला देखील आपल्या वाहनांसाठी डिझेलच्या वाढीव भावाला टाळण्याच्या दृष्टीने व आर्थिक बचत करण्याच्या दृष्टीने स्थानिक खाजगी मात्र अधिकृत विक्रेत्यांकडून डिझेल खरेदी करता येईल. त्यामुळे १२००० लिटरच्या मागे सध्याच्या प्रचलीत दरानुसार रक्कम रु.१,६४७.८७/- मात्र महानगरपालिकेची आर्थिक बचत होईल. तसेच वेळोवेळी डिझेलचे किरकोळ दर चढ-उतार (परिवर्तन) होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ज्यावेळी डिझेल (ठोक/बल्क) खरेदीचे दर किरकोळ दरापेक्षा न्युनतम होतील त्यावेळी पुन्हा इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लि.आय.ओ.सी.पानेवाडी डेपो मनमाड यांचे मार्फत (ठोक/बल्क) डिझेल खरेदी करता येईल.

महानगरपालिकेने यापुर्वी स्थायी समिती ठराव क्रं.११२२ दि.०८/०२/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.११८२ दि.२६/०४/२०१३, स्थायी समिती ठराव क्रं.९१ दि.१९/०७/२०१४ अन्वये पारीत ठरावाच्या अनुषंगाने इंडीयन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडून महानगरपालिकेस आवश्यक असलेले इंधन (डिझेल) स्थायी समितीच्या पारीत ठरावानुसार निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी केलेली आहे.

किरकोळ डिझेल खरेदी दर (बाजारभाव) व बल्क दर यामध्ये जोपर्यंत तफावत राहील तोपर्यंत बाजारभावातुन किरकोळ इंधन खरेदी करणे महानगरपालिकेस फायदेशीर राहील.

| प्राप्त झालेल्या इंधन (डिझेल) दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | कामाचे नांव | Quantity | मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन, (आय.ओ.सी.डिलर) जळगांव |
| १ | महानगरपालिका कार्यरत विविध वाहनांसाठी किरकोळ दरात इंधन (डिझेल) खरेदी करणे बाबत. | १२००० लि. | प्रति लिटर दर रु.९४.११/- |
| | | | ११,२९,३२०/- |
| | | एकूण रक्कम रुपये - | ११,२९,३२०/- |

महासभा ठराव क्रं.८८६ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, महासभा ठराव क्र.८८७ दि.०८/०८/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मा.महासभा ठराव क्रं.९२७ दि.०७/१०/२०२२ अन्वये १२००० लिटर्स डिझेल, मा.महासभा ठराव क्रं.९४१ दि.२१/१०/२०२२, मा.महासभा ठराव क्रं.९७७ दि.२३/१२/२०२२ मा.महासभा ठराव क्र.१००१ दि.१५/०२/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०४४ दि.२१/०३/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९३ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्र.१०९४ दि.२१/०४/२०२३, मा.महासभा ठराव क्रं.११३४ दि.३०/०५/२०२३ अन्वये १२००० लिटर्स डिझेल मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून किरकोळ दरात डिझेल खरेदी करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांना देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार त्यांनी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडील वाहन चालक व विभागप्रमुखांच्या मागणीनुसार दि.०१/०६/२०२२ ते आजपावेतो किरकोळ स्वरुपात इंधन (डिझेल) चा पुरवठा केलेला आहे. त्यानुसार मनपा वाहनांसाठी डिझेल पुरवठा करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव हा पंप एम.आय.डी.सी.रोडवर असल्याने सदर पंपावरुन डिझेल घेणे सोयीचे होईल.

सबब इंधन (डिझेल) खरेदी कामी ई-निविदा सुचना क्रं.३१५ सन-२०२३-२४ दि.०७/०६/२०२३ अन्वये ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निविदा प्रक्रीया अंतिम होईपावेतो तात्पुरत्या स्वरुपात व तातडीने आवश्यक असलेले इंधन (डिझेल) किरकोळ स्वरुपात खरेदी करण्याकामी मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांच्याकडील इन्व्हाइस नं.२०२३-२४/०३ दि.२०/०६/२०२३ अन्वये १२००० लिटर डिझेल खरेदी कामी रक्कम रु.११,२९,३२०/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर खर्चास तसेच इंडियन ऑईल कॉर्पोरेशनचे अधिकृत विक्रेते मे.सर्वोदय सर्व्हिस स्टेशन,जळगांव यांचेकडून निविदा न मागविता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा कलम (२) (२) नुसार किरकोळ डिझेल खरेदी करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने तात्काळ निविदा प्रक्रिया पुर्ण करावी निविदा प्रक्रिया पुर्ण होवून कार्यादेश निर्गमित झाल्याचे दिनांकापासून डिझेल खरेदी बंद करावी तसेच वाहनांसाठीची इंधनाची मागणी व सदर वाहनाचे इंधनासाठीची गरज याबाबत खात्री करुन डिझेल पुरवठा करणेची वाहन विभागाने दक्षता घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५४ :-** मनपा विदयुत विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९१४८ (हायड्रोलिक लॅडर) या वाहनाची दुरुस्ती करणे कामी येणारा एकूण रक्कम रु.४१,७३७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका विदयुत विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९१४८ (हायड्रोलिक लॅडर) हे वाहन विदयुत विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. सदर वाहनाचे दुरुस्तीचे कामे नविन स्पेअर पार्टस्सह व मजुरीसह करणे कामी वाहन चालक यांचा टिप्पणी रिपोर्ट व मागणी क्रं.१५३१५ दि.२१/०४/२०२३ व वाहन चालक यांच्या मागणी कार्यालयीन टिप्पणी प्रमाणे वाहनाचे दुरुस्तीची कामे नविन स्पेअर पार्टस्सह मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

वाहन क्रं.एम एच १९ एम ९१४८ (हायड्रोलिक लॅडर) वाहनाचे वाहन चालक यांनी दिलेल्या मागणी व टिप्पणी रिपोर्ट प्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस् / मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमीटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०२/०६/२०२३ अन्वये खर्च रक्कम रु.४१,७३७/- मात्र अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत सदर खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.४१,७३७/- मात्रचा कार्यादेश देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५५ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ मधील स्वामी समर्थ चौक ते पाटचारी (राज शाळेसमोर) पर्यंतचा डी पी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व प्रभाग क्रं.१४ मेहरुण मधील राम नगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे (एकत्रित ०२ कामे मनपा निधी व नागरी दलितेत्तर वस्ती) कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरास व याकामी येणारा एकूण रक्कम रु.२,१८,४१,२६६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१४ मधील स्वामी समर्थ चौक ते पाटचारी (राज शाळे समोर) पर्यंतचा डी पी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे व प्रभाग क्रं.१४ मेहरुण मधील राम नगर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे (एकत्रित ०२ कामे मनपा निधी व नागरी दलितेत्तर वस्ती) कामास महासभा ठराव क्रं.७६९ दि.२४/०३/२०२३ च्या मान्यतेने व जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर./२७५/२०२३ दि.३०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२८/०४/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२६३ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९९६९५ _१) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१९९ दि.०२/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.लोकमत राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता

संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१,८०,३३,२०९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | डी एच पाटील कंन्स्ट्रक्शन<br>प्रोपा विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दराने | १,८३,९३,८७३/- |
| २ | श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दराने | २,०७,३८,१९०/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार डी एच पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्यास त्यांनी दि.१२/०६/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१०९७ दि.१२/०६/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंती अपेक्षीत खर्च रक्कम | १,८०,३३,२०९/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ३२,४५,९७८/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ९०,१६६/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | २२,३००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ४,४९,६१३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | २,१८,४१,२६६/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.२,१८,४१,२६६/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,८६,७९,१६६/- मात्र हा नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत च्या निधीतून व उर्वरीत रक्कम रु.३१,६२,१००/- मात्र मनपा अर्थ संकल्पातील नविन रस्ते या लेखाशिर्षातुन सन २०२३-२४ अंतर्गत करणेस व त्यानुसार मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५६ :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०२ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे (०३ कामांची एकत्रित) कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दरास व याकामी येणारा एकूण रक्कम रु.८३,९३,८४५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०२ मध्ये रस्ते डांबरीकरण करणे (०३ कामांची एकत्रित) कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नपा/नियोजन/आर.आर./२७९/२०२३ दि.३०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.११/०४/२०२३ च्या मान्यतेअन्वये उक्त कामाची एकत्रित ई निविदा सुचना क्रं.२४९ सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/९५ दि.१३/०४/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रात दि.१४/०४/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०१ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली असल्याने सदर कामाच्या ई निविदे प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसल्याने दुसऱ्यावेळेस ई निविदा सुचना क्रं.२६५ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९९८२५ _१) सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१९८ दि.०२/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी या वर्तमानपत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१,८०,३३,२०९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दराने | ७०,२६,३०४/- |
| २ | वैष्णवी बिल्डकॉन | निविदा रक्कमेवर १५% जास्तीचे दराने | ७४,१३,०७३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला न येता वाटाघाटी अंती निविदेत नमुद दरात दर कमी न करता निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.०२/०६/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./९२१ दि.०२/०६/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांची तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन त्यात चालु प्रचलीत दर हे सोबत दिलेल्या तुलनात्मक तक्त्यात नमुद प्रमाणे १०.४२% जादा येत असल्याबाबत कनिष्ठ अभियंता यांनी नमुद केले आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दर व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेले दर यांची गणिती केली असता सदरची निविदा रक्कम ही चालु प्रचलीत जिल्हादर सुचिच्या रक्कमेपेक्षा १.४२% ने कमीचे दर येत आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी निविदा रक्कमेवर ९% जास्तीच्या दरानुसार होणारी एकुण रक्कम रु.७०,२६,३०४/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दर त्यानुसार अपेक्षीत खर्च रक्कम | ७०,२६,३०४/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १२,६४,७३५/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ३५,१३२/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ५३,२२०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | १४,४५४/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ८३,९३,८४५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.८३,९३,८४५/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५४,०४,९८१/- मात्र

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गतच्या निधीतुन व याच योजनेतील मनपा हिस्सा व जादा दरानुसार होणारी रक्कम रु.२९,८८,६६४/- मात्र मनपा निधीतुन सन २०२३-२४ चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करणेस व त्यानुसार मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ९% जास्तीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५७ :-** नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ सि.स.नं.४४४ आदर्श नगर कॉंक्रीटरोड तयार करणे व प्रभाग क्रं.१४ मेहरुण स.नं.२५३/२, २५३/३ जवाई कॉलनी मध्ये रस्ते डांबरीकरण करणे (एकत्रित ०२ कामे मनपा निधी व नागरी दलितेत्तर वस्ती) कामी मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरास व याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,६४,८९,४८५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, नागरी दलितेत्तर वस्त्यात सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१४ सि.स.नं.४४४ आदर्श नगर कॉंक्रीटरोड तयार करणे व प्रभाग क्रं.१४ मेहरुण स.नं.२५३/२, २५३/३ जवाई कॉलनी मध्ये रस्ते डांबरीकरण करणे (एकत्रित ०२ कामे मनपा निधी व नागरी दलितेत्तर वस्ती) कामास आयुक्त यांचे दि.२५/०४/२०२३ च्या मान्यतेने व जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/नियोजन/आर.आर./२७५/२०२३ दि.३०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, मनपा यांचे दि.२८/०४/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२६४ (Tender ID - २०२३ _ JCMCJ _ ८९९७२१ _१) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१९९ दि.०२/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.लोकमत राज्यस्तरीय या वर्तमानपत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असुन आलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१,३५,५४,७३९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | डी एच पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दराने | १,४९,१०,२१२/- |
| २ | श्री विलास प्रभाकर पाटील | निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दराने | १,४२,३२,४७५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दरात काम करण्यास त्यांनी सा.बा.आ.क्रं./११५० दि.१४/०६/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. सदरच्या दरानुसार होणारी एकुण रक्कम रु.१,३५,५४,७३९/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार

जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति निविदा रक्कमेइतके दर त्यानुसार अपेक्षीत खर्च रक्कम | १,३५,५४,७३९/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | २४,३९,८५३/- |
| ०३ | कामगार विमा १% | १,३५,५४७/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | १९,६२०/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ३,३९,७२६/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | १,६४,८९,४८५/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,६४,८९,४८५/- मात्रला मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,४९,९९,९९९/- मात्र हा नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गतच्या निधीतून व रक्कम रु.१४,८९,४८६/- मात्र मनपा निधीतुन सन २०२३-२४ चे लेखा शिर्ष या लेखाशिर्षातून करणेस व त्यानुसार मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५८ :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील उस्मानीया पार्क स.नं.४१८ मधील प्रमुखमार्ग खडीने करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.३९,२६,५०९/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५८, ५९,६० आणि ६१ ही सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील उस्मानीया पार्क स.नं.४१८ मधील प्रमुखमार्ग खडीने करणे कामास आयुक्त, म.न.पा. यांचे दि.०३/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये तसेच महासभा ठराव क्र.१०५४ दि.२१/०४/२०२३ अन्वये जाहीर ई निविदा सुचना क्रं.२७१ सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२६८ दि.०४/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.तरुण भारत या वर्तमानपत्रात दि.०५/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी कागदपत्र क्र.०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी लिपीक संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.२८,८३,२३५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | २८,८३,२३५/- |
| २ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर ५% जास्तीचे दराने | ३०,२७,३९६/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.२८,८३,२३५/- मात्र इतका खर्च निविदा

रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | २८,८३,२३५/- |
|---|---|---|
| ०१ | टेस्टींग चार्जेस | २३००/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ५,१८,९८२/- |
| ०३ | कामगार विमा १% | २८,८३२/- |
| ०४ | रॉयल्टी चार्जेस | ४,९३,१६०/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ३९,२६,५०९/- |

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील उस्मानीया पार्क स.नं.४१८ मधील प्रमुखमार्ग खडीने करणे कामी प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.५९ :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मध्ये उज्वल चौका पासुन श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.३८,०३,३१६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५८, ५९,६० आणि ६१ ही सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मध्ये उज्वल चौका पासुन श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामास आयुक्त, म.न.पा. यांचे दि.२३/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये तसेच महासभा ठराव क्र.१०५३ दि.२१/०४/२०२३ अन्वये जाहीर ई निविदा सुचना क्रं.२७२ सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/२७६ दि.०८/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.सामना या वर्तमानपत्रात दि.०९/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी कागदपत्र क्र.०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी लिपीक संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३०,९९,४४५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | ३०,९९,४४५/- |
| २ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर ७.५१०% जास्तीचे दराने | ३३,३२,२१३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.३०,९९,४४५/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३०,९९,४४५/- |
|---|---|---|
| ०१ | टेस्टींग चार्जेस | ११,४७०/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ५,५७,९००/- |
| ०३ | कामगार विमा १% | ३०,९९४/- |
| ०४ | रॉयल्टी चार्जेस | १,०३,५०७/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ३८,०३,३१६/- |

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ मध्ये उज्वल चौका पासुन श्री.भगवान सोनवणे यांच्या घरापासुन ते प्रशांत चौका पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे कामी वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.३८,०३,३१६/- मात्रचा खर्च नविन रस्ते या लेखशिर्षका खाली सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातून करणेस तसेच मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६० :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ व.वा. मार्केट मनपा जवळ फायर ऑफीस ते खाऊगल्ली रस्ता काँक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.६२,४४,००२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५८, ५९,६० आणि ६१ ही सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ व.वा. मार्केट मनपा जवळ फायर ऑफीस ते खाऊगल्ली रस्ता काँक्रीटीकरण करणे कामास आयुक्त, म.न.पा. यांचे दि.१४/०२/२०२३ च्या मान्यते अन्वये तसेच महासभा ठराव क्र.१०१५ दि.२१/०३/२०२३ अन्वये जाहीर ई निविदा सुचना क्रं.२६१ सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई - निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा/१४२ दि.२१/०४/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमानपत्रात दि.२२/०४/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी कागदपत्र क्र.०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी लिपीक संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | ५१,६०,१५९/- |
| २ | श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दराने | ६०,८८,९८७/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.५१,६०,१५९/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ५१,६०,१५९/- |
|---|---|---|
| ०१ | जि.एस.टी. १८% | ९,२८,८२८/- |
| ०२ | कामगार विमा १% | ५१,६०२/- |

| | | |
|---|---|---|
| ०३ | टेस्टींग चार्जेस | १३८०.००/- |
| ०४ | रॉयल्टी चार्जेस | १,०२,०३३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ६२,४४,००२/- |

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०५ व.वा. मार्केट मनपा जवळ फायर ऑफीस ते खाऊगल्ली रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी वर नमुद निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६२,४४,००२/- मात्रचा खर्च नविन रस्ते या लेखशिर्षका खाली सन २०२३-२४ या वित्तीय वर्षातून करणेस तसेच मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल :- ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६१ :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१० पिंप्राळा गट नं.२१४/३, २१४/४ व २१६ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.योगराज गणेश पाटील यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचे दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.६५,७८,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.५८, ५९,६० आणि ६१ ही सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.१० पिंप्राळा गट नं.२१४/३, २१४/४ व २१६ मध्ये आर.सी.सी.गटार बांधणे कामास महासभा ठराव क्र.१०३३ दि.२१/०३/२०२३ नुसार प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, म.न.पा. यांचे दि.०९/०३/२०२३ च्या मान्यते अन्वये जाहीर ई निविदा सुचना क्रं.२९६ सा.बा./जा.क्र.३६८ दि.१९/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्य नगरी या वर्तमान पत्रात दि.२०/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे https://mahatenders.in वर निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे आलेले कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.५४,७४,४८५/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.निखील कृष्णराज पाटील | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दरात | ५५,८३,९७५/- |
| २ | श्री.योगराज गणेश पाटील | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | ५४,७४,४८५/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.योगराज गणेश पाटील यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५४,७४,४८५/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ५४,७४,४८५/- |
|---|---|---|
| १ | जि.एस.टी. १८% | ९,८५,४०७/- |
| २ | कामगार विमा १% | ५४,७४५/- |
| ३ | टेस्टींग चार्जेस | ३,९३०/- |
| ४ | रॉयल्टी चार्जेस | ६०,०९३/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ६५,७८,६६०/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.६५,७८,६६०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.६५,७८,६६०/- मात्र मनपा

अर्थ संकल्प २०२३-२४ चे नविन गटार या लेखाशिर्षा खाली मंजुर झाले असल्याने सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात खर्च करावयाचा आहे त्यानुसार मक्तेदार श्री.योगराज गणेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६२ :-** मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरा पासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.३६,९५,८६४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरा पासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामास आयुक्त यांचे दि.२८/०४/२०२३ च्या मान्यते अन्वये तसेच महासभा ठराव क्र.९९२ दि.१५/०२/२०२३ अन्वये जाहीर ई निविदा सुचना क्रं.२७० सा.बा/जा.क्र./२६८ दि.०४/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.तरुण भारत या वर्तमानपत्रात दि.०५/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता दि.१७/०५/२०२३ पर्यंत मुदतीत संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे आलेले बंद पाकीटापैकी कागदपत्र क्र.०१ शहर अभियंता यांचे समक्ष उघडले असुन त्यांची विस्तृत छाननी लिपीक संबंधीत शाखा अभियंता व पवडी उपलेखापाल यांचे कडुन करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.३०,७३,०१३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | ३०,७३,०१३/- |
| २ | श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी | निविदा रक्कमेवर ३.१५०% जास्तीचे दराने | ३१,६९,८१२/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच कमी दर आलेले आहे. त्यानुसार सदर रक्कम रु.३०,७३,०१३/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| अ.नं. | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ३०,७३,०१३/- |
|---|---|---|
| ०१ | टेस्टींग चार्जेस | १३८०/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | ५,५३,१४२/- |
| ०३ | कामगार विमा १% | ३०,७३०/- |
| ०४ | रॉयल्टी चार्जेस | ३७,५९९/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | ३६,९५,८६४/- |

मनपा निधी अंतर्गत प्रभाग क्र.०२ अंतर्गत कालंकामाता मंदिरा पासुन ते सदगुरु किराणा स्टोअर्स पर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण करणे कामी प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.स्वप्नील नरेंद्र चौधरी यांचे अंदाजीत रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६३ :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०४ मध्ये काटयाफाईल, बळीराम पेठ, शनिपेठ, बालाजीपेठ व जुने जळगांव परिसर व इत्यादी ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणे व याकामी येणारा एकूण रक्कम रु.१,४६,८३,०१६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्र.६३ वर बोलायचे आहे. दि.१० ऑगस्ट २०२२ दलित वस्तीच्या अंतर्गत हा निधी मंजुर झाला होता. त्या टाईमाला प्रशासनाने वस्तुस्थितीनुसार प्रस्ताव पाठविले नाही. आता हा प्रस्ताव वापस गेला. वापस जे वेळेला प्रस्ताव मागविले, त्याच्या मार्फत हा प्रस्ताव पाठविला नाही, आणि आता हा प्रस्ताव महापालिकेच्या फंडात आला, मग याची जबाबदारी कोणाची. हे ४६ लाखाचा विषय आहे हा. दलित वस्तीत मंजुर झालेला हा १० ऑगस्टला, ११ कोटी २५ लाखामध्ये. त्यावेळेला हेच कामे त्याच्यामध्ये आलेले होते. प्रशासनाच्या काही भेसळ कारभारमुळे हा प्रस्ताव टाकलेला नाही त्यावेळेस. वापस पाठविलेल्यानंतर वेळ चालला गेला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, तो दलितवस्तीचा निधी आता दुसऱ्या कामात येईल ना.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ते दुसरीकडे वापरायचे ठरले होते आपले सभागृहात.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्र.०४ मध्ये काटयाफाईल, बळीराम पेठ, शनिपेठ, बालाजीपेठ व जुने जळगांव परिसर व इत्यादी ठिकाणी रस्ते काँक्रीटीकरण करणे कामास महासभा ठराव क्र.१११८ दि.३०/०५/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, म.न.पा. यांचे दि.०२/०६/२०२३ च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.३१४ सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./४७८ दि.०५/०६/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्य नगरी या वर्तमान पत्रात दि.०६/०६/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता ई-निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०.०० (एकही नाही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेली नसल्याने सदर कामाच्या ई निविदे प्रक्रियेस प्रतिसाद मिळत नसल्याने दुसऱ्यावेळेस फेर ई निविदा करण्यास आयुक्त यांनी दि.१४/०६/२०२३ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची दुसऱ्या वेळेस फेर ई निविदा सुचना क्रं.३२१ (Tender ID -२०२३_JCMCJ_९१६०९६_ १) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./५७० दि.१५/०६/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमान पत्रात दि.१६/०६/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे https://mahatenders.in वर दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे कामाचे आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली असुन त्यात आलेल्या निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१२०४४११८/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री बालाजी इंन्फ्रास्ट्रक्चर | निविदा रक्कमेइतकेचेच दरात | १२०४४११८/- |
| २ | श्री.पंकज गजानन वाघ | निविदा रक्कमेवर ४.९९९% जास्तीचे दराने | १२६४६२०३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेइतकेचेच दर आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.१२०४४११८/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | १२०४४११८/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | २१६७९४१/- |
| ०३ | कामगार विमा १% | १२०४४१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ३४५०/- |
| ०५ | रॉयल्टी | ३४७०६६/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | १४६८३०१६/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,४६,८३,०१६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.१,४६,८३,०१६/- मात्र मनपा लेखा शिर्ष सन २०२२-२३ नविन रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गतच्या निधीतुन खर्च करावयाचा आहे त्यानुसार मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६४ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या १ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०५ मध्ये ओंकार नगर व गांधीनगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे (०३ शासकीय निधी व ०३ मनपा निधी असे एकुण ०६) कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या १ कोटी अनुदाना अंतर्गत प्रभाग क्रं.०५ मध्ये विविध ०१ ते ०३ कामांचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता जिल्हाधिकारी,जळगांव यांच्या कडेस पत्र क्रं.जशमनपा/साबा/१९१ दि.१३/०४/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार उक्त कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात जिल्हास्तरीय समितीची दि.१२/१०/२०२२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली त्यात ०१ ते ०३ कामांना मान्यता देण्यात आली त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी,जळगांव यांनी त्यांच्या कडील पत्र क्रं.पालिका/कावि-०४/८१ दि.२०/०३/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रभाग क्रं.०५ मध्ये ओंकार नगर व गांधीनगर मध्ये रस्ते डांबरीकरण

करणे (०३ शासकीय निधी व ०३ मनपा निधी असे एकुण ०६) कामाची एकत्रित ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त,मनपा यांनी दि.१०/०४/२०२३ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२६९ (Tender ID - २०२३_JCMCJ_९००११६_१) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./२०९ दि.०३/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता ई-निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे कामाचे आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१५३१९८३३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेवर १२.८३०% जास्तीचे दराने | १७२८५३६८/- |
| २ | एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर १८% जास्तीचे दराने | १८०७७४०३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर १२.८३०% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती ७% जास्तीचे दरात काम करण्यास त्यांनी दि.२३/०६/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१३५९ दि.२३/०६/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे. निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत राज्य दर सुचितील दर यांची कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता त्यात चालु प्रचलीत दर हे ७.८०% ने जादा येत आहे. मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेले दर यांची गणिती केली असता सदरची निविदा ही चालुदरसुची नुसारच्या रक्कमेपेक्षा ०.८०% ने कमी येत आहे. त्यानुसार मक्तेदार यांनी निविदा रक्कमेवर ७% जास्तच्या दरानुसार होणारी रक्कम रु.१६३९२२२१/- मात्रची अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीने अपेक्षीत खर्च रक्कम | १,६३,९२,२२१/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | २९,५०,६००/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ८१,९६१/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ६६,१००/- |
| ०५ | रॉयल्टी चार्जेस | ९०,८५६/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :- | १,९५,८१,७३८/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,९५,८१,७३८/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून सदर रक्कमेपैकी रक्कम रु.९९,९७,०२७/- मात्र हिस्सा महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या १.०० कोटी अनुदाना अंतर्गतच्या निधीतुन व मनपा निधीतुन सन २०२३-२४ मधील नविन रस्ते या लेखाशिर्ष अंतर्गत रक्कम रु.९५,८४,७११/- मात्र खर्च करणेस व त्याअनुषंगाने मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६५ :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या २.८० कोटी अनुदान व मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.०५ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे (मनपा ०२ व अनुदान ०१) कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंती परिशिष्ट अ मध्ये नमुद प्रमाणे डांबर फरकाची रक्कम विचारात घेवुन प्राप्त दराबाबत वाटाघाटी अंती आलेले निविदा रक्कमेइतकेच दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.१२१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या २.८० कोटी अनुदाना अंतर्गत प्रभाग क्रं.०५,११ व १४ मध्ये विविध ०१ ते ०७ कामांचा प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळण्याकरीता जिल्हाधिकारी जळगांव यांच्या कडेस पत्र क्रं.जशमनपा/साबा/१०६२ दि.२५/०७/२०२२ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला. त्यानुसार उक्त कामांना प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात जिल्हास्तरीय समितीची दि.०१/१२/२०२२ रोजी बैठक आयोजीत करण्यात आली त्यात ०१ ते ०४ कामांना मान्यता देण्यात आली त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी,जळगांव यांनी त्यांच्या कडील पत्र क्रं.पालिका/कावि-०४/१६/२०२३ दि.२५/०१/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार प्रभाग क्रं.०५ जिल्हा परिषद चौक ते बळीराम पेठ रस्ता डांबरीकरण करणे कामाची ई-निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त,मनपा यांनी दि.०७/०२/२०२३ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.१९५ सन २०२२-२३ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./१८७२ दि.२१/०२/२०२३ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.२२/०२/२०२३ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दि.२१/०२/२०२३ ते दि.०८/०३/२०२३ पर्यंत मुदत देण्यात आली होती. परंतु प्रशासकीय व तांत्रीक कारणामुळे सदरची ई-निविदा रद्द करण्यास शहर अभियंता यांनी दि.२४/०२/२०२३ रोजी मान्यता दिली आहे. त्यानुसार ई-निविदा सुचना क्रं.१९५ रद्द करण्यात आली. तद्नंतर सन्मा.नगरसेवक श्री.नितीन बालमुकुंद लढ्ढा मनपा प्रभाग क्रं.०५ यांनी त्यांचे कडील पत्र दि.०६/०४/२०२३ चे पत्रानुसार उक्त कामासोबत मनपा निधीतील खाली नमुद ०२ कामांची एकत्रीत ई-निविदा प्रसिध्द करण्यास सुचित केलेले आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | महासभा ठराव क्रं. व दिनांक | ठरावानुसार अंदाजित रक्कम | तांत्रिक मान्यता जशमनपा पत्र क्रं. व दिनांक | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्रं.०५ प्रभुदेसाई चौक ते रेल्वेलाईनचा रस्ता डांबरीकरण करणे. | ८१६ दि.३०/०५/२०२२ | २३०००००/- | TS/PWD ९३ दि.२६/०५/२०२२ | २२६६४८७/- |
| २ | प्रभाग क्रं.०५ मधिल आर्कीट हॉस्पीटल ते बि.जे.मार्केट ते खंडवा पीस सेंन्टर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे. | ८१६ दि.३०/०५/२०२२ | ५००००००/- | TS/PWD ९४ दि.२६/०५/२०२२ | ४९४००१६/- |

त्यानुसार या ०२ कामांची व वर नमुद कामाची एकत्रित ई-निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त यांनी दि.१९/०४/२०२३ रोजी मान्यता प्रदान केली त्यानुसार प्रभाग क्रं.०५ मध्ये डांबरी रस्ते तयार करणे (मनपा ०२ व अनुदान ०१) कामाची एकत्रित ई निविदा प्रसिध्द करण्यास आयुक्त,मनपा यांनी दि.१९/०४/२०२३ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.२६८ (Tender ID - २०२३_JCMCJ_९०००४०_१) सन २०२३-२४ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./२०९ दि.०३/०५/२०२३ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०४/०५/२०२३ रोजी प्रसिध्द केली असता ई-निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच पात्र निविदा प्राप्त झाल्या आहे. सदरचे कामाचे आलेल्या ई-निविदांचे कागदपत्रांची छाननी केली असता खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे,

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.१०५६७७६३/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेवर ३०.६५०% जास्तीचे दराने | १३८०६७८२/- |
| २ | एल एच पाटील कंन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर ३५% जास्तीचे दराने | १४२६६४८०/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ३०.६५०% जास्तीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदर निविदेमध्ये मुळ अंदाजपत्रकात तरतुद असलेल्या डांबरातील दराच्या फरकाची एकुण रक्कम रु.२४,६८,६६३/- मात्र समाविष्ट नाही सदर रक्कम कार्यादेशात मंजुर निविदा दराच्या गणितीनंतर स्वतंत्रपणे नमुद करणे आवश्यक आहे व त्यामुळे मक्तेदाराने मनपा मार्फत देण्यात येणाऱ्या निविदा दरावरील जास्तीच्या रक्कमेत बचत होणार आहे. त्याबाबतचा स्वतंत्र तक्ता सोबत जोडण्यात आला आहे. त्यानुसार मक्तेदाराने निविदा दरावर भरलेले जास्तीचे दर हे जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी सा.बा.पत्र क्रं.५६५ दि.१४/०६/२०२३ अन्वये दि.१५/०६/२०२३ दुपारी ०३:०० वाजता बोलविले असता सदर मुदतीत वाटाघाटीसाठी न येता दि.२३/०६/२०२३ रोजी प्रत्यक्ष वाटाघाटीला येवुन वाटाघाटी अंती सोबत दिलेल्या पत्रात नमुद प्रमाणे (१) सदरचे काम निविदा रक्कमेवर २५.४३% जास्तीच्या दरात करण्यास अथवा (२) सदर कामाच्या निविदा रक्कमेत डांबर फरकाची रक्कम समाविष्ठ केलेली नसल्याने डांबर फरकाची रक्कम कामाच्या कार्यादेशात समाविष्ट करीत असाल तर सदरचे काम निविदा दरानेच करण्यास तयार असल्याचे त्यांनी दि.२३/०६/२०२३ रोजी सा.बा.आ.क्रं./१३६६ दि.२३/०६/२०२३ अन्वये लेखी संमती दिली आहे.

मक्तेदार यांनी दिलेल्या पत्रातील मुद्दा क्रं.०१ प्रमाणे निविदेत नमुद दर व चालु प्रचलीत सन २०२२-२३ चे राज्य दर सुचितील दर यांची कनिष्ठ अभियंता यांनी तुलना केली असता सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला असुन त्यात चालु प्रचलीत सन २०२२-२३ चे दर हे २५.५०% ने जादा येत आहे. मक्तेदार यांनी दिलेले वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर २५.४३% जास्तीचे दर व कनिष्ठ अभियंता यांनी दिलेले दर यांची गणिती केली असता सदरची निविदा ही मुळ अंदाजपत्रकातील डांबर फरकाची रक्कम विचारात घेता चालु दर सुची नुसारच्या रक्कमेपेक्षा ०.०७% ने कमी येत आहे.

मुद्दा क्रं.०२ नुसार प्रशासकीय मान्यता आदेश पत्र क्रं.पालिका/कावि-०४/१६/२०२३ दि.२५/०१/२०२३ अन्वये नुसार मंजुर प्रशासकीय मान्यता रक्कमेत व मुळ अंदाजपत्रकात डांबर फरकाची रक्कम समाविष्ठ असुन उपरोक्त प्रमाणे निविदा स्विकारल्यास सदर डांबर फरकाची रक्कम कार्यादेशात समाविष्ठ केल्यास मनपा वर आर्थीक भार पडणार नाही.

त्यानुसार सदर कामी सोबत दिलेल्या तक्त्यात नमुद प्रमाणे डांबर दरातील अंदाजपत्रकातील तरतुदीनुसार फरकाची रक्कम रु.२४,६८,६६३/- मात्र असुन या मध्ये जि.एस.टी. व कामगार विमाच्या रक्कमेचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यामुळे या कामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे निविदा रक्कम रु.१,०५,६७,७६३/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१,३०,३६,४२६/- मात्र अपेक्षीत खर्च आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | निविदा रक्कम | १,०५,६७,७६३/- |
| ०२ | जि.एस.टी. १८% | १९,०२,१९७/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | ५२,८३९/- |
| ०४ | डांबराच्या फरकाची रक्कम | २४,६८,६६३/- |
| ०५ | टेस्टींग चार्जेस | २५,७००/- |
| ०६ | रॉयल्टी चार्जेस | १,१३,१४१/- |
| | **एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु :-** | **१,५१,३०,३०३/-** |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.१,५१,३०,३०३/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत असून शासकीय अनुदानाच्या कामाच्या रक्कमेपैकी रक्कम रु.७९,२६,००३/- मात्र हिस्सा महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोयी सुविधांचा विकास योजने अंतर्गत शासनाने वितरीत केलेल्या २.८० कोटी अनुदाना अंतर्गतच्या निधीतुन पैकी ७५% म्हणजेच रक्कम रु.५९,४४,५०२/- व याच योजनेतील मनपा हिस्सा २५% रक्कम रु.१९,८१,५०१/- मात्र हिस्सा मनपा निधीतुन सन २०२३-२४ चे लेखा शिर्ष मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रम मनपा हिस्सा या लेखाशिर्षतुन करणेस तसेच मनपा निधीतील कामांची रक्कम रु.७२,०४,३००/- मात्र मनपा लेखाशिर्ष नविन रस्ते सन २०२३-२४ मधुन खर्च करणेस व त्यानुसार ७५% शासकीय निधी रक्कम रु.५९,४४,५०२/- + २५% मनपा हिस्सा रक्कम रु.१९,८१,५०१/- मात्र + इतर मनपा निधीतुन करावयाच्या कामांकरीता रक्कम रु.७२,०४,३००/- मात्र अशी एकुण रक्कम रु.१,५१,३०,३०३/- मात्रचा अपेक्षीत खर्च करणेस व त्याअनुषंगाने मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे वाटाघाटी अंती मुळ अंदाजपत्रकात व प्रशासकीय मान्यता रक्कमेत तरतुद असलेली परंतु निविदा रक्कमेत समाविष्ठ नसलेली डांबर दराच्या फरकाची रक्कम ही प्रशासकीय मान्यतेनुसार निविदा रक्कमेत अंतर्भुत केल्यानंतर परिशिष्ठ अ नमुद ०१ ते ०३ कामांची काम निहाय येणाऱ्या रक्कमेत काम करण्यास तयार असल्याचे पत्रानुसार परिशिष्ट अ मध्ये नमुद प्रमाणे डांबर फरकाची रक्कम विचारात घेवुन प्राप्त दराबाबत वाटाघाटी अंती आलेले निविदा रक्कमेइतकेच दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव -विषय क्र.६६:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.६६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. १२१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./७२ दि.०२/०६/२०२३ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी येणाऱ्या एकुण रक्कम रु.१८,८२,९३०/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०७ दि.१८/०५/२०२३ अन्वये पिंप्राळा कुंभारवाडा रोड, सोमाणी काम्प्लेक्स चौक, पिंप्राळा शिवार येथील ११ KV लाईन LT लाईन, २ नग रोहित्र स्थलांतरीत करणे (महावितरण कंपनी मर्या.च्या १.३% सुपर व्हिजन स्किम अंतर्गत) कामी मक्तेदार महेश इलेक्ट्रीकल्स वर्क्स,जळगांव यांचे अंदाजीत रक्कमेत सर्वात कमीचे दर स्विकृत करुन रक्कम रु.८,८९,०८५/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ३१**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीतला सुरुवात करावी.
**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**